नोव्हेंबर'०४
वर्ष चौथे
अंक अकरावा

दीपावली विशेषांक

# मेहता मराठी ग्रंथजगत


* संपादक
सुनील मेहता

* कार्यकारी संपादक
शंकर सारडा

* संपादन सहाय्य
सुनीता दांडेकर

* अंकाची किंमत
४० रु.

* वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

* प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी :
*मेहता पब्लिशिंग हाऊस*



संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-३०.
फोन : २४४७६९२४ फॅक्स :०२०-२४४७५४६२.
Email - mehpubl@vsnl.com Website - mehtapublishinghouse.com


**वार्षिक वर्गणी १०० रु.। तीन वर्षांची २००रु.।पाच वर्षांची ३००रु.**
**३ व ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

# अनुक्रमणिका

संपादकीय ४

## अनोखे ऋणानुबंध


अनोख्या उत्कट नात्याचे बंध उलगडणारे लेखन


द. ता. भोसले ०९
नसीमा हुरजूक १६
रा. रं. बोराडे २०
डॉ.सुवर्णा दिवेकर २२
प्रतिभा काळे २६
महादेव मोरे २९
सुधा चांदोरकर ३६
स्वाती देशपांडे ४०
विद्या चिंचाळकर ४४
डॉ. शंतनु चिंधडे ४६
सुनीता लोहोकरे ५०
संजीव परळीकर ५६
रा. अ. कुंभोजकर ६४
सुनीता दांडेकर ६७
वामन देशपांडे ७१


## नक्षत्रांचे देणे

पुढच्या पिढीला आपण काय देऊ शकतो?



डॉ.अश्विनी धोंगडे ७६
डॉ.सुनीलकुमार लवटे ८३
डॉ.श्यामा घोणसे ८८
प्रमोदिनी वडके-कवळे ९५
सौ.मेधा तेलंग १००
प्र. के. घाणेकर १०५
जयश्री काळे १०८

## अतींद्रिय अनुभव

भरभरून प्रतिसादाच्या लेखस्पर्धेतील निवडक लेख


वनमाला कुलकर्णी १११
शरद महाबळ ११३
माधवी कुंटे ११६
नीलिमा आंगले ११९
मालती नांदापूरकर १२२
डॉ. लीला दीक्षित १२५
रजनी अपसिंगेकर १२८
प्रा. डॉ. शर्मिष्ठा खेर १३०
सुनंदा देशमुख १३३
ना. द. जोशी १३६







## बालनगरी







स्पर्धा, कोडी,
चित्रकथा, साहसकथा
आणि गमतीजमतींची
रेलचेल...





पहा पान नं. १३९पासून पुढे

## संपादकीय

# रात्रीच्या गर्भातला उज्ज्वल उष:काल

पुन्हा एकदा आपल्या सर्वांच्या जीवनात प्रकाशाचे आणि आशावादाचे, उत्साहाचे आणि चैतन्याचे लक्षलक्ष दीप उजळवत दीपावलीचे आगमन झाले आहे. अवतीभवती कितीही अंध:कार असला, अडीअडचणी असल्या तरी त्यांनी विचलित न होता, आपल्या अंतरीचे दीप उजळून त्या प्रकाशात पुढे चालत राहा, दुष्टांचा संहार करा, धनदौलतीची, समृद्धीची आणि लक्ष्मीची पूजा-उपासना करा असा संदेश दीपावली देत असते. रात्रीच्या गर्भात उद्याचा उष:काल आहे याचे प्रेरक स्मरण दीपावली देत असते.

या दीपावलीने आपल्या सर्वांच्या जीवनात नवे प्रकाशाचे, उत्साहाचे आणि कर्तृत्वाचे पर्व सुरू व्हावे हीच अपेक्षा.

'मेहता मराठी ग्रंथजगत'च्या या वर्षीच्या दिवाळी अंकातील वैविध्यपूर्ण सामग्री आपल्या दिवाळीच्या आनंदात निश्चित भर टाकेल असा विश्वास वाटतो.

आयुष्याच्या वाटचालीत अनेक माणसे भेटतात, कमीजास्त जवळ येतात; पण अविस्मरणीय, चिरंतन ऋणानुबंधांची अवीट, अमिट छाप आपल्यावर उमटवून जातात; अशा काही अनुभवांचे दर्शन 'ऋणानुबंध' या विभागात घडेल.

माणूस हा बुद्धिमान प्राणी आहे; आणि आपल्या बुद्धीने, विचारशक्तीने त्याने आपल्या अस्तित्वाला आणि आचरणाला सामाजिक नैतिक मूल्यांची एक व्यापक बैठक देण्याचा सातत्याने प्रयत्न चालवला आहे; बुद्धिप्रामाण्यवादाच्या आग्रहाने अनेक अंध:श्रद्धांवर मात करून, विज्ञाननिष्ठा बाळगून या विश्वातील विविध घटकांची संगती लावण्याचा प्रयत्न चालवला आहे. एका परीने निसर्गालाही आपल्या वेठीला धरण्यात काही प्रमाणात यश मिळवले आहे. बुद्धिमत्ता हे त्याच्या या सर्व वाटचालीतले महत्त्वाचे साधन राहिलेले आहे. परंतु बुद्धिप्रामाण्यालाही चक्रावून टाकणारे काही अनुभव माणसाला येतात. पंचेंद्रियांनी होणाऱ्या ज्ञानाच्या कक्षांना धुडकावून लावणारे ते अनुभव असतात. त्यांना आपण अतींद्रिय अनुभव म्हणतो. अशा अनुभवांची श्रीमंती संतसाधकांकडे आढळते असे आपल्या मनावर बिंबवले जाते. संतांच्या, योग्यांच्या चरित्रकथांमध्ये अशा चमत्कारांची मांदियाळी दिसते. मृत्यूवर मात करणे, पूर्वजन्मांची स्मृती असणे, एकाच वेळी अनेक ठिकाणी वावरणे, लहानमोठी रूपे घेणे, दुसऱ्याच्या मनातील विचार जाणून घेणे, आगामी संकटाची पूर्वसूचना



देणे, अशुभाचे निवारण करणे, भविष्यातील घटनांचा वेध घेणे, भौतिक जड देहातून बाहेर पडून तिन्ही लोकी संचार करणे, कुंडलिनी जागृत होणे, अदृश्य होणे, केवळ स्पर्शाने रोगनिवारण करणे, दूरच्या व्यक्तीशी मानसिक पातळीवर संपर्क साधणे वगैरे गोष्टी या अतींद्रिय शक्तीद्वारे शक्य होतात असे मानण्यात येते. पंचज्ञानेंद्रियांनी आपल्याला होणारे ज्ञान दैनंदिन व्यावहारिक जीवनाचे अधिष्ठान ठरते. पण आणखी काही इंद्रिये असतील असे गृहीत धरून अशा चमत्कारांची संगती लावणे शक्य होईल. उदाहरणार्थ, सहावे ज्ञानेंद्रिय पक्ष्यांची भाषा जाणणारे असेल, सातवे ज्ञानेंद्रिय भूतकाळाचे, पूर्वजन्माचे ज्ञान जाणणारे असेल, आठवे ज्ञानेंद्रिय भविष्याचा वेध घेणारे असेल; नववे दूरवरच्या ग्रहांपर्यंत पोचण्यासाठी आवश्यक ते रूप धारण करण्याच्या क्षमतेचे असेल. अशी ही वेगवेगळी ज्ञानेंद्रिये असू शकतील असे मानले तर आज जे चमत्कार वाटतात ते कदाचित् सर्वसामान्य व्यवहारातील घटनाप्रसंग ठरू शकतील. परदेशातील अनेक विद्यापीठांतून पॅरासायकॉलॉजीवर संशोधन चालू आहे, इनट्युशन, (अंत:प्रेरणा), टेलिपथी, क्लेअर व्हॉयन्स, स्वप्नसंकेत, भूत सृष्टी, दुष्ट संहारक शक्ती वगैरेंचा उलगडा करण्यासाठी वेगवेगळे प्रकल्प राबवले जात आहेत. मनाचा मोठा भाग हा अबोध, अप्रकट असतो; आणि मन हे मेंदूचा एक साधन, एक उपकरण म्हणून वापर करत असते; मन म्हणजे मेंदू नव्हे, शरीर आणि मन यांच्यात ही सुसंवाद असतो असे नाही, बुद्धी-विवेकशक्ती आणि मानवी मन यांच्यातही ताळमेळ असतो असे नाही - वगैरे कल्पना - संकल्पना तपासून घेतल्या जात आहेत; त्यासाठी आवश्यक ती अभ्यासप्रणाली सिद्ध केली जात आहे. मेंदूच्या कार्यपद्धतीचाही वेगवेगळ्या पातळ्यांवरून अभ्यास होत आहे.

अतींद्रियज्ञानाची सीमितक्षमता अनेकांजवळ असते आणि अनेकांना अतींद्रिय म्हणावे असे अनुभव येतात. भावी काळात अतींद्रिय पातळीवरच्या अनुभवांचा अभ्यास हे एक महत्त्वाचे ज्ञानक्षेत्र असणार आहे.

अशा अनुभवांबद्दल लेख पाठवण्याच्या आमच्या आवाहनाला वाचकांकडून बराच प्रतिसाद मिळाला. मृत्यूचा व नंतर जिवंत होण्याचा अनुभव, संकटाच्या वेळी मार्गदर्शक व मदतनीस म्हणून भेटणाऱ्या व्यक्तीचे नंतर अदृश्य होणे, स्वप्नाद्वारे भविष्यकालीन संकटांची पूर्वसूचना मिळणे, आराध्यदैवताचे (उदा. स्वामी समर्थांचे) दर्शन होणे, वगैरे अनुभव अनेक लेखांमध्ये वाचायला मिळाले. काहीवेळा त्यात अतींद्रिय शक्तीपेक्षा योगायोगाचाही भाग अधिक आढळला. वाचकांनी अशा प्रकारच्या अनुभवांकडे चिकित्सकपणे बघावे अशी अपेक्षा आहे. अंधश्रद्धा वा मंत्रमंत्र यांना प्रोत्साहन देण्यासाठी हा उपक्रम नाही; परंतु असे कोणाचे अनुभव असले तर त्यांची नोंद करणारी यंत्रणा हवी असे मात्र वाटते. अशा अनुभवांची सत्यासत्यता तपासण्याचीही गरज आहे.


सध्या 'फँटसी'या प्रकाराला खूप महत्त्व आले आहे; आणि हॅरी पॉटर सारख्या जादूच्या दुनियेची भूल वाचकांना पडत आहे. एका परीने हे अतींद्रिय अनुभव होत. गेल्या शतकातील सर्वात महत्त्वाचा वाङ्मयप्रकार म्हणून फँटसीचा निर्देश केला जातो. लॉर्ड ऑफ दि रिंग्ज (टोलकिन), ॲनिमल फार्म (जॉर्ज ऑरवेल), हॅरी पॉटर (रोलिंग), लॉर्ड ऑफ दि फ्लाइज (विल्यम गोल्डिंग) या फँटसीचा वापर करणाऱ्या कलाकृतींना मोठीच

मान्यता मिळाली. बोलणारे प्राणी, जादूच्या शक्ती, कालप्रवास, अन्य ग्रहांवरील जीवसृष्टीशी संपर्क, यासारख्या घटकांचा वापर त्यात केला गेला आहे. जादू, दुय्यम जग, फँटॅस्टिक वस्तू, कल्पनारम्य वातावरण, शुभ-अशुभ संघर्ष वगैरे लक्षणे वा घटक फँटसीमध्ये आढळतात. विज्ञानकथांमध्येही फँटसीचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो. परंतु कालच्या विज्ञानकथेतील अनेक कल्पना आज वास्तवात उतरलेल्या आहेत असेही दिसते. ज्यूल्स व्हर्नने १८६३ साली चंद्रावर स्वारी ही कादंबरी लिहिली. १९६९ मध्ये - म्हणजे शंभर वर्षांनी माणूस खरोखर चंद्रावर पोचला. फँटसीतील जादू ही तर्कापलीकडची असते तर विज्ञानकथेतील जादू तर्कसंगत असते. अतींद्रिय शक्तींशी कमीजास्त जवळीक फँटसी वा विज्ञानकथा दाखवू शकतात. त्यामुळे वाङ्मयीन भूमिकेतूनही या सर्वांचा विचार अर्थपूर्ण ठरू शकेल.

त्याचप्रमाणे 'नक्षत्रांचे देणे' या विभागात काही जीवनादर्शाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला गेला आहे. पुढच्या पिढीसाठी आपण काय ठेवून जात आहोत या विषयी अंतर्मुख होऊन केलेले चिंतन प्रेरणादायक ठरेल.

जागतिकीकरणाच्या आजच्या वेगवान लाटेत टिकून राहण्यासाठी आपली बुद्धी, आणि अंत:शक्ती, कल्पनाशक्ती आणि अतींद्रिय क्षमता, या सर्वांची गरज आहे. साहित्यातही त्यांची वाढती प्रचीती येत राह्यला हवी.

ही दीपावली आणि नवीन वर्ष आपणां सर्वांना सुखसमृद्धिकारक ठरो हीच प्रार्थना.



# शुभ दिपावली



**यंदाची दिवाळी आणि नवे वर्ष आमच्या सर्व वाचक-ग्राहक मित्रांना, लेखक लेखिकांना आणि ग्रंथविक्रेत्यांना सुख समृद्धीचे जावो ही प्रार्थना.**





# वर्षा योजना

दिपावली म्हणजे दिव्यांची आरास, आनंदाची बरसात. म्हणूनच खास दिपावली निमित्त ग्राहकांसाठी आम्ही **'वर्षा योजना'** जाहीर करीत आहोत.

या योजनेतून तुम्ही आमच्या प्रकाशनाची कोणतीही आणि कितीही पुस्तके घेऊ शकता **चक्क २५% सवलतीत!**

आमच्या सभासदांसाठी (टी बुक क्लब व मेहता मराठी ग्रंथजगत) या योजनेत आहे **खास वाढीव सवलत!**

योजनेत सभासदांना सर्व पुस्तके मिळतील **३०% सवलतीत!**

योजनेचा लाभ घेण्यासाठी संपूर्ण सूची मागवा. आणि आपली मागणी मनिऑर्डर/ड्राफ्टसह नोंदवा. पुस्तके घरपोच हवी असल्यास पोस्ट खर्च पाठवावा.

**आमच्या वेबसाईटवरूनही आपण पुस्तकांची निवड व मागणी करू शकता.**

**Website :www. mehtapublishinghouse.com**

**मेहता पब्लिशिंग हाऊस,** १९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ३०.

**मुदत :१ ऑक्टोबर २००४ ते २८ फेब्रुवारी २००५ पर्यंत**

**टी बुक क्लब १२** सभासद फी ५०रु.

**सभासद व्हा व ५०% सवलत मिळवा!**

**या योजनेतील सहाही पुस्तके घेणे आवश्यक!**

**सभासदांना इतर पुस्तके २५% सवलतीत!**

**टी बुक क्लब १२ मधून प्रकाशित झालेली पुस्तके**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | द रेनमेकर | जॉन ग्रिशॅम | अनु. अनिल काळे | ३८०रु. |
| २. | फर्स्ट टु डाय | जेम्स पॅटरसन | अनु. रवींद्र गुर्जर | २००रु. |
| ३ | द ब्लाइन्ड असॅसिन | मार्गारेट ॲटवुड | अनु. चारुता नानिवडेकर | २५०रु. |
| ४. | द गोल्डन रॉन्देव्हू | ॲलिस्टर मॅक्लीन | अनु. अशोक पाध्ये | २००रु. |
| ५. | फ्रॉम रशिया विथ लव्ह | इयान फ्लेमिंग | अनु. विजय देवधर | २५०रु. |

**टी बुक क्लब १२ मधून प्रकाशित होणारे पुस्तक**

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | ऑन द विंग्ज ऑफ इगल | केन फॉलेट | अनु. जोत्स्ना लेले |

# अनोखे ऋणानुबंध

**आपल्या आयुष्याच्या वाटचालीत कुठल्यातरी निर्णायक टप्प्यावर अशा काही व्यक्ती येतात की त्या आपल्यावर विलक्षण प्रभाव टाकून जातात. आपल्यावर चिरकाल टिकणारा ठसा उमटवून जातात. काही नवी जीवनदृष्टी देऊन जातात. नवा मार्ग दाखवून जातात. त्या व्यक्तींचा सहवास कधी अल्पकाळच मिळालेला असतो; तर कधी दीर्घकाळ. परंतु त्यांचा प्रभाव मात्र चिरस्थायी राहतो. अशा काही अनोख्या ऋणानुबंधांचे हे वेधक, प्रेरक स्मरण.**





## स्वामी नरेंद्रजी

द. ता. भोसले

पन्नास वर्षांपूर्वी ही घटना आहे. या घटनेवर शतकाचं जाडजूड असं अर्धे पान झाकलेलं असतानासुद्धा गच्च अंधारात मळलेल्या काचेच्या पोटात मंदपणे तेवत असलेला दिवा आपली नजर खेचून घेतो; तशी ती घटना आणि तिच्या निगडीत असलेली व्यक्ती आजही नजरेसमोर साकार होते. अगदी काल-परवा भेटल्यासारखी, अगदी त्या व्यक्तीच्या बारीकसारीक हालचालींसह, अगदी सगळ्या तपशीलासह. खरे तर या पन्नास वर्षांत शेकडो घटना घडून गेलेल्या आहेत. हजारो माणसे आयुष्यात ये-जा करून गेली. दरसाल कोसळणारा पाऊस नि सांडणारं चांदणं. या अठरा हजार दिवसांत खूपदा पानगळ झाली. खूपदा बहर घमघमला. जखमा झाल्या. जखमा झेलल्या आणि इतरांना प्रसंगी जखमा केल्याही; पण जखमांची त्वचेवर जशी खूण अजूनही ठळक आहे. आठवण येताच उजळ होते.

तेव्हा मी इयत्ता नववीत होतो. सांगोला (जि. सोलापूर) यासारख्या छोट्याशा गावात नव्याने सुरू झालेले विद्यालय, गावातल्या काही विद्याप्रेमी मंडळींनी सुरू केलेले, शाळा नवीन, शिक्षक नवीन अन् वर्गांची जागा धर्मशाळेच्या दोन खोल्या. तालुक्यातील ग्रामीण मुलांची सोय व्हावी म्हणून सात-आठ खणी धाब्याच्या जुनाट घरात नव्यानेच वसतिगृह सुरू केलेले. या 'वास्तू'त आम्ही पंधरा-सोळा विद्यार्थी कसेबसे राहात असू. छोट्याशा खुराड्यात काठोकाठ कोंबड्या घालून ठेवाव्या तशा त्यामुळे आमच्यापैकी अनेक मुलांचा वावर आणि निवासही समोरच्या महादेवाच्या देवळात असायचा. जेवणापुरता त्या घरात वावर व्हायचा. देऊळ मोठे प्रशस्त होते. हवेशीर होते आणि बऱ्यापैकी स्वच्छही होते. जमिनीवर खाली दगडी फरशी घातलेली होती.

श्रावण महिन्याचे दिवस होते. अधून-मधून झिमझिम पाऊस यायचा. शिवाय थंडगार वारे सोबतीला. या पावसाने वसतिगृहातलीइ जमीन आणि भिंतीही ओलसर झालेल्या. रस्त्या-वरही बऱ्यापैकी चिखल झालेला. स्वाभाविकच वसतिगृहातली बरीच मुले या देवळाच्या आश्रयाला आलेली होती. रात्रीची झोप, सकाळचा अभ्यास, स्वयंपाकाला मदत इथेच या देवळाच्या प्रशस्त जागेत चालायची, हे देऊळ म्हणजे जणू आमचं दुसरं वसतिगृहच होतं.

अशाच एका सकाळी आम्ही उठून बघतो तर आमच्या उशाजवळ एक दाढीधारी तरुण संन्यासी अंगाचं मुटकुळं केलेल्या स्थितीत खांबाला टेकून बसलेला. मिटल्या डोळ्यांनी ओठातल्या ओठात काहीतरी श्लोक पुटपुटत असलेला. त्यांना पाहताच आम्ही आश्चर्यचकित झालो. रात्री झोपताना शेजारी कुणी नव्हते. मग हे अचानक आले कोठून! आणि यांना आपल्या या देवळाचा पत्ता दिला कोणी? असा भाव आमच्या चेहऱ्यावर उमटला. आता आली ही पीडा आपल्या शेजारी. आपल्यावर

बंधनं आली. या बुवामुळे आता आपणाला दंगामस्ती करता येणार नाही. मोठ्याने धडे वाचता येणार नाहीत. काही खाजगीतले बोलायचे झाले तरी बंधन आले. अनेकदा आम्ही वसतिगृहातले जेवणाचे ताट घेऊन तिथेच दाटीवाटीने खाण्यापेक्षा सरळ या देवळात कोंडाळं करून बसायचो. आता त्यावरही बंधन आल्यासारखे झाले.

माझ्या शेजारी झोपलेला धनगराचा बबन माझ्या कानाशी तोंड नेऊन पुटपुटला, ''तुला सांगतो, ही दाढी-मिशा वाढवलेली गोसावी माणसं, लई बेरकी असतात. गोड गोड बोलून लोकांना नादी लावतात, फसवतात. काही बायकांच्याबी भानगडी करतात. मागं आमच्या गावात आलेल्या एका गोसाव्यानं चोरी तर केलीच, पण एका बाईलापण पळवून नेलं. आपणही सावध राहिलं पाहिजे गड्या.''

आमचं हे हळू आवाजातलं बोलणं त्यांच्या कानावर पडले असावे. त्यांनी अर्धवट डोळे उघडले. आम्हाकडे पाहून मंद हास्य केले आणि ''नमस्कार बंधूनो, आपको मेरा प्रणाम'' म्हणून हात जोडून आम्हाला नमस्कार केला. लाघवी आणि निर्मळ आवाजातले हे शब्द नि त्याबरोबरच आदबीनं केलेला नमस्कार यामुळे आम्ही अधिकच गांगरून गेलो. ''बघ मी म्हणतोय ते खरं झालं ना!'' असं पुन्हा बबनने मला सांगितले.

नरेंद्र महाराजांबरोबर झालेली ही पहिली भेट. फाटक्या आणि मळलेल्या कपड्यासह मातीवर नांदणूक करणाऱ्या आमच्यासारख्या शाळकरी पोरांना एका तेजस्वी वाटणाऱ्या साधूने केलेला हा पहिलाच नमस्कार होता. जवळजवळ जिंकून घेणारा, निदान मला तरी! नंतर त्यांनी संवाद चालू ठेवण्यासाठी चार-दोन प्रश्न विचारले. म्हणजे स्नानासाठी जवळपास विहीर कोठे आहे? प्रातर्विधीसाठी कोठे जावे लागते? आम्ही कोणत्या शाळेत जातो? कोणत्या वर्गात शिकतो आणि कोठून शिकण्यासाठी आलो वगैरे. आम्ही आमच्या 'गावरान हिंदी'मध्ये त्यांना माहिती दिली. संभाषणावेळी हिंदी शब्द सुचला नाही की आम्ही मराठी शब्दालाच हिंदीचे प्रत्यय लावून बोललो. छानपैकी हसत त्यांनी सारे समजून घेतले. त्यांनाही थोडं थोडं, अडखळत्या स्वरूपात मराठी येत होते. कारण ते या मराठी मुलुखात चार-पाच महिन्यांपासून भ्रमंती करीत होते. या भ्रमंतीत त्यांनी थोडेफार मराठी अवगत करून घेतले होते.

खरंतर ''एका तेजस्वी वाटणाऱ्या साधूने'' असं त्यांचं वर्णन करणं अपुरंच म्हणावं लागेल. खरोखरच ते तेजस्वी होते. तितकेच देखणेही होते. सुवर्णाची झाक असणारा गोरा वर्ण, सरळ नाक, उभट चेहरा,विलक्षण बोलके नि दवबिंदूपासून तयार झालेल्या निर्मळ पाण्याचे डोह डोळ्यांत दाटलेले, नाजूक जिवणी, मोहक नि सौष्ठवपूर्ण बांधा, परेमश्वराने जणू जीव ओतून अन् खूप वेळ देऊन ही 'आकृती' निर्माण केलेली असावी. त्यातच काळेभोर व चकाकणारे केस गळ्यात येऊन लडिवाळपणे खेळणारे, शोभून दिसणारी दाढी. गळ्यात छातीपर्यंत रुळणारी रुद्राक्षांची माळ. गळ्याबरोबर असणारी आणखी एक तांबूस-लाल मण्यांची माळ कमेरला स्वच्छ धुतलेली लुंगी आणि पांढरे शुभ्र असे खादीचे उपरणे दोन्ही खांद्यावरून मागच्या बाजूने खाली सोडलेले. वय अंदाजे तीसच्या आसपास. पाय पूर्णत: आणि नेहमीचे 'नग्न' स्थितीत, तरीही त्यांच्या पायांच्या टाचा इतक्या गोजिऱ्या, लालचुटूक अन् फिक्कट गुलाबी रंगाच्या होत्या की, जणू एखाद्या अप्सरेचे अस्पर्श ओठच त्या ठिकाणी आणून लावले आहेत, असे बघणाऱ्याला



वाटावे. नेहमी आपण ''एक नूर आदमी, दसनूर कपडा'' अशी म्हण वापरतो. या म्हणीनुसार स्वत:ला 'लक्षवेधी' बनवितो. पण नरेंद्र महाराज एकवस्त्रांकित असूनही कमालीचे तेजस्वी आणि प्रभावी वाटायचे. कदाचित विद्येचे तेज, व्रतस्थ जीवनाचे तेज आणि त्यात मिसळलेले ओसंडून वाहणाऱ्या यौवनाचे तेज या सर्वांचा झालेला मिलाफ याला कारणीभूत असावा. त्यांच्या या दर्शनाने त्यांच्याविषयी आमच्या मनात आदरभाव उत्पन्न झाला.

हा उत्पन्न झालेला आदरभाव वाढीस लागण्याचे कारण त्यांचा दिनक्रम, त्यांचा स्वभाव आणि अंत:करणातील शुचिता घेऊन येणारे त्यांचे प्रेमळ शब्द यामध्ये सापडण्यासारखे आहे. त्यांचा रोजचा दिनक्रमदेखील आमच्या पाहण्यात जे साधू-संन्यासी किंवा गोसावी अशी मंडळी आलेली होती त्यांच्यापेक्षा खूप वेगळा असा वाटायचा. नव्हे, त्याचा आम्ही दररोज अनुभव घेत होतो. नरेंद्र महाराज पहाटे चारच्या आसपास उठायचे. सारे मंदिर स्वच्छ झाडायचे. देवळाच्या पायऱ्या, शेजारचे दोन रस्ते झाडून काढायचे. देऊळ झाडत असताना थंडीने गारठून गेल्याने अंगाची घडी घालून झोपलेल्या पोरांच्या अंगावर ते पांघरूण घालायचे. आम्ही रात्री झोपण्यापूर्वी त्यांना सांगितले असेल तर आमच्या उशाशी येऊन आम्हाला उठवायचे. हे उठवतानासुद्धा एखाद्या रागीट गुरख्याने डाफरावे असे न करता ''बेटा, भीमराव, बेटा सुरेश, बेटा बबन' असे कमालीच्या वात्सल्याने पुकारून थोपटल्यासारखे करायचे. ही स्वच्छता करताना ते गीतेतील श्लोक म्हणायचे. तेही अतिशय ठेक्यात आणि ठसक्यात म्हणायचे. मग मंदिराचा गाभारा, शंकराच्या पिंडीजवळ असलेला प्रसादाचा कचरा, नारळाच्या करवंट्या, सुकलेली फुले गोळा करून स्वच्छ करायचे. एव्हाना उजाडलेले असायचे. मग कधी आमच्याबरोबर तर कधी एकटेच साधारणत: पाऊण किलोमीटरवर असलेल्या विहिरीवर जायचे. गार पाण्याने स्नान उरकायचे. गरजवंताला बादलीभर पाणी काढून द्यायचे. स्वत:चे कपडे स्वत:च स्वच्छ केल्यावर मंत्र पुटपुटत ते मंदिरात यायचे. मग पूजा व्हायची. गीता व तुळशी रामायणाचे वाचन ठरलेले. देवळात येणाऱ्या भाविकाला आधी स्वामी नमस्कार करणार. आपुलकीने चौकशी करणार मग त्यांनी केलेला नमस्कार मोठ्या संकोचाने स्वीकारणार. भाविक मंडळी भेट म्हणून काही देऊ लागली तर ते त्या भेटीला नमस्कार करून घरातल्या मुलांना किंवा एखाद्या गरजू माणसाच्या मुखात घालण्यासाठी आर्जवाने सांगणार. त्यातून केळी, मोसंबी अशा सारखी फळे खूप आग्रह झाल्यावर स्वीकारली तरी ते एखादे केळ स्वत:साठी ठेवून आम्हा विद्यार्थ्यांना बोलावून खाऊ घालायचे. याचा फायदा असा झाला की आम्हा वसतिगृहाच्या मुलांच्या तब्येती सुधारल्या. दररोज आमटी नावाचे गरम केलेले रंगीत पाणी आणि भाकरी नावाचा करपून कोळ झालेला तुकडा घशाखाली घालताना आमचे मन खूप कष्टी व्हायचे. आधीच्या वर्षी दर रविवारच्या बाजारात माळवे विकायला येणाऱ्या शेतकऱ्यांकडून भिक्षा म्हणून काही भाजी आमच्या वसतिगृहात मिळत होता. तीही आता जवळजवळ थांबली होती. दोन्ही हातांत गोणपाटाचे पोते घेऊन भाजी विकणाऱ्या खेड्यातल्या माऊलीसमोर आम्ही भिक्षेसाठी उभे राहिलो की, ती माऊली तोंडाला चव येणाऱ्या इरसाल अशा दहा बारा तरी शिव्या द्यायची. शिव्यांचा हा आहेर स्वीकारला तरी पदरात भाजी पडेलच याची खात्री नसायची. ऐतखाऊ मुडदे, सोकावलेले बैल, लापाट

आणि हावरट कुत्री अशा पदव्या मिळाल्या तरी भाजी मिळायची नाही. आणि एखाद्या माऊलीने उदार मनाने घातलीच भिक्षा तर किडलेले वांगे, किडलेला दोडका, रोग पडलेली पालेभाजी, नासलेला कांदा असा शेलका माल आमच्या पोत्यात पडायचा. अशी भाजीही फारतर दोन दिवस कशीतरी पुरायची. त्यामुळे उरलेल्या पाच दिवसांचे पक्वान्न म्हणजे आमटी आणि भाकरी. मूठभर तूर-डाळीची बादलीभर केलेली आमटी. आणि उन्हात वाळायला घातलेल्या गवरीसारखी भाकरी. या पार्श्वभूमीवर नरेंद्र महाराज आम्हाला देत असलेली फळे अन् प्रसाद म्हणून त्यांना मिळालेले मिष्टान्नाचे ताट आमच्या मुखात घालायचे. ते खाताना आमच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहणार तृप्तीचा आनंद तितक्याच समाधानाने न्याहाळत बसायचे. त्यामुळे आमचा एक कान नेहमी देवळाकडे असायचा. महाराज आता आपणास बोलावणार असे वाटायचे. अनेकदा ते खरेही व्हायचे.

त्यांच्या या वागण्यापेक्षाही मी कमालीचा प्रभावित झालो ते त्यांचे देहाचे चोचले न करण्याचे धोरण आणि त्यांचे जिभेवरचे नियंत्रण यामुळे. खरे तर महाराजांचे तरुण वय होते. अंगात सळसळणारे रक्त अन् या वयात खाण्यावर असणारे प्रेम लक्षात घेतले तर त्यांची ही अनासक्ती व जिव्हालौल्यावर असणारे प्रभुत्व मला कमालीचे कोड्यात टाकायचे. कमालीचे चकित करून जात असे. ते रोज काय खात असावेत? ते केवळ कच्चा आहार घ्यायचे. तोही पोटभर नाहीच. एखादी काकडी, एखादे केळं, एखादे गाजर, मूठभर शेंगा खाल्ल्या की झाले यांचे भोजन. ते जिभेचे लाड पुरविण्यासाठी खात नसत. देहधारणेसाठी खायचे. यज्ञात मूठभर समिधा टाकून जसा अग्नी सातत्याने प्रज्वलित ठेवला जातो; तसा देह टिकवण्यासाठी आणि त्याचा वापर करण्यासाठी ते अन्नग्रहण करायचे. अनेकदा भाविक मंडळींकडून फळांपैकी काहीच मिळायचे नाही. त्यावेळी ते शिवलिंगाच्या पिंडीशेजारी असलेल्या म्हणजे भाविकांनी अर्पण केलेले एक मूठभर तांदूळ ओले करून घ्यायचे. अर्ध्या तासाने ते नरम होताच खाऊन घ्यायचे. प्रसादाप्रमाणे. एखादा आवडीचा गोड पदार्थ खावा तसे. त्या तांदळाला मीठ नसे. गूळ नसे अथवा दूध नसे. ओंजळीत बसतील एवढे तांदूळ ते सकाळचे भोजन म्हणून घेत. रात्रीच्या वेळी जवळजवळ ते काहीच खात नसत. गावाकडून काही मुले भुईमुगाच्या शेंगा आणत. कधी कापण्या-कडबोळी घेऊन येत. ती महाराजांना प्रेमाने देत असत. पर त्यांनी शिजविलेले काहीच खायचे नाही असे व्रतच आचरणात आणलेले असल्याने ते त्यास स्पर्शही करायचे नाहीत. फारतर मूठभर शेंगा आम्हा मुलांच्या आग्रहापोटी घेत असत. अनेकदा त्यातील चार शेंगा दुसऱ्या दिवशी मला किंवा भेटेल त्याला द्यायचे. हे सारे बघून माझ्या मनात यायचे, या माणसाने मात्र भुकेलाच गिळून टाकलेले आहे. एवढ्याशा अन्नावर यांचा दिवस आनंदात जातो तरी कसा? त्यांची प्रकृती ठणठणीत राहते तरी कशी? यांच्या मनात पुरणपोळी खावी, खीर खावी, भजी पापड खावेत किंवा शहरात असणारे श्रीखंड, बासुंदी, जिलेबी, गुलाबजाम यासारखे पदार्थ अगदी आकंठ खावेत असा विचार कसा येत नाही? सामान्य माणसाला आपल्या ताटातले खादडून दुसऱ्याचे ताट हिसकावून घ्यावे असे वाटत असते. घश्यात घातलेल घास ओरबाडून घेण्यात पुरुषार्थ मानणे हा मानवी स्वभावधर्म असताना या महाराजांना ओठाजवळ नेलेला



घास दुसऱ्यांच्या ओठात घालण्याचे मातृ-वात्सल्य आले तरी कोठून! यामुळेच माझ्या बालमनावर या नरेंद्र महाराजांचा खोलवर परिणाम झाला.

म. गांधीजींचे माणूस म्हणून असणारे मोठेपण खूप नंतर मला समजले. म्हणजे प्रौढ वयात त्यांचे आत्मकथन वाचल्यावर, त्यांची चरित्रे वाचल्यावर समजले. पण गांधीजींनी जी काही आचारमूल्ये स्वत: आचरणात आणली व समाजासमोर ठेवली ती या नरेंद्र महाराजांनी त्या काळात आमच्यासमोर साक्षात केली होती. गांधीजींनी कमीत कमी गरजा या माणसाला अधिक सुखी बनवितात असे सांगितले होते. नरेंद्रमहाराजांनी गांधीजींचा विचार आम्हाला ज्ञान होण्यापूर्वीच आचरणात आणलेला होता. त्यांच्याजवळ दोन लुंग्या होत्या. एक उपरणे होते. हेच पांघरूण म्हणून ते रात्री वापरायचे. काठीवर वाळत घातलेली लुंगी फरशीवर टाकली की त्यांचे अंथरूण सिद्ध व्हायचे. दोन धार्मिक ग्रंथ होते. एका झोळीसारख्या पिशवीत कपाळी लावण्यासाठी गंध होतं अन् एक छोटीशी बिनकिंमतीची पण बहुउपयोगी असणारी लोटी होती. झाले यांचे सामान. हातावर घेऊन भोजन व्हायचे. मानेखाली हात घातला की उशी व्हायची. पावसाळ्यात व श्रावणातल्या बोचऱ्या वाऱ्यात हे महाराज थंडगार होणाऱ्या दगडी फरशीवर झोपायचे. सोसण्याचे फार मोठे बळ त्यांनी संपादन केले होते. गांधीजींनी स्वच्छतेचा आदर्श घातला होता. गरिबांच्या सेवेचा आदर्श घातला होता. गीतेतील विचार त्यांचे जीवनविषयक आदर्श मूल्य होते. नरेंद्रमहाराजांनीही आपल्या कामाचा वा वागण्याचा कसलाही बोलबाला न करता ही मूल्ये आचरणात आणली होती. साधू या शब्दाला आजकाल जो एक विकृतार्थ प्राप्त झाला आहे, त्याला पूर्णत: छेद देणारे, आरपार विशुद्ध नि उन्नत असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. अन् तरीही ते आमच्यासारख्या आठवी-नववीत शिकणाऱ्या गावठी मुलांत एकरूप होऊन जायचे. वाहते पाणी, वाहता वारा नि वाहता सुगंध यांची आठवण करून देणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते.

काही दिवसातं माझी आणि त्यांची बऱ्यापैकी गट्टी जमली. एकतर अनाथपण आणि शालेय प्रगती यामुळे हे नाते दृढ होत गेले असावे. मन मोकळे करण्यासाठी मी त्यांच्याकडे धाव घेई. अनेकदा कशावरून तरी भूतकाळात ते शिरायचे व नकळत स्वत:च्या आयुष्याचा एक-एक पदर उलगडत जायचे. मी अगदी कान टवकारून त्यांच्या भूतकालीन आयुष्याचा अंश मानत साठवायचो. बोलता बोलता काही सांगताना त्यांच्याकडून त्यांच्याविषयी ऐकायला मिळायचे. मूळचे ते मध्यप्रदेशातील कुठल्याशा शहरातले. घरची सुस्थिती होती. घरातले वातावरण सुसंस्कारी होते. पिताजी मोठ्या पदावरील अधिकारी होते. घरात एक बहीण आणि हे नरेंद्रच होते. खूप लाडात वाढलेले. वैभवात मोठे झालेले. शिक्षणातही चांगली प्रगती होती. इंग्रजी आणि संस्कृत हे त्यांचे आवडते विषय. पदवीपर्यंत प्रथमश्रेणीत उत्तीर्ण झालेले. एम. ए.च्या पहिल्या वर्षाला असताना वडिलांनी एका सुविद्य व देखण्या मुलीशी नरेंद्राचा विवाह ठरविला. याला त्यांचा ठाम नकार होता. प्रपंचाची आसक्ती नव्हती. विलासाची लालसा नव्हती. स्त्रीदेहाचे आकर्षण नव्हते. संपत्ती आणि कीर्ती त्यांना जखडून टाकत नव्हती. आपण आपल्यापुरते जगायचे नाही. नेहमीच्या चाकोरीने जायचे नाही. काहीतरी वेगळे करायचे. सेवा आणि भक्ती यातून जीवनाला पूर्णता आणावी असा त्यांनी दृढ

निश्चय केला नि नियोजित पत्नीला एक विस्तृत पत्र लिहून अन् क्षमा याचना करून त्यांनी सिद्धार्थ गौतमाप्रमाणे अंधारामध्ये प्रकाशाची वाट धरली. गृहत्याग करून आधी आपला देश उघड्या डोळ्यांनी बघावा या हेतूने त्यांनी भ्रमंती सुरू केली. या भ्रमंतीला अधिक विसावा मिळाला या महादेवाच्या देवळात. आमच्यासारख्या मुलांच्या सहवासाने. नाहीतरी एरव्ही ते दोन किंवा तीन दिवसांपेक्षा एका ठिकाणी कधीच थांबले नाहीत. रमले नाहीत. आमचा त्यांना लळा लागला नि त्यांचे आम्हाला अकृत्रिम प्रेम लाभले. आमची कच्च्या मातीची गाडगी-मडकी या प्रेमाच्या उबेमुळे जगणं कसं सुंदर करावं नि तितकंच परिपूर्ण करावं याचा संस्कार घेत पक्क्या स्वरूपाची बनत गेली.

शाळेचा वेळ सोडला तर माझा जवळजवळ सगळा वेळ त्यांच्या सहवासात जाऊ लागला. या सहवासातून मला जे जाणवले ते मोठे विलोभनीय होते. या नरेंद्रमहाजांनी स्वत:हून कुणाला काही मागितले नाही. चार भाबड्या बायका गोळा करून त्यांच्या श्रद्धेचा स्वार्थासाठी कधी वापर केला नाही. उगीच पढिक पांडित्याचे प्रदर्शन करणारे प्रवचन केले नाही. ''देव असा आहे, देव तसा आहे. देवासाठी हे करा नि देवासाठी याचे दान द्या'' असला स्वार्थ साधणारा उपदेश केला नाही. कुणी काही द्यायला आले तर स्वीकारले नाही. सॉक्रिटिसाने आपल्या शिष्याला आणि मित्रांना जे सांगितले तेच यांनीही सांगण्याचे व्रत घेतले. सॉक्रिटिसाने म्हटले होते की,''जे असत्य आहे त्याचा त्याग करा. सत्यालाच अनुसरा. जे शुभ असेल नि शिव असेल त्यावर लक्ष केंद्रित करून त्यासाठी झटा किंवा झिजा.'' नरेंद्र महाराजांनी वेगळ्या भाषेत हेच सांगितले.

एका सायंकाळी चोरीला गेलेली म्हैस शोधत शोधत एक शेतकरी देवळात आला. महाराजांनी त्याला आश्रय दिला. एक अर्धवट वेडा असलेला भिकारी भीक मागण्यासाठी देवळासमोर आला. महाराजांनी त्याच्या ओंजळीत दोन केळी घातली. आम्हा मुलांना त्याला खायला द्यायला सांगितले. काही मंडळींनी बंद पाकिटात काही दक्षिणा दिली. महाराजांनी ती रक्कम आमच्या कपड्यांना साबण घेऊन खर्च केली. साबणाच्या वडीतला एक झिजलेला तुकडा स्वत:साठी घेतला. महाराजांनी विद्येची उपासना, गरिबाची सेवा, निष्काम भक्ती, अनासक्त कर्मयोग आणि सामान्य माणासात घडणारे ईश्वरदर्शन यांचा जणू आचरणातून आदर्श घालून दिला. न सांगता संस्कार केले. न शिकविता सज्ञान केले.

एकदा मी माझे संस्कृतचे पाठ्यपुस्तक घेऊन त्यातील सुभाषिते पाठ करीत होतो. अर्थात देवळाच्या एक कोपऱ्यात खांबाला टेकून बसलो होतो. माणदेशी बोलीतील गावठी उच्चार, चुकीचा यतिभंग आणि ताठ, राठ आणि माठ बनलेल्या माझ्या जिभेकडून जे उच्चार होत होते ते ऐकले असते तर भास-भवभूती पासून कालिदास हर्षपर्यंत साऱ्यांनी वैतागाने नि विषादापोटी स्वत:च्या डोक्यावरचे केस स्वत:च्याच हातांनी उपटून घेतले असते, एवढे माझे उच्चार भारी होते. आतल्या गाभाऱ्यात अंधुक प्रकाशात महाराज समोर गीताग्रंथ घेऊन मागे-पुढे झोके घेत पठण करीत होते. त्यांच्या कानावर माझे हे पाठांतर गेले असावे. ते मजजवळ आले. हातातले पुस्तक घेतले आणि त्यांनी ते श्लोक अतिशय रसाळपणे नि तितक्याच श्रुतिसुभग उच्चाराने मला शिकविले.त्यांच्या मुखातून ही सुभाषिते आणि खोल अर्थ समजावून घेतल्यावर मला



मातीत गाडल्या गेलेल्या सुवर्ण मोहोरांचा अपूर्व हंडा सापडावा असा अत्यानंद झाला. नाहीतरी आमच्या शाळेतील सर्व मुलांची संस्कृतच्या बाबतीत थोडीफार आबाळच झाली होती. ज्या शिक्षकाला पूर्णवेळ कामासाठी तास कमी पडायचे, त्याच्या गळयात संस्कृतचे तास घातले जायचे. एकदा शास्त्र शिकविणारे शिक्षक संस्कृत शिकवून गेले मग गणिताचे सर येऊन संस्कृतची हाल-अपेष्टा करून गेले. शेवटी तर शाळाप्रमुखांनी पारंपरिक पद्धतीचे संस्कृत विद्येचे व्यासंग केलेले एक वयस्कर शास्त्री आमच्यासाठी पकडून आणले. त्यांचे संस्कृत आम्हाला आकळेना नि आमचे संस्कृत त्यांना कळेना. त्यात त्यांना ऐकायलाही कमी येत होते. अशा पार्श्वभूमीवर नरेंद्र महाराजांनी आम्हा वसतिगृहातल्या साऱ्या मुलांचे अतिशय उत्तम संस्कृत करून घेतले. एका पाठांतर स्पर्धे-निमित्ताने त्यांनी माझ्याकडून जो एक दोन पानी धडा पाठ करून घेतला आणि त्या-बरोबर त्यांनी जे घटवून घेतले ते म्हणजे माझ्या विद्योपासनेतील अपूर्व आठवण म्हणावी लागेल. कालांतराने त्यांनी आमचे इंग्रजीही फार चांगले करून घेतले.

असे हे महाराज आमच्या जीवनात आले नि तसाच चटका लावून गेले. एका सकाळी आम्ही सारेजण विहिरीवर स्नानासाठी गेलो होतो. नरेंद्रमहाराज ही बरोबर होते. जाता-येता रस्त्याच्या कडेला अंधाराचा गैरफायदा घेऊन आळशी गावकऱ्यांनी जी घाण केलेली होती; त्यावर ते माती पसरत होते. आम्ही स्नान केले. विहिरीला पाणी होते, मातीत कोरलेल्या नि पावसामुळे निसरड्या झालेल्या पायऱ्यांमुळे सहसा कोणी विहिरीत जात नसे. पण आम्ही आमचे रोजचे कपडे विहिरीजवळ धूत असताना कोणीतरी ''जय गंगे'' म्हणून विहिरीत उडी घेतली. उडीसरशी बाहेर पाणी आले. नंतर काही क्षणातच ''मेलो मेलो, मला वाचवा.'' असा आक्रोश कानावर आला. तो आम्ही साऱ्यांनी ऐकला. पाण्यातला गडी आक्रोश करीत होता. आमच्यापैकी कोणी उतरेना. ते शक्यही नव्हते. मात्र कसलाही विचार न करता नरेंद्रमहाराजांनी बाणाच्या वेगाने विहिरीत झेप घेतली. त्याच्या खुब्याला पकडले. पण एखादी गटांगळी खाल्ल्याने भेदरून घाबरून गेलेला तो गडी महाराजांच्या गळ्याला प्राणघातक मिठी मारून बसला. कदाचित खाली पायानेही त्याने कमरेला विळखा घातला असावा. तशाही स्थितीत महाराज त्याला काठावर आणू लागले. त्यांच्याही नाका-तोंडात पाणी गेले असावे. जीवाच्या आकांताने त्यांनी त्याला काठावर ढकलले. पण त्याने तितक्याच ताकदीने महाराजांना जबरदस्त मिठी मारली. दोघेही दमले असावेत. महाराजांना त्या मिठीतून स्वत:ची सुटका करून घेता येईना. खूप कष्ट होत असावेत. त्या गड्यालाही काही सुचत नसावे. शेवटी सर्वांच्या समोर, गळ्याला मिठी पडलेल्या अवस्थेत दोघेही नाकातोंडात पाणी जाऊन जड होत गेलेल्या शरीरासह तळाला गेले. अदृश्य झाले. आम्ही आरडाओरडा केला. धावा-धावा असा पुकारा केला. पण सारे संपले होते. सारे निरर्थक बनले होते. तिसऱ्या दिवशी त्या दोघांचीही फुगलेली कलेवरे काठावर आली. सेवा आणि भक्ती यांच्याद्वारे या चराचराला परमेश्वर शोधण्यासाठी घराबाहेर पडलेले नरेंद्र-महाराज शेवटी न संपणाऱ्या प्रवासाला निघून गेले. आमच्या अंत:करणावर आपले अस्तित्व कोरून!

तेव्हापासून आम्ही सुमारे एक वर्षभर तरी देवळात पाऊल टाकले नाही!

# पुनर्जन्म

**नसीमा हुरजूक**

आज वर्तमानाकाळाच्या झोक्यावर बसून झोके घेत असतांना भूतकाळ व भविष्य काळात जेव्हा डोकावते तेव्हा मला दिसते पलंगावर असहाय्य लघवी-संडासच्या वासाने बेजार झालेली, रात्रीच्या काळोखात नि:स्तब्ध-पणे अश्रू ढाळणारी, देवाकडे मृत्यू मागणारी नसीमा. झोका पुढे जाताच दिसतो स्वप्नातील राजवाडा. खास अपंगांसाठी, वृद्ध अपंगां-साठी बनविलेला. त्याच्या गच्चीवर सकाळच्या कोवळ्या उन्हात व्हीलचेअरवर बसून अंगा-भोवती शाल, डोळ्याला चष्मा लावून पांढऱ्या शुभ्र केसांची नसीमा तळ मजल्यावर चालणारा लहान अपंग बालक-बालिकेंचा आनंदात न्हाऊन निघालेला दंगा ऐकत न्याहाळत आहे. दूरवर शेतात कॅलीपर, कुबड्या किंवा एखादा अशक्त हात अथवा पाय घेऊन शेतात भाताची लावणी करणारे, गाई-म्हशीचे दूध काढणारे अपंग तरुण-तरुणी, एका काखेत कुबडी व डोक्यावर घागर घेऊन तालबद्ध पावले टाकणारी दिपाली, एका पायाने लचकत कमरेवर घागर घेतलेली प्रेरणा जणू नृत्यातील पदन्यास टाकत आहे. कृत्रिम पाय लावूनही दुसऱ्यांची चाकाची खुर्ची मागील दोन चाकावर नेणाऱ्या चेन्नईच्या पार्वतीआई. या सर्वांना कौतुकाने न्याहाळत आकाशाकडे दोन्ही हात पसरून देवाचे आभार मानणारी नसीमा.

हा एवढा प्रचंड प्रवास खरंच मी कसा करू शकले? कोणती शक्ती मला लाभली? कोणी दिली ही ताकद? या सर्वांचं बीज रुजवलं, प्राणप्रिय बाबूकाकांनी आपल्या हाताने. तो क्षण मला आठवतो. माझी मैत्रीण अरुणा कामतने रमाकाकींच्या घरी बाबूकाकांना भेटायला ये असा निरोप दिलेला. माझ्यासारखेच पॅराप्लेजीक, लघवी संडासाच्या प्रश्नासहित चाकाच्या खुर्चीतून वावरणारे. पण ते येणार होते. हाताने चालवायच्या कारमधून. अत्यंत उत्सुकतेने माझ्या अवजड मोठ्या चाकांच्या खूर्चीतून मी रमाकाकींकडे गेले. त्यांनी अंगणातच टेबलखुर्च्या मांडून ठेवलेल्या होत्या. पायऱ्या चढून वर जायचा प्रश्न नव्हता. थोड्याच वेळात बाबूकाका आले. स्वत: ड्रायव्हिंग सीटवर बसलेले. कार थांबली. त्यांची हलकी फुलकी लहानशी सर्व बाजूने मिटलेली चाकाची खुर्ची त्यांच्या दाराजवळ मदतनीसाने आणली. व बाबूकाका स्वत:च त्या चाकाच्या खुर्चीत त्या खुर्चीच्या हॅन्डलला धरून उडी मारल्यासारखे बसले. कडक इस्त्रीचे कपडे, शर्ट, पँट, पायात मात्र बुटाऐवजी मोजे. माझ्यासारखेच मोज्या-आतील पाय सुजलेले, इतकं प्रसन्न हसत बाबूकाकांनी हात जोडून नमस्कार केला की नकळत मीही हसून हात जोडले. चाकाच्या खुर्चीतील व्यक्ती इतकं छान हसू शकते. क्षणात भोवतालचे वातावरण उत्साही, आनंदाने सळसळणारे बनवू शकते. मी स्वप्नात आहे अथवा हे सत्य आहे? थोडावेळ संभ्रमात पडले. मी भानावर आले ते बाबूकाकांच्या वाक्याने 'या नसीमाला छान हसता येते. आवडलं हे हास्य असंच हसत रहा व इतरांना हसव' बाबूकाका आरशात स्वत:चे प्रतिबिंब पहात होते. माझं हास्य हे त्यांचं आरशातील प्रतिबिंब होते. बस! तो एक क्षण, ती एक भेट मला अंतर्बाह्य बदलायला कारणी-भूत ठरली. त्या दिवसानंतर मला देवाघरी गेलेल्या बाबांची, लहानपणापासून नसलेल्या काकांची, मित्राची, गुरूची कशाकशाची उणीव भासली नाही.

त्या दिवशी एका नव्या नसीमाने जन्म घेतला. इतरांना, इतर अपंगांना हसवण्यात आपल्या स्वत:ला जो ब्रह्मानंद मिळतो तो अनुभवानेच घ्यावयाचा असतो. दोन-चार तास चाकाच्या खुर्चीत व बाकी पूर्ण वेळ बिछान्यात घालवणारी मी हळू-हळू बसण्याचे तास वाढवत पूर्ण दिवसही बसून काम कधी करू लागले हे माझे मला समजले नाही.

बाबूकाकांची दुसरी भेट ही कोल्हापूर-मध्येच त्यांच्या घरी झाली. तोपर्यंत माझे शिक्षण सुरू होऊन मी एफ.वाय.बी.ए.ची परीक्षा दुसऱ्या वर्गात पास झाले होते. कोल्हापूरमधील इतर अपंगांचे बाबूकाकांनी दिलेले नाव व पत्ते घेऊन भाऊ अजीजच्या मदतीने त्यांच्याशी संपर्क साधलेला होता. अपंग पुनर्वसनासाठी संस्था स्थापनेची पूर्व-तयारी सुरू होती. बाबूकाकांची शाबासकीची थाप पाठीवर पडली व कामाचा उत्साह, जोम दुणावला. बाबूकाकांकडे हक्काने हट्ट करण्याइतकी जवळीक झाली.

त्यानंतर मात्र बाबूकाका भेटले ते त्यांच्या शब्दात त्यांना आंतरराष्ट्रीय पाहुणा भेटल्यावर. इतर कोणापेक्षाही त्याने बाबू-काकांचा पूर्ण वेळ, पूर्णपणे ताबा घेतला. माझ्यापासून दूर नेणाऱ्या त्या पाहुण्याची खूप चीड आली. देवाला हे असं का? याचा जाब विचारावासा वाटला. ब्लॅड कॅन्सरने बाबूकाकांना गाठले होते. सतत कॅथेटर वापरून झालं असावं! केमोथेरपी घेतलेले, वेदनांनी वेढलेले तरीही काम करणारे, ट्युशन घेणारे, खळाळून हसणारे बाबूकाकांचे हे आगळे-वेगळे रूप बघून थक्क झाले मी! ते कोल्हापूरला आले की मी जास्तीत जास्त वेळ त्यांच्या सोबत असे. त्यांना काय हवं नको बघणे, सूप देणे,अंगाला खूप खाज सुटायची, पाठ खाजविणे, त्यांनी सांगितलेली पत्रं लिहायची. त्या लिखाणातही विनोद असे. त्यांच्या सोबत असताना मी पण भारलेली, चैतन्याने मुस-मुसलेली असायचे. त्यांच्यासमोर त्यांची अवस्था बघून कधी रडले नाही मी. पण माझ्या घरी परतताना, परतीच्या वाटेत मात्र बाबूकाका आपल्याला अधिक काळ लाभणार नाहीत. चाकाच्या खुर्चीतून जगताना आड येणाऱ्या दऱ्या, डोंगर कसे ओलांडायचे. खूप काही मला त्यांच्याकडून शिकायचं होतं. पण केव्हा व कसे? या विचाराने मी गलितगात्र झाल्या-सारखी व्हायचे. घरी येताच आई म्हणे 'केवढी दमली आहेस! आज जास्त उशीर केलास? चल जेव व झोप' बाबूकाकांच्या मदतनीसाने मला घरी चाकाच्या खुर्चीतून ढकलत आणलेले असल्यामुळे मी बाबूकाकांकडेच होते हे आईला न सांगताच कळत असे. त्या वेळी मला जेवण नकोसे वाटे. खूप वेळ झोप येत नसे. बाबूकाकांनी कोल्हापूर येथेच राहावे. बेंगलोरला जाऊच नये, असं वाटतं असताना कॅन्सरने तर त्यांना कायमचं दूर नेण्याचे प्रयत्न चालवले होते. दुसऱ्या दिवशी परत बाबूकाकांना भेटायला जाण्याइतकी, तिथे बसण्याइतकी ताकद हवी. व उपाशी झोपायचे नाही ही आईची शिकवण. त्यामुळे थोडे जेवून मी पलंगावर पडत असे. आता मला उचलून पलंगावर ठेवत नव्हते. बाबूकाकांना गाडीतून उतरताना-चढताना पाहिल्यापासून त्यांच्याप्रमाणेच मी कॉटवर,

रिक्षात चढायला-उतरायला शिकले होते. बाबूकाकांनी मला हातात सर्जिकल हॅन्डग्लोव्हज घालून पोट कसे साफ करायचे हे सांगितल्याने मी तो प्रयोगही सुरू केला होता. न कंटाळता रोज प्रयत्नाने आता यशही येऊ लागले होते.

बाबूकाकांचे आयुष्य आणखी जवळून, अगदी जवळून पाहाण्याची इच्छा होती. बाबूकाकांनी बेंगलोरला त्यांची संस्था, त्यांची कर्मभूमी पाहण्याचे आमंत्रण दिले. आ. दत्ता बाळ यांच्याकडून येण्याजाण्याच्या खर्चाची सोय करून दिली. ती आर्थिक मदत घेताना स्वाभिमान आड येत होता. नको दुसऱ्यांची मदत असं वाटत होते. पण बाबूकाकांनी समजावले 'आज गरज आहे तर अवश्य मदत घे. पण त्याची परतफेड इतरांना सातत्याने अशीच मदत करून करायची आहे. हे कायम लक्षात ठेव.' मी, अजीज व मावशी बेंगलोरला बाबूकाकांकडे गेलो. बाबूकाका स्वत: घ्यायला व सोडायला स्टेशनवर आले होते. केवढं आश्चर्य वाटले होते मला.

बेंगलोरची ती ट्रीप हे माझ्या आयुष्यातील एक सुंदर वळण होते. या वळणावर मला बाबूकाकांनी डॉक्टरांच्या मदतीने कॅथेटरचा मंत्र दिला. कपडे भिजणे थांबले. मी तेथील क्रीडास्पर्धेत भाग घेतला. बक्षीसे मिळविली. भालाफेक, थाळी फेक, गोळाफेक, चाकाच्या खुर्चीची शर्यत, टेबल टेनिस. पुढे इंग्लंडपर्यंत क्रीडा स्पर्धेसाठी मजल मारली. इंग्लंडहून अपंग पुनर्वसनाच्या नवनवीन कल्पना घेऊन भारतात आले व त्या कल्पना, ती स्वप्ने आज कल्पनेपलीकडे सत्यात उतरली आहेत. याच बेंगलोर ट्रिप मध्ये मी बाबूकाकांसोबत त्यांच्या कार्यालयात व वर्कशॉपमध्ये थांबून त्यांची कार्यपद्धती न्याहाळली. अभ्यास करण्याचा प्रयत्न केला. बाबूकाका समजावून सांगत होते. पण मला काहीच कळत नव्हत. टेलिफोनचे पार्टस् बनविण्याचे ते मोठे वर्कशॉप व कार्यालयातील काम, मी कमी, सामान्य बुद्धीची. मला हे कधीच जमणार नाही, असे त्या क्षणी वाटले. याच बेंगलोरच्या वास्तव्यात बाबूकाकांशी तासन्तास बोलत बसण्याची संधी मिळाली. मनातला प्रत्येक प्रश्न मी विनासंकोच त्यांना विचारत होते व तेही तितक्याच खुल्या मनाने मला मार्गदर्शन करत होते. स्त्री, पुरुष, मैत्री करावी. संकोच नसावा पण कोठे कशी मर्यादा पाळायची याची उदाहरणे त्यांनी त्यांच्या आयुष्यातील झालेल्या प्रसंगांचा उल्लेख करून सांगितली. अपंग, पॅराप्लेजिक हीसुद्धा शेवटी माणसेच असतात. तरी पण कितीही मोह झाला तरी चांगलं-वाईट, योग्य-अयोग्य हे ओळखायला शिकले पाहिजे. निर्मळ आनंद कसा मिळवायचा हे मी बाबूकाकांकडूनच शिकले.

लहान मुलाला बोटाला धरून चालवावं त्याप्रमाणे बाबूकाका मला सोबत घेऊन मुंबईत आ. विजय मर्चंट, फातिमा इस्माईल, नमा भट या अपंग पुनर्वसन कार्यात उल्लेखनीय भरीव कार्य करणाऱ्या अनेकांना भेटले. माझं विश्व विस्तारत गेले.

शेवटी तो क्षण आला. या आंतरराष्ट्रीय पाहुण्याला (ब्लॅडर कॅन्सर) इथून बायबाय करता येणार नाही. अगदी शेवटपर्यंत जावं लागणार. वेळ थोडा आहे. काम खूप आहे. सहकारी हेमा अय्यंगार सर्व सांभाळून घेईल. म्हणणारे बाबूकाका शेवटचा श्वास घेऊ लागले. त्यांचे जिवलग मित्र व आमचे काका बाळ जनवाडकर यांचा फोन आला. शेवटचे भेटायचे असेल तर पुण्याला कमांड हॉस्पिटलमध्ये भेटून या. एकदा जाऊन भेटले होते. पण आता परत रजनी, शकुंतला सोबत गेले. मध्यरात्री कॅथेटर बसवायला कोठून डॉक्टर, नर्स आणायची?



म्हणून मीच प्रयोग करून फॉलीस कॅथेटर बसविला. पोहोचलो तर बाबूकाका ग्लानीत अर्धवट शुद्धी-अर्धवट बेशुद्धीत होते. मला इन्फेक्शन होऊन ताप चढू लागला होता, ओकाऱ्या सुरू झाल्या. त्या तशा ग्लानीत त्यांनी मला ओळखले. 'लवकर घरी आले आहे असे त्यांना वाटत होते. रजनीला गाणं म्हणायला लावलं. 'केळीचे सुकले बाग' संपताना सर्वांचे डोळे पाणावलेले होते. अर्धवट बेशुद्धीत बाबूकाकांना तसेच सोडून मूकपणे परतले. कारण आम्हा सर्वांची राहण्याची सोय पुण्यात कोठेच होण्यासारखी नव्हती.

कोल्हापूरला परतलो व बातमी मिळाली.'बाबूकाका स्वर्गवासी झाले.' दोन-तीन दिवस मी तापाच्या ग्लानीत बाबूकाकांसोबतचे दिवस आठवत गप्प पडून होते. उठले ते बाबूकाकांचा उत्साह आनंद माझ्या सामावूनच. तेव्हापासून प्रत्येक क्षणी बाबूकाका माझ्या सोबत आहेत. आनंदात, दु:खात, निराशेत-आशेत, स्वप्नात-जागेपणी, त्यांच्या विरहाचे दु:ख उरलेच नाही.

२२ वर्षे मी केंद्र शासनाची नोकरी केली. नोकरी करता-करता 'हेल्पर्स ऑफ दि हॅन्डीकॅप, कोल्हापूर' स्थापन केली. आज हेल्पर्सचे अनेक प्रकल्प आहेत. चार वसतीगृहे, शालेय-महाविद्यालयीन शिक्षण, व्यवसाय प्रशिक्षण घेणांऱ्यासाठी, मतिमंदांना स्वावलंबन शिकवण्यासाठी ही वसतीगृहे आहेत. समर्थ विद्यामंदिर अपंग-सुदृढ एकत्रित शाळा, अर्थार्जनासाठी कुकींग गॅस एजन्सी, हॅन्डीहेल्प नागरी सहकारी पतसंस्था, लाजवाब फिरते उपाहारगृह, स्वप्ननगरी शेती प्रकल्प, गाई-म्हशी पाळून दूध प्रकल्प, उपाहारगृह, स्वप्ननगरी, शेती प्रकल्प, जनरल स्टोअर्स, एक ना अनेक प्रकल्प जे अपंगांना सन्मानाने स्वाभिमानाने समाजाचा उत्पादाक घटक म्हणून जगायला शिकवतात.

हे प्रकल्प पाहून काहीजण म्हणतात. 'गुरु से शिष्य सवाई' जसे 'बाप से बेटी सवाई' बाबूकाका हे माझे गुरु त्यांनी असा शिष्य एवढ्या अल्पकाळात घडवला. तेव्हा सारे श्रेय त्यांना. स्वर्गातून ते नक्कीच सर्व प्रकल्प पाहात असतील. मला शाबसकी द्यायला ते स्वप्नात बऱ्याच वेळा मला भेटतात. ते मला स्वत:ची मुलगी मानत. ते पॅराप्लेजिक झाले तेव्हा त्यांची सातव्या महिन्यात जन्मून देवाघरी गेलेली मुलगी असती तर ती माझ्याच वयाची असती. तिचाही जन्म १९५० मध्येच झाला होता. मी सतत बाबूकाकांना पत्रे लिही. माझ्या ४-५ पत्रांची उत्तरे त्यांनी एका पत्राने ते ही रात्री १-२ वाजता लिहून दिलेले असे. एका पत्रात त्यांनी लिहिले होते. 'तुझ्या पत्राने मनाला खूप दिलासा मिळाला.' 'सूप काय करतं. कचरा फेकून देतं' अपंग पुनर्वसनाच्या कार्यात येणारे कडू अनुभव मी सुपातील कचरा म्हणून फेकून देते. चांगल्या अनुभवाचा साठा करते व ते वाटत राहाते.'

पहाटे किंवा संध्याकाळी सुरेख रॅम्पवरून माझी मीच स्पॉन्डीलायसिसच्या दुखण्यासोबत स्वप्ननगरीच्या टेरेसवर चाकाच्या खुर्चीतून एकटीच जाते. हिरवीगार वनराई, डोंगर, डोंगरावर उतरलेले ढग, वारा व निरव शांतता, आकाशाची भव्यता, उगवणारा किंवा मावळणारा सूर्य या सोबत माझ्याबरोबर असतात बाबूकाका व जन्मदाते बाबा. बाबा बाबूकाकांना म्हणतात 'तुम्ही नसीमाला असा पुनर्जन्म देणार आहात याची कल्पनाच करू शकलो नाही. १६व्या वर्षी हिला अशी विकलांग बघून माझे हृदयच बंद पडले. तुम्ही नसीमाला भेटला व माझी काळजी संपली.''

अनोखे ऋणानुबंध

# चौगुणी दत्ता चौगुले

**रा. रं. बोराडे**

दत्ताची आठवण झाली की आजही अनवाणी पायाखाली खडा रुतावा तसं माझं होतं. नियती इतकी क्रूर असते? फूल उमलू द्यायचं, रंगानिशी, गंधानिशी फुलू द्यायचं आणि एका आंधळ्या रात्री पायाखाली चिरडून टाकायचं. असं आणि इतकं चिरडून टाकायचं की पाकळीला पाकळी लावणं या पाकळ्या देठाला जोडणं अशक्य व्हायचं.

हे फूल उमलताना मी पाहिलं होतं. या फुलांच्या पाकळ्या खुलताना मी पाहिलं होतं. या फुलाचा रंग खुलत राहाणार या फुलातला गंध दरवळत राहाणार, हे मी तेव्हाच जाणलं होतं. त्या काळात अशी कितीतरी फुलं माझ्या अवतीभवती फुलत होती.

ते १९६९चं वर्ष होतं. मी परभणी येथील श्री शिवाजी महाविद्यालयात मराठीचं अध्यापन करीत होतो. महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनाचे ८ दिवस होते. स्नेहसंमेलनात मला एक मराठी एकांकिका सादर करायची होती. एकांकिकेचं लेखन मी स्वत:च केलेलं होतं. एकांकिका लेखनाचा माझा तो पहिलाच प्रयत्न होता. अभिनयाची जाण असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या- विद्यार्थिनींच्या शोधात मी होतो. एक टपोरं, आकर्षक फूल मी वेचित होतो. या वेचणीत जी फुलं माझ्या हाती लागली त्यामध्ये आजचा मराठीतला आघाडीचा कवी प्रा.फ.मुं.शिंदे, दत्ता चौगुले, गणेश धांडगे, माधुरी जोशी (आशीरगडे), सरोज तत्त्ववादी (अलकुंचवार) या सुगंधी, आकर्षक फुलांचा समावेश होता. माझ्या या विद्यार्थ्यांनी माझी ती एकांकिका एवढ्या झोकात सादर केली की, ती केवळ स्नेहसंमेलनातल्या यशस्वी कार्यक्रमाचा मानदंडच ठरली नाही तर मला नाट्यलेखानाचं बळ देऊन गेली. या बळावरच माझा पुढचा नाट्यलेखनाचा प्रवास सुरू झाला.

या विनोदी एकांकिकेनंतर मी 'अंधाराच्या गडद कडा' हे बिन बाईचं वगनाट्य लिहिलं. या वगनाट्यात दत्ता राजाची भूमिका करायचा. दत्तानं राजाची वेषभूषा केली की, तो खरोखर राजबिंडा दिसायचा. या नाट्यलेखनाच्या व प्रयोगाच्या निमित्तानं माझे विद्यार्थी माझ्या आयुष्यात आले आणि माझ्या आयुष्याशी कायमचे जोडले गेले.

या पाखरांच्या पंखात बळ येताच ही पाखरं उडून गेली. सोयीशक्यतेनुसार स्वत:ची घरटी बांधून राहू लागली. कधीतरी कुठं तरी त्यांच्या माझ्या भेटी व्हायच्या. दिलखुलास बोलणं व्हायचं. आठवणींना उजाळा मिळायचा.

दत्ता एम.ए.झाला. कन्नड (जि.औरंगाबाद) येथील एका महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून रूजू झाला. त्या महाविद्यालयच्या स्नेहसंमेलना-निमित्त तिथं जाण्याचा मला योग आला. त्याची माझी गाठभेट झाली. आठवणी निघाल्या. कोण, कुठं आहे, याचा ठावठिकाणा कळाला.

थोड्याच दिवसात दत्तानं कन्नडची नोकरी सोडली. वसमत (जि.परभणी) येथे तो प्राध्यापक म्हणून रूजू झाला. वसमतला तो एकटा गेला नाही तर सोबत कन्नडच्या महाविद्या-लयातील एका सुंदर सुस्वभावी प्राध्यापिकेला आयुष्याची जोडीदार म्हणून घेऊन गेला. गाव वसमत असलं तरी त्याच गावात वसला. त्याच गावात रमला.

वसमतला स्थिरावल्यानंतर त्याच्या कलागुणांची एक एक पाकळी उमलत चालली. बहिणाबाई चौधरींच्या काही कवितांच्या त्यानं स्वत: चाली बांधल्या. खानदेशाच्या या मळ्याला मराठवाड्याचा गळा दिला. 'खानदेश मळा, मराठवाड्याच्या गळा' हा कार्यक्रम महाराष्ट्रभर गाजला. मुंबई दूरदर्शनने हा कार्यक्रम प्रक्षेपित केला.

दत्ताने स्वरबद्ध केलेली ती बहिणाबाईची गाणी प्रा. अशोक जोंधळे व सौ. आशा जोंधळे गायचे. साथसंगत प्रा.श्रीकांत सदावर्ते व श्री. काळे करायचे या कार्यक्रमाचे सूत्र-संचालन प्रा. फ.मुं.शिंदे करायचा तो उपलब्ध नसेल तर प्रा.शेख शफी अथवा दत्ताची पत्नी- चारुदत्ता करायची. या कार्यक्रमामुळं दत्ता मराठी रसिकांना परिचित झाला.

एके दिवशी मी रेडिओवर दत्ताचं बासरीवादन ऐकलं आणि विलक्षण स्तिमित झालो. ही साधना दत्तानं कुठं केली असेल? केव्हा केली असेल? त्याचा गुरु कोण असेल? त्याच्या वाट्याला एकलव्याची साधना आली तर नसेल? मी विचारपूस केली तेव्हा मला कळाले ते असं. दत्ताचं बासरीवादनाचं शिक्षण पं. रघुनाथ सेठ (मुंबई) यांच्याकडं झालं होतं.

दत्ता उत्तम गझल गायचा. गझल गायनाचे कार्यक्रम करायचा. दुष्यंतकुमार यांच्या गझला त्याने स्वत: स्वरबद्ध केल्या होत्या. कार्यक्रमाचं संचालन चारुदत्ता करायची. देखणं संचालन कसं असावं याचं जणू ते प्रात्याक्षिक असायचं.

दत्ताला मुंबईच्या सूरसिंगार संस्थेचा 'सूरमणी' हा किताब लाभला. दत्ता गायक, बासरी वादक, संगीतकार म्हणून नावारूपाला येत चालला.

सत्तावीस वर्षांनंतर माझी बदली पुन्हा परभणीला प्राचार्य म्हणून झाली. दत्ता आवर्जून मला भेटला. म्हणाला, ''बरं झालं सर. तुम्ही पुन्हा आमच्याजवळ आलात.''

एका सकाळी वार्ता आली, दत्ताचं अपघाती निधन झालं! वसमतला प्रतिवर्षी जन्माष्टमीनिमित्त गायन-वादनाचा कार्यक्रम असतो त्या कार्यक्रमासाठी काही कलावंतांना निमंत्रण देण्यासाठी दत्ता पुण्याला गेला होता. रात्रीच्या बसनं परत येत असता वेगानं काटकोनात आलेल्या दुसऱ्या गाडीनं या बसला जोराची धडक दिली होती. दत्ता ज्या बाजूला आणि जिथे बसला होता तिथंच ही धडक बसलेली होती. दत्ताच्या शरीराचा चेंदामेंदा झाला होता. फूल चिरडलं गेलं होतं. इतकं आणि असं चिरडलं गेलं होतं की पाकळीला पाकळी लावणं या पाकळ्या देठाला जोडणं अवघड गेलं.

''बरं झालं सर. तुम्ही पुन्हा आमच्या-जवळ आलात'' असं म्हणणारा दत्ता माझ्या-पासून कायमचा दूर... किती तरी दूर गेला होता.


**असे बना अन् बनवा विद्यार्थी**

**शं. व्यं. काश्यपे**



खरे विद्यार्थी कसे असावे याचे शास्त्रशुद्ध मार्गदर्शन

किंमत : १००रु.
सभासदांना : ७०रु.
पोस्टेज : २०रु.

अनोखे ऋणानुबंध

# आमचे वयातीत नाते

**डॉ. सुवर्णा दिवेकर**

समोरच्या ब्लॉकची दारं सारखी उघडत होती, मिटत होती. एकएक करून पॅक केलेले सामान हमाल वाहून नेत होते. टी.व्ही. गेला, फ्रीज गेला, आता हमाल भांडी भरून ठेवलेले बॉक्सेस जिन्यावरून खाली नेऊ लागू लागले. ब्लॉक जवळजवळ रिकामा होत गेला. आता उद्यापासून माझ्या ब्लॉकसमोरचा फडक्यांचा ब्लॉक नेहमीसाठी रिकामा होणार होता. फडक्यांच्या घराची आणि कुसुमताई फडक्यांची मनाशी घट्ट गाठ जुळलेली सोबत संपणार होती. गेली सहा महिने माहीत होतं, फडक्यांच्या मुलाने, सुनील फडक्यांनी खडकीच्या रेंजहिल भागात नवीन तीन बेडरूम्सचा मोठा ब्लॉक बुक केला आहे. (मुलांसाठी स्वतंत्र बेडरूम नसल्याने) भांडारकर रोडचा दोन बेडरूम्सचा ब्लॉक छोटा पडत होता. व्यावहारिक दृष्ट्या सारं योग्यच होतं, पण कुसुमताईंना, फडके मावशींना ही जागा, आमचा शेजार आणि विशेषत: माझ्याशी जडलेलं वयातीत नातं सोडणं अतिशय जड वाटत होतं. कारण आता रोजच्या गाठीभेटीत, गप्पात दृढ होत गेलेला अनोखा स्नेहसंबंध 'पाहुणे' पातळीवर उरणार होता. तोही फक्त माझ्यातर्फे. कारण मी कधीतरी का होईना खडकीला फडके मावशींना भेटायला म्हणून निश्चितच जाणार असले, तरी त्या जाण्यालाही भौगोलिक अंतर आणि वेळेच्या मर्यादा असणारच होत्या.आणि कुसुमताई तर फिरून माझ्याकडे कधीही येणार नव्हत्या. कारण पाच वर्ष झाली, त्यांचा एक पाय गुडघ्यापासून कापलेला होता.

फडक्यांचा ब्लॉक पूर्णपणे रिकामा झाला. सामान ट्रकलोड होऊन नव्या ब्लॉकवर गेलं. सामानासोबत कुसुमताईंचा मुलगा, सून आणि नव्या मोठ्या घरात रहायला जाणार म्हणून अतिशय आनंदात असणारी नातवंडं त्यांच्या कारमधून गेली होती. रिकाम्या घरात उरली होती फक्त व्हीलचेअर आणि या चेअरवर बसून मनसोक्त रडणाऱ्या कुसुमताई आणि त्यांचा थकलेला वृद्ध हात हातात धरून अश्रूंना वाट करून देणारी मी, त्यांची त्यांच्यापेक्षा तीस वर्षांनी लहान असलेली मैत्रीण, (हो! फक्त मैत्रीणच! आम्ही कधीही 'तू मला मुलीसारखी, तुम्ही मला आईसारख्या, किंवा तुम्ही माझ्या मावशी-काकी, आणि तू माझी भाची, पुतणी, अशी 'मानीव' नाती जोडली नाहीत. किंवा पूर्वजन्मीचे ऋणानुबंध असंही मानलं नाही.)

आता काही तासातच कुसुमताई माझा निरोप घेणार होत्या. वीस वर्षांचं शेजारधर्माच्या पलीकडे गेलेले हे अनोखे मैत्र तुटणार तर नव्हतंच. इतकं आजन्म नातं होतं ते. फक्त दुरावणार मात्र होतं. म्हणूनच ही हुरहुर,बैचेनी.

अशीच हुरहुर मला वीस वर्षांपूर्वीही वाटली होती. मला समोरचा नवा शेजार कोण असणार आहे? नवीन ब्लॉक खरेदी करतांना बिल्डरकडे आमच्या समोरच्या ब्लॉकवर फडक्यांच्या नावाची नोंद होती. परंतु आडनावा-खेरीज बाकी काही माहीत नव्हतं. वाडा संस्कृतीमध्ये बाळपण गेलेल्या मला 'शेजार' या नात्याचं (अन) मोल जन्मापासूनच माहीत होतं. त्यामुळे 'कोणी का शेजारी असेनात, आपलं दार बंद, त्यांचं दार बंद' अशी 'बंदिस्त' भावना कधीच नव्हती. शिवाय १९७६/७७ च्या सुमारास भांडारकर रोड-वरची वसाहत जवळ जवळ निर्मनुष्य आणि त्यातही जोशी-अभ्यंकरांची खुनाची घटना नुकतीच घडलेली. अद्याप गुन्हेगारही सापडले नव्हते. त्यातून दिवसभर घरात मी एकटीच असणार होते. त्या दृष्टीनेही मला शेजार फार महत्त्वाचा होता. आम्ही 'सुखद' मध्ये राहायला आलो. तेव्हा समोरच्या ब्लॉकचे दार बंद होते. पण दारावरचे तोरण आणि कुंकवाचे स्वस्तिक वास्तुपूजन होऊन गेल्याचं सुचवत होते. पलीकडच्या प्लॉटवरच बंगल्यात राहणाऱ्या बिल्डरनी सांगितले ''फडके लोकं तीस वर्ष कलकत्त्यात होती. आता ते पुण्यात स्थायिक होणार आहेत. दोघे नवरा-बायकोच पुण्यात राहणार आहेत. एक मुलगा लंडनला, एक शिपवर आणि एक टाटानगरला आहे. वास्तुशांत करून ते लोक कलकत्त्याला सामान आणायला गेले आहेत. पुढच्या सोमवारीच येतील इथं राहायला.'' मनात एक खट्टूभाव उमटला. मिसेस फडके माझ्यापेक्षा खूप मोठ्या असणार होत्या. मला समवयस्क सोबत असणार नव्हती.

त्यानंतरचा मंगळवार. सकाळी सकाळी दाराची बेल वाजली. आणि दारात हसतमुख आणि हातात बंगाली मिठाईचा बॉक्स घेतलेल्या कुसुमताई उभ्या होत्या. ''गुड मॉर्निंग, मी कुसुम (स्वत:चा नेहमीच एकेरी उल्लेख) नवी शेजारीण तुझी. ए,तुला तूच म्हणते बरं मी. आमच्या सुचित्रा एवढी (सून) तू. तर मी तुला ए म्हणणंच ठीक राहील.'' किरकोळ अंगकाठी, छोटासा अंबाडा, मध्यम उंची, सावळ्या पेक्षा थोडा उजळरंग, आणि अतिप्रसन्न हास्य, कलकत्त्याहून आल्याची ग्वाही देणारी ढाका साडी, भांगात सिंदूर, गळ्यात छोटंसं मंगळसूत्र. हात मात्र मोकळे, टिपिकल मध्यमवयीन बाईसारखा (त्याकाळातल्या) 'गेटअप' तर नव्हताच. पण बंगाली आणि इंग्लिश शब्द मध्ये 'साहजिक-पणे' येतजात बोललेलं मराठी, मी त्यांना आत बोलावून चहाबद्दल विचारलं, तर आढेवेढे न घेता म्हणाल्या,''करतेस तर कॉफी कर. मी चहा घेत नाही आणि कॉफी बिन साखरेची. अगं, डायबेटिस आहे मस्तपैकी'' एखादी वस्तू खरेदी केल्याचं बोलावं तशा त्या म्हणत होत्या.

त्या बिनसाखरेच्या कॉफीतून निर्माण झालेलं आमचं नातं मात्र 'गोडं' होत गेलं. औपचारिकपणाची (उसनी) कवचकुंडलं कधीच गळून पडली. त्याचं श्रेय देते कुसुमताईनाच. कारण अत्यंत हुशार, जुन्या काळातही नागपूरला हॉस्टेलमध्ये राहून कॉलेज शिक्षण घेतलेल्या (आणि १९७६/७७ चा काळ पाहताना) मुलाकडे लंडनला वास्तव्य करुन आलेल्या, सफाईदार इंग्रजी बोलणाऱ्या, तीन स्कॉलर आणि मोठ्या पदावर असणाऱ्या मुलग्यांची आई, आर्थिक दृष्ट्या आमच्यापेक्षा कितीतरी वरचढ गटात असलेल्या कुसुमताईनी त्यांच्या आणि माझ्यात असणारी अनेक अंतरं कापून टाकली. आस्ते आस्ते... सहजपणे...

आमच्या मैत्रीची वाट पहिल्यांदा आणि नंतर निरंतर पोटाच्या रस्त्याने चालू झाली. म्हणजे झालं काय, मी संसारात आणि स्वयंपाकात नवशिकी आणि कुसुमताई सर्व प्रांतीय आणि आंतरराष्ट्रीय कुकरीत एक्सपर्ट (त्यांच्या पंचाहत्तरीला 'शतरुची' हे त्यांचे पाककृतींवरचे सुरेख पुस्तक त्यांच्या मुलांनी प्रसिद्ध केले) त्या मला एखादा पदार्थ आवर्जून आणून देत किंवा त्यांच्या घरी खायला बोलवत. त्यांच्या घरी गेलं की त्या पदार्थाचा 'डिसप्ले'

फार आकर्षक करून ठेवलेला दिसे, सुंदरशी क्रोकरी, त्याखाली कागदी रूमाल आणि पदार्थाची आकर्षक सजावट. छे छे पाहुणे येणार किंवा पार्टीसाठी म्हणून नाही! त्या रोजचं जेवण, नास्ता किंवा अगदी चहाकॉफी असो सुंदर प्रेझेंटेशन सह चवदार अन्नब्रह्म समोर येई. ''अगं, लोकांसाठीच का म्हणून हे सारं करायचं? आपल्या मुला माणसां-साठी पण असं सुशोभित जेवण करावं. छान वाटतं घरात जेवायला.'' मला अगदी पटलं. उकडलेलं अंडं जरी प्लेटमध्ये ठेवलं, तरी त्या पटकन त्या अंड्याला काळे मिरे लावून दोन डोळे लावीत. काकडी-टॉमॅटोच्या चकत्या पायाखाली घालून 'अंड्याचा ससा' करीत. मी पण हळूहळू त्यांच्याकडून अनेक गोष्टी शिकू लागले. कुसुमताईंना कामाचा खूप उरक आणि सगळे काम शिस्तवार आणि व्यवस्थित. 'टाईम मॅनेजमेंट' हा शब्द ही फारसा माहीत नसलेला तो काळ होता. पण त्यांचे प्रत्येक बाबतीत व्यवस्थित प्लॅनिंग असे. खरेदी असो- वाचन असो- मेजवानी असो- मंगलकार्य असो. हळूहळू अनेक गोष्टींचं 'गुरुत्व' मी त्यांना देऊ लागले. त्यांच्याकडे पैसा असूनही 'उतमात' नव्हती की अनाठायी खर्च नव्हता. नोकरचाकर तर नव्हतेच. 'अपना हाथ जगन्नाथ' असं म्हणायच्या आणि वागायच्या. मग जशी ओळख वाढत गेली तशी वय विसरून आमच्या 'ये हृदयीच्या ते हृदयी' गोष्टी सुरू झाल्या. सुरुवातीच्या सावध, नंतरच्या मनमोकळ्या आणि त्यानंतरच्या कुठलाच आडपडदा नसलेल्या स्वच्छ गप्पा. वयातलं अंतर कधीच संपलं. कुसुमताईंचं छिंदवाड्याचं बालपण, सुरुवातीचा संघर्ष, नवऱ्याच्या सततच्या नोकऱ्या बदलणं, स्वत:च्या सर्व गरजा किमान ठेऊन मुलांचं कॉनव्हेंटचं शिक्षण, आणि मुलांशी संवाद आवश्यक म्हणून इंग्रजीवर मिळवलेले प्रभुत्व (पालकत्व ही जाणीवपूर्वक जपण्याची गोष्ट नसण्याचा काळ) त्यांचा परिवार, कलकत्ता आणि त्यांचं कलकत्ता मंडळ असा त्यांचा जीवनपट माझ्या ओळखीचा होत गेला. (पुढे आम्ही त्यांच्या मुलाकडे कलकत्त्याला जाऊनही आलो.) तसा माझाही जीवनपटच नाही, तर माझे नातेवाईक, मैत्रिणी, आवडी आणि माझं वाचन, आणि तेव्हा अगदीच थोडकुलं चाललेलं लेखन, त्यांच्या ओळखीचं होत होतं. ''तू पुढे शिकच, शिक्षणानं तुमचं मूळचं कसब वाढतं, आणि मी आहे ना मदतीला.'' असं नुसतं म्हणणंच नाही, तर कृतीही होती. मग पुढे मी त्यांच्याच उत्तेजनाने एम.ए. नंतर पीएचडी.च्या पायऱ्या चढत होते, तेव्हा त्यांचा मदतीचा हात आणि कौतुकाची थाप पाठीवर असे. अर्थात कुठलंही नातं एकतर्फी वाढू शकत नाही. कुसुमताईंच्या वयाच्या आणि डायबेटिसच्या मर्यादा लक्षात घेऊन मी माझ्या बाजारहाटाबरोबर त्यांचाही बाजार आणत असे. त्यांच्या यजमानांना झोपेत पॅरॅलेसिसचा अॅटक आला. तेव्हा माझ्या मिस्टरांनी आणि मी घरच्या माणसांहून जास्त धावपळ केली. मध्यरात्री डॉक्टरांना आणले. हॉस्पिटलमध्ये हलवले. असे अनेक सुखदुःखाचे जीवनव्यवहार आम्ही एकमेकींच्या साक्षीने, आधाराने काढले. माझी आई गेली तेव्हा मी पहिल्यांदा मनमोकळी रडले ती त्यांच्यापाशी आणि त्यांच्या (इंग्रज) सुनेशी मुलाने लग्न केले तेव्हाची त्यांची प्रतिक्रिया लपवाछपवी न करता उघडी झाली, तीही माझ्यापाशीच. त्यांची आणि माझीही वृत्ती छोट्या छोट्या गोष्टीत आनंद घेण्याची. मग ते एकत्रित पापड करणं असो, सुंदर चित्रपट पाहणं असो,एखादी पूजा (वटपौर्णिमा, हरतालिका इ.) एकत्रित करणं असो. आम्ही छानपैकी तयारी करून तो प्रसंग (इव्हेंट) साजरा करायचो. हॉटेलिंगची आवड दोघींनाही नव्हती. पण कुसुमताई त्या काळातही पिझ्झा, मॅकरोनी, रशियन सॅलॅड, सूप्स, पुडिंग्ज, केक उत्तम करीत आणि 'ला-ओपेलच्या' त्याकाळी मोजक्या लोकांकडे असणाऱ्या क्रोकरीतून सादर करीत. या सर्व तेव्हाच्या दुर्मिळ पाककृती आम्ही खाल्या आणि मी त्या बनवायलाही शिकले. एखादा अगदी पारंपरिक पदार्थ चुरमुऱ्याचे लाडू, जाड रव्याचा सांजा, मोदकही त्या करीत आणि मी म्हटले ''छानच झालाय'' तर म्हणत, ''नुसतं छान नको म्हणू. तू कधी करणार आहेस सांग. मी आहेना दाखवायला. त्याला एवढं एवढं लागतं. त्यापैकी केशर पिस्ता नको आणू बाहेरून. माझ्याकडचं देते.''
आमच्या दोघीत अनेक बाबतीत भिन्नता होती. त्यांना हस्तकलेची प्रचंड आवड (चार प्रचंड पेटारे कलावस्तूंनी भरलेले होते.) तर माझी मजल क्रोशाची लेस किंवा क्रॉसस्टिच पुरती. मला प्रत्येक अनुभव शब्दबद्ध करण्याची म्हणजे लेखनाची रुची, तर त्यांना पेन हाती धरण्याचा कंटाळा. तर मी कुठे बाहेर कलावस्तू पाहिल्या. प्रदर्शन पाहिले, की त्याची वर्णने त्यांना सांगणार तर त्यांना आलेला, पाहिलेला अनुभव सांगून त्या म्हणणार ''लिही तू यावर'' त्यांना कला-कौशल्याची आणि मला लेखनाची बक्षिसे मिळाली, त्याचा आनंद घेतला. त्यावेळी दूरदर्शन नव्यानेच सुरू झाले होते. मोजक्याच घरातून असणारा टी.व्ही. आमच्या घरात होता. फडक्यांना टी.व्ही. घेणं अगदी सोपं होतं. पण त्यांनी तो मुद्दाम घेतला नाही. ''रोजचा एक तास छानपैकी मिळून काढू टी.व्ही. पाहत.'' मग त्यांच्या कडचा सकाळचा उरलेला स्वयंपाक आणि मी केलेली एखादी पोहे, उपम्यासारखी ताजी डीश असं सह-भोजन होऊ लागलं. मी नव्या घरात आणि त्या पुण्यात एकमेकांच्या सोबतीने छान रूजलो. दोघींनाही आमची स्वतंत्र वर्तुळही होती. त्या वर्तुळातले अनुभव-ही आम्ही शेअर करत करत जवळ येत गेलो. कुसुमताई चार महिन्यांसाठी त्याच्या विशाखापट्टणमच्या मुला-कडे गेल्या होत्या. त्यांचे यजमान श्री. फडके स्वर्गवासी झाले होते. ते काही वर्ष अंथरूणाला खिळून होते तेव्हा कुसुमताईंनी 'दायी' वगैरे न ठेवता स्वत: सेवा केली. त्यावेळी स्वत:कडे लक्ष द्यायला वेळ झाला नाही. परिणामी डायबेटिस वाढत गेला आणि विशाखापट्टणमला पायाला काहीतरी टोचल्याचे निमित्त झाले आणि त्यांचा एक पाय गुडघ्या-पासून कापावा लागला. दीड पायांच्या कुसुमताई व्हीलचेअरवरून पुण्याला आल्या. साधारणपणे आठवर्षेत्या तशा अवस्थेत (बेड रीडन) होत्या. तेव्हाही त्यांनी कलाकौशल्याच्या अनेक वस्तू बनवल्या. वाचन तर होतेच. त्या एकदाही म्हणाल्या नाहीत की ''मी कंटाळले, कशाला हे जीवन परावलंबी दिले देवाने?'' त्यांच्या या वृत्तीमुळे आम्ही कापलेला पाय हा विषय वगळता पूर्वीसारख्या गप्पा करीत होतो. नंतर मग जागा कमी पडल्याने फडक्यांचे घर खडकीला गेले. पण आमच्या दोघींच्या मनात मैत्रीचे घर बांधलेले कायमच होते.''

अशाच एका सकाळी कुसुमताईंच्या बहिणीचा फोन आला. ''आज पहाटे कुसुम गेली.'' त्यांच्या 'दहाव्या'ला आम्ही खडकीच्या घरी गेलो होतो. एका चौरंगावर त्यांचा फोटो, अवतीभवती उजळलेल्या समया. फोटो शेजारी त्यांच्या 'शतरूची' पुस्तकाची प्रत आणि त्यांच्या असंख्य कलावस्तू टेबलावर मांडलेल्या. सभोवताली रंगसंगती साधलेली फुले आणि अतिशय नेटकेपणाने सर्व्ह केलेली 'प्रसादाची' डीश. मुलासुनांनी त्यांची अभिरूची मृत्यूनंतरही जपली होती. हे पाहून समाधानाचा हुंकार देणारं माझं मन हे अनोखं स्नेहनातं कायमचे संपल्याचे दु:खही सोबत वागवत होते. आणि वागवत आहे.

अनोखे ऋणानुबंध

# बिचारा हत्ती

**प्रतिभा काळे**

म्हातारपणी एकटं बसलं की, कुठल्या कुठल्या आठवणी येतात! काही चांगल्या, काही मजेदार काही बेचैन करणाऱ्या.

ह्यांची बदली अहमदाबादला झाली. आम्ही प्रथमच गुजरातमध्ये गेलो होतो. गुजरात प्रांत, तेथली भाषा, तेथली राहणी मला पुणेकरणीला नवीनच होती. माझा मुलगा विजय ३ वर्षांचा होता आणि मुलगी कल्याणी ३-४ महिन्यांची होती. शेजारी ४-५ मराठी कुटुंबे होती. बाकी सर्वजण गुजराथीच होते. भाषेच्या अडचणीमुळे त्यांच्याकडे येणेजाणे बोलणे सुरूच झाले नव्हते. आज लिहिते आहे त्याला ६० वर्षे झाली असतील.

त्यातल्या त्यांत जानकीबाई, प्रमिलाबाई आणि सुमतीबाई यांच्याशी माझी लवकर ओळख झाली. कारण त्या मराठीच बोलणाऱ्या होत्या. आम्ही सर्व मंडळी 'कॅलिको' मिलच्या आवारात राहात होतो. मुलगी लहान असल्याने त्यांच्याकडे माझे जाणे कमी व्हायचे; पण या तिघी माझ्याकडे नेहमी यायच्या. सुमतीबाई जरा जास्तीच कारण त्यांना स्वत:ला मुले नव्हती आणि लहान मुले त्यांना खूप आवडायची. त्यांना विजय आणि कल्याणी अतिशय आवडत असत. संध्याकाळी आल्या की येताना रंगीबेरंगी फुले घेऊन यायच्या आणि कल्याणीची बाबागाडी फुलांनी सजवायच्या. म्हणायच्या "प्रतिभाताई, आज कल्याणीला केशरी फ्रॉक घाला बरं का. आज मी केशरी फुलांनी गाडी सजवली आहे." तिची दुधाची बाटली, बदलायचे कपडे वगैरे सर्व तयारी करून घेऊन तिला मिलच्या आवारात फिरायला घेऊन जायच्या. असे बरेच वेळा झाल्यानंतर एकदा प्रमिलाबाई व जानकीबाई माझ्याकडे आल्या आणि म्हणाल्या "कशाला हो पाठवता सुमतीबाईंबरोबर कल्याणीला? असं बरोबर नाही."

मला कसेसेच झाले. त्यांना मुले नाहीत म्हणून त्यांच्याशी असे का वागतात? पण प्रमिलाबाई म्हणाल्या, "तसं नाही हो, पण ३-४ वर्षांपूर्वी त्यांना वेड लागलं होतं. बाहुली हातात घेऊन त्या फिरायच्या." मग त्यांच्या वेडाविषयीच त्या बोलत राहायच्या.

त्यानंतर कल्याणीला त्याच्यांबरोबर पाठवायचा मला संकोच वाटायला लागला. रोज संध्याकाळी तिचे कपडे बदलणे, गाडी फुलांनी सजवणे, चालूच असायचे.

एकदा अशाच त्या कल्याणीला फिरायला घेऊन गेल्या होत्या. थोड्याच वेळात जानकीबाईंची मुलगी धावत आली आणि म्हणाली "काकी, सुमती काकी कल्याणीला गच्चीवर घेऊन गेल्या आहेत. चला लौकर." आम्ही लगेच निघालो, तेवढ्यांत सुमतीबाई कल्याणीला घेऊन आल्या आणि म्हणाल्या 'प्रतिभाताई, आज मी कल्याणीला सगळे अहमदाबाद दाखवले. गच्चीवरून खूप छान दिसते सर्व!'

आमच्या तोंडचे पाणी पळाले होते ते त्यांना कसे सांगणार! कल्याणीला देवी काढल्या होत्या. कल्याणीला फिरायला नेणे बंद झाले होते. तरी त्या रोज यायच्या. विजयशी गप्पा, गोष्टी सांगणे, कागदाच्या होड्या करायला शिकवणे वगैरे चालू झाले.

छोट्या पलंगडीवर कल्याणी खेळत असायची. ही दोघेजण बाजूला बसून त्यांच्या कागदाच्या होड्या वगैरे आणि माझे घरकाम चालू असायचे.

एकदा अशाच बसल्या असताना एकदम उभ्या राहिल्या आणि म्हणाल्या, 'प्रतिभाताई, मी या दोघांचे फोटो काढते. मी काही बोलायच्या आधीच त्या भराभरा घरी गेल्या. त्यांचे मन दुखवायचे नाही असे मी ठरवले होते. त्या खरंच मुलांना अपाय करीत नाहीत याची मला खात्री पटली होती.

त्यांनी कॅमेरा आणला. कल्याणीला रंगीत कपडे घातले. विजयचेही कपडे स्वत:च बदलले. मग म्हणाल्या,'कल्याणीच्या गळ्यात घाला ना काहीतरी.'

मी माझी सर्व कामे बाजूला ठेवली आणि त्यांच्या मागे फिरू लागले. एवढ्यांत त्यांच्या काय डोक्यांत आले कोण जाणे! आपण ह्या मुलांच्या शेजारी प्रमिलाबाईंच्या घरातील काचेचा हत्ती ठेवू या. त्या लगेच त्यांच्या घरी गेल्या आणि काचेचा हत्ती घेऊन आल्या. कल्याणीच्या पलंगडीजवळ विजयला बसवले. जवळच तो हत्ती एका स्टुलावर ठेवला.

"अहो हत्तीच्या अंगावर दागिने हवेत की!' झालं त्या पुन्हा प्रमिलाबाईंच्या घरी गेल्या. त्यांचे सोन्याचे तोडे, चंद्रहार मागून आणला. प्रमिलाबाईही पाठोपाठ आल्या. त्यांना काही राहवेना.

एवढी जमवाजमव होईपर्यंत विजय कंटाळला. कल्याणीचेही दोनदा कपडे बदलून झाले. पण सुमतीबाईनं नेट धरून मुलांचे एकदाचे फोटो काढले. मग म्हणाल्या "आता एकदोनच शिल्लक आहेत ते काढून झाले की फिल्म डेव्हलप करून प्रिंट काढून आणीन. पण तुम्हांला एक सांगायचं राहिलं."

प्रमिलाबाई माझ्याजवळच बसल्या होत्या. त्या पुटपुटल्या.

"आता काय राहिलं यांचं?"

"प्रतिभाताई माझा एक योग आहे बरं का? सुमतीबाई सांगू लागल्या. मी ग्रुप फोटो काढला की त्यातलं एक कोणीतरी कमी होतं. मागे एकदा असंच झालं होतं."

सुमतीबाईंचे हे वाक्य ऐकून माझा धीरच सुटला. कल्याणीच्या देवी खूप फुलल्या होत्या. रात्रीची जागरणं करून मीही दमले होते.

दुसऱ्याच दिवशी विजयला ताप आला. मला काही सुचतच नव्हतं. सर्वांची मुले एकदम गोवराने आजारी झाली. विजय तर गोवराने फुलला होता. हे कामासाठी बाहेरगावी गेले होते.

"एक कोणीतरी कमी होतं." सुमतीबाईंचे शब्द माझ्या कानांत घुमत होते. मुलांचे सर्व करत होते पण सारखे वाटायचे की यांच्यातले कोणी कमी नाही ना होणार?वेड्यासारखी मी सारखा तोच विचार करत होते.

चारपाच दिवस गेले. हे गावाहून परत आले. मुलांच्या दुखण्याला थोडा उतार पडला होता. माझी चिंता ऐकून त्यांनी माझी चेष्टाच केली

"ती वेडी बाई काहीतरी बोलली आणि तू कसली काळजी करतेस! आता दोघांनाही बरे वाटले आहे ना? मग काय?" माझ्याच काळजीत मी होते. शेजारी जाणेयेणे नव्हतेच पण त्यांचीही मुले आजारी असल्यानं त्याचंही येणं बोलणं झालं नव्हतं.

एक दिवस ह्यांनी सांगितले की प्रमिलाबाईंच्या नवऱ्याची साराभाईंच्या दुसऱ्या मिलमध्ये बदली झाली. म्हणून मी प्रमिलाबाईंकडे जाऊन विचारले तर त्या म्हणाल्या, 'हो ना. आता कुठे मुले बरी झाली आणि आता सामानाची हलवाहलव करणे आले. आम्ही उद्याच जाणार सर्व.''

त्या सर्वांच्या जाण्याने मला आणखीच उदास वाटायला लागले. सुमतीबाईंच्या त्या वाक्यानंतर प्रमिलाबाईंनीच मला धीर दिला होता. पण माझं वेडं मन भ्यायलेलंच होतं.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी गेटवरच्या पहारेकरी बोलवायला आला.''प्रतिभाबेन, तमारा माटे टेलिफोन छे.'

तेव्हा आम्हा कुणाकडेच फोन नव्हते. मुलांकडे पाहायला नोकरांना सांगून मी फोन घ्यायला गेले.

प्रमिलाबाईंचाच फोन होता. मी म्हटले ''लागलं का सगळं सामान जागेवर? घर केवढं आहे?''

''घराचं जाऊ द्या हो. एक आनंदाची बातमी सांगते ती ऐका.'' आनंदाची बातमी? म्हणजे मुलांचे रिझल्ट लागले एवढ्यात?

''नाही हो. तसं काही नाही. पण माझा हत्ती फुटला! आता काही चिंता करू नका!''

क्षणभर माझ्या डोक्यात प्रकाश पडेना. हत्ती फुटला, आनंदाची बातमी.. आणि एकदम लख्ख प्रकाश पडल्यासारखे झाले. वीज चमकावी तसे काहीतरी घडल्यासारखे झाले. वेड्यासारखी फोनवरच रडायला लागले. आणि मग फोन खाली ठेवला.

सुमतीबाईंचे शब्द खरे ठरले. एक कोणीतरी कमी झाले, रडतच मी घरी गेले.

अजूनही ह्याविषयी मनांत विचार येतो.

श्री.दाते यांची बदली झाली, सामानाच्या हलवाहलवीत हत्ती फुटला. नसता फुटला तर? नसती त्यांची बदली झाली तर?

तर!तर!

जाऊ दे. आता ६० वर्षानंतर ह्या गोष्टीचा विचार कशाला करायचा? मुले मोठी झाली आहेत. त्यांचे चांगले चालले आहे.

आणि कसेतरी करून मनातल्या विचारांचा हा गोंधळ माझा मीच बंद केला.


**विविध जीवनानुभवांचे लालित्यपूर्ण प्रकटन करणारी पुस्तके**

**गोष्टी माणसांच्या**

**सुधा मूर्ती**

**अनुवाद**

**लीना सोहोनी**



*समजा, तुमच्या समोर अडचणी उभ्या राहिल्या तर तुम्ही स्वत:ला त्या सर्व समस्यांपेक्षा मोठं करायचं. तुम्ही मोठे झालात तर त्या अडचणी तुम्हाला छोट्या, किरकोळ वाटतील.पण जर का तुम्ही त्या अडचणींहून लहान झालात तर त्याच अडचणी तुम्हाला पर्वतासमान भासतील.*

**किंमत : १३०रु. सभासदांना : ९०रु. पोस्टेज : २०रु.**






# धडा

**महादेव मोरे**

१९५७ साली एस.एस.सी झालो व पुढील शिक्षणाची गावी सोय नसल्याने ४० कि.मी. वरील कोल्हापूरला गोखले कॉलेजमध्ये जाऊन ॲडमिशन घेतली. तेथे इंटर आर्टस्पर्यंत शिक्षण रेटले व पुणे विद्यापीठाच्या (तेव्हा शिवाजी विद्यापीठ स्थापन झाले नव्हते.) परीक्षेत इंग्रजीला केवळ आठ मार्कस् कमी पडल्याने नापास होऊन गावी परत आलो. पुनःश्च कोल्हापूर-सारख्या ठिकाणी राहून तेथील शिक्षणाचा खर्च पेलण्याजोगी घरचीही सुस्थिती नसल्याने गावी परत आल्यावर रानाशिवारात मजूरांसह राबायला लागलो. सारणी खोदणे, भाताची ओपाडी तयार करून त्यांचे भोवती बांध घालणे आदी उन्हाळी मशागतीच्या नावाखाली मोडणारी कामे करू लागलो. बी.ए. होऊन शिक्षक होण्याचं माझं स्वप्न, तर मला मिलिटरीत धाडून कॅप्टन करण्याची वडिलांची आकांक्षा! पुण्याच्या संस्कृत विद्यापीठाच्या दोन, टिळक हिंदी विद्यापीठाच्या दोन आणि ड्रॉईंगच्या दोन (ज्याला इंटर मिजीएट ग्रेड म्हणत) अशा परीक्षा सेकंड क्लासमध्ये मी लीलया पासही झालो होतो. (७वीतील अल्प वयात काढलेलं शिवाजी महाराजांचं वॉटर कलर अप्रतिम चित्र अजूनही मजकडे आहे.) मिलिटरीत जावं लागलं तर उपयोगी पडाव्यात म्हणून एन.सी.सी च्या 'बी-वन' व 'बी-टु' ह्या परीक्षाही सेकण्डमध्ये मी पार केल्या होत्या. पण इंग्रजीच्या पर्वत शिखराच्या सुळक्यावर धडकून माझ्या स्वप्नांच्या विमानाचा चक्काचूर झाला होता! आजवर शाळा-कॉलेजातील स्वप्नाळू जगात वावरत होतो,पण ह्या जगाबाहेरही एक जग होतं. व त्यातील वास्तव समजण्यासाठीच की काय कोण जाणे माझ्या हाती आता पहार, टिकाव, खोरे, कुदळ, पत्र्याची घमेली वा बुट्ट्या आदी आले. सारणी-वगळी उकरण्याची सवय नसलेल्या हातांच्या तळव्यांना फोड आले, फुटले (जणू माझ्या स्वप्नांचे फुगे फुटले.) काही दिवसांनी ह्या कामाची हातांना सवय झाली न् मग तळव्यांना घट्टे पडून ते निब्बर झाले...

माझ्याबरोबर तवंदी गावातील मजूर बाप्पे व बायका असत. माझ्या गावच्या दक्षिणेस तीन मैलावर (५कि.मीवर) पुणे-बंगलोर रोडला उभे छाटत पाटगाव-गारगोटी खोऱ्याकडून आलेली एक डोंगर-फांदी सेनापती कापशी खोऱ्याला डावी घालत उगवतीकडे चिक्कोडी या तालुक्याच्या गावी गेली होती. ह्याच डोंगरातील घाटावर तवंदी गाव. 'गावभर पाटील, शिवारभर रामराम' अशी ह्या गावची परिस्थिती. नाही म्हणायला दीक्षित आडनाव असलेल्या ब्राह्मणांची दोन घरं (ह्याच घरातील कवयत्री इंदिरा संत व त्यांचीच बहीण ना.सी.फडकेंची द्वितीय व काही कथा-कादंबऱ्या लिहून मराठी साहित्याच्या क्षितिजावर चमकून गेलेल्या सौ. कमला फडके) व तितकीच लोहार सुतारांची.

ह्याच गावची ती आपला चुलत भाऊ व त्याच्या बायकोबरोबर रोजगाराला यावयाची.

दुपारच्या सुट्टीत सारी मिळून नड्यावरील एखाद्या झाडाच्या सावलीत जेवायचो. केवळ दीडेक भाकरी व तीवर जणू वासालाच त्याल घालून तव्यात परतलेली शेवग्याच्या भाजीगत एखादी भाजी, एवढंच तिच्या जेवणाच्या गटऱ्यात जेवण आढळे. एवढ्या अपुऱ्या जेवणावर दिवसभर उन्हात होरपळत शिवारात राबण्याची ताकद तिच्या अंगी कशी येत असेल, हा एक प्रश्नच तेव्हा मला पडे. ह्या सहानुभूतीपोटी नंतर माझ्या मनात तिच्याविषयी कोवळीक कशी व केव्हा निर्माण झाली, ते समजलेच नाही. दुपारची जेवणं झाल्यावर घटकाभर ईस्वाटा घ्यायसाठी म्हणून वरच्या टेकडावरच्या एका खोपटात आम्ही जात असू. ते खोपटं केवळ ऊन-पावसात घटकाभर टेकावं म्हणून केलेलं, चौबाजूनं भिंत वा कडब्याचा कूड नसलेलं ते खोपटं उर्फ छप्पार टेकाडावर असल्यानं तेथे बसून साऱ्या शिवारावर नजर ठेवता येत असे. राखण करता येत असे तिथे गेल्यावर आपल्या वहिनी शेजारी तोंडावर पदर पांघरून व डोईवरली हातमुडपून घेऊन खालच्या सारवलेल्या जमिनीवर ती लवंडत असे. टेकाडावर ते खोपटं असल्यानं तसल्या त्या ऐन भराच्या उन्हाच्या रणातही कधीमधी चुकारवाऱ्याच्या झुळका हळूहळू झुळझुळा वाहू लागत आणि त्यामुळे ताव बराच सुसह्य होई.. त्यांची डुलकी निघाली की परत कामाला जुप्पी सुरू होई...

काही दिवसांनी हे काम संपलं... परत रानाशिवारातलं काम निघालं तेव्हा 'रोजगारी माणसं सांगाया' म्हणून मी तिच्या गावाकडे निघालो. पाच कि.मी. अंतरावर आडवा पसरलेला तो डोंगर. त्याच्या खड्या चढावा-वरची पाऊलवाट चढून वर गेल्यावर गाव येई. ह्या वाटेच्या डाव्या बाजूस, डोंगराच्या पायथ्याशी एक आश्रमशाळा होती. मी सायकल रेमटत आलेलो, त्यामुळे ह्या शाळेच्या व्हरांड्यात मी सायकल ठेवली व डोंगराची खडी चढण चढत गेलेली पायवाट धरली. तेव्हा मी ऐन विशीत होतो. हायस्कूलच्या दिवसात गावातल्या तालमीत जात होतो तीन हजार जोर व तीन हजार बैठका मारण्याचं माझं रेकॉर्ड तेव्हा (व आतापर्यंत) कुणी मोडायला नव्हतं. तरीही वरचा डोंगरमाथा गाठूपर्यंत लोहारी शाळेतील भात्यागत माझं छाताड वर-खाली होऊ लागलं. त्यामुळे त्या पायवाटेचा चढ किती खडा असेल त्याची कल्पना यावी! रोज रोजगारासाठी हा डोंगर उतरून खालच्या खोऱ्यातील मळ्यादळ्यात ईळभर राबून परत सांज करून किनिट पडल्यावर सुट्टी झाल्यावर हा खडा डोंगरचढ चढून वरचं आपलं गाव गाठणारी इथली माणसं कष्टाला घणमणत नव्हती, हेच खरे! शेवग्याच्या मूठभर मुटक्या एवढ्या भाजीसंगं केवळ टीचभर भाकरी खाऊन, वर मातीच्या गेळयातलं बेलंटभर पाणी रिचवून दिस मावळूस्तोवर राबायसाठी अंगी नवं न्याट/बळ आणायचं, ही काही तशी साधी गोष्ट नक्कीच नव्हती! वरील डोंगरपठारावरच्या गावात गेल्यावर मी इतर रोजंदारी मजुरांना सांगितलं,

"उद्या ठावनं काम सुरू हुणार हाय, तवा आलबत यायचं. काय- नावाच्या टिप्पनाला!" मग त्यातीलच तिच्या चुलत भावाला मी तिच्या घरचा पत्ता विचारला, "हौसाचं घर कुठंसं हाय?" त्या सर्व मजुरांसह राबून माझ्या तोंडी आपसुक ग्रामीण बोली बसली होती.

"हे काय, खाल आंगाला त्येंचंच घर!" तिच्या चुलत भावानं माहिती पुरवली.

तसा मी तिच्या घरी गेलो... मी असा वळवाच्या पावसावानी अचानक आलेला पाहून खरोखर ती हारकून ढ्यान् झाली,आणि अत्यानंदाने लकाकणाऱ्या डोळ्यांनी केवळ प्रेमात पडलेल्या माणसाकडेच कटाक्ष टाकावा तसा मजकडे टाकून मधाळ आवाजात बोलली,

"बसा, च्या करतो!" नि चटकन तिनं चुलीवर चहाचं पातेलं ठेवलं.

चहाला उस्साळा येईपर्यंत ती लगा-लगा गल्लीतील किराणी दुकानाकडे गेली, नि तेथून आणलेली बटारं माझ्यापुढे धरीत लाघवीपणे म्हणाली,

"घ्या!"

अशी बटारं सकाळच्या चहाबरोबर मुलं खातात व ती नाही मिळाली की फुरंगटतात. त्यावेळचा ग्रामीण भागातील घराघरांतील हा रोजचाच सीन! पर असला चाटका खाना लहानपणी मिळण्याचं भाग्य मला तरी न लाभल्यामुळे असेल, लहान मुलागत मी ती बटारं तिनेच दिलेल्या पेलाभर चहात बुडवून-बुडवून चवीनं खाऊ लागलो. ज्यांचं हातावरचं प्वाट आहे अशा मजुरांना (तेव्हा दिवसभर राबल्यावर एक ते दीड रुपयापर्यंत मजूरी/रोजंदारी मिळे) त्याकाळी साखरेचा चहा परवडत नसे. साखर आठ आणे शेर (म्हणजे आताचा १ किलो) तर गूळ चार आणे. त्यामुळे मजुरांच्यात गुळाचाच चहा असे. तिनेही असलाच चहा केला होता व माझ्याबद्दलच्या आपल्या मनातील ओलाव्यामुळे असेल थोड्या ढिल्ल्या हाताने तिने च्याच्या आधणात गुळाचा खडा टाकला होता, व चहा न् गुळवणी ह्यांच्या सीमारेषेवरचं ते रसायन तयार झालं होतं. डोळ्यांत अपार/अतीव प्रेम आणून प्रेमळपणेच तिनं ती बटारं अशा काही आर्जवाने मी 'नको-नको' म्हणत असतानाही मला खायला दिली होती की त्या गुळाच्या चहागत ती गुळचाट न लागती तर नवल!

दिवस असेच जात असलेले. माझे शेतातले काम सुटले, नि पिठाच्या गिरणीत राबायचे माझ्या नशिबी आले. भोवतालच्या परिसरातील खेड्यांवरील हजारो लोक गुरुवारच्या बाजार दिवशी बाजारासाठी इथे येत. तीही बाजाराला आली की आपले दळण दळून घ्यायला मी काम करीत असलेल्या पिठाच्या गिरणीत येई व तिच्या दळणाचा नंबर येईपर्यंत माझ्याशी मोकळेपणाने बोलत राही. तिचं येणं, माझ्याशी लाघवीपणे बोलत राहाणं, प्रेमभरल्या लकाकत्या नजरेनं मजकडे पहाणं ह्या साऱ्यांमुळे उघड्या अंगावर मोरपीस फिरविल्यागत मला सुख वाटू लागले... ती आली की, मला खायला म्हणून बटारं घेऊन येई. कधी चिरमुरेही आणे, तर कधी... अर्थात तिच्या ह्या प्रेमभरल्या भेटीची परतफेड म्हणून मीही तिच्या दळणाचे पैसे घेत नसे!

एकदा ती म्हणाली,

"आमच्या गावच्या डोंगर पायथ्यापत्तोर तीन मैल एकटीला चालत जायला भ्या वाटतंय! रस्त्यानं जाणारं येणारं ट्रकवाले कधी बाई माणूस बघितल्या नसल्यागतीत करत्यात. तवा सोबत म्हणून तिथवर पोचवा चला!"

तिचं म्हणणंही खरं होतं. माझ्या गावातून बाहेर पडलेला पुना-बेंगलोर रोड डोंगरावरील तिच्या गावाला डावं घालून घाटातून पुढे निघून गेला होता, आणि ह्या नॅशनल क्रमांक ४ वरून माल नेणारे ट्रकवाले रस्त्याने जात असलेल्या एकट्यादुकट्या पोरीची कळ काढणे शक्यही होते. त्यामुळे मी गिरणी बंद केली व माझी सायकल घेऊन तिच्या सोबत निघालो. तिकडून येईस्तोवर गिरणी बंद राहिल्यामुळे आपलं काही आर्थिक नुकसान होऊ शकते, हा विचारही तेव्हा मनात आला नाही! गद्धे पंचविशी ह्या कालखंडाला अशा वर्तणुकीमुळेच म्हणत असावेत.

डोईवर बाजाराने भरलेली बुट्टी घेतलेली ती माझ्या सायकलीच्या पलीकडून जात होती.

मध्ये सायकल व अलीकडे ती धरलेला मी,असे बोलत चाललो होतो. बोलत-बोलत ते ३ मैलांचं अंतर कसे व केव्हा कटले ते समजलेच नाही. डोंगराचा पायथा आला. हाय-वे पायथ्याजवळून तीरकस डोंगरघाट चढून वर गेलेला होता. आणि समोरच्या बाजूसच एक वाट फुटून थेट खडा डोंगर चढत माथ्यावरील तिच्या गावी गेली होती. त्या वाटेवर उभी राहून निरोपादाखल मला हात हलवीत ती म्हणाली,

''जावा आता, लई येळ मोडला तुमचा!''

मी परत फिरलो,आणि सायकलीवर टांग टाकली. डोंगर उतारावरील त्या हाय-वे वरून माझी सायकल आपोआप खाली पळू लागली. मी सहज मागे वळून पाहिले-मी सायकलीवर बसताच ती पाठ वळवून डोंगरचढावाची वाट तुडवू लागली नव्हती,तर मघाच्याच जागेवर अजूनीही निश्चल उभी होती- माझ्या पाठमोऱ्या आकृतीकडे पहात! मी मागे वळून पहाताच स्मित हास्याचं एक गुलाब पुष्प मला बहाल करीत तिने तेथूनच हात हलविला. त्यावर मीही हात हालवून, उंचावल्यागत केला न् पुढे बघून सायकल मारू लागलो...

ह्यानंतर दुसऱ्यांदा तिला पोहोचवायला गेलो तेव्हा निम्म्या रस्त्यातच पावसाने गाठले. जवळ एकच छत्री, तीही तिची नि अर्थात मोडकी. त्या छत्रीतून भिजत जाण्यापेक्षा रस्त्याच्या डाव्या बाजूच्या कडेला चिंचेचं एक झाड होतं, त्याच्याजवळ आम्ही गेलो. सायकल उभी करून बुंध्याच्या आडोशाला आम्ही बसलो. पण पावसाची चिपळी एवढी जोरदार सरसरत आली की, झाडाच्या पानांपानांवरून खाली पाणी टिपकू लागले व ते आम्हा दोघांवर अक्षतागत पडू लागले. त्याखाली भिजण्यापेक्षा मोडकी का असेना छत्री डोईवर धरलेली बरी, अशा विचाराने तिला म्हणालो, ''हौसा,छत्री उघड आता.मोडकी का आसंना डोस्कीवर धरू. निदान डोस्कं तरी भिजणार न्हाई!''

तिनं छत्री उघडून माझ्या डोकीवर धरली. नि तीत मावण्यासाठी ती आणखीन् थोडी माझ्या बाजूला सरकली. पावसापूर्वी कोरड्या असलेल्या बुंध्याखालच्या जमिनीवर आम्ही सप्पय बसलो होतो, ती अशी आपली दोन्ही पाऊले पुढे करून बसली होती. तिची ती मूळचीच गोरीपान असलेली पाऊले पावसात भिजून सुस्नात झाल्याने आणखीन् गोरी दिसत होती, नि मला एक वेडी भुलावण घालीत होती. तिचं रूपडं तर दहा जणीत उठून दिसावं, असं देखणं होतं. व्यंकटेश माडगुळकरांच्या कथेवर त्यांचेच थोरले बंधू 'ग.दि.मां' नी पटकथा-संवाद-गाणी लिहिलेला 'पुढचं पाऊल' हा गाजलेला चित्रपट मी त्याकाळी गावातल्या 'प्रभात' थिएटरात पाहिला होता. 'सांगत्ये ऐका' ह्या आत्मचरित्राने पुढे खळबळ माजविलेली मराठमोळ्या रुपड्याची देखणी हंसा वाडकर चित्रपटाची नायिका होती. त्या हंसाची धाकटी बहीण शोभावी अशी ही हौसी होती. चेहरेपट्टी तर हुबेहूब हंसासारखी. जणू तिची ही जुळी बहीणच. ती हंसा मक्काचं कणीस भरल्यावानी गच्च भरल्याली,तर ही थोडी शिडशिडीत, एवढाच फरक!

एक चिपळी सडसडून पडून पाऊस शिळापला असता, कमी झाला असता, तर उठून निघून रस्त्याला तरी लागता आलं असतं. पण असं शेजारी-शेजारी, एकत्र बसण्याचं सुख आणखीन् थोडा वेळ आम्हाला मिळावं म्हणून परत एक सरवाट सरसरून आलं. वळीवागत त्याचं हे ऽ मोट्ठालं थेंब रापराप कोसळू लागले. त्यात मावळतीकडं सुटलेल्या वाऱ्याने पाऊस आडवा-तिडवा बडवू लागला. वाऱ्याच्या लाटांवर स्वार होऊन सरीवर सरी आम्हांपर्यंत येऊन भिगवू लागल्या तशी ती आपलं अंग चोरत आणखीन् थोडी माझ्या बाजूस सरकली. आता तिच्या माझ्यामध्ये केवळ छत्रीचा दांडा होता व तो मी उजव्या खांद्यावर टेकवून धरला होता; नि माझ्या ह्या खांद्यालगतच तिचा डावा खांदा येऊन स्पर्शाची वेगळीच भाषा बोलत होता. आणि त्या मूकभाषेपेक्षा वेगळीच भाषा प्रत्यक्षात आम्ही बोलत होतो. बोलता-बोलता तिच्या लग्नाचा विषय निघाला,तेव्हा ती म्हणाली,''मला तुम्हालाच द्यावं, असं घरात बोलत्यात, पन तुमचा नि आमचा दोरवा जमत न्हाई, काय करायचं? आम्ही पाटलांचं, आनी तुम्ही..''

मराठ्यांच्यातही जातीभेद, उच्च-नीच वगैरे असतात, हे त्यावेळी प्रथमच कळल्याने मनोमन मी थक्कच होऊन गेलो. पाटील, देसाई, देशमुख आदी आडनावे धारण करणारे इतरांपेक्षा आपणास उच्च वगैरे म्हणवून घेत असतात, आणि उरलेले सर्वच मराठे स्वत:ला ९६ कुळी वगैरे समजत इतरांना आपल्याहून कमी, हलके, तुच्छ समजत असतात!पण ९६ कुळी म्हणजे नेमकं काय,हे ह्यांतील बहुतेकांना ठाऊक नसतं! ४५ वर्षांपूर्वी मुलकी (म्हणजे ७ वी) परीक्षा पास होणं, हे बहुजन समाजात खूप शिकण्यासारखं होतं. आणि मी तर इंटर आर्टसपर्यंत मजल मारलेली. आमच्या घराण्यात, गोतवळ्यात एवढं (म्हणजे १२वी) शिकलेलं तोवर तरी कुणीच नव्हतं आणि अशा मुलग्याला तिच्यागत शाळेची पायरीही कधी न चढलेली अडाणी मुलगी कशी करून घेतील, हा विचार तिच्या घरच्यांनाही आला नव्हता!

थोड्या वेळाने पाऊस थांबताच आम्ही पुढे निघालो.

तिच्या वाटेवर निम्म्या अंतरावर, हाय-वेच्या पूर्वेस तीनेक कासरा दूर अंतरावर आमचं शेत होतं..असाच तिला एकदा पोहचवायला जात असता माज्या आजीने तेवढ्या दूरवरूनही आम्हाला बरोबर ओळखलं. मी काम करीत असलेली गिरणी आमची स्वत:चीच होती आणि तिला सोबत करायला गिरणी बंद करून मी जात असतो, हे कळल्यवार रागावलेल्या माझ्या आजीने तिच्या घरच्यांना खडसावले,

''तुमची पोर्गी आमच्या पोराच्या नादी लागलीया, तिला ताकीद द्या!''

विशी-पंचविशीतलं ऐन भराच्या तारुण्यातलं वारं काही वेगळंच असतं! एवढं सारं होऊनही पुनश्च ती 'सोबतीला चला' म्हणून मला बोलवायला आल्यावर मी माझ्या धंद्याच्या नुकसानीचा थोडाही विचार न करता तिला पोहचवायला गेलोच! (एकटं जायचं एवढं भय वाटत होतं तर तीही यस्टीने का बरं जात नव्हती? अर्थात, हा प्रश्न आता ४५ वर्षांनंतर मनात येतो. तिच्या गावच्या डोंगरपायथ्याजवळून पुष्कळ यस्ट्यापुढे संकेश्वर-बेळगावच्या दिशेने निघून जात आणि तेव्हा ५ कि.मी. अंतरवार ४ आणे यस्टी चार्ज होता, पण ते चार आणे वाचवायला सर्वच हातावरच्या पोटावरले मजूर लोक पायीच जाणं पसंत करीत, ही वस्तुस्थिती होती.) तिला सोबत करण्यात, तिच्या बरोबर बोलत बोलत चालत जाऊन ३ मैलांचं ते अंतर पार करण्यात मला मनातून खूप सुखाचं वाटत होतं... मी तिच्यावर लुब्ध झालो होतो आणि ते माझं गद्धेपंचविशीतलं वय असल्यान तिच्या घरचे लोक राजी झाले असते तर (माझ्या घरच्या विरोधाला न जुमानता) मी तिला करूनही घेतले असते. माझे शिक्षण व तिचे अडाणीपण ह्याचा विचारही माझ्या मनात येत नव्हता, असे मजवर तिचे मत्तीर होते. नेहमीसारखंच ह्यावेळीही आम्ही बोलतबोलत निघालो... तासाभरात डोंगरपायथा आला. मी

खालच्या हायवेच्या डांबरी रस्त्यावर थांबलो आणि ती समोर डोंगरावर चढत गेलेल्या पायवाटेच्या टेकाडावर चढली, आणि तिने अत्यंत प्रेम भरल्या स्निग्ध नजरेने माझ्याकडे पाहिले, तसा सायकल वळवून घेत हात हलवित मी निरोप घेतला

"बरं हाय, निघतो!"

"बरं!" आणि थेट माझ्या डोळ्यांत नजर गुंतवत तिने हात हलविला नि मोगऱ्याच्या कळ्या सांडणारं एक स्मित हास्य मला बहाल केलं, अन् पाठ फिरवून ती डोंगर चढू लागली.

हे तिचे अखेरचे दर्शन असेल असे स्वप्नातही वाटले नाही. कारण, ह्यानंतर दोनच दिवसांनी ती आपल्या घरातून पळून गेल्याची बातमी कानांवर आली. ऐकून मनोमन मी उदध्वस्त झालो, ह्या बातमीचा जणू ज्वालामुखी झाला. नि त्याच्या स्फोटाने मला माझ्या स्वप्नांसह कुठल्याकुठे उडवून टाकून ठिकऱ्या ठिकऱ्या केल्या.

तिच्या गावच्या वाटेवरील यरनाळ गावाकडून आलेल्या ओढ्यावर एक मोठा पूल होता. त्याला 'लकडी पूल' म्हणत. ह्या पुलाच्या पलीकडे हायवेच्या पश्चिमेस एका बड्या तंबाखू व्यापाऱ्याचा बगीचा होता. त्यात फुलांच्या झाडाखाली खूप आंब्याची झाडे होती व मध्ये त्याची टुमदार बंगली. बंगली पुढल्या पोर्चमध्ये फॉरेनमेकची त्याची कार उभी असे. ह्या बगीच्याला चंद्रकोरीगत वळसा घालून पुढे हायवे निघून जातो. बागेतील आंब्याच्या दाट झाडीमुळे ह्या वळणावरून जाताना वाहनांना अलीकडील व पलीकडील वाहन चटकन दिसत नसल्याने वर्षातून इथे ८-१० अपघात होताच! रस्त्याकडेलाच बागेतील विहीर, व रस्ता तिच्याहून ६-७ फूट उंच त्यामुळे अपघातग्रस्त वाहन कधी त्या विहिरीतही सूर मारे, ह्यात जिवित हानी बरीच होई. हे टाळण्यासाठी त्या बगीच्यातून थेट हायवे काढण्याची योजना सरकारने आखली, पण रस्त्यात जाणाऱ्या बागेचा योग्य मोबदला मिळावा म्हणून बागेच्या मालकाने सरकार-विरुद्ध दावा लावला नि प्रकरण भिजत पडले, त्याचा निकाल लागेपर्यंत पी.डब्ल्यू.डी ने इथे वाहनांना साइड दाखविण्यासाठी शेख नावाच्या माणसाची नेमणूक केली होती.

हौसीला सोबत करीत ह्या रस्त्याने तिच्या गावापर्यंत जाताना अर्थात ह्या शेखने प्रत्येक-वेळी मला पाहिले होते. शेख हा बोलका असल्यामुळे तिच्या गावातील सर्वांशीच त्याचा परिचय होतो. ह्या वाटेने बाजारासाठी जाणाऱ्या खेडुतांना आपल्यासाठी बिडी-काडी आणणेसारखी चिल्लर कामे सांगून पैसे देई. कुणाला अगत्याने बोलत उभा करून त्याचे जवळची चंची सोडायला लावी... पान खाई.. हा शेख एके दिवशी मला म्हणाला, "वो लडकी जो भाग गयी है ना, उसके घरवालोंका तुम्हारे पर शक है; ऐसे वख्त तुम अकेले खाली हाथ घुमना ठीक नही. मेरे पास एक हथियार है, कुछ दिन वो तुम्हारे पास रखो, धोका टल जाये बाद वापस करना!"

त्यानं दिलेले हत्यार म्हणजे वीतभर लांबीचा जंबीया. त्यावर चामड्याचं म्यान व तो कमरेच्या पट्ट्यात अडकायची सोय. कमरेच्या बेल्टमध्ये म्यानाची इडी अडकून पॅण्टच्या आत जांबिया मांडीवर लटकत राहिला तरी बाहेरून काही कळत नसे.

एके दिवशी सायकलीवरून आमच्या शेताकडे चाललो असताना वाटेतील एका झाडाच्या बुंध्या आडून गप्पकन ५-६ लोक आडवे झाले. आपणावर हल्ला झालाच तर आपण संपण्याआधी एखाद्याला तरी संपावयचेच या तयारीत मी होतो.

"तिला पळवून न्हेवून कुठं दडवून



ठेवलाईस, सांग!' पन्नाशी ओलांडलेला तिचा चुलता दरडावत राहिला.

"मी तिला पळवून न्हेली असती तर मी तुम्हास्नी हितं, ह्या रस्त्यावर तरी दिसलो आस्तो काय?" तिच्या चुलत्यापेक्षराही आवाज चढवून मी म्हणालो," पळून जाणारी काय गावातल्या गावात ऱ्हात्यात?"

कानफडात मारावी तशी सारी चिप्प बसली व निघून गेली.

मग समजलं हार-तुरे, गजरे विकण्याचं फुलांचं दुकान असलेल्या मालकाच्या मुला-बरोबरही ती अशीच खूप जीव लावल्यागत वागत होती. त्यांची डोंगराकडील बाजूस शेती होती, त्यात त्यांनी फुलंच फुलं लावली होती. त्यांच्या शेतातही ती रोजगाराला वेळोवेळी जात होती. पण फुलवाल्याचा पोरगाही इथेच होता. मग कुठं मट्टमाया झाली ही?

माझ्या गावातून उत्तरेकडे कोल्हापूरच्या दिशेने गेलेल्या हायवेवर ३ मैलांवर यळगर्णी गाव. गावाबाहेरून पूर्वेकडे वेदगंगा वाहात गेलेली. दोन दिवसांनी ह्या नदीत एका तरुणीचं प्रेत आढळलं. ती हौसाच असावी ह्या अशंकेने तिचा चुलत भाऊ तिथवर जाऊनही आला. पण ते दुसऱ्याच तरुणीचं प्रेत होतं.

मग हौसा गेली कुठं? माझ्यावरून तिला घरी दोन दिवस मारहाण झाली असे तिच्या गावचे लोक मला सांगत आल्यावर तर मी खूपच मन:स्ताप करून घेतला. डोंगर पायथ्याशी एक आश्रमशाळा होती. तेथील एका शिक्षकाला तिच्या घरच्या म्हशीच्या दूधाचा रतीब घातला जाई. दूध घालायला हौसाच जाई. अशीच रोजच्यागत दूध घालायला ती डोंगर उतरून खाली आली नि त्या शिक्षकाला दूध घालून दूधाच्या किटलीसह कुठं मट्टमाया झाली. कुठं जीव देती तर मढं तरी गावलं असतं पण तसंही झालं नाही. जणू कुठं दिगंतरीच उडून गेल्यागत झाली..

काही वर्षे अशीच उडाली. मधल्या काळात मी मोटार गॅरेजचं काम करू लागलो होतो. तिच्या गावाचा पाटील आडनावाचा एक ड्रायव्हर माझ्याच गावातील एका ट्रकवर होता. तो एके दिवशी ट्रकचं हावग्रीसींग करून घ्यायला गॅरेजला आला. त्यानं आपण होऊन बोलता बोलता तिचाच विषय काढला. "मेस्त्री, तुमचवर तिच्या घरच्यानी उगंच अदावत घेतली व्हती बघा. पर्वा तिला मी कोरेगावला बघीतली. ट्रक घेऊन साताऱ्यास्नं माल पोहचवायला दहीवाडीला चाललो हुतो, तर रस्त्याच्या कडेला एका घराम्होरं ही दिसली. ट्रक थांबवून तिची वास्तपुस्त केली. तिनंबी आग्रह करून उतराय लावलं, च्या करून दिली... त्यानं माहिती पुरवली, "हितल्या मैलकुठल्याबरोबर ती पळून गेलीया बघ!"

एक अश्राप, निरागस वाटणारी आडाणी पोर एकाचवेळी तिघांना खेळवित होती.

संपादक म्हणतात, 'आयुष्याच्या विशिष्ट निर्णायक टप्प्यावर विलक्षण चटका लावून गेलेल्या व्यक्तीवर लिहा.' हिनं चटका तर लावलाच व जाता जाता धक्काही दिला. शिवाय तारुण्याच्या ऐन उंबरठ्यावर मला एक धडा घालून देऊन नवी दृष्टीही दिली. शहाणपण दिलं.

ह्यानंतर ४० वर्षांनी शिखर शिंगणापूरहून साताऱ्याला येताना वाटेत कोरेगाव लागलं, नि एकदम ती मन:चक्षूंसमोर उभी ठाकली. अगदी ४० वर्षांपूर्वीगत, तरुण, देखणी, डोंगरटेकडावर उभी राहून मोगऱ्याच्या कळ्या सांडणारं स्मित हास्य करीत मला निरोप देणारी!

अनोखे ऋणानुबंध

# अनामिक नाते

**सुधा चांदोरकर**

लहानपणापासून मला नवनवीन माणसे जोडायला आवडतात. जीवनातल्या मार्गावर कितीतरी भेटत गेले. कुणी हसून पुढे झाले तर कुणी दखल न घेताच समोरून गेले. ना खंत ना खेद! मात्र कधी कुणी मैत्रीसाठी हात पुढे केला तर मात्र मी माझ्याकडून त्याला पूर्ण प्रतिसाद दिला. यांच्या नोकरीच्या निमित्ताने भारतभर हिंडून झाले. बदलीच्या गावी कधी एक ते दीड वर्षे किंवा त्याहून अधिक वास झाला. अनेक भावोजी (यांचे मित्र) तर अनेक वहिनी (मित्रपत्नी) भेटल्या. आज मागे वळून पाहताना वाटतं आपलं हे मैत्री कुटुंब केवढं मोठ्ठं आहे! अनेकांची मनीची हितगुजं मी आत अंतरात जपून ठेवलीत. एक तृप्त आनंदमय जीवन त्यामुळं बनलं. जे-जे आलं वाट्याला, ते-ते आनंदानं स्वीकारलं. स्मृतींची कवाडं जरी थोडीशी खुलली तरी आंतून आठवणींचा बकुळगंध येतो अन् मला वेटाळून घेतो. या वयात आलेले एकांतक्षण केस परिमलाने घम-घमतात. मनाला उभारी येते नव्यानं येणाऱ्या आयुष्याला आणि या वयातील गृहीत धरलेल्या व्याधींना देखील हासत स्वीकारण्याची, 'जिकडे जावे तिकडे माझी भावंडे आहेत.' असं सार्वत्रिक नातं आणि नातेसंबंध विपुलतेनं मला लाभले. मी खरंच या वैभवाने सदैव भाग्यवती ठरले आहे.

नातेवाईक तर जोडलेतच पण माझ्यावर अपार प्रेम करणारे मित्र-मैत्रिणी परिवार ही माझी अगदी खाजगत संपत्ती आहे.

मी मुंबईला होते तेव्हाची म्हणजे साधारण ऐंशी सालची गोष्ट. माझ्या सासूबाई नुकत्याच वारल्या होत्या. मुलगी भारतीय पातळीवर दिल्ली युनिव्हर्सिटीच्या स्पर्धा परीक्षेस बसून भारतात बारावी आल्याने दिल्लीला 'लेडी हार्डिंग्जला' मेडिकल कोर्ससाठी दाखल झाली होती. मुलगा मुंबईत मेडिकलची इंटर्नशिप करत होता आणि पुढे स्पेशलायझेशनचा त्याचा विचार चालला होता. तोही वसतिगृहावर राहात असे. एक शनिवार, रविवार सोडला व नित्य कामकाज, सोडलं. तर खूप वेळ मिळे, त्यातून मला भयंकर एकाकीपण जाणवू लागायचं. अशा वेळी माझं मन खरंच 'आज कुणीतरी यावे'च्या प्रतीक्षेत असायचं. मला हवं होतं कुणीतरी खास 'माझं' असं, वयाच्या मर्यादा दूर करून निखळ प्रेमळ मैत्री जोडणारं!

एक दिवस मी संध्याकाळी बाजारहाट करून दोन हातांत भरल्या पिशव्या घेऊन रस्ता पार करत होते. माझ्या हातांना रग लागली होती. कधी एकदा घरी जाऊन सामान ठेवते असं झालं होते. एवढ्यात समोरून एक साधारण दीडेक वर्षांची छकू पळत आली आणि माझ्या पायांना 'आजी' म्हणून मिठी मारली. छान असा हलका पिवळा घेरदार फ्रॉक, दीड-दोन फूट उंची,गोबरे गाल, गोल उत्सुक डोळे, केस व्यवस्थित कापलेले. मिठी सैल होण्याचा काही रंग दिसेना. अखेर तिची आई तिला पकडायला आली तशी मिठी घट्ट झाल्यानं मला पाऊल पुढे टाकता येईना. मीच माझ्या पिशव्या तिच्या आईच्या हातांत दिल्या आणि तिला उचलून तिची पापी घेतली. जशी काही गेल्या जन्मीची ओळख असल्यागत ती मला बिलगली घट्ट! मला तो स्पर्श खूप सुखावून गेला. माझं घर अगदीच जवळ आलं होतं. मी तिच्या आईला माझ्या घरी येण्यासाठी विनवलं, दारसुद्धां, कुलूप तिलाच उघडायला सांगितलं. ही पठ्ठी मला मुळी सोडायला तयार नाही. आत आल्यावर ती उतरली. 'आजीचं घर' म्हणून. एवढंसं माझं घर पळून पालथं घातलं. परकेपणा मुळी नाहीच. त्या अस्तित्वानं माझं घर उजळलं.

मी आधी त्या पिल्लूला पाय धुवून लाडू दिला. आईकडं संमतीसाठी पाहिलं, आणि खाली बसून वाटी धरून नीटपणे खाऊ लागली. मी तिच्या आईला कॉफी घेऊन आले आणि आमच्या गप्पा सुरू झाल्या. आईचे नाव वैजू- वैजयंती. बाबांचं नाव सुभाष आणि या पिल्लाचं नावं मधुर. अगदी अल्पकाळात मधुरने माझा संपूर्ण ताबा घेतला. मला मधुर खूप आवडली, वैजू तर काय बोलण्याचा धबधबा. तिच्याशी गप्पा मारतांना आमची अनोळख कधीच गळून पडली. मधुरनं तिच्या भाषेत 'ही माझी आजी हं!' म्हणून परत मला गुदमरायला लावणारी गळेमिठी घालून त्या नात्याची मुद्रा पक्की केली. थोडावेळ गप्पा मारून ती जवळच असलेल्या तिच्या घरी गेली. जाता जाता मला खूप कृतार्थता आणि शब्दातीत आनंद देऊन गेली.

हे रात्री ड्यूटीवरून परत आले मला न लपवता आलेली खुशी चेहऱ्यावर ओसंडत असलेली पाहून म्हणाले,''आज खूष दिसतेस कोण आवडीचं भेटून गेलं वाटतं?'' हल्लीच्या माझ्या उदासीनतेला खरंच आज छेद गेला होता. मग यांना उत्तरार्थ माझे मधुर-वैजू पुराण सुरू. यांना पण माझ्या आनंदाचा परिमल पोचला. खूप दिवसांनी मळभ जाऊन यांच्याशी बोलण्यात मी रंगले. यांच्याही मनात नकळत कुतूहल निर्माण झाले.

दुसरा दिवस रविवारचा. मी माझा लेक हॉस्टेलवरून घरी येईल म्हणून आवरून मस्तपैकी स्वयंपाकात गढले. लेक आला, मग कॉलेज-हॉस्टेलच्या गप्पातच जेवणे झाली. मी त्याला त्याच ओघात मधुर-वैजूविषयी सांगितले. मला ती कशी भेटली? कशी माझी एकदम आजी बनवली? सारं मी सांगितलं. जेवण झाल्यावर आठवडाभर रात्रीच्या इमर्जन्सी कराव्या लागल्यानं, त्याला पेपर वाचतानाच झोप लागली. हेही झोपले. मी निवडण-टिपण काढलं. त्याचे बाहेरचे कपडे धुतले. त्याला रुमवर नेण्यासाठी लाडू भाजायला घेतले, हे दोघंही गाढ झोपलेलेच. आज तर संध्याकाळचे सहा वाजायला आले तरी मी एकटी कामातच गुंतलेली होते. तोच दारावर धडकन मारल्याचा आवाज. मी हळूच दार उघडले; तो दारात प्रचंड त्रासलेली वैजू आणि अत्यंत टवटवीत फुललेली मधुर!

मी मधुरला उचलून तिची पापी घेतली. तिने मला घट्ट मिठी मारली. जशी काही मी कुठे पळूनच चालले होते. मलाही बरं वाटलं. तिच्या भेटीत माझा एकाकीपणा पार पळून गेला. इतक्यात तिला माझा लेक आणि हे दिसले. ते झोपलेले पाहून माझ्या कडेवरून पायउतार झाली ती थेट पळत पळत त्यांच्या पलंगावर चढून दोघांनाही गदागदा हलवत 'ए मामा ऊठ, आजोबा ऊठा! संध्याकाळ झाली.' हे दोघंही चकित झालेले! वैजूही आत आली. दार बंद करून मी, वैजू स्वयंपाक घरात. ''बस ग! चहा ठेवते, आमचा व्हायचाच

आहे.'' ''सॉरी हं!'' वैजूची ओशाळली दाद ''मामा, ही माझी आई, वैजूताई म्हण तिला!'' त्याचा मामा आणि यांचा आजोबा तिनं केव्हाच बनवून टाकला. माझ्या दूरदेशी. दिल्लीला गेलेल्या लेकीची उणीव मधुरनं, तिच्या आईनं भरून काढली. त्यामुळं माझा लेक पहिल्या भेटीतच मधुर आणि वैजूशी मिसळून गेला. तिचा बंडपणा मामाबरोबर भरपूर चालू झाला.

त्यानंतर तो कधीही घरी आला की पहिली चौकशी मधुरची! आम्हां सर्वांनाच जणू काही तिनं झपाटून टाकलं. वैजूही खूप बोलकी. कधी परकेपण जाणवलंच नाही. असं हे आमचं अनामिक सख्खं नातं वाढीला लागलं. मधुरनं आजोबांनाही पार वश करून टाकलं. पुढे-पुढे तर मधुरच्या बंडपणाला वैजू वैतागून जाई. घर तसं जवळच. मधुर बरोबर आजोबांच्या घरी यायच्या वाटेला डोळे लावून बसे. हे दिसले की, ''आजोबा!'' म्हणून मोठ्यानं हाक मारे. हे तिला येता येता कडेवर घेऊनच येत. वैजूलाही इतर कामांसाठीं वेळ मिळे. मधुरचे बाबा आर्किटेक्ट. त्यामुळं ते येण्याचा वेळ नियमित नसे. शिवाय ते तसे अबोलच. त्यामुळं मधुर आमच्या घरीच जास्त दिसू लागली. वैजूलाही जरा विसावा लाभू लागला, माझाही एकाकीपणा पार पळून गेला.कित्येक वेळा वैजू न्यायला आली की लगेच ''मला अजून इथंच थांबायचंय. मी घरी येणार नाही.'' अशी घोषणा देत कशात तरी रमून जायची. लेकीला लिहिलेली पत्रं आता मधुर, वैजूच्या अस्तित्वानं भरून जात. तिला थोडीशी उत्सुकता आणि थोडा हेवा वाटे. तिच्या पत्रात ते प्रतिबिंबित होई.

मधुरची भेट अशी अगदी आमच्या ऐन गरजेवेळी झाली की त्यावेळी लेक दूर असल्यानं (प्रथमच) मी खूप खंतावत असे. त्यावेळच्या विरही उदासीनतेत मधुर म्हणजे आम्हाला फार मोठा विरंगुळा बनला होता. आम्ही असे खूपच तिच्यात रमलो होतो.

अशात माझी लेक सुटीवर आली. तीही मधुर नामक ध्यानाच्या नादी तर लागलीच पण वैजूनं तिच्या मोठ्या बहिणीच्या नात्याची उणीव भरून काढली.

एक दिवस मधुर मावशीबरोबर घरी आली. माझ्या लेकीला तिनं 'मावशी' बनवून ते नात्याचं जिगसॉ जणू पूर्ण केलं. रात्री माझ्या लेकीबरोबर खेळली, जेवली. अंथरूण घातल्यावर तर तिच्या अंगातच आलं. गादीच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत लोळणे, कोलांट्या मारणे, अखेर माझी लेक म्हणाली,''मधुर आता आपण झोपायचं हं! खूप रात्र झाली आता! चला चूपचाप झोपा!'' त्यावर ''वाऽग मावशी, मी झोपायला नाही, आजीकडे खेळायला आली आहे.'' परत दंगा सुरू. यांना दुसऱ्या दिवशी लवकर कामावर जायचे होते. अखेर ११॥ वाजता रात्री त्यांनी कपडे केले आणि मधुरला घरी सोडून आले.

दिवस भराभर चालले होते. वैजूने मधुरला शाळेत घातले. मुळीसुद्धा रडली नाही. उलट समवयीन मुलामुलींत दंग्यात रमून गेली. वैजूला पुन्हा दिवस गेले होते. आता मधुर ५ वर्षांची झाली होती. दरम्यान माझी लेकही दिल्लीहून मुंबईच्या तिच्या भावाच्या कॉलेजा-तच मेडिकलला शिकायला आली होती. शाळेच्या वेळाखेरीज मधुरला आता कमी वेळ आजीकडे यायला मिळायचं पण त्यातला क्षण न् क्षण ती उपभोगून घ्यायची. आता वैजू आमच्यापैकीच एक झाली होती. तिला तिच्या आत्याने विचारले,''वैजू, तुझी आई नागपूरला, सासूपण अलिबागला मग बाळंतपण कोण करणार?'' ''का चांदोरकर आजी आहेत ना!''



तिच्या आत्याचे मला जेव्हा हे सांगितले तेव्हा मी खरंच भरून पावले. तिनं केवढा विश्वास दाखवलान.

मधुर नंतर रीमाचा जन्म! वैजूनं पुन्हा मुलगी झाली म्हणून मुळीच वाईट वाटून घेतलं नाही. उलट दोघा पतीपत्नींनी अत्यंत आनंदाने त्याही बाळाला सामावून घेतलं. आता आम्ही बोरिवलीस आलो होतो. गोरेगावचं येणं जाणं कमी झालं असलं तरी एकमेकींकडे तितक्याच ओढीनं जेव्हा काही वेळ मिळेल तेव्हा येत जात होतो. एवढी बंड मधुर पण रीमाला खूप छान खेळवायची. आता तीही मोठी होत होती. दंगा हट्ट कमी झाला होता. शाळेत हुशार म्हणून गणली जात होती. दरम्यान मधुरच्या मामाचं लग्न ठरलं. वैजू घरच्यासारखी राबली. माझ्या साऱ्या नातेवाईकांना आतां वैजू माहित झाली होती. कुठल्याही आणीबाणीस ती व मी एकत्र येत होतो.

मुलांची लग्नं झाली आणि हे निवृत्त झाले. आम्ही पुण्यास- मुलगा प्रॅक्टीस करणार म्हणून- पुण्यातक स्थायिक झालो. वैजूचे सख्खे असे बरेच नातेवाईक पुण्यास होते पण आली की आमच्याकडं उतरायची. मुलींनाही इकडेच यायचं असायचं. आम्हालाही अगत्यानं राहायला बोलवायाची. त्यामुळं कितीतरी चढ-उतारात आम्हा दोघींची साथ टिकून राहिली. मधुर आत्ता उत्तम प्रकारे आर्किटेक्ट झालीय. रिमाने केटरिंगचा कोर्स घेतलाय. ती हैद्राबादला गेली. मधुर एम.आर्क करण्यास आता पूर्ण स्कॉलरशिप मिळून अमेरिकेला चाललीय. नुकतीच चार दिवस मायलेकी माझ्याकडं रहायला येऊन गेल्या. जाताना मधुर पाया पडली. आणि घट्ट मिठी मारली. मी डोळे तिच्या नकळत पुसले. पहिल्या भेटीची आठवण झाली.

''आजी मी आता मधुर गेली की फार एकटी होणार. मधुर अमेरिकेत तर रिमा हैद्राबादला. आता मी हाक मारली की तुम्ही व आजोबांनी माझ्याकडं आलं पाहिजे.'' असं ठणकावून हक्कानं सांगून, माझ्या मुला-सुनेकडून प्रॉमिस घेऊन ती गेलीय. तूर्त हा महिनाभर तिला मधुरची तयारी पुरेल. मग मात्र फोन येईल. अर्धातास भडाभडा बोलेल. 'माझ्याकडं यायचं'. बोलावणं देईल. खरंच मनांत येतं कुठल्या जन्मीचे हे ऋणानुबंध?' खरंतर ती माझी नातेवाईक नाही की कुणी नाही पण तरी आमच्याशी घट्ट बांधलेली माझी खरी लेक आहे!


## विविध जीवनानुभवांचे लालित्यपूर्ण प्रकटन करणारी पुस्तके



### या सुखांनो

**सुरेश वसंत नाईक**

सर्वांगानी जीवनाचे मर्म शोधून सुखाचा मार्ग दाखवणारे सुंदर ललितलेखन.

किंमत : **१७० रु.** सभासदांना : **१२० रु.**पोस्टेज : **२० रु.**

# अनोखे मैत्र ऋणानुबंध

**स्वाती देशपांडे**

नाती... खरंच ह्या जीवसृष्टीत प्रवेश केल्यापासून आपण किती विविध नात्यांच्या कोषात विणले जातो... नवजात अर्भकाच्या प्रथम रुदनाच्या अर्थात जन्माच्या क्षणापासूनच हा कोष विरला जाऊ लागतो. ते कुणाचं मूल, कुणाचं भावडं, नातवंड... असं एकाच वेळी बरंच काही बनत जातं, अन तेही ह्यातलं काहीही उमजत नसताना. पुढे जरा समज उमज आल्यावर शाळेत शिकताना तर ही वेगवेगळी नाती आपल्याकडून अगदी घोटून पाठ करून घेतली जातात. म्हणजे आईच्या भावाला मामा म्हणतात, वडिलांच्या भावाला काका म्हणतात... वगैरे. पुढे चुलत चुलत, मावस मावस इत्यादि नात्यांची ओळख व्हायला लागते. कित्येकदा तर लहान मुलांना अमुक एक तुझी दूरची आत्या/काका आहे असंही सांगितलं जातं. त्यातून त्या मुलांना किती अर्थबोध होतो कुणास ठाऊक. परंतु प्रत्येक व्यक्तीच्या मागे एका नात्याचा 'स्टँप' चिकटवलेला असतो अशा अर्थाचं काहीतरी वाटत असणार हे नक्की. शाळा कॉलेजातल्या दिवसात मैत्री ह्या नात्याची ओळख होते. पूर्वी पाहिलेल्या नात्यांपेक्षा हे नातं जरा वेगळं असतं. बरेचदा ह्या मैत्रीची सुरुवात कुठल्यातरी समान धाग्याने होते. उदा. एका इमारतीत रहाणाऱ्या, एका शाळेत/वर्गात शिकणाऱ्या, समान विषयांमध्ये रुची ठेवणाऱ्या व्यक्तींमध्ये. परंतु सतत सहवास हा बरेचदा ह्या नात्याला बांधून ठेवणारा एक धागा असतो. दोन मित्र, मैत्रिणींच्यातलं नातं सहसा सहवासाने फुलतं. मात्र ह्याच मैत्रीत केवळ एका व्यक्तीच्या स्थलांतराने सुद्धा अंतर पडू शकतं. दोन्हीकडून मनात कुठलाही कटु-भाव नसताना देखील. केवळ वर्तमानाशी जुळवून घेण्याची मानवी प्रवृत्ती हे कारणही असेल कदाचित् पण बरेचदा असं होतं खरं. तरीही ह्या स्थळकाळाच्या, परिस्थितीच्या परिवर्तनातून, नियमित चाकोरीच्या बाहेर पडून टिकणारी देखील काही नाती असतातच. ती आपोआप टिकतात, फुलतात, बहरतात. आपलं आयुष्य संपन्न करून टाकतात.

असंच एक नातं अनुभवण्याचं सुदैव मला लाभलं आहे. नातं आहे एका सखीशी... जिचं नाव आहे शुभदा. नावाप्रमाणेच काहीतरी शुभ, चांगलसं इतरांना देणारी देत राहणारी. ही शुभदा आहे शुभदा पटवर्धन.

आपल्या आयुष्यात काहीही वाईट झालं की आपण 'ललाटीच्या रेखा' म्हणून नशिबाला बोल लावतो. पण खरंतर काही चांगलं झालं की तीही 'ललाटीची रेखा'च होती हे आपण बरेचदा विसरतो. ज्या गोष्टी घडायच्या त्या घडतातच. काही काही योग कसे जुळून येतात ही अगदी अचंब्यात टाकणारीच गोष्ट आहे. शुभदाशी माझा परिचय होणे ही पण अशीच एक घटना. त्याचं झालं असं की वयाच्या विसाव्या वर्षी महाराष्ट्रातूनच बाहेर पडल्यानंतर बरेच वर्षांनी बदलीमुळे पुन्हा महाराष्ट्रात, तेही मुंबईत राहण्याचा योग झाला. मनुष्य हा अनतंकाळचा विद्यार्थी असतो हे माझं अगदी पक्कं मत आहे. आपल्या आजूबाजूच्या जगात सतत काहीतरी नवीन समोर येत राहावं. त्यातून काय घ्यावं, नाही घ्यावं ही आपली निवड असते.

मुंबईत राहायला आल्यावर असंच एक वेगळं जग माझ्यासमोर आलं. आपलं, मराठी जग.. महाराष्ट्राबाहेर पडण्यापासूनच्या मधल्या काळात गणित अध्यापनाच्या माझ्या कामात स्थिरावले असूनही मराठी लेखनाची उर्मी मनात खोलवर दडलेली होतीच. आपल्या राज्यात, मुंबईत राहायला आल्यावर ती पुन्हा पुन्हा उफाळून वर यायला लागली होती. काय करावं, कसं करावं अशा मनाच्या बेचैन अवस्थेत असतानाच अचानक एक दिवस चतुरा-लोकसत्ता पुरवणीचा अंक समोर आला अन् लगेचच मी त्यात दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधला.

''नमस्कार.. माझं नाव.'' अशी पूर्णपणे औपचारिक सुरुवात करून मी 'चतुरा' कार्यालयात फोन लावला होता. कामाचं बोलून झाल्यावर 'आपलं नाव समजू शकेल का?' अशी मी पृच्छा केल्यावर पलीकडून बोलणाऱ्या व्यक्तीने आपलं नाव सांगितलं अन् मी अक्षरश: उडालेच. ती अगदी सहजपणे, चेहऱ्यावर हलकेच स्मित ठेवून बोलत आहे अशी प्रतिमा मनात निर्माण करणारी, ओळख नसतानाही अत्यंत आश्वासक बोलणारी व्यक्ती चक्क त्या मासिकाची संपादिका निघाली. तीच पुढे माझी सखी बनलेली... शुभदा. कामानिमित्त भेटायचं होतंच. त्यामुळे तिने दिलेल्या वेळेनुसार, तारखेनुसार भेटायला गेले. छोटंसं, लोभस व्यक्तिमत्त्व.. कुणालाही पटकन आवडेल असं. पण सर्वात प्रामुख्याने जाणवलं ते म्हणजे फोनवरून बोलताना डोळ्यासमोर आला होता तसा हसरा चेहरा. नंतर कामाच्या निमित्ताने गाठीभेटी होत राहिल्या अन् पुलंच्या 'वेव्हलेंथ जमते' ह्या शब्दांची प्रचीती येऊ लागली. कपड्यांच्या 'मॅचिंग' करता आपण किती धडपडतो दहा दुकानं शोधतो अन् हवी ती छटा मिळाली की कोण आनंदित होतो हे आपण सगळ्यांनी अनुभवलेलं असणारच. पण आपल्या विचारांशी 'मॅचिंग' विचारांची व्यक्ती सहजपणे, आपसूकच आपल्या आयुष्यात येणे, भेटणे हा अगदी थरारून टाकणारा अनुभव असतो.

तसं बघितलं तर दोन मैत्रिणी म्हणजे दोन स्त्रिया कुठल्या विषयांवर बोलतात, चर्चा करतात ह्याबद्दलचे जनमानसात काही पक्के आडाखे बनलेले दिसतात. अन् ते बरेचदा खरे ठरलेलेही आढळतात. ते म्हणजे दोन स्त्रिया भेटल्या की, सर्वसामान्यपणे घरं, मुलं, कपडे, दागिने, गॉसिप ह्या शिवाय संभाषण संपतच नाही किंबहुना ते कितीही आवर्तनात फिरलं तरी ह्या विषयांच्या 'समे'वर येऊन पोचतंच. हे स्त्री स्वभावाला, प्रकृतीला धरूनच आहे असं मानलं तरी ह्यामुळेच जे अपवाद असतात ते ठळकपणे जाणवतात. शुभदाच्या सहवासात असंच होते. तिच्याजवळ बोलायला नेहमीच नवे, वेगळे विषय असतात. कधी चाकोरीबाहेरचे, कधी चाकोरीतलंच परंतु नेहमी-पेक्षा वेगळ्या दृष्टीतून पाहिलेले एक 'फॅमिली वूमन' असतानाही तिने स्वत:चं जपलेलं वेगळेपण मला खूपच आवडून गेलं. ह्याचं मुख्य कारण मला वाटतं की 'डिस्कस आयडियाज नॉट पीपल' हे इंग्रजीतलं बहुमोल वचन तिच्याकडून सहजच पण तंतोतंत पाळलं जातं. अशा प्रकारची आदर्श वचनं, सुविचार आपण नेहमी ऐकतो अन् सोडूनही देतो अन् म्हणूनच ती पाळणाऱ्याचं वैशिष्ट्य जाणवल्या-

शिवाय राहत नाही.

कुठल्याही क्षेत्रात नव्याने काम सुरू करताना असे घरच्या मंडळींचे सहकार्य, प्रोत्साहन मिळणे आवश्यक असते त्याचप्रमाणे त्या क्षेत्रातल्या अनुभवी, व्यावसायिक व्यक्तींचे मार्गदर्शन मिळणे ही तितकेच महत्त्वाचे. माझ्या बाबतीत कुटुंबाचे सहकार्य कायम होतेच पण मुंबईत आल्यानंतर शुभदाशी झालेला परिचय हा अतिशय मार्गदर्शनपर ठरला अन् माझं जणू विश्वच बदलून गेलं. हातून हवं त्या पद्धतीचं काम तर व्हायला सुरुवात झालीच शिवाय मनातल्या विचारांना योग्य दिशा मिळत गेली अन् स्वत: मध्ये होणारे वैचारिक बदल जाणवू लागले. ती स्वत: संपादिकेच्या पदावर असूनही कुठलाही चढेलपणा न दाखवता इतरांना प्रोत्साहित करणारं तिचं आश्वासक वर्तन मी स्वत: तर अनुभवलेच व इतर काही संबंधितांना सुद्धा अनुभवताना पहात गेले.

वाचनाची आवड हा आमच्या दोघींच्या आयुष्यातला प्रमुख घटक; परंतु वाचण्याचे विषय व लेखक अगदी सारखे होतेच असं नाही. मी आधी न वाचलेला, काहीसा दूरस्थ वाचलेला एक लेखक मी शुभदाच्या सहवासात आल्यावर वाचायला लागले. जी. ए. कुलकर्णी. ह्यापूर्वी मला त्यांच्या लेखनाचे पदर इतक्या सुलभपणे उलगडून दाखवणारी कुणी व्यक्ती भेटली नव्हती अन् पुढे भेटली असती की नाही हे ही सांगता येत नाही. ह्याचं कारण असं की, माझं राहाणं कायम परराज्यात त्यामुळं मराठी वाचक भेटण्याची शक्यता मुळात कमीच. शिवाय स्वत:ची आवड दुसऱ्यावर न लादता आपल्या आवडीच्या विषयाचे योग्य ॲनालिसिस करून दुसऱ्यापर्यंत पोचवण्याची हातोटी असणाऱ्या शुभदासारख्या किती व्यक्ती भेटतील ह्याबद्दल जरा शंकाच वाटते.

वृत्तपत्र माध्यमात, अधिकाराच्या पदावर असूनही प्रसिद्धी सहज मिळत असातानाही त्या मध्ये रस नसलेल्या प्रसिद्धी पराङ्मुख अशा ह्या माझ्या सखीचा प्रत्यक्ष असा सहवास मला बदलीच्या फिरत्या आयुष्यामुळे केवळ तीनच वर्ष लाभला. परंतु इतक्या अनेकविध रूपांनी मी तिला बघत गेले. चतुरा मासिकांचे पुणे मुंबई अंक सांभाळताना पायाला चाकं लागल्यासारखी मुंबई-पुण्याची फिरती करणारी संपादिका, पुन्हा त्यात कुठेही दमणुकीची, तक्रारीची भावना तर नाहीच उलट हिच्या मनाची 'बॅटरी' कायम 'चार्ज' झालेली, तर कधी माझ्या मनातल्या एखाद्या समस्येची सहजपणे उकल करून देणारी मैत्रीण, तर कधी माझ्या आनंदात माझ्या इतकीच आनंदणारी सखी... एक ना अनेक अन् मुख्य म्हणजे हा माझा फक्त वैयक्तिक अनुभवच नव्हता तर तिच्या सहवासात आलेल्या इतरही बऱ्याच जणांकडून अशीच प्रतिक्रिया ऐकायला मिळत गेली.

आता मी (पुन्हा एकदा) महाराष्ट्राबाहेर उटीला रहायला आले असले, तरी आमच्यातला 'संवाद' फुलतोच आहे. फक्त आता 'फोन'वर अवलंबून राहावे लागते इतकंच. अन् 'संवाद' तरी दरवेळी प्रत्यक्ष बोलून होतो असं थोडंच आहे? काही महिन्यांपूर्वीची गोष्ट साधारण ४-५ आठवडे माझा व शुभदाचा संपर्क काही ना काही कारणाने होऊ शकला नव्हता. अन् एके दिवशी अचानकपणे तिला फोन करण्याची तीव्र इच्छा झाली. तीव्र म्हणजे इतकी तीव्र की त्यापुढे दुसरे काही सुचायलाच तयार नाही. त्यात उटीतल्या मुसळधार पावसाने फोन लाईन्स खराब झालेल्या. शेवटी एकदाचा फोन लागला अन् तेव्हा कळले की त्याच दिवशी काही तासांपूर्वी तिच्यावर एक शस्त्रक्रिया झाली होती. तेव्हा जाणवले की 'टेलिपथी' म्हणतात ती हीच! हाही एक प्रकारचा संवादच नाही का? एका मनाचा दुसऱ्या मनाशी झालेला-

शस्त्रक्रियेनंतर काही दिवसांनी जेव्हा प्रथम तिच्याशी बोलले तेव्हा जरा जीवात जीव आला. त्यानंतरच्या 'फोन्स' मध्ये स्वत:च्या प्रकृतीबद्दल जुजबी बोलून ती तिच्या कामाबद्दल, पुढच्या अंकांबद्दल बोलत राहायची. अन् मी थक्क होऊन ऐकत राहायची. सिक लिव्ह च्या काळात येणाऱ्या चतुराच्या पुढच्या अंकांची तिने तजवीज तर केली होतीच अन् एकदा बोलताना कुठला तरी विषय निघाला अन् ती नेहमीप्रमाणे म्हणून गेलीच 'लेखाकरता काय मस्त विषय आहे नं?' आपल्या कामात इतकं सामावून जाणाऱ्या, झोकून देणाऱ्या व्यक्तींबद्दल आपण ऐकतो पण असं माणूस इतक्या जवळून जाणायला मात्र नशीबच लागतं.

माझ्या आयुष्यात एका काहीशा अस्वस्थ, बैचेन टप्प्यावर ह्या माझ्या सखीशी भेट झाली. अन् पुढे तिच्या सहवासात अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या, विचारांना, कामाला योग्य दिशा मिळाली. अन् मुंबई सोडताना बराच 'ठेवा' बरोबर घेऊन जात असण्याची जाणीव झाली. भविष्यात लवकरच पुन्हा सहवासाची संधी मिळावी अशी मनात ओढ लागलेली आहेच. तुम्ही जर असं एखादं 'मैत्र' अनुभवलं असेल तर उत्तमच. पण नसेल तर तुम्हालाही असं एखादं नातं अनुभवायला मिळो, अशी एखादी सखी लाभो, हीच शुभेच्छा!


## विविध जीवनानुभवांचे लालित्यपूर्ण प्रकटन करणारी पुस्तके

### रात्रींचे धुंद अनुभव मांडणारी आगळी पुस्तके



संपादनः अरूण शेवते

**रात्ररंग**

किंमत : १८० रु.
सभासदांना : १२६रु.
पोस्टेज : २० रु.

**रंगल्या रात्री**

किंमत : ८० रु.
सभासदांना : ५६रु.
पोस्टेज : २० रु.



### मद्य नव्हे, हे मंतरलेले पाणी

संपादनः अरूण शेवते

किंमत : १२० रु. सभासदांना ८५रु.
पोस्टेज : २० रु.

नामवंत कलावंतांनी, साहित्यिकांनी रंगवलेल्या मैफिलींच्या दिलखुलास हकिकती

अनोखे ऋणानुबंध

# प्रसन्न निर्भर नाते

**विद्या चिंचाळकर**

या पृथ्वीतलावर जन्म घेतानाच नवीन अपत्याची अनेक नाती तयार झालेली असतात. ते आईवडिलांचं प्राणप्रिय मूल असतं, कोणाचा भाचा-भाची, पुतणी असतं तर आजी-आजोबांच लाडकं नातवंडं असतं. अशी रक्ताची नाती त्याच्या जन्मावरून ठरलेलीच असतात. त्याची निवड करणं त्याच्या हातात नसतं. ते मूल जसजसं मोठं होत जाते तसतशी त्याच्या काही नात्याची वीण घट्ट होत जाते तर काही नात्यांची वीण उसवत राहते. परंतु कधीकधी या रक्ताच्या नात्याव्यतिरिक्त काही जोडलेली नाती आयुष्याच्या काळपटावरील धागेदोरे जुळवून जरतारी वस्त्रं विणत राहतात. अशी जोडलेली किंवा निर्माण झालेली नाती आपण आपल्याला हव्या त्या व्यक्तीशी जोडू शकतो. अशा नात्यात आपल्याला निवड करण्यास वाव असतो. अशा जोडलेल्या नात्यांमधून अनोखे ऋणानुबंध तयार होऊ लागतात. व्यक्ती-व्यक्तीमध्ये एकमेकांत काही जवळकीच्या भावना निर्माण होतात. त्यालाच दोघांमधील 'नातं' निर्माण झालं असं म्हणता येईल. अशा नात्याचा लाभ माणसाचं जीवन उबदार करण्यास मदत करतं. माझ्याही आयुष्यात अनेक व्यक्तींनी माझं जीवन सुखद, उबदार करण्यास प्रवेश केला आहे. त्यातीलच एक नाव आहे - श्रीमती नलूताई पटवर्धन

नलूताईंचं आणि माझं जुळलेलं नातं जसं अगदी ताजतवाने आहे. माझ्या एका मैत्रिणीच्या मध्यस्थीमुळे त्यांची माझी ओळख झाली व नंतर ओळखीचे रूपांतर सहवासाने मैत्रीत कधी झाले कळलेही नाही. माझा लेखनाचा छंद तसा स्वान्त सुखाय- पण या लेखनाच्या माध्यमाने आम्ही दोघी जवळ आलो. पुण्यामध्ये 'उमेद परिवार' या नावाची, मतिमंद, बहुविकलांग मुलांच्या पुनर्वसनाचे गेली १४ वर्षे जागरूकतेने काम करणारी एक संस्था आहे. या संस्थेचे वैशिष्ट्य म्हणजे मतिमंद मुलांच्या पालकांनीच ही संस्था स्थापन केलेली आहे. 'नलूताई' या संस्थेच्या उपाध्यक्षा म्हणून काम करतात, परंतु त्या पालक सदस्य म्हणून संस्थेच्या पदावर नसलेल्या एकमेव सभासद आहेत. या संस्थेच्या 'सेमिनार'च्या रिपोर्टींग-साठी (बातमीपत्रासाठी) त्यांनी मला बोलावलं, मी ते काम पार पाडलं आणि मग माझ्यावर खूष होऊन हळूहळू संस्थेच्या सर्व पुढील कार्यक्रमाच्या लिखाणाचे काम त्यांनी माझ्यावर सोपवलं. त्या निमित्ताने आम्हा दोघींमध्ये सहवास घडत गेला, त्यातूनच स्नेहाचं नातं निर्माण झालं. एक मोकळी, आश्वासक मैत्री निर्माण झाली.

नलूताईंच वय वर्ष ७१ पण माझ्यामते मैत्रीच्या नात्याला वयाचं बंधन नसतं, नसावं. त्यांच्या सहवासात मला त्यांचे अनेक अनुभव असे आले की, त्यांच्या आणि माझ्या वयातलं अंतर पार विसरून जायला झालं. माझ्या मोठ्या बहिणीच्या, 'आक्काच्या' वयातील नलूताईंची तुलना माझ्या नकळतच मी आक्काशी करू लागले. आक्कांच्या या वयातील (सत्तरीतील) उदंड उत्साह व सकारात्मक जीवनदृष्टी, दुसऱ्याला उपयोगी पडण्याची वृत्ती इ. सर्व गुणांची झलक मला त्यांच्यातही अनुभवता आली. वयाने निर्माण झालेल्या व्याधींकडे लक्ष न देता, किंवा त्यांचा बाऊ न करता पूर्ण दिवस स्वत:ला बिझी ठेवून आपलं आयुष्य सुखासमाधानाने जगत राहण्याची कला नलूताईंनी आत्मसात केली आहे. 'उमेद परिवारा'चे काम करताना सर्व जास्तीतजास्त- जबाबदाऱ्या आपल्या शिरावर घेऊन मतिमंद मुलांसाठी आवश्यक असणारे केवढे तरी वैशिष्ट्यपूर्ण कार्य त्या अत्यंत आपुलकीने करत असतात. ते काम पार पाडताना कधी गोडीगुलाबीने तर कधी वडिलकीच्या नात्याच्या धाकाने, दराऱ्याने समोरच्या व्यक्तीशी संवाद साधून त्या कामाचे व्यवस्थापन करत असतात. त्यासाठी कोणत्या माणसाकडून कोणते काम घ्यायचे याची योग्य ती जाण त्यांना आहे. संस्थेचे एखादे शिबीर, सेमिनार किंवा इतर काही कार्यक्रम असेल तर ते होईपर्यंत त्यांच्या फोनला विश्रांती नसते व देहालाही आराम नसतो. तो कार्यक्रम मनासारखा पार पडेपर्यंत त्यांच्या जीवाला चैन पडत नाही इतके स्वत:ला झोकून देत काम करण्याची त्यांची वृत्ती मी अनुभवली आहे. त्यावेळी आपले वय, वयाबरोबर आलेली दुखणी व इतर काही संसारी काळज्या त्या पूर्ण विसरलेल्या असतात. 'उमेद परिवार' या संस्थेशिवाय गेल्या वर्षीपासून त्यांनी आणखी एका तशाच स्वरूपाच्या शाळेचे- (सी.पी. मुलांसाठी सेरेब्रल प्लासी मुलांसाठी शाळा) उपाध्यक्ष-पद स्वीकारले आहे आणि त्याचेही काम त्यांनी जोमाने सुरू केले आहे. याबरोबरच आठवड्यातील सात वारांचे नियोजन करून स्वत:च्या गाण्याचा छंदही त्या भजन-क्लासला जाऊन जोपासतात. एका महिला सेवा केंद्राचे कामही, त्या कमिटीवर राहून जबाबदारीने पार पाडतात. या सर्वांतून वेळ काढून स्वत:च्या विरंगुळ्यासाठी आठवड्यातले दोन दिवस समवयस्क मंडळींबरोबर ब्रीजच्या डावातही रमतात. त्यांच्या चोखंदळ वृत्तीमुळे स्वयंपाककलाही त्यांच्यात भिनलेली आहे. त्यांच्या हातचे रोजचे साधे जेवणही त्यामुळे रूचकर व स्वादिष्ट असते. हे मी प्रत्यक्ष चव घेऊन अनुभवलेले आहे. एवढा उदंड उत्साह त्यांच्यामध्ये कायमच संचारलेला असतो. २१ वर्षांपूर्वी त्यांच्या पतीचं निधन झाल्यामुळे व दोन्ही मुलींची लग्ने होऊन त्या परदेशी गेल्यामुळे आलेल्या एकाकीपणावर मात करून जीवनाची वाटचाल अशी समरसतेने करण्याची त्यांची वृत्ती कौतुकास्पद अशीच आहे. त्यांच्या या सर्व गुणवैशिष्ट्यामुळे मला त्यांच्याशी मैत्रीचे नाते जोडावेसे वाटले. त्यांनाही ते तसे माझ्याबद्दल वाटले आणि मग आमचे सूर छान जुळले. आम्ही एकमेकींच्या 'मैत्रिणी' झालो. आता कामाव्यतिरिक्त मी त्यांना जाऊन भेटते- आम्ही दोघी आपापली वैयक्तिक सुखदु:खे एकमेकींना सांगत असतो. खूप गप्पा मारतो. आमची भेट खूप दिवस जर झाली नाही तर आम्हाला चैनच पडत नाही. मध्यंतरी माझ्याकडचा फोन काही दिवस बंद होता तर लागोपाठ पोस्टकार्डे पाठवून त्या माझ्याशी संवाद साधायच्या. गंमत म्हणजे त्यांचे पोस्टकार्ड मला मिळण्यापूर्वीच माझा बाहेरून केलेला फोनवरील संवाद त्यांच्या-पर्यंत पोहचायचा. असे आमचे मैत्रीचे धागे हळूहळू पक्के होत गेले. आमचा मैत्रीतील प्रसन्न निर्भर असे नाते आमच्यामध्ये जिव्हाळा व गोडवा निर्माण करून गेले. रक्ताच्या नात्याचं ओझं नसलेलं, परंपरांचं आदर व कौतुक करणारं व कॉमन इंटरेस्टमधून निर्माण झालेलं आमचं नातं वेगळ्या प्रकारे जुळून गेलं. माझ्या आयुष्यावर चिरकाळ ठसा उमटवणारं ठरलं.

अनोखे ऋणानुबंध

# तेथी कर माझे जुळती

**डॉ. शंतनु चिंधडे**

तीर्थरूप वडिलांच्या काव्यसंग्रहातील अर्पण पत्रिका खूप वर्षानंतर अचानक वाचण्यात आली. 'ज्यांच्या शीतल छायेत दु:खाच्या झळी मला कधीच लागल्या नाहीत. त्या कै. बाबूकाकांच्या चरणी...' मन त्या वाक्यावर स्थिरावले.

कोण होते हे कै. बाबूकाका? तर माझे पूजनीय आजोबा कै. सदाशिव गोविंद चिंधडे, वकील. मुक्काम मालेगाव, जिल्हा नाशिक. अर्पण पत्रिकेतल्या त्या हृद्य ओळी वाचल्या आणि माझे मन भूतकाळात अगदी पन्नास वर्षे मागे गेले.

कुग्राम मालेगावात टिळक पथावरच्या घरात माझा जन्म झाला.आमची त्या वेळी एकत्र कुटुंब जीवनी होती. आजोबा आणि आजी-ताई यांच्याबरोबर माझे आईवडील व आम्ही काही भावंडे बरीच वर्षे वास्तव्य करून होतो. आजोबा गावातले नामवंत वकील होते. शेतीचे कामही पहात. समाज कार्य करीत. स्वा.सावरकर, हिंदूमहासभा, रा.स्व.संघ अशा विचारप्रणालीत व वातावरणात त्यांचा अनेक वर्षे वावर होता. नाटक, साहित्य, संगीत या कलांची त्यांना मनस्वी आवड होती. काहीसे स्थूल, बेताची उंची असलेले पण वर्णाने गोरे आणि शांतचित्त मुद्रा. माझी आजी- सौ. ताई वर्णाने चांगलीच काळी. त्यामुळे तिच्या सहवासातले आजोबा गौरवर्णामुळे उठून दिसत. बघणाऱ्यावर छाप पाडत.

आयुष्याची सुरुवातीची काही वर्षे आठवणींना दगा देतात. आठवणी धूसर बनतात, पण एक चांगले आठवते आणि ते म्हणजे शाळेविषयी मला असलेली कमालीची नावड. उग्र चेहऱ्याचे मारकुटे मास्तर हा एक मोठा घटक या नावडीमागे असावा. घरा शेजारच्याच शाळा क्रमांक २ मध्ये इयत्ता चौथीपर्यंत मी जात होतो या बहुतांशी काळात आजोबांनी माझ्या शालेय प्रगतीचा पाठपुरावा केला. प्रसंगी शाळेत वर्गापर्यंत पोहोचवायला येत. तास संपेपर्यंत बाहेर पडवीत बसून राहात. शिक्षकांविषयीची भीती काही प्रमाणात कमी होण्यास त्यांच्या उपस्थितीचा आधार वाटायचा, पण ही सोबत त्यांना सतत कशी जमणार? त्यांना त्यांचे कोर्ट होते, पक्षकार होते, वाचन-लेखन होते. शाळेत मला सोडून ते दृष्टिआड होताच मी भोकाड पसरून दिल्याचे मला चांगले आठवते.

रेटत रेटत कशीबशी ही शाळेतली वर्षे मी संपवली. वेळच्या वेळी पास मात्र होत गेलो. माझ्या प्रगतीपुस्तकावर आजोबांची सतत दृष्टी असे. भाषाविषयात कमी गुण पडल्याचे त्यांच्या लक्षात येताच कुणा केळकर नावाच्या वाड्यात पण विज्ञान संस्कृत पंतोजींची शिकवणी त्यांनी मला लावली होती. रामरक्षा, गीतेतले निवडक अध्याय, वेचक मराठी रचना संध्यापाठ वगैरे 'मुखशुद्धीकारक' पाठांतर केळकर घोटून घेत. फावल्या वेळात कोपऱ्यावरच्या लक्ष्मी नारायणाच्या मंदिराच्या पायऱ्यांवर बसून येणाऱ्या



जाणाऱ्या तरुण स्त्रियांकडे बघत बसत. आजोबांच्या कानावर हे केळकरी चाळे आम्ही मुले घालायचो पण आजोबा या गोष्टीकडे दुर्लक्ष करीत. पुढे केव्हातरी बघू म्हणत

क्षमाशील, उदार स्वभाव हे त्यांचे वैशिष्ट्य होते.
घराच्या ओट्यावरच त्यांची पक्षकार मंडळी बसत. बरीच गर्दी व्हायची. खाली मान घालून लिहित असलेल्या कापसे नामक कारकुनाला सतत अनाकलनीय भाषेतला मजकूर सांगत. आठ-नऊ वर्षांचा मी. मला ती कायदेकानूंची भाषा परग्रहावरची वाटायची.

आजोबांच्या पक्षकार मंडळीत ग्रामीण भागातला शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने दिसायचा. मुसलमान पक्षकार देखील अधून-मधून येत. अहमदजान भाई नावाचे रुबाबदार बोहरा समाज पुढारी तर वर्षानुवर्षे. त्या समाजातील गुंतागुंतीची प्रकरणे आजोबांकडे आणत. हिंदू मानसिकता असूनही आजोबांचे मुस्लीम समाजात वजन होते- स्नेहाचे संबंध होते. एवढेच नाही तर आमच्या शेतावर काम करणारा दादुमिया नावाचा एक फार प्रेमळ म्हातारा कुळ म्हणूनच वर्षानुवर्षे राहिला होता. तालुका संघचालक असूनही ही सर्व माणसे आजोबांनी मोठ्या कौशल्याने हाताळली असणार असे आता लक्षात येते.

काळाकुट्ट दादुमिया वर्षातून एकदा केव्हातरी गव्हाबाजरीची तट्ट फुगलेली पोती बैलगाडीतून घरी आणून टाकायचा. आजोबांना नमस्कार करून परतायचा. पुढे या शेत-प्रकरणावरून दोघांचे काही मतभेद झाले. कधी न संतापणारे आजोबा त्याला जोरदार रागावले. शेत खाली कर म्हणाले. दादुमिया पुन्हा दिसले नाहीत. धान्याची पोती मात्र घरी येत राहिली.

आजोबांच्यातील कवित्वाचा शोध योगायोगानेच लागला. नुकताच शाळेतून उद्विग्न मनाने मी घरी परतलो होतो. माजघरात त्या सायंकाळी आजोबा हातातल्या वर्तमानपत्रात बघून आजीला सुरावर काहीतरी गाऊन वाचून दाखवित होते.

'गर्जा जयजयकार गाईचा. ... गर्जा जयजयकार
गो मातेला अर्पण करू या शत पुष्पांचा हार'

काही शब्द परिचित वाटले. त्या काळात अत्यंत लोकप्रिय असलेल्या'गावकरी' वर्तमान पत्रात त्यांची प्रदीर्घ कविता छापून आली होती 'गाईचा जयजयकार' असे शीर्षक असलेली ती कविता ते मोठ्या तन्मयतेने गाऊन दाखवत होते. पुढे प्रसंगाप्रसंगाने आजोबांचे हे काव्य-वाचन मी माझ्या कानांनी ऐकत गेलो. राजकवी यशवंत ज्या विशिष्ट ढबीने काव्यगायन करीत अगदी तसेच हे काव्यगायन चालायचे. सर्व कविता एकाच चालीत.

कविता ऐकवायला आजोबांना कोणीही श्रोता चालायचा. पहिला श्रोता अर्थातच माझी आजी गंगूताई असायची. केवळ चौथी इयत्ता पास असलेल्या आजीला आजोबांची शब्द-बंबाळ, संस्कृत प्रचुर कविता, किती प्रमाणात कळत असणार? पण योग्य 'समेवर' ती मान हालवतांना दिसायची. आजीला कंटाळा आला की आजोबांना कापसे कारकून, पक्षकारांपैकी कोणीतरी त्यातूनही अहमदजान भाई, शेजारपाजारच्या परकरी पोरीटोरी किंवा महिला मंडळात जाणाऱ्या स्मार्ट शेजारीण बाई सुधाताई कोणीही चाले.

स्वतंत्रपणे त्यांनी मला समोर बसवून कविता ऐकवल्याचे आठवत नाही. मी त्यावेळी त्यांचा एक दूरस्थ श्रोता होतो. मात्र मला आताशा वाटते या अशा कळत नकळत झालेल्या संस्कारांमुळेच माझे काव्यप्रेम उफाळून

वर आले. मीही कविता लिहू लागलो.

आमच्या घराच्या माडीत त्यावेळी फिलिप्स कंपनीचा एक सुबक देखणा छोटेखानी रेडिओ होता. त्यातून आजोबा नाट्यसंगीत, शास्त्रोक्त संगीत ऐकताना दिसत. हा रेडिओ धूळ खाऊन खाऊन फार मंद आवाजात वाजे. असे असले तरी त्याच्या पडद्याला कान लावून आजोबा हे संगीत ऐकत बसायचे. माझ्यातही हे संगीतप्रेम झिरपावे म्हणून की काय ते मला गावातल्याच अंधत्व आलेल्या मनोहर गुरुजींकडे व्हायोलिन शिकायला पाठवू लागले. मनोहर गुरुजी पेटी सुंदर वाजवत व गात. गजानन वाटव्यांनी गायलेली मधुर भावगीते छान म्हणत. अंध असले तरी पेटीवर त्यांची बोटे झुळझुळ फिरत. कुठेतरी दूरवर अज्ञातात नजर लावून गाणी गात. त्यांनी गायलेले 'त्या गावी त्या तिथवर... चल भरभर मना पुन्हा' हे गाणं पन्नास वर्षे उलटून गेली तरी अजून आठवत राहते. आजोबांच्या मास्टर कृष्णा आणि बालगंधर्व यांच्याशी ओळखी होत्या. संगीत प्रेमाचे धागे त्यामुळेच जुळले असावेत. पुढे कॉलेजच्या एका कार्यक्रमात मास्टर कृष्णा भेटले व त्यांना मी आजोबांची आठवण दिली तसे त्यांनी माझे हात हातात घेतले.

आजोबांचे नाट्यप्रेम फारच नंतर मला कळले. गंधर्व कंपनीत काही काळ त्यांनी प्रॉम्प्टर म्हणून सेवा बजावली होती. मालेगावातील सरदार राजे बहाद्दरांच्या वाड्यात गणेशोत्सव थाटामाटात होई, सांस्कृतिक कार्यक्रम झडत शालीन, सुखवस्तू गृहिणी व कॉलेज कन्यकांकडून आजोबांनी अनेक नाटके बसवून घेतली होती. या स्त्रीवर्गात त्यांचा खूप दबदबा असायचा. आजोबांचे हे नाट्यवेड माझ्या मानगुटीवर मात्र कधीच बसले नाही.

आजोबांनी तब्बल पन्नास-साठ वर्षे वकील म्हणून काम केले. बरेच सांपत्तिक यश कमावले. शेत होतेच. ते पुढे विकले. वार्धक्याची चाहूल लागताच सर्व मिळकतीची नीट विल्हेवाट लावली. पुत्रप्रपौत्रांना सढळ हाताने मदत केली. गावातील संस्थांना सढळ हातांनी दान केले. नंतर मालेगावातून आम्ही सर्व मंडळी इतस्तत: पांगलो. नाशिक-पुण्यात तंबू ठोकळे. पण हे सर्व फार पुढे अनेक वर्षांनी घडले.

माझे कॉलेजचे दिवस आले आणि मी आजोबांपासून दुरावलो. मी प्रोफेशनल पास झाल्यावर मेडिकलला जाण्याचा योग आला. आताच्या काळात भरावी लागते, तेवढी प्रचंड की तेव्हा नव्हती पण ३७५रु. प्रत्येक टर्मला भरायचेही ओझे वाटायचे. कोणतीही खळखळ न करता आजोबा मला पैसे पाठवीत. आजोबांच्या वडिलांना म्हणजे माझ्या पणजोबांच्या काही गंभीर नेत्रविकारमुळे अंधत्व आले होते आणि म्हणूनच की काय एम.बी.बी.एस नंतर मी ही डोळ्यांचाच विशारद व्हावा असे ते बोलून दाखवित. कळत नकळत संस्कार कसे मनावर गारूड करतात याचे आश्चर्य वाटते. यथाकाल मी नेत्रविशेषज्ञ झालो. प्रशिक्षणासाठी इंग्लंडला अनेक वर्षे वास्तव्य केले. आजोबांचे पाठबळ व प्रेरणा नसती तर हा मार्ग निवडला असता का? सांगता येत नाही.

वर्षे उलटली. वार्धक्याने ताई आजोबांना घेरले आजोबांच्या हातांना कंप सुरू झाला. बशीत ओतलेला चहा सांडू लागला. वडिलांनी यथाकाल आजोबांची दोन पुस्तके प्रकाशात आणण्यासाठी पुढाकार घेतला. 'हुतात्मा चापेकर आणि कविता' हा काव्यसंग्रह ज्याला कविवर्य कुसुमाग्रजांची रसलोलुप प्रस्तावना लाभली 'माझी स्मरणिका' या पुस्तकात आजोबांची सामाजिक बांधीलकी व्यक्त झाली आहे. या दोन्ही पुस्तकांनी त्यांना उभारी आली. ऐंशीच्या घरात असतांना ही पुस्तके येणे हा एक अजब योगच म्हणायचा. अशा आनंदाची जातकुळी कशी असेल?

किती वर्षांनी या सगळ्या आठवणी गोळा झाल्या आहेत. निसर्ग नियमानुसार या पृथ्वीतलावरची वाटचाल आजोबांनी संपवली. त्यांच्या अंत्यसमयी वा यात्रेला मी काही कारणाने उपस्थित राहू शकलो नाही. या गोष्टीचे शल्य मला मधून मधून बोचत राहते.

आता पुण्यात व्यवसायात व जमेल तशा साहित्यकलासाधनेत व्यस्त असताना गावाकडील माणसे कधी कधी भेटतात. नेत्रतपासणीसाठी येतात. बाबूकाकांचा नातू म्हणून बोलकी होतात. आठवणींचे पाणी ढवळून निघते. आजोबा नव्याने आठवतात. त्यांचे थोरपण मनाला प्रभावित करते. अचानक कविवर्य बोरकरांच्या त्या ओळी आठवतात आणि मन म्हणते -


www.mehtapublishinghouse.com

**प्रत्येक पुस्तकाची सविस्तर माहिती असलेली संपूर्णपणे मराठी असलेली वैशिष्ट्यपूर्ण वेबसाईट.**

**आमच्या वेबसाईटची ठळक वैशिष्टये**

- **संपूर्णपणे मराठी असलेली वेबसाईट**
- **लेखकांच्या नावांनुसार, वाङ्मयप्रकारानुसार,पुस्तकाच्या नावानुसार पुस्तके 'सर्च' करण्याची सुलभ सुविधा**
- **पुस्तकांची संपूर्ण यादी अकारविल्हे पाहण्याची सोय**
- **प्रत्येक पुस्तकाचे संपूर्ण स्वरूप स्पष्ट करणारी, पुस्तकाचा सारांश तसेच पुस्तकातील निवडक भाग व वृत्तपत्रीय परिक्षणे या स्वरूपातील सविस्तर माहिती**
- **आपल्या आवडीनुसार नवीन पुस्तकांची माहिती इमेलद्वारा त्वरित पाठवण्याची तत्पर सेवा**
- **आमच्या सवलत योजनांची सविस्तर माहिती**
- **क्रेडिट कार्डद्वारा ऑनलाइन शॉपिंगची सुविधा**

**आजच भेट द्या. व आपली मागणी नोंदवा.**

अनोखे ऋणानुबंध

# सहप्रवासी

सुनीता लोहोकरे

डिसेंबरचा सुखद गारवा. मुंबईतसुद्धा थंडी वाजू शकते, हे पहिल्यांदाच कळत होतं. एरवी घाम पुसत धावतपळत लोकल गाठणारे मुंबईकर हे मुंबईचं रूप काही मनातून हलत नाही. आजची हवा अगदी हवीहवीशी वाटते आहे! नवीन वर्षाचा सूर्योदय व्हायला जेमतेम दोन दिवस तर उरलेत. नवीन वर्षाला सामोरं जायला ही थंडीची साथ कशी उबदार आहे. फ्लाइट तशी लेटच आली. खरं तर दीड तासांपूर्वी पोहोचलो असतो आपण. पण नेहमीप्रमाणेच सिंगापूर हॉल्ट दीड तासानं लांबला. अर्थात एका दृष्टीनं बरंच झालं ते! नाहीतरी तो दीड तास इथं असं विमानतळावर वाट बघतच काढावा लागला असता.

मुंबईवरून पुण्याला येणं आता किती सोपं वाटतं. फक्त तीन-साडेतीन तासांचा रस्ता. म्हणजे पहाटे तीनच्या सुमारास पोहोचू आपण. पण इतर प्रवासी वेळेवर आले तर. मघाशी ड्रायव्हरनं गाडीत सामान चढवताना म्हटलं, 'मॅडम, तुम्हीच पहिल्या. बाकीचे पॅसेंजर अजून यायचेत,' तेव्हा कपाळावरची आठी काही लपवू शकले नाही.

'किती जण आहेत?'

'तिघे आहेत. तुम्ही धरून चौघं.'

'तिघांच्या फ्लाइटस वेगळ्या आहेत की, एकाच फ्लाइटनं येताहेत? 'मनातला वैताग बाहेर पडू नये, असा कितीही प्रयत्न केला तरी तो बाहेर पडलाच.

'नाही मॅडम, वेगवेगळे आहेत. तुम्ही तोपर्यंत फोनबिन करून घ्या. मॅडम, दोन तास तरी थांबावं लागेल. त्यातून एखादा डोमेस्टिकचा पॅसेंजर आला, तर त्याला आपल्यात ॲडजस्ट करू. आणि आपल्यातल्या शेवटच्या पॅसेंजरला शेवटच्या गाडीनं पाठवू. तुमची फ्लाइटही लेट झाली ना मॅडम?''

'हो ना! दीड तास.'

'ही फ्लाईट कायम लेट होतेच मॅडम, तसं काही काळजी करू नका. तीन तासात पोहोचू पुण्याला.''

ड्रायव्हरनं माझा वैताग कमी करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. बहुतेक हा प्रामाणिकपणाही त्याच्या व्यवसायातल्या सवयीचा भाग असावा.

खरं तर जाम भूक लागलीय. विमानातलं ते रटाळ खाणं पोटाच्या कोपऱ्यात बसलंय. पण इथं विमानतळावर काही खाण्याची इच्छाही होत नाहीय. आता थेट घरीच. गाडीपाशी जाऊन बघून येऊ या का? कोण सहप्रवासी आलाय का तो? तास होत आला आता आपण येऊन. कोणीतरी नक्की आलं असेल.

आपला अंदाज बरोबर ठरला तर! कुणीतरी गाडीपाशी दिसतं आहे.

'मॅडम, हे एक पॅसेंजर आले आत्ता. तुम्ही इकडंच जवळपास थांबा. लांब जाऊ नका. बाकीचे, दोघेही येतील लवकर.' त्या नव्या प्रवाशाचं सामान गाडीत टाकत ड्रायव्हर म्हणाला आणि 'पुढच्यांना बघून येतोच, सांगत सटकला.'

'तुम्ही याच गाडीतून येणार आहात का?' त्या सहप्रवाशानं माझ्याकडे पाहात विचारलं, 'हो, याच गाडीतून'

'कुठून आलात तुम्ही?' त्यानं विचारलं.

'ऑस्ट्रेलिया. सिडनीहून.' मी सांगितलं.

'मी डल्लासहून. अमेरिका,' तो म्हणाला. 'फ्लाइट अगदी वेळेत पोहोचली. प्रवास लांबचा होता. पण मस्त झाला. डल्लासला फारच चेकिंग करतात बुवा. अर्थात आपल्याकडेही काही कमी नाही.'

'हो ना, फार वेळ जातो या चेकिंगमध्ये', मी म्हटलं.

खरं तर त्याला माझ्याकडून काही प्रतिसादाची अपेक्षा आहे असं वाटत नव्हतं. विमानतळावर उतरल्यावर त्याचा पहिला श्रोता मीच होते, हे दिसत होतं. परदेश-प्रवासाची नव्याची नव्हाळी त्याच्या चेहऱ्या-वरून जणू ओसंडत होती.

'दोन महिने कसे गेले ते कळलंच नाही. कंपनीनं अचानक सांगितलं, असा असा प्रोजक्ट आहे. दोन महिने जावं लागेल. मी वाटत बघत होतो, संधीची! अशी अचानक मिळेल असं वाटत नव्हतं. पण मिळाली,' तो बोलतच होता.

'सिडनी कसं वाटलं?'

'सुंदर, तिथून बाहेर पडले आहे असं वाटतच नाही.' मीही सुखावून म्हटलं.

'असंच असतं हो या देशांचं. आपली माणसं काही उगीच राहात नाहीत तिथं. मराठी माणसं, अगदी आपल्या पुण्यातलीही कितीतरी जणं आहेत तिकडं. मी राहात होतो, तिथं तर शेजारच्या बिल्डिंगमध्ये गोळे, त्यांच्यावर लेले, पलीकडच्या बिल्डिंगमध्ये गुमास्ते. मागची दोन घरं टाकून सहस्त्रबुद्धे. त्यांच्या शेजारी रेगे. सगळी सदाशिव-नारायण भरली आहे असे वाटत होतं, त्याच्या आवाजातला तिशीतला उत्साह लपत नव्हता.

'हो, अगदी खरंच, सिडनीतही आपली भरपूर माणसं आहेत.' मी उगीचच माहिती पुरवली. पण त्याचं त्याकडे लक्षच नव्हतं.

नवीन वर्षाची सुरवात तिकडेच करावी, असं मनात होतं. पण प्रोजेक्टवरचं काम संपलं. खरं तर घरचीही आठवण यायला लागली होती. तिकडे कितीही सुखं असली, तरी आपला देश तो आपलाच. आपण तिकडे परकेच, तो आणखीही बरंच काही बोलला असता. पण ड्रायव्हरबरोबर आणखी एक आकृती येताना दिसली.

'साहेब कंटाळला नाहीत ना?' अजून एक पॅसेंजर यायचाय.' ड्रायव्हरनं हसत विचारलं.

'नाही रे, माझाच मित्र आहे तो. आम्ही एकत्र याच गाडीतून यायचा ठरवलं होतं. त्याची फ्लाईट लेट आहे. मी एअरपोर्टवर उतरल्या उतरल्या त्याच्या फ्लाइटची चौकशी केली आधी.' माझा सहप्रवासी उद्गारला.

तोपर्यंत ड्रायव्हरनं त्या नव्या प्रवाशाचं सामान गाडीत चढवलं. आणि तो पुढच्याच्या शोधात निघाला.

'हॅलो, कसा झाला प्रवास?' माझ्या त्या पहिल्या सहप्रवाशानं दुसऱ्या सहप्रवाशाला विचारलं.

'ठीक, खरं म्हणजे बराचसा प्रवास झोपेतच झाला. अमेरिकेतून यायचं म्हणजे डोळे चोळतच.' दुसरा स्मित करत म्हणाला.

'अरे वा! तुम्हीही तिकडूनच आलात का? मीही तिकडूनच येतोय. माझा मित्र यायचाय तोही सॅनफ्रान्सिस्कोवरून. त्याची फ्लाइट लेट झाली आहे.' पहिला सहप्रवासी म्हणाला.

मग काही काळ शांततेतच गेला.

'मी जाऊन बघतो, मित्र आलाय का

ते. सहा वर्षांनी भारतात येतोय तो.' घड्याळ्याकडे पहात पहिला सहप्रवासी म्हणाला. मग खांद्यावरची हँडबॅग सारखी करत झपझप पावलं टाकत तो डिपार्चरच्या दिशेनं जाऊ लागला.

तो दिसेनासा झाल्यावर दुसऱ्या सहप्रवाशानं आजूबाजूला नजर टाकली.

'फारसं काही बदललेलं दिसत नाही, दोन वर्षात.' तो म्हणाला.

'तुम्ही दोन वर्षांनी येताय?' मी विचारलं.

'हो, दोन वर्षांनी येतोय. दोन वर्षांपूर्वी गेलो होतो, तेव्हा हे सगळं असंच दिसत होतं. विमान आकाशात झेपावताना येणारा वास असाच जाणवत होता. इकडे येताना खूप काही बदललेलं असेल असं वाटत होतं.' तो आपल्याच नादात असल्यासारखा बोलत होता.

'नवीन वर्ष दोन दिवसात सुरू होईल. शतक संपणार.'

'हं. एकविसावं शतक सुरू होणार.' मी म्हटलं. पण कदाचित त्यानं ते ऐकलेलं नसावं. कारण त्याची नजर वेगळ्याच विश्वात होती.

तेवढ्यात भल्या मोठ्या बॅगा असलेली ट्रॉली ढकलत ढकलत येणाऱ्या ड्रायव्हरची आकृती दिसू लागली. त्याच्या पाठोपाठ पहिला सहप्रवासी आणि त्याच्याबरोबर आणखी कोणीतरी तरुण... बहुतेक हा आपला तिसरा सहप्रवासी दिसतो आहे. ट्रॉली घेऊन ड्रायव्हर हळूहळू जवळ आला. मागोमाग ते दोघेही आमच्यापाशी येऊन उभे राहिले.

'हे अमेरिकेतूनच आलेत.' पहिल्या सहप्रवाशानं दुसऱ्याकडे निर्देश करत तिसऱ्या सहप्रवाशाला सांगितलं,'याही आपल्या गाडीतून येणार आहेत. या ऑस्ट्रेलियातून आल्या आहेत,' तो पुढं म्हणाला.

'हाय,' आमच्याकडे कटाक्ष टाकत तिसऱ्यानं अस्पष्टसं स्मित केलं. पण त्याची नजर ड्रायव्हरच्या हालचालीचा वेध घेत होती. गाडीच्या सामान ठेवण्याच्या भागात थोडीफार जागा शिल्लक होती. ड्रायव्हर तिसऱ्याचं सामान त्यात रचत होता. सामान नीट लावण्याचं त्याचं कौशल्य खरंचच वाखाणण्याजोगं होतं. पण तिसरा अस्वस्थ दिसत होता. ड्रायव्हरनं शेवटची बॅग उचलल्यावर तिसरा त्याच्याजवळ जाऊन पाहू लागला. आपलं सर्व सामान व्यवस्थित आहे, याची खात्री करून खांद्यावरच्या हँडबॅगेशी चाळा करत तो पुन्हा आमच्यापाशी आला.

'चला निघायचं?' तिसऱ्याच्या पाठोपाठ येत असलेल्या ड्रायव्हरनं आमच्याकडे पहात विचारलं.

'हो, चला.' पहिला उत्तर देत उत्साहानं गाडीकडे निघाला. आम्हीही त्याच्यापाठोपाठ गाडीत शिरलो.

गाडी सुरू झाली. 'थोडावेळ खिडकी उघडी ठेवली तर चालेल ना?' मी त्या तिघांकडे पहात प्रश्न केला.

'हो, हो ठेवा ना. तसं वारं काही बोचरं नाहीय.' पहिला तत्परतेनं उत्तरला.

गाडी विमानतळामधून बाहेर पडली. गार वारं खिडकीतून आत शिरलं होतं. हँडबॅगमधून शाल काढून मी ती अंगावर लपेटून घेतली. चला आता तीन तासात पुणं. घरी पोहोचणार या विचारानं सुखावून डोळे मिटून घेत मी मागे रेलले.

पहिल्याचा उत्साह काही अजून मावळलेला दिसत नव्हता. तो आता अधिरतेनं तिसऱ्यावर प्रश्नांची सरबत्ती करू लागला.

'कसा आहेस? किती वर्षांनी भेटतोय आपण. तू ही इंडियात येतो आहेस असं जितूनं सांगितलं. म्हणून तुला मेल केली. बरं झालं. सहा वर्षांनी येतो आहेस ना?'

'हं.' तिसऱ्यानं होकार भरला.

'कंटाळलास का? फ्लाइट लेट झाली म्हणून?'

'हो ना.' तिसऱ्यानं मान हलवली.

पहिल्यानं आणखी काहीबाही बोलण्याचा प्रयत्न केला. पण तिसरा 'हो, नाही'च्या पुढे सरकेना. शेवटी कंटाळून पहिला दुसऱ्याकडे वळला.

'तुम्ही सॉफ्टवेअरमध्ये का?' पहिल्यानं विचारलं.

'हो. सॉफ्टवेअर. कॉन्ट्रॅक्टिंग करतो.' दुसऱ्यानं माहिती पुरवली.

'मीही सॉफ्टवेअरमधलाच' असं सांगत पहिल्यानं सॉफ्टवेअर कंपन्यांबद्दल बोलायला सुरुवात केली. दुसरा त्याला अधूनमधून प्रतिसाद देऊ लागला.

मुंबई ओलांडून गाडी बाहेर पडली तशी थंडी चांगलीच जाणवायला लागली. खिडकी लावून घ्यावी आता. गाडीतही आता शांतता पसरली होती. बंद पडलेले सिग्नल्स, अधूनमधून दिसणारी झाडं, शेजारून सुळकन पुढं जाणारी एखादी मोटार किंवा पलिकडून वर्दळ नसतानाही कर्कश्श हॉर्न वाजवत जाणार ट्रक आणि मधेच दिसणारा एखादा चुकार वाटसरू, एवढीच काय ती सोबत. नाही म्हणायला थोड्या थोड्या अंतरानं असणाऱ्या ढाब्यांवर मध्यरात्रीही गर्दी उसळलेली दिसत होती.

गाडीत वरच्या त्या एकाच दिव्याचा अंधुक प्रकाश पसरला होता. तिसरा मागे डोकं टेकवून शांतपणे झोपलेला दिसत होता. पहिला खिडकीतून बाहेर पहात होता तर दुसरा आपल्याच विचारात गर्क

एक्स्प्रेस हायवे आला. तसा ड्रायव्हर एकदम खुलला.

''मस्त काम झालंय ना साहेब. एकदम फॉरेन्' तो म्हणाला. तसं पहिल्यानं म्हटलं, 'चांगलंच झालंय हे. पुणं कधी आलं ते कळतही नाही.'

'अरे, हा एक्सप्रेस हायवे ना? मी वाचलं होतं इंटरनेटवर याच्याविषयी. चांगलाच केलाय. भारतात आहोत असं वाटतच नाही,' दुसराही खूष होऊन म्हणाला.

त्या तिघांच्या आवाजानं तिसऱ्याची झोप चाळवली.

'अरे, बघ बघ. कसा झालाय रस्ता ते,' पहिला उत्साहानं त्याला सांगू लागला.

'ओह, मुंबई-पुणे नवीन हायवे केलाय का?' मला माहीत नव्हतं,' तिसरा पहिल्यांदाच दोन संपूर्ण वाक्य म्हणत होता. त्याच्या आवाजात आणि नजरेत कौतुक नव्हतं. पण त्यातलं आश्चर्य मात्र लपत नव्हतं. त्यानं मान उंचावून रस्ता एकदा निरखून घेतला. आणि पुन्हा खुर्चीत मागे रेलला.

'हे नितीन गडकऱ्यांचं काम बरं का, आपले राजकारणी जर सुधारले ना, तर आपला देश कुठच्या कुठे जाईल.' पहिल्याची नजर अजून बाहेरच गुंतलेली होती.

एक्सप्रेस हायवेनं दुसराही सुखावलेला दिसत होता. 'हो, मी इंटरनेटवर वाचतो, इकडच्या बातम्या. अगदी नियमित नाही, पर आठवड्यातून एक-दोनदा पेपरच्या साईट्स सर्फ करतो. काही काही चांगल्या गोष्टी घडताहेत हे मान्य करायला हवं. तोही आता उत्साहानं बोलू लागला होता.

'लोकसंख्या आणि भ्रष्टाचार या दोन गोष्टींना आळा घालायला हवा, तरच देशाची भरभराट होईल.' पहिला म्हणाला.

'काल लाल किल्ल्यावर स्फोट झाला

का? मी इकडे निघताना टाइम्सच्या साइटवर वाचलं,' दुसऱ्यानं पहिल्याला विचारलं.

'हो, मीही वाचलं. फारच भयंकर. कधीतरी युद्ध होणार असं दिसतंय.' पहिला उत्तरला.

दोघे बराच वेळ बोलत राहिले. लोणावळा आलं तशी ड्रायव्हरनं गाडी एका ढाब्यापाशी थांबवली.

'चहा घेणार ना साहेब?' ड्रायव्हरनं पहिल्याला विचारलं.

'हो तर! चहा हवाच!'

आम्ही एक एक करून खाली उतरलो. पहिल्यानं चहाचा ग्लास थोड्या जबरदस्तीनंच तिसऱ्याच्या हातात दिला. अनिच्छेनंच त्यानं तो ओठाला लावला. चहा घेऊन झाल्यावर पहिल्यानं पैसे काढायला पाकीट उघडलं. तसा दुसरा म्हणू लागला, 'नाही, नाही मी देतो.'

पण पहिल्यानं तोपर्यंत गल्ल्यावर जांभया देत बसलेल्या मालकापुढे पैसे ठेवलेही.

'आता पुणं आलंच,' ड्रायव्हरनं गाडीत बसता बसता म्हटलं. गरम चहाची तरतरी त्याच्या चेहऱ्यावर दिसत होती. गप्पा पुन्हा सुरू झाल्या. तिसरा पहिला-दुसऱ्याचं बोलणं ऐकत खिडकीतून बाहेर बघू लागला.

पुण्याचे दिवे दिसायला लागले तसा ड्रायव्हर म्हणाला, 'मॅडम, आधी तुम्हाला घरी सोडतो.'

'हो हो! या आपल्या सगळ्यांच्या आधी एअरपोर्टवर आल्या होत्या. त्यांनाच आधी सोडू या.' पहिला म्हणाला.

घर जवळ आलं तशी मीही अधीर झाले. चला, घरी गेलं की आधी कडकडीत पाण्यानं आंघोळ करायची. आणि मग घरात जे काही असेल त्यावर तुटून पडायचं.

गाडीतून सामान उतरवायचं म्हणजे मोठी कठीण गोष्ट होती. कारण माझं सामान सगळ्यांच्या सामानाच्या खाली होतं. मात्र माझा ड्रायव्हरच्या कौशल्यावर विश्वास होता. त्यामुळे खाली उतरून मी आरामात उभी राहिले. पण पहिला मात्र गाडीतून उतरला. आपल्या सामानाला धक्का बसणार नाही ना या भीतीनं तो ड्रायव्हरला सूचना करू लागला. तसे गाडीतून दुसरा आणि तिसराही खाली उतरून आपापल्या सामानाकडे पाहू लागले. इतका वेळ कशाकडेही फारसं लक्ष न देणारा तिसराही ड्रायव्हरला उगीचच सूचना करू लागला.

ड्रायव्हरनं खाली ठेवलेली ती जड बॅग कशीबशी उचलून मी त्या सगळ्यांकडे पहात 'बाय' म्हणत त्या सगळ्यांचा निरोप घेतला. पहिल्या आणि दुसऱ्यांनाही हात उंचावला. तिसरा गाडीत बसत पुढच्या रस्त्याकडे पाहू लागला. गाडी दिसेनाशी झाली. थंडीचा कडाका चांगलाच जाणवत होता. एका हातानं अंगावरची शाल सावरत मी घराकडे वळले.

दोन दिवसांत नवं वर्ष उजाडेल. विसावं शतक संपेल. नव्या शतकाला सामोरं जाण्याचा दुर्मिळ क्षण अनुभवायला मिळणारे आम्ही सारेच सहप्रवासी. साऱ्यांच्याच नजरा सुखाकडे, अधिकाधिक सुखाकडे लागलेल्या. दोन महिन्यांसाठी अमेरिकेत गेलेला पहिला एक वेगळंच जग पाहून आलाय. समृद्धी आणि भरभराटीचं. देशात राहून परदेशाची स्वप्न बघत असला तरी त्याला आपला देश श्रीमंत बनलेला, विकसित झालेला पाहायचाय. पण पुढची संधी आली तर तो मागे वळून पाहणार नाही. दुसरा दोन वर्षांनी येतोय. देशाची ओढ त्याच्या मनात अजूनही कायम आहे. बदलाचा, घडामोडींचा कानोसा घेत आठवणी आणि भविष्याची तो सांगड घालतोय. पण हे केवळ महिनाभरासाठीच. त्याला परतायचंय. आणि तिसरा... तो या साऱ्यातून केव्हाच पार झालाय. सहा वर्षात त्याच्या मनात केवळ कुतूहल उरलंय. आणखी काही असेलच तर तो परकेपणाचं!


काही वर्षांनी कदाचित पहिला दुसऱ्याची जागा घेईल. आणि दुसरा तिसऱ्याची.

पहिल्याची जागा आणखी कोणी घेईल. खरंच असं होईल? की तिसरा कधी पहिला नव्हताच? तो कायम तिसराच होता? तुटत जाण्याच्या या तीन स्थिती नव्हत्याच? या होत्या भिन्न अविचल प्रवृत्ती?

चार तासांच्या सहवासात माझ्या सहप्रवाशांनी माझ्याशी एक नातं जोडलं होतं. एकविसाव्या शतकात प्रवेश करताना या नात्यानं मला एका वेगळ्याच कोड्याचं उत्तर शोधायला भाग पाडलं.


## प्रेरणा देणारी, मनाला चटका लावणारी जीवनचरित्रे


आधुनिक भारताचे प्रेषित
**स्वामी विवेकानंद**



**'स्वामी विवेकानंद म्हणजे विश्वात्म्याच्या वाद्यवृंदाने सादर केलेले उत्कृष्ट संगीत'**

**गौतम घोष**
**अनु. माधव मोर्डेकर**
किंमत : १८० रु.
सभासदांना : १२६ रु.
पोस्टेज : २० रु.

**इंदिरा**
इंदिरा नेहरू गांधी यांचे जीवनचरित्र



**'माझ्यावर कोणीही दडपण आणू शकत नाही. कोणतीही व्यक्ती नाही किंवा कोणतेही राष्ट्र नाही!'**

**कॅथरीन फ्रँक**
**अनु. लीना सोहोनी**
किंमत : ४०० रु.
सभासदांना : २८० रु.
पोस्टेज : ३० रु.

**जीवनयात्रा**
अभिनेता, दिग्दर्शक मा. विनायक



**'चित्रपट तयार करणं ही फार मोठी तपस्या आहे. त्यात मानवी स्वभावाचे सर्व पैलू दाखवायचे असतात.'**

**भाई भगत**
किंमत : १५० रु.
सभासदांना : १०५ रु.
पोस्टेज : २० रु.

अनोखे **नातीगोती** ऋणानुबंध

# नातीगोती

**संजीव परळीकर**

ज्या माणसाला नातीगोती सांभाळता येत नाहीत त्याला दीर्घकालीन यश कधीच मिळू शकत नाही. शेवटी नात्यागोत्यातूनंच आपलं यश, निर्माण होत असतं. मग ती नाती व्यावसायिक असोत, कौटुंबिक असोत किंवा वैयक्तिक असोत. माझ्या पहाण्यात असा कोणीही माणूस नाही की ज्यानं नातेसंबंध पायदळी तुडवून, फक्त स्वत:च्या कर्तृत्वावर किंवा कौशल्यावर यश मिळवलं. कर्तृत्व आणि कौशल्यं तर लागतातच, त्याशिवाय यश मिळूच शकत नाही. पण दीर्घकालीन यश मिळविण्याकरता नुसतीच कर्तृत्व आणि कौशल्य पुरेसे नसते. तेथे नातेसंबंधाचीसुद्धा जोड लागते.

जेथे नात्यागोत्यांच्या वाटेवरून चालण्याचा प्रश्न येतो तेव्हा ती वाट बऱ्याचवेळा अतिशय काट्याकुट्यांनी भरलेली असते हे लक्षात येते. हे काटे भूतकाळातले असतात. कित्येक वेळा हे काटे नकळत आणि अज्ञानात पेरलेले असतात. अनेक मानापमानाचे प्रसंग, रागलोभाचे प्रसंग, मत्सर आणि द्वेषाचे प्रसंग, अनेक हेवेदावे आणि भांडणतंटेयांनी भरलेली ही नात्यागोत्यांची वाट आहे. आता परत त्याच वाटेवरून चालण्याचा निर्णय घेणे हे काही सोप काम नाही. नातेसंबंध दृढ करायचे म्हणजे भूतकाळातील हे काटे उकरून काढायचे आणि त्या काट्यांना मुळासकट उपटून फेकून द्यायचे. बरं, हे काम एका रात्रीत संपण्यासारखंसुद्धा नसतं. ह्याला बराच काळ लागणार असतो. पण ह्या वाटेला टाळूनही जाता येत नाही. आपल्याकडे दुसरा पर्यायच नाही.

एकदा एक माणूस एका स्वामीजींकडे सल्ला मागण्यासाठी आला. स्वामीजींनी त्याला विचारले, 'मुला' तू कशासाठी आला आहेस?'

तो म्हणाला 'स्वामीजी' मी अतिशय फटकळ माणूस आहे. मला हा माझा दोष माहीत आहे. पण फटकळपणा हा माझ्या स्वभावाचा भाग आहे. मला कुणाला हेतुपूर्वक दुखवायचं नसतं. पण मला नंतर कळतं की माझ्या बोलण्यामुळे काहीजण दुखावतात. पण माझ्या हे जेव्हा निदर्शनास येतं तेव्हा लगेच मी त्यांची माफीसुद्धा मागतो. तरीसुद्धा संबंध पूर्ववत व्हायला बराच काळ लागतो, विशेषत: माझ्या बायकोशी जेव्हा माझे खटके उडतात तेव्हा माफी मागूनसुद्धा ती माझ्याशी नीट वागत नाही. 'तुम्ही माझ्या बायकोला थोडं समजवाल काय?'

स्वामीजींनी म्हटले, 'होय निश्चितपणे समजावीन. पण मला आधी सांग, मुला, तुझा उदरनिर्वाह कसा होतो?'

'मी सुतारकाम करतो.'

स्वामी म्हणाले, 'ठीक आहे. म्हणजे तू खिळे वगैरे ठोकण्यात तरबेज असशील.'

'होय स्वामीजी.'

'ठीक आहे.' स्वामी म्हणाले, 'मी तुझ्या बायकोला समज देईन पण त्याआधी तुला माझं एक काम करावं लागेल. करशील काय?'

'स्वामीजी, तुम्ही हुकूम सोडायचा. पण मी साधा सुतार आहे. मला तुमचं काम करता येईल काय?'

'होय तर, निश्चित येईल.' स्वामीजी म्हणाले 'फक्त थोडे खिळे ठोकायचे आहेत.'

'अरे वा! हे तर माझ्या आवडीचे काम आहे. आत्ता करतो. सांगा कुठे ठोकायचे आहेत? माझ्यांकडे हातोडीसुद्धा आहे.'

स्वामीजींनी त्याला समोरच्या भिंतीवर दहा खिळे एका सरळ रेषेत ठोकायला सांगितले त्याने ते काम पाच मिनिटात केले. तो स्वामीजींकडे हात झटकत आला व म्हणाला, 'घ्या, तुमचं काम झटक्यासरशी केलं. आता माझं काम करायचं.'

स्वामीजी म्हणाले 'माझं काम पूर्ण झालेलं नाही.'

'आणखीन खिळे मारायचे आहेत काय? सांगा आत्ता ठोकतो.'

'नाही रे. आता खिळे काढायचे आहेत.'

'काय? हे जरा कंटाळवाणं काम आहे. पण तरीसुद्धा तुमचं आहे म्हणून करतो. कोणते खिळे काढायचे आहेत?'

स्वामी म्हणाले, 'जे खिळे तू आत्ता ठोकलेस ते सगळे काढ.'

त्याने ते सगळे खिळे काढून टाकले वं हात झटकले. स्वामीजींनी आता त्याला त्या भिंतीकडे पहायला सांगितले व विचारले, 'कशी दिसते आहे भिंत?'

'भिंतीचा सगळा शो गेला.'

'आता आणखी एक छोटंसं काम करायचं, 'स्वामीजी म्हणाले 'या भिंतीची डागडुजी करून ती भिंत पूर्ववत करायची. पटकन.'

'हे काम पटकन होण्यासारखं नाही स्वामीजी.'

स्वामीजी म्हणाले 'अगदी बरोबर. हे काम पटकन होणार नाही आणि कितीही डागडुजी केली तरी ती भिंत आता पूर्ववत होणार नाही. त्या जागेवर डागडुजी केल्याच्या खुणा आता कायमच्या रहाणार. बरोबर?'

'बरोबर.'

'मग आता मला सांग ती भिंत पूर्ववत होत नाही ह्याच्यात खिळ्यांचा दोष आहे की भिंतीचा? भिंतीला समज द्यायला पाहिजे की खिळ्यांना? आपले नातेसंबंध ह्या भिंतीसारखे असतात. फटकळपणा म्हणजे त्या भिंतीवर खिळे ठोकण्यासारखे आहे. आपला प्रत्येक शब्द हा खिळ्यासारखा त्या भिंतीमधे जातो व ती भिंत खराब करतो. त्यानंतर कितीही डागडुजी केली तरी ती भिंत पूर्ववत होऊ शकत नाही. विशेष म्हणजे त्या डागडुजीला खूप वेळही लागू शकतो. म्हणजेच तुमच्या फटकळपणाची भरपाई तुम्हाला दामदुपटीने करावी लागेल. एवढं करूनही तुमचे संबंध पूर्ववत होणार नाहीत. कुठेतरी त्या जखमा टोचत रहातील व त्या कधी ना कधीतरी डोकं वर काढतील. समजा, त्यांनी डोकं वर काढलं नाही तर त्यात तुझी मर्दुमकी अजिबात नाही. उलट तुझ्या बायकोचाच मोठेपणा जास्त आहे हे समज. म्हणजे तुझ्या बायकोने तुझ्या फटकळपणाकडे दुर्लक्ष केलं आणि तुझ्याशी ती पूर्ववत वागली तर त्यात तिचा मोठेपणा जास्त आहे. तिला तुझा फटकळपणा पोटात घालता आला नाही तर त्यात काहीही वावगं नाही. कारण भिंत खराब झाली ह्यात तिचा दोष नाही तर खिळ्यांचाच दोष जास्त आहे. म्हणून तुझे खिळे तू वापरू नकोस. तुझा फटकळपणा पहिल्याप्रथम बंद व्हायला हवा.'

पाहिलंत! नात्यागोत्याच्या वाटेवरून चालणं किती कठीण असतं? फटकळ लोकांना तर त्यांच्या स्वभावामुळे आणखीनच कठिण

जातं. त्यांना वाटतं की भावनेच्या भरात आपण जे काही बोलतो ते इतरांनी समजून घेतले पाहिजे. अशा वेळी जर काही बोचणारे शब्द वापरले गेले तर ते हेतुपुरस्सर वापरले गेले नसल्यामुळे त्याकडे कानाडोळा करायला काही हरकत नाही. शेवटी जे काही शब्द वापरले ते प्रेमापोटीच असतात. ते शब्द बोचतात पण त्यामागचं प्रेम दिसत नाही. एवढेच नाही तर त्यांना असंही वाटतं की त्यांच्याशी निगडीत इतरांनी पाळायची जी काही कर्तव्ये आहेत त्यांमधे, त्यांच्या फटकळ स्वभावामुळे अजिबात कसूर होता कामा नये. उदाहरणार्थ, नवरा जर फटकळ असेल आणि तो बायकोला कितीही फाडफाड बोलला तरी बायकोने त्याच्या फटकळ-पणाकडे दुर्लक्ष करून त्याच्याशी निगडीत असलेली सगळी कर्तव्य बिनबोभाट पार पाडली पाहिजेत. जर बायको फटकळ असेल तर ती नवऱ्याकडून अशाच प्रकारची अपेक्षा करते. जर वडील फटकळ असतील तर मुलांना वाटेल ते बोलून झाल्यावर मुलांनी वडिलांच्या बाबतीतील सगळी कर्तव्ये पार पाडायची. जर आई फटकळ असेल तर तीसुद्धा मुलांकडून तशाच प्रकारची अपेक्षा करते. समजा, दोघंही फटकळ असतील तर युद्धजन्य परिस्थिती केव्हा निर्माण होईल ह्याचा नेम नाही. पण ह्या मंडळींना हे समजत नाही की खिळा नकळत ठोकलेला असो वा हेतुपुरस्सर, भिंत व्हायची तेवढी खराब होणार. ती पूर्ववत कधीच होणार नाही. मग ह्याचा परिणाम काय होतो हे समाजात अनेक ठिकाणी पहायला मिळतं. नवरा बायकोची भांडणं. आईवडिलांची भांडणं, मुलं पालकांना वाऱ्यावर सोडतात किंवा वृद्धाश्रमात पाठवून देतात.

आपली नातेसंबंधाची भिंत सुंदर ठेवायला पाहिजे ह्याबद्दल कोणाचेही दुमत नसते. पण ते साध्य करायचं कसं हेच माहीत नसतं. आता आपण एक वेगळ्या पद्धतीचा पुढाकार घ्यायला शिकू या. नातेसंबंधाच्या भिंतीवर वेगवेगळ्या प्रकारचे खिळे ठोकले जातात. नेमक्या त्याच जागी पुढाकार घेऊन खिळा फेकून द्यायचा आहे. समजा, चुकून ठोकला गेलाच तर लवकरात लवकर ती भिंत पूर्ववत करण्यांसाठीसुद्धा पुढाकार घ्यायचा. हे खिळे आपण कसे ठोकत असतो आणि आपल्याला त्याविषयी काय करता येईल ते पाहू या.

**असमंजसपणा**

आम्ही एके ठिकाणी लग्नघरात होतो. लग्नानंतरचा दुसरा दिवस होता. घरात संध्याकाळच्या वेळी घराच्या गच्चीवर पार्टी होती. लहान मुलं, मोठी माणसं, बायका मंडळी मिळून साठसत्तर माणसं जमलेली होती. आम्ही सगळे गच्चीवर जमलो. तेथे मुलांनी संगीतखुर्चीचं आयोजन केलं होतं. हा खेळ थोड्या वेगळ्या पद्धतीने खेळला जाणार होता. मुलांनी प्रत्येक खुर्चीला प्राण्यांची नावं वगैरे दिलेली होती. खुर्च्या विशिष्ट पद्धतीने मांडलेल्या होत्या. मुलांनी बरीच मेहनत केलेली दिसत होती. मुलांना त्यात सर्व मंडळींचा सहभाग हवा होता. तेवढ्यात त्या मुलांचे आजोबा बोलले, 'हे पहा, आता येथे मोठ्या मंडळींची पार्टी आहे. त्यामुळे लहानांचा खेळ वगैरे उद्या करा. लहान मुलांनो खाली जा बरं.'

पालक मंडळींना पाहुण्यांच्या समोर आपल्या घरातील लहान मुलांच्या चांगल्या गोष्टी का दिसत नाहीत हे मला कळत नाही. घरातील त्या दोनतीन चिल्ल्यापिल्ल्यांनी एवढी मेहनत केलेली आजोबांना दिसलीच नाही. त्यांनी येऊन फक्त 'लहानांनी खाली जा.'



'असं एक फर्मान सोडलं. ती मुलं बिचारी हिरमुसली झाली. सगळ्यांनी संगीतखुर्चीत सहभागी होणं हे लहान मुलांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचं होतं. पण आजोबांना ते काही पसंत नव्हतं. आजोबांना नातवंड आवडायची, परंतु त्या नातवंडांना खेळ हवा होता. जी गोष्ट आपल्याला आवडत नाही पण आपल्या आवडत्या व्यक्तीला आवडते म्हणून त्या नावडत्या गोष्टीचंसुद्धा स्वागत करणं, ह्यालाच तर समजून घेणं म्हणतात. मग आम्हीच म्हटलं की चला आपण खेळू या. आम्ही सगळी मंडळी मग त्या खेळात सहभागी झालो, अगदी म्हातारे-कोतारेसुद्धा संगीतखुर्ची खेळले. मुलांनी त्यात खरोखरीच कल्पकता दाखवली होती. खेळ कंडक्ट करताना मुलांच्या नेतृत्वगुणांना तर वाव मिळालाच पण त्यांचा आत्मविश्वासही वाढलेला मला दिसला. आणि सगळ्यांत महत्त्वाचं म्हणजे तेथे हजर असलेल्या सगळ्यांना इतकी मजा आली की एक तास कसा गोला हे कळलंच नाही. समजून घेण्यासाठी प्रयत्न करायचे ते असे.

**महत्त्वाच्या गोष्टींना क्षुल्लक समजणे**

नातेसंबंधाच्या भिंतीमधे एखादा खिळासुद्धा जोरदार बसतो आणि भिंत खराब करून टाकतो. आपण कित्येक वेळा काही महत्त्वाच्या गोष्टी अगदी क्षुल्लक समजतो. हा देखील एक प्रकारचा असमंजसपणाचा असतो. गंमत म्हणजे बहुतेक वेळा हा खिळासुद्धा नकळत ठोकला जातो. कारण त्या गोष्टी खरोखरीच क्षुल्लक वाटत असतात. पण जेव्हा काही निवडक नातेसंबंधांचा प्रश्न येतो, तेव्हा त्याच गोष्टी अतिशय महत्त्वाच्या होतात. विशेषत: जेथे माणुसकीचा प्रश्न येतो, जेथे एकमेकांचा विश्वास संपादन करण्याचा प्रश्न येतो तेथे क्षुल्लक गोष्टीच जास्त महत्त्वाच्या ठरतात. उदाहरणार्थ

नजरानजर (Eye Contact आय कॉन्टॅक्ट)

स्मितहास (Smile स्माईल)

स्पर्श (Touch टच् )

शाबासकी (Positive Stroke पॉझिटिव्ह स्ट्रोक)

आपल्या अतिशय जवळच्या लोकांशी कित्येक वेळा आपली नजरानजरच झालेली नसते. दोघांनी एकाच वेळी एकमेकांच्या डोळ्यात पहाणे महत्त्वाचे आहे. डोळ्यातून आपल्या सगळ्या भावना व्यक्त होतात आणि समोरच्या व्यक्तीला सुद्धा कळतात. पण त्यासाठी आपण खास प्रयत्न करत नाही. तो होणे जरुरीचे आहे.

चेहऱ्यावरील हास्य नातेसंबंधामधे तर महत्त्वाचे आहेच; पण एकंदर आरोग्यसुद्धा त्यामुळे चांगले रहाते. आपण घरातील माणसं सकाळी उठल्यावर एकमेकांच्या समोर येतो तेव्हा एकमेकांचं स्मितहास्यानं स्वागत करतो काय? काही लोक ह्या प्रश्नाला हसतील. आपण अशाच प्रकारे आपल्या जवळच्या सगळ्या नातेसंबंधांना गृहीत धरलेले असते. आपण आपल्या सायकलला, स्कूटरला, मोटारगाडीला वंगण न देता गृहीत धरू शकतो काय? ह्याचं उत्तर निश्चितपणे नकारार्थी आहे. त्याचप्रमाणे नातेसंबंधालासुद्धा आपण गृहीत धरले, वंगण दिले नाही तर हळूहळू ते कुरकुरू लागतात. हास्यासारखं वंगण नाही. बाब क्षुल्लक आहे पण म्हणूनच कित्येक घरात ती दुर्लक्षित असते.

आपल्याला जे उघड्या डोळ्यांनी दिसत नाही ते दृष्टीहीनांना नुसत्या स्पर्शातून कळते. स्पर्श हा बोलका असतो. काही गोष्टी, विशेषत: भावना, बोलल्याशिवाय स्पर्शातून संक्रमित होत जातात. नातेसंबंधाचा संबंध तर थेट भावनांशीच

असतो. म्हणून मी परत एकदा प्रश्न विचारतो की आपण आपल्या जवळच्या व्यक्तींना कितीवेळा आणि कसा स्पर्श करतो? बऱ्याच ठिकाणी भारतीय संस्कृतीच्या नावाखाली स्त्रीपुरुषांचा स्पर्श घरातसुद्धा निषिद्ध समजला जातो, मग ते नाते आई आणि मुलगा असे किंवा असो वडील आणि मुलगी किंवा असो, नवरा बायकोची तर बातच सोडा. त्यातूनही नवरा बायको जख्ख म्हातारे झालेले असतात. म्हणजे लैंगिक आकर्षण यत्किंचितही राहिलेलं नसतं. तरीसुद्धा संस्कारा प्रमाणे स्पर्श होऊ देत नाही. नातेसंबंधात स्पर्श हा महत्त्वाचा आहे. तो नात्यांना बांधून ठेवतो, न बोलता प्रेम व्यक्त होतं. मुलं मोठी झाली तरी आईवडिलांचा स्पर्श हा अतिशय महत्त्वाचा आहे.

वर शाबासकीचा जो उल्लेख आहे तो तोंडी शाबासकीबद्दल आहे. आपल्या तोंडून टीका लगेच येते, पण एखादी चांगली गोष्ट दिसली तर त्यावर स्तुतिपर शब्द तोंडून फुटत नाही.

एकदा एका जोडप्याचे भांडण विकोपाला गेले. अगदी घटस्फोटापर्यंत पाळी आली. परंतु शेवटचा उपाय म्हणून समुपदेशका कडे ही केस गेली. सामुपदेशकाने त्या स्त्रीला विचारले, 'नवरा तुमच्यावर प्रेम करीत नाही असं तुमचं म्हणणं आहे. पण हे तुम्हाला कसं कळलं?'

त्यावर ती म्हणाली, 'अहो, इतकी वर्ष मी ह्याला स्वयंपाक करून खायला घालते आणि हा नुसता बकासुरासारखा खातो. पण एक दिवस तरी त्याने माझ्या पदार्थाची स्तुती केलीय का त्यालाच विचारा.'

तो म्हणाला, 'स्तुती करायची काय गरज आहे? मी परत परत मागून खातो ह्यातच स्तुती नाही का आली?'

**दिलेला शब्द न पाळणे**

आपण मोठी माणसं शब्द पाळण्याऐवजी शब्द फिरवण्यात तरबेज असतो. विशेषत: मुलांना दिलेल्या शब्दाला आपण फारशी किंमत देत नाही. त्यामुळे तो फिरवताना आपल्याला काही वाटत नाही. परंतु नातेसंबंधांच्या भिंतीमधे ह्यामुळेच फार मोठे खिळे ठोकले जातात. मुलांना आपण अनेकवेळा अनेक प्रकारचे शब्द देत असतो. पण त्याचे पालन करायची वेळ आली की काहीतरी सबब सांगून टाळाटाळ करीत राहतो.

पावसाळ्यात छत्री मागायची वेळ येते. आपण छत्री लगेच परत पाठवून द्यायच्या बोलीवर मागून घेतो. पण छत्री काही परत जात नाही. कधी पैसे मागायचीसुद्धा वेळ येते आणि आपण आपलं काम झाल्यावर आपला शब्द पाळत नाही. मैत्रीमधे पेन मागून नेणारे तर हमखास पेन परत द्यायला विसरतात. येवढंच नाही तर त्या गोष्टीबद्दल विचारलं तर 'त्यात काय झालं? साधं पेनच तर होतं ना. चल हे घे दुसरं पेन.' 'असं म्हणून दुसरं पेन तोंडावर फेकतात. पण एखाद्याचं पेन खास असू शकतं. त्याला भावनिक मोल असू शकते. विशेषत: पेन जेव्हा प्रेयसीने भेट वगैरे दिलेलं असेल तेव्हा तर खिळा चांगलाच बोचतो.

असल्या छोट्या छोट्या प्रसंगात जागरूक रहाणे जरुरीचं आहे. विश्वास हा कोणत्याही नातेसंबंधाचा पाया आहे. विश्वासाशिवाय कोणतेही नातेसंबंध उभे राहू शकत नाहीत आणि टिकूही शकत नाहीत. विश्वास टाकण्यासाठी समोरची व्यक्ती विश्वासार्ह असावी लागते. समोरच्या व्यक्तीने आपल्यावर विश्वास टाकावा असे जर वाटत असेल तर आपण पहिल्याप्रथम विश्वासार्ह असावे लागते. ही विश्वसार्हता मोठ्या घोषणा आणि देखावा करून मिळवता येत नाही. तर छोट्या छोट्या प्रसंगातून सहज मिळवता येते.

**सशर्त प्रेम**

स्वामी सुखबोधानंदांनी आपल्या प्रवचनात एक घटना सांगितली होती.

हैद्राबाद येथील एक बहुराष्ट्रीय बँकेमधे नोकरी करणारा तरुण एक दिवस स्वामीजींकडे आला.

'स्वामीजी, मी हिंदू आहे. माझा प्रेमविवाह झालेला आहे. माझी बायको आपल्या धर्मातील नाही. मला एक सुंदर मुलगीदेखील आहे. आमच्या लग्नाआधी आणि लग्नानंतर अजूनही आमच्या वादामधे धर्म हा कधीच वादाचा मुद्दा नव्हता. परंतु मला हल्ली असं वाटू लागलंय की माझ्या बायकोने जर कपाळावर कुंकू लावले तर ती आणखी सुंदर दिसेल. मी माझी इच्छा तिला बोलून दाखवली. पण ती लगेच म्हणाली 'हे बघ, माझ्यावर तुझा धर्म थोपवायचा प्रयत्न करू नकोस!' स्वामीजी, मी अगदी प्रामाणिकपणे सांगतो, कपाळावर कुंकू लावण्याचा आणि धर्माचा काही संबंध आहे असं मला मुळीच वाटत नाही. आमच्यात हल्ली रोज ह्यावरूनच खटके उडतात. आणि आता तर परिस्थिती अशी आहे की येणाऱ्या प्रत्येक दिवसागणिक ह्या खटक्यांचं कडाक्याच्या भांडणात रूपांतर होत आहे. काल तर माझं डोकंच फिरलं आणि मी म्हणालो, 'तुझ्या खानदानाला मी ओळखंत नाही काय?' तिचा अहंकार दुखावला. लगेच रागाने तिने सुरी घेतली, आपलं बोट कापून घेतलं आणि भळभळ वाहणारं रक्त कपाळावर लावून ती म्हणाली 'हे घे. मी माझं कपाळ लाल केलं. आता झालं का तुझं समाधान?' मी तिला माझ्याबरोबर आणले आहे. तिला जरा चांगला उपदेश द्या. एवढं बोलून तो थांबला.

स्वामीजी त्या दोघांना म्हणाले 'बेटा, तू मला जे काही सांगितलंस त्यावरून मी निश्चितपणे एक निष्कर्ष काढू शकतो की तुम्हा दोघांचं एकमेकांवर अतिशय प्रेम आहे. तुमच्या प्रेमाचं मूळ कशांत आहे हे माहीत आहे का तुला?'

स्वामीजी पुढे म्हणाले, 'ज्या दिवसापासून तुम्ही दोघं एकमेकांच्या प्रेमात पडलात तेव्हापासून तुझ्या बायकोने तू म्हणशील त्याला होकार दिला. आणि म्हणूनच तू तिच्यावर जास्तच प्रेम करू लागलास. परंतु एखादा आपल्या म्हणण्याला मान डोलावतो ह्या कारणामुळे जर प्रेम टिकणार असेल तर ते प्रेम खरं नाही. ते सशर्त प्रेम झाले. आजची परिस्थिती वेगळी आहे. आज तुझ्या बायकोने कुंकू लावण्याचं तुझं म्हणणं धुडकावून लावले आहे. म्हणून तुमच्या प्रेमाला ओहोटी लागली.'

'आता तुमच्या प्रेमप्रकरणाकडे थोडा वेगळ्या दृष्टिकोनातून पाहू या. इतके दिवस तुला वाटले की तू जे काही म्हणशील ते ती काहीही प्रश्न न विचारता निमूटपणे ऐकून घेईल. तुझे हे मत बदलण्याकरता तुझ्या बायकोनेदेखील काहीही प्रयत्न केले नाहीत. म्हणूनंच आता परिस्थिती अशी आहे की तू तुझ्या बायकोपेक्षा तुझ्या मतावर जास्त प्रेम करू लागला आहेत.'

शेवटी स्वामिजींनी त्याला सल्ला दिला, 'हे पहा, जीवन हे एक वाद्य आहे. ह्या जीवनात रुढी आहेत, परंपरा आहेत तसेच नातेसंबंधही आहेत. तू जर रूढी बाजूला ठेवून नातेसंबंधावरंच भर दिलास तर जीवनात जे संगीत निर्माण होईल. ते अप्रतिम असेल.'

माझी खात्री आहे की कुंकू लावण्यावरून परत त्यांच्यात वाद झाला नसावा.

आपण आपल्या प्रेमाच्या माणसांकडूनच जास्त अपेक्षा का करत असतो? खरं तर ते

प्रेमाच्या अगदी विरुद्ध असतं. प्रेम करणे म्हणजे काय? प्रेम करणे म्हणजे समजून घेणे, प्रेम करणे म्हणजे समंजसपणा दाखवणे, प्रेम करणे म्हणजे त्या व्यक्तीला अतिशय उच्च दर्जा देणे. खरं तर प्रेम हे क्रियापद आहे म्हणूनच प्रेम करणे म्हणजे आपण त्या व्यक्तीला जपणे, त्या व्यक्तीच्या मनाला जपणे, त्या व्यक्तीच्या मताला जपणे. येथे अपेक्षेचा प्रश्न येतो कुठे?

प्रेम करणे म्हणजे अपेक्षा करणे नव्हे. प्रेम करणे म्हणजे त्या व्यक्तीला गृहीत धरणे नव्हे. पण प्रत्यक्षात आपण आपल्याच प्रेमाच्या व्यक्तींकडून जास्तीत जास्त अपेक्षा करीत असतो. त्यांनाच जास्तीत जास्त गृहीत धरीत असतो. त्यांच्या मताला काही किंमत देत नाही. त्यांनी आपल्या मताला जपावं अशी अपेक्षा करतो. खरं तर हे प्रेमाच्या अगदी विरुद्ध आहे. मग आपण प्रेम कुणा-वर करतो? आपण फक्त आपल्या मतांवरच प्रेम करत असतो. आपल्याच मतांना जपत असतो. बऱ्याचवेळा आपली मतं रूढी-परंपरांमधे अडकलेली असतात. त्यांच्यावर कुणी कुरघोडी करायचा प्रयत्न केला, त्यांना कुणी नावं ठेवायचा प्रयत्न केला तर लगेच त्या व्यक्तीवर आग पाखडतो, मग ती व्यक्ती आई असो कि बायको असो. आपण खरं तर आपल्या माणसांपेक्षा आपल्या मतांवर जास्त प्रेम करत असतो.

थोडक्यात काय, नातीगोती सांभाळणं हे कित्येक लोकांना खूप कठीण वाटतं. विशेषत: कौटुंबिक नाती सांभाळणं हे फारंच किचकट करून ठेवलेले असते. वर्तन शैलीचे काही नियम आहेत. आपण त्या नियमांचं उल्लंघन करतो आणि आपल्याच हाताने आपल्याच सुंदर भिंतीमधे खिळे ठोकतो.

एकदा आपण नियम समजून घेतले की मग काम अगदी सोपं आहे. उलट कौटुंबिक नाती सांभाळण्यासाठी साध्या साध्या गोष्टी करायला लागतात. त्यासाठी वेळही जास्त द्यावा लागत नाही. पण आपण आपल्या व्यावसायिक रगड्यात ते सगळं दुर्लक्षित करतो. आपल्याला व्यावसायिक यशासाठी व्यावसायिक नाती सांभाळता येतात तर कौटुंबिक का येऊ नयेत? खरं म्हणजे व्यावसायिक नातेसंबंधासाठी जे नियम आहेत तेच नियम कौटुंबिक नात्यांसाठीसुद्धा लागू होतात. फक्त थोडी इच्छाशक्ती आवश्यक आहे. तिचा वापर करून, आपण आपल्या मतांवर प्रेम करत असतो, तसंच आपल्या माणसांवर प्रेम केलं तर हे जगणं किती सुंदर होईल!

तुमची इच्छाशक्ती वापरा आणि आपापली नातीगोती सुरेख ठेवा.





**तो आणि ती** जॉन ग्रे
अनु. डॉ. रमा मराठे

**स्त्री पुरुष हे भावकोमल नातं सर्व स्तरावर कसं जपावं याबद्दल सर्व काही...**

किंमत : **२५० रु.** सभासदांना : **१७५ रु.**पोस्टेज : **२५ रु.**




# साहित्य संगम जाहिरात

अनोखे ऋणानुबंध

# एक वीज चमकून गेली

**रा. अ. कुंभोजकर**

माझ्या आयुष्याच्या एका वेगळ्या वळणावर ती भेटली. त्या वेळी कोल्हापुरात एका साप्ताहिकाच्या पुरवणी संपादनाचे काम मी पाहात होतो. आणि एकदोनदा तिने रविवार अंकासाठी माझ्याकडे लेखही आणून दिले होते. अर्थात चांगले असल्यामुळे ते प्रसिद्धही झाले.

एक दिवस संध्याकाळी मी नागाळा पार्कमध्ये डोळे मिटून एका बाकावर निवान्त बसलो होते. एवढ्यात ती तिथे आली. अवचितच, अनपेक्षितपणे. बरोबर तिची तेरा-चौदा वर्षांची मुलगी होती. संध्याकाळी बागेतल्या हिरवळीवरून, थंडगार गवताचा पायांना स्पर्श घेत आई-मुलीची शतपावली चालू होती. माझ्याकडे लक्ष जातच ती म्हणाली, 'काय, विश्रांती घेताय् वाटतं?' ती या बागेत भेटेल याची मला कल्पना नव्हती. तिचा प्रश्न येताच मी सावरून बसलो नि म्हणालो. 'होय, कंटाळा आला म्हणून इथं आलो नि आराम करतो आहे.'

मग तीच म्हणाली, 'अहो, इथून अगदी जवळ मी राहते, चला कॉफी घेऊ या.'

मी तिच्याबरोबर गेलो. तशी तिची माझी भेट पूर्वी झालेली. एका बड्या कारखान्यात अधिकारी असलेले तिचे पती अचानक दिवंगत झाले होते आणि ही बातमी तिनं पत्र लिहून मला कळविली होती. मीही पत्राद्वारेच तिचे सांत्वन केले होते आणि माझ्या पत्राने आपल्याला धीर आला असं तिनेही कृतज्ञतापूर्वक कळविले होते. तिच्या बरोबर चालताना हा प्रसंग मला आठवला.

नागाळा पार्कमध्ये एका ओनरशिप फ्लॅटमध्ये ती आपल्या दोन मुलींसह राहात होती. ब्लॉक चांगला प्रशस्त होता. टेबलावर पाचसहा मराठी पुस्तके पडलेली. काहीत खुणा घालून ठेवलेल्या. मी पुस्तके चाळून पाहिली. त्यातले तीन ताजे कथासंग्रह आणि तीन कादंबऱ्या होत्या.

कॉफीपान झाले. माझ्या लक्षात आले की हिचे वाचन भरपूर आहे. मी तिला आणखी लिहिण्याची सूचना करून तिच्या शानदार फ्लॅटमधून बाहेर पडलो. संकोच मोडला होता. माझ्या सूचनेप्रमाणे एक चांगला लेख घेऊन दुसऱ्या दिवशी ती कार्यालयात आली. मी लेख वाचून पाहिला. तो वाचनीय कसा करावा याची तिला आता चांगली कल्पना आली होती. साहजिकच हा लेखही पुढच्या आठवड्यात आमच्या रविवार पुरवणीत प्रसिद्ध झाला. या नंतर मी एकदोनदा तिच्याकडे चहा प्यायला गेलो असेन.

ती उंचीपुरी आणि देखणी होती. तिचं हसणं देवघरात किणकिणणाऱ्या घंटीसारखं नादमधुर होतं. अनेक स्त्रिया लेखिका असतात. काहीबाही लिहीत असतात. पण थोड्या दिवसाच्या अनुभवावरून माझ्या लक्षात आले होते, की ही गुणवती लेखिका आहे. ती एम्. ए. असल्यामुळे इंग्रजी साहित्याचा तिचा अभ्यासही चांगला होता. त्यामुळे मराठी लेखन करताना इंग्रजीतले नक्की काय घ्यायचे व काय वगळायचे याची तिला कल्पना होती. त्यामुळे ती जे काही लिहील ते वाचनीय व्हायचे.

सहा महिन्यातच मी त्या साप्ताहिकाचा निरोप घेतला आणि बेळगावातल्या एका दैनिकात रविवार पुरवणीचे काम पाहू लागलो. मी बेळगावला आल्याची जशी तिला कल्पना दिली तसेच लेखकांकडून आमच्या साप्ताहिकाच्या कोणत्या अपेक्षा आहेत, हेही तिला कळवून टाकले. त्या बरहुकूम तिचे लेखन येऊ लागले. या काळात तिचे दोनतीन लेखच नापसंत ठरले असतील. पण बाकीचे उपयोगी पडावे असेच होते. लेखाच्या जोडीने ती आता कथा आणि कवितासुद्धा पाठवू लागली. तिच्या लेखनाबरोबर आमच्यातील विशुद्ध, आरस्पानी मैत्री वृद्धिंगत होत गेली.

नंतर आपण लिहिलेले काही अभिनव स्वरूपाचे लेखन घेऊन ती तीनचार वेळा बेळगावला आली. बेळगावात येताच ती बिनदिक्कत माझ्या खोलीवर येई. माझे बहुतेक कार्यालयीन काम मी खोलीत बसूनच करीत असे. ती केवळ स्वत:च्या लेखना-संबंधीच बोले असे नव्हे, तर कोल्हापुरातल्या कवि-मैत्रिणीसंबंधीही बोले. तिथल्या काही लेखिकाही तिच्या परिचयाच्या होत्या. त्यांच्या-बद्दलच्या लेखनाची काही निरीक्षणे ती माझ्याजवळ प्रकट करी. एकूण काव्य-शास्त्रविनोदात वेळ मजेत जाई. आमच्यात औपचारिकपणा आता उरला नव्हता आणि स्नेहाचे सुकुमार रोपटे विशुद्धपणे वाढीला लागले होते.

कोल्हापुरातल्या लायन्स क्लबची एक दोन वर्षे ती प्रेसिडेंटही होती आणि आपल्या काळात तिने उत्तम काम केले होते. कोल्हापुरात भरलेल्या अखिल भारतीय साहित्य संमेलनात तिने मनापासून रस घेतला आणि संमेलनाकरता मला अगत्याने पाचारण केले. मी गेलो. तिच्या इच्छेनुसार मी तिच्या घरचा पाहुणाच झालो. सकाळी आंघोळ चहानाष्टा आटोपला की संमेलनाच्या ठिकाणी आम्ही मिळूनच जात असू. पहिले एकदोन परिसंवाद संपल्यावर दोन तास रिकामे असत. या काळात संमेलनाचे जेवण न घेता, आम्ही गावातील मोठ्या हॉटेलमध्ये जेवणासाठी यायचो. बहुतेक श्रोते याच ठिकाणी जेवायला येत. आमच्या आसपासच्या खुर्च्या त्यांनी अडविलेल्या असायच्या. आम्हा उभयताकडे बऱ्याच नजरा वळलेल्या असायच्या. पण त्या दोन दिवसांत कोणाच्याच विस्फारित नजरांकडे आम्ही लक्ष दिले नाही. बेळगावपासून जवळच एक खेडे आहे. ते कर्नाटकात असले तरी आजही तिथे पंचाहत्तर टक्के मराठी बोलले जाते. मराठी भाषेबद्दल प्रेम बाळगणारे ग्रामस्थ या गावात आहेत. या ठिकाणी दर वर्षी डिसेंबर अथवा जानेवारीत साहित्य-संमेलन भरते. पुण्यामुंबईतल्या कोणातरी साहित्यिकाची अध्यक्ष म्हणून निवड होते. सलग तीन वर्षे तरी ती या संमेलनाला आली. एक वर्षी तर तिने आपली उत्कृष्ट कथाही रसिकांना ऐकविली.

आपल्या लेखनापासून ती कधी दूर गेली नाही. माझ्या सूचनेवरून आमच्या रविवार पुरवणीसाठी वेळोवेळी तिने काही सदरे लिहिली. तिच्या लेखांवर वाचकांची खुषी पत्रे यायची. 'बंद दाराची संस्कृती' हा उत्कृष्ट लेख तिने आमच्यासाठी लिहिला. त्यावर मी वाचकांची मते मागवली व त्या प्रतिक्रियांवर मी स्वत:च एक लेख लिहिला.

ती केवळ आमच्या रविवार अंकातच लिहायची असे नव्हे, कोल्हापुरातील अन्य दैनिकांच्या रविवार आवृत्त्यांतही लिहायची. मात्र आमच्या वृत्तपत्रावर तिचा अधिक लोभ होता.

इतके विपुल लेखन करूनही तिचे एकही पुस्तक प्रकाशित झाले नाही याचे शल्य आज घटकेलाही मला जाणवते.

तिच्याशी माझे काही नाते नव्हते. पण माझ्या संपादकीय जीवनात तिने मला अधिक डोळस केले, विचक्षण बनविले, हे कबूलच करायला हवे.

मी आजारी आहे असे कळले तर रोज चौकशी करणारा तिचा एकतरी फोन यायचा. मी एकटा राहतो याची तिला विशेष काळजी वाटे, आणि मी कोणते औषध घ्यावे या बद्दल ती अगत्याने आणि जिव्हाळ्याने सूचना करी. ज्या दिवशी तिचे पत्र येई तो माझ्या आनंदाचा दिवस असायचा. आपण श्रीमंत झालो असे वाटायचे. भरपूर पैसे असले म्हणजे माणूस श्रीमंत असतो असे नव्हे. परस्परांच्या सहवासात किती आनंद देतो-घेतो हे महत्त्वाचे आहे असे मला वाटते.


हा आनंद मी दीर्घकाळ भरभरून घेतला आणि समृद्ध जीवन जगलो. एका वर्षी मी उमलत्या मुलां-मुलींसाठी एक सदर लिहिण्याची तिला विनंती केली. तिने ती लगेच मान्यही केली. सातआठ आठवडे प्रकरणे निर्वेधपणे येत राहिली. एक पावसाही दिवसात दुपारच्या वेळी तिचा मला फोन आला, 'नाना, मी ***** बोलतेय्. आज पुढची दोन प्रकरणे पाठविली आहेत. पण मी उद्या पुण्याला जाऊन माझ्या बहिणीबरोबर अमरनाथच्या यात्रेला निघालेय्. प्रवास लांबचा आहे. परतायला आठ-दहा दिवस लागतील. परतल्यावर पुढची प्रकरणे नियमितपणे पाठवेन.'

माझ्या मनात आले, इथे जर इतका पाऊस तर अमरनाथच्या वाटेवर किती कोसळत असेल! 'तू जाऊ नको' असे सांगायचे माझ्या जिभेच्या शेंड्यावर आले होते. पण तिचा कार्यक्रम आधीच ठरला असल्यामुळे मी तसे तिला सांगितले नाही.

ठरल्याप्रमाणे दोन दिवसांनी मी अमरनाथच्या प्रवासाला निघाली.

तिसऱ्या दिवशी आमच्या पेपरात एक बातमी आली. काही प्रवासी महिलांना घेऊन निघालेली बस अमरनाथला जाताना वाटेतच एका अरुंद कड्यावरून खाली कोसळली. बातमीत मृत महिलांची नावे होती आणि हाय रे दैवा, त्यात तिचेही नाव होते. माझ्या डोळ्यांसमोर अंधारी आली.

तिचा अमरनाथचा प्रवास हा न परतीच्या वाटेवरला प्रवास होता. एक ऋणानुबंध एका क्षणात संपला होता. विजेच्या लखलखाटा-सारखी ती आयुष्यात आली आणि वीज नाहीशी व्हावी तशी लुप्तही झाली!


**प्रोतिमा बेदी अनु. सुप्रिया वकील**

**टाईमपास**

**बिनधास्त तितकेच प्रांजळ आत्मकथन...**

किंमत : **१८० रु.** सभासदांना : **१२६ रु.**पोस्टेज : **२५ रु.**






# दारावरचे पाहुणे

**सुनीता दांडेकर**

ऋणानुबंध हा शब्दच असा आहे की मनाला एका अलवारपणाचा स्पर्श घडवतो. नात्याचे हळवे नाजूक बंध या शब्दात हळुवारपणे सामावलेले असतात. 'एखाद्याशी आमचा अगदी जुना ऋणानुबंध' असे जेव्हा म्हणतात तेव्हा त्या नात्याची वीण कशी बांधली गेली असेल याचा विचार लगेच सुरू होतो.

या शब्दाला अनेक धुमारे आहेत. अनेक रंग ज्याप्रमाणे मानवी जीवनात नात्याला असतात तसे. नातं म्हटलं की ते रुजलेलं असावं लागतं. माणसाच्या आठवणीही असतात त्या अशा रुजलेल्या नात्याच्याच. पण काहीवेळा एकूण वाता-वरणाशीच असे नाते रुजलेले असते.

आज मागे वळून बघताना आपल्या लहानपणी अवतीभवती असलेले निर्मळ भावजीवन सांस्कृतिक समृद्धता ही एखाद्या सुंदर स्वप्नासारखी वाटते.

आमचं घर म्हणजे एक हसतं खेळतं एकत्र कुटुंब. धार्मिक वातावरण व्यापून राहिलेलं. पण तरीही बाहेर घडणाऱ्या राजकीय सामाजिक घटनांचे पडसाद लगेच उठणारं. आमच्या घराला जणू सामाजिक कार्य करण्याची, समोर येणाऱ्या व्यक्तीला मदत करण्यासाठी सदैव तत्पर असण्याची एक प्रकारची ओढच होती. तशी परंपराच होती. त्यामुळं आमच्या घरातून कोणीच कधी विन्मुख गेलं नाही. आणि यामुळंच निरनिराळ्या व्यक्तींचे हलके, धूसर असे ऋणानुबंध विणले गेले.

त्यावेळी अनेक व्यक्ती आमच्या घरी येत. प्रत्येकाचे काम वेगळे असे. पण येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या 'येण्या'मुळे सर्वांना नेहमीच आनंद वाटत असे.

माझ्या लहानपणी आमच्याकडे कान्हेरे काका येत असत. लहानखुरी सडसडीत मूर्ती अंगात झब्बा-पायजमा, खांद्याला पिशवी. आणि चेहऱ्यावर न लोपणारं लोभस हसू. त्यावेळी ते काय उद्योग करत हे मला कधी समजले नाही. त्यांच्या पिशवीत कायम उदबत्तीचा पुडा असे. बोलता बोलता चटकन ते उदबत्ती काढीत आणि हातात देत. आणि प्रत्येक वेळी उत्साहानं सांगत, चिमणे ही उदबत्ती बघ एकदम नवीन आहे. पण जास्त नाकावरून फिरवू नकोस हं नाहीतर मिशा उठायच्या.

आपुलकीनं भेटायला येत. प्रत्येकाशी हसून-बोलून १५/२० मिनिटांत ते निघूनही जात त्यांच्या उदबत्तीसारखाच त्यांच्या येण्याचा गंध दरवळत राही.

माझ्या लहानपणी ज्याच्या येण्याची मी वाट पहात असे तो म्हणजे आमचा डबेवाला. माझे वडील खडकीला ॲम्युनिशन फॅक्टरीमध्ये ड्रॉईंग ऑफिसर होते. सकाळी ७.१५ वा. ते घरातून निघत. आणि १०.३० वाजता त्यांचा डबा घेऊन जाण्यासाठी डबेवाला येई. त्याचे नाव मला आजही माहित नाही. आम्ही त्याला 'डब्या'च म्हणत असू. तो आल्याची वर्दी

देताना मी ओरडून म्हणे, 'आईऽऽ डब्या आलाय गं.' त्यालाही ते कधी खटकले नाही. त्याच्याशी गप्पा मारायला मला फार आवडे. हा गडी मला कधी 'म्हातारा' दिसलाच नाही. माझ्या आठवणीतील त्याचं चित्र कधी बदललं नाही. मी प्राथमिक शाळेत तिसरी-चौथीत असताना शाळा जवळ असल्याने पायी एकटीच घरी येत असे. एकदा माझी शाळा सुटली, तेव्हा माझ्या रस्त्यावरूनच 'डब्या' सायकलवरून चालला होता. लगेच थांबून त्याने मला सायकलवर बसवले आणि घरी सोडले. त्यानंतरही ४/५ वेळा त्याने मला सायकलवरून घरी सोडलं. एक दिवस मी रस्त्यात त्याची वाट पाहात किती वेळ थांबले. शेवटी कंटाळून घरी गेले. आईनं काळजीनं विचारलं, ''का ग, इतका उशीर झाला?''

''अगं, 'डब्या' आलाच नाही. मी त्याची वाट पहात होते!''

आईनं कपाळाला हात लावला. आणि म्हणाली, ''अगं, एक दिवस तो भेटला, म्हणजे नेहमी कसा भेटेल? त्याच्यासाठी रस्त्यात काय थांबतेस? जीवाला घोर लावू नकोस उगीच!''

पण मला काही ते पटलं नव्हतं. 'रोज का येत नाही तो त्या रस्त्यावरून?' 'डब्या'ने सांगितलं, ''अगं, मी वेगवेगळ्या ऑफिसात जातो ना तेथे मला वेळ लागतो. तुझ्या वेळेत नेहमी मी कसा येईन? आणि तुला कोणी पळवून नेलं तर? असं उगाच रस्त्यात थांबू नकोस माझ्यासाठी. वेडी कुठली!''

आमच्याकडे एक मोठं रामफळाचं झाड होतं. त्याला खूप रामफळं येत. खूप फळं दिसायला लागली की आमची ऑर्डर सुटे: 'डब्या, रामफळं काढून दे आज'. संध्याकाळी डबा द्यायला आला की तो सरसर झाडावर चढे. खाली आम्ही चादर धरून उभे असू. तो झाडावर कुठेही असला तरी आमच्या चादरीत अचूकपणे फळं टाके.

'डब्या' आमचा खरंच कोण होता? म्हटलं तर एक गडी माणूस. त्याच्या साध्या वागण्यातूनही मदत करण्याची, चटकन काम करून देण्याची एक आत्मीय इच्छा दिसून येई. आम्ही हक्कानं सांगितलेल्या कुठल्याही कामाबद्दल कधी त्याची नाराजी जाणवली नाही. आणि त्यानं वारंवार कशाची मागणी केलेलीही कधी पाहिली नाही. समाधानाचं, सामंजस्याचं प्रसन्न वातावरण परस्परांमध्ये भरून राहिलेलं असे.

त्याकाळी अनेकजण दारावर येत. त्यात मद्रासी ब्राह्मण असत. माधुकरी मागणारे असत, माधुकरी मागणारी मुलंही लहानच असत. त्यंच्या चेहऱ्यावर एक प्रकारची सात्विकता असे. पण सूक्ष्म अशी अगतिकताही असे. हसू विसरल्यासारखे त्यांचे चेहरे असत. काही वेळेला आमच्या मागच्या वाड्यातल्या मुलांचे पतंग आमच्या अंगणात येत. मी ते हळूच काढून ठेवी. आणि या माधुकरी मागणाऱ्या मुलांना देऊन टाकी. त्यावेळी त्यांचे डोळे लकाकत. आणि चेहऱ्यावर हसू उमटे. त्यामुळे माधुकरी मिळाली तरी ते उत्सुकतेनं मला शोधत. मलाही त्यामुळे फुशारल्यासारखे वाटे.

त्यांच्याप्रमाणेच वासुदेव येत असे, एक रामदासी बुवाही येत असत. जख्ख म्हातारे, पांढरी शुभ्र दाढी-मिशा. चेहऱ्यावर एक प्रकारचं तेज असे आणि मुखी सतत रामदासांचे श्लोक असत. ते मला कधी भिक्षेकरी वाटले नाहीत. अनेकदा ते मनाच्या श्लोकांचा अर्थ समजावून सांगत. हळूच झोळीतून मनाच्या श्लोकांचं पुस्तक काढून देत. कुठलाही श्लोक म्हणायला सांगितला तरी त्यांना तो येत असे. याचं मला त्यावेळी फार आश्चर्य वाटे. कधी कधी ते ताक प्यायला मागत. त्यांच्या मिशा फारच लांब होत्या. मी त्यांना म्हणे, 'बुवा बुवा, ताक तर सगळं मिशातच अडकून बसलं की!'

ते म्हणत, 'अगं, ही तर माझ्या तोंडावरची गाळणी आहे. बघ फक्त चांगलं तेवढंच आत जातं!'

अचानक रामदासीबुवा यायचे बंद झाले. मी नकळत त्यांची वाट पाहत असे. त्यांच्या न येण्यानं काहीकाळ मला उदास केलं होतं.

माझ्या आजीला गरीब विद्यार्थ्यांना मदत करण्याची तीव्र इच्छा असे. त्यामुळे आमच्याकडे नेहमी वार लावून विद्यार्थी जेवायला असत. या वारकऱ्यांना आमच्या घराबद्दल, आजी-आजोबांबद्दल अतिशय आदर होता. त्यांचा आदर आणि प्रेम ते वेळोवेळी व्यक्त करीत. वारकरी म्हणून आमच्याकडे नियमित येणाऱ्या एका मुलाला एकदा थोडा ताप आला होता. त्याला काही सुचत नव्हते. आजीनं त्याला गरम गरम मेतकूट भात आणि लिंबाचं लोणचं प्रेमानं खाऊ घातलं. त्याच्या मनावर या गोष्टीचा इतका परिणाम झाला होता की पुढे तो मोठा झाल्यावर त्याची बदली एका गावी झाली तेथे लिंबे भरपूर व स्वस्त मिळत. त्यानं एक मोठी बरणीभरून लोणचं घालून आमच्याकडे आणून दिलं.

असाच आणखी एक वारकरी प्रेमानं अनेक कामे करून देत असे. आमच्या घरच्या वातावरणाचा त्याच्या मनावर प्रचंड प्रभाव पडलेला होता. पुढे तो पुण्यातील एका नामांकित प्राथमिक शाळेचा मुख्याध्यापक झाला. आणि त्याची कारकीर्द त्याने अत्यंत आत्मीयतेने आणि सचोटीने काम करून गाजवली. प्रत्येक काम करताना ते उत्तम आणि स्वच्छ झालं पाहिजे. स्वत:लाच शरम वाटेल असे काम कधी होता कामा नये हा आमच्या घरचा संस्कार त्यांच्या मनात अलगद-पणे आतपर्यंत झिरपलेला होता. त्यामुळेच 'सचोटी' हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा मानदंड ठरला.

आमच्याकडे पुष्पा नावाची एक छोटी मुलगी केर, भांडी घासण्यासाठी यायची तिचे वय पाहून आम्हाला फार वाईट वाटायचे. पण ती मोठ्या आनंदाने काम करायची. तिचे वडील अट्टल दारुडेबाज होते. त्यांच्या नकळत काम करून ती शाळेच्या फीचे पैसे मिळवत असे. केव्हातरी एकदा तिच्या वडिलांना हे कळले व ते आमच्या घरी आले. त्यांना लांबून पाहताच पुष्पानं रडायला सुरुवात केली होती. पण आमच्या आजीनं त्याला चांगलंच ठणकावलं. आणि परत पाठवलं. या पुष्पानं पुढं अत्यंत कष्टातून वाट काढत बी. कॉमपर्यंत शिक्षण फर्स्ट क्लासमध्ये पुरे केलं आणि उत्तम नोकरी मिळवली.

अशा विविध लोकांप्रमाणे आमच्याकडे एक गायही अगदी नियमितपणे येत असे. तिला भूक असेल तर पोळी देईपर्यंत ती हंबरत राही. नाहीतर अंगणात असलेल्या हौदातील पाणी पिऊन शेपटीचे फटकारे मारत निघून जाई.

त्याकाळी असे अनेकजण येत-जात असत. त्या प्रत्येकाला काहीना काही मदत केली जाई. आमच्यासारख्या अनेक घरांतून असे घडत असे. समाजातील गरीब गरजू वर्गाचं भरण-पोषण थोड्या प्रमाणात का होईना परंतु प्रेमळपणे केलं जात असे. दारावर येणाऱ्या व्यक्तीबद्दल शंका घ्यावी, त्याची भिती बाळगावी असं त्यावेळी कधी वाटलं नाही. अनोळखी माणसावरही काही प्रमाणात विश्वास टाकायला

कोणाला हरकत वाटत नव्हती. दारावर आलेला भिकारीही अतिथी आहे असे समजून काही ना काही त्याच्या मुखी घालण्याची मानवीय संवेदना तेव्हा शाबूत होती. त्यामुळंच प्रसंगी जीवाला जीव देणारी माणसं अनाहूतपणे उभी रहायची.

आज माणसं स्वत:ला सर्वांपासून तोडून घेतात. स्वत:च्या कोषात, अगदी आतल्या कोषातच राहण्याचा प्रयत्न करतात. रोजच्या धकाधकीच्या जीवनात त्यांना अनेक फसगतीचे, लुबाडणुकीचे अनुभव येतात. समोर येणाऱ्या माणसाच्या आत कोण दडले आहे या आशंकेनं तो सर्वांपासून स्वत:ला वाचवत राहतो. दूरस्थ माणसांप्रमाणे नेहमीच्या सहवासातील माणसांबद्दलही त्याचे मन साशंकच राहते. नात्याची वीण घट्ट होण्याऐवजी कोणत्याही क्षणी मोकळी होईल असे अलग अलग धागे तयार होतात. पण या अस्थिरतेवर मात करायची असेल तर स्वत:च्या कोषातून बाहेर पडून मोकळेपणानं समोरच्या व्यक्तीतला 'माणूस' शोधला पाहिजे. ऋणानुबंध, मग ते कोणतेही असोत, दृढ झाले तरच मनाला दिलासा देणारा आधार निर्माण होणार असतो!


आता मराठीत येत आहे

**'जेम्स बाँड'** चा झंझावात...




फ्रॉम रशिया विथ् लव्ह

लेखक **इयान फ्लेमिंग**

अनुवाद **विजय देवधर**

किंमत : **२५० रु.** सभासदांना : **१७५ रु.**पोस्टेज : **२५ रु.**

**टी बुक क्लबच्या सभासदांना १२५रु.**




अनोखे ऋणानुबंध

# मोहिनी घालणारे केशवराव

**वामन देशपांडे**

साठीच्या टप्प्यावर डोंबिवली हे माझ्या कायम वास्तव्याचे ठिकाण झाले तेव्हा मला प्रथमच जाणवले की, ह्या अभिजात संस्कृतीसंपन्न गावामधून, शाश्वत मूल्यांची जपणूक करणारी नदी दुथडी भरून वाहाते आहे. रसिकता हा ह्या नगरीचा प्राण आहे. ह्या गावाला माणसांची आणि मुख्य म्हणजे माणुसकीची उब लाभलेली आहे. वयाची पहिली साठ वर्षे मुंबईसारख्या महानगरात राहण्याची सवय झालेल्या मला, डोंबिवली सामावून घेईल ना अशी किंचित का होईना परंतु काळजी वाटत होती. अडीच-तीन महिन्यांच्या वास्तव्यावरून माझ्या एक गोष्ट लक्षात आली की, ह्या तीर्थक्षेत्रावर राहायला यायला आपल्याला थोडासा उशीरच झाला. परंतु, ह्याच गावात मला केशवराव कोडियाल नावाचे महान कृष्णभक्त भेटले. ज्ञानदेवांवर निस्सिम प्रेम करणारे परमभक्त भेटले. माझे दुसरे अध्यात्मस्नेही श्री. रमेश जोशी, कोडियालना आमच्या घरी घेऊन आले तो माझ्या आयुष्यातला एक अपूर्व असा भाग्यक्षण ठरला. ना नात्याचा ना गोत्याचा हा कानडी शुद्ध ब्राह्मण माझ्या इवल्याशा हृदयात कधी वास्तव्य करून बसला, माझे मलाच कळले नाही. माझ्या घरापासून हाकेच्या अंतरावर राहणाऱ्या कोडियाल यांनी त्यांच्या निस्सीम प्रेमभक्तीने मला अक्षरश: वेढून टाकले. अवघ्या दीड-दोन महिन्यांच्या आमच्या दोघांच्या मैत्रीने जन्माजन्माचे रहस्य अगदी सहजगत्या उलगडले. माझ्यापेक्षा वयाने दहा वर्षे मोठे असलेल्या ह्या माझ्या नव्या वडील मित्राने निस्सिम प्रेमाची नवी ध्रुवदिशा दाखवली. मैत्रीच्या आनंदाच्या प्रदेशात मी मुक्तपणे वावरू लागलो.

कानडी ही खरी तर माझी मातृभाषा. माझ्या जन्मापूर्वी चार-दोन वर्षे अगोदर माझ्या आई-वडिलांनी कानडी मुलुख सोडला आणि ते मुंबईत कायम वास्तव्यासाठी आले. त्यामुळे मी मराठीतून शिकलो आणि माझी भाषा मराठी झाली. तरीही आई-वडिलांच्या सहवासात मी कानडी बोलू लागलो आणि ती भाषा मला किंचितशी अवगत झाली. कोडियाल आणि माझ्या गाढ मैत्रीतला हा महत्त्वाचा दुवा ठरला, त्याहून महत्त्वाचा दुवा होता तो मात्र ज्ञानेश्वरीचा. पहिल्याच भेटीत माझ्या लक्षात आले की, कोडियाल हे ज्ञानेश्वरांचे परमभक्त आहेत. ज्ञानेश्वरीचा त्यांनी सखोल अभ्यास केला आहे. किंबहुना मी असे म्हणेन की त्यांच्या रक्तातच मुळी ज्ञानेश्वरी प्रेमाच्या अमृतपेशी आहेत. पहिल्या भेटीत त्यांची वाङ्मयीन कुंडली मला जी कळली ती मात्र लोकविलक्षण होती. कानडी भाषेत अभिजात मराठी साहित्य रुपांतरीत करायचे हा त्यांना ध्यास लागला होता. चार-दोन वर्षांच्या अथक प्रयत्नानंतर त्यांनी माऊलीची ज्ञानेश्वरी कानडी भाषेत ओवीबद्ध केली.

त्यातल्या काही ओव्या त्यांनी मला ऐकवल्या तेव्हा मी अवाक्‌च झालो. वाटले, माऊलीच कानडीतून गीतेवर भाष्य करते आहे.

इतके हे रूपांतर अप्रतिम वठले आहे. ह्याची मला आनंद-जाणीव झाली. त्यामुळे की काय, आमच्या प्रगाढ मैत्रीचे धागे घट्ट विणले जाऊ लागले. ह्या मैत्रीच्या सुंदर वळणावर अधिक मास प्रगट झाला. माझ्याच घराच्या हॉलमध्ये महिनाभर भक्तियोगावर माझी प्रवचने सुरू झाली. कोडियाल नित्यनियमाने रोज येऊ लागले. लेखक आणि कवी असणारे कवी कोडियाल कृतीने अतिशय तरल आहेत. प्रेमळ आहेत आणि मुख्य म्हणजे कवीहृदयाचे आहेत हे माझ्या लक्षात आले. मी ज्ञानदेवांच्या भक्तीयोगावर अत्यंत प्रेमाने बोलत असताना माझ्या लक्षात आले की, कोडियाल यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रूंच्या धारा लागल्या आहेत. ते माझा प्रत्येक शब्द आपल्या रसिक ओंजळीत अक्षरश: झेलत होते. दीड तासानंतर प्रवचन संपायचे आणि आमच्या गप्पांना मग सुरुवात व्हायची. विषय फक्त ज्ञानेश्वरीशी निगडीत असायचा. नंतर आम्ही फिरायला बाहेर पडायचो. दीड-दोन तासांच्या भटकंतीत ज्ञानेश्वरीतल्या कितीतरी ओव्यांना आम्ही अक्षरश: स्पर्श करायचो. माझ्या नंतर लक्षात आले की कोडियाल यांनी केवळ ज्ञानेश्वरीच ओवीबद्ध केलेली नाही, तर त्यांनी अमृतानुभव कानडीतून ओवीबद्ध केला आहे. ज्ञानदेवांचे हरिपाठाचे अठ्ठावीस अभंग रुपांतरित केलेले आहेत. सातशे श्लोकांची संस्कृत गीता कानडीतून श्लोकबद्ध केलेली आहे. खरे सांगायचे तर त्यांनी अभिजात साहित्य कानडीतून असे काही प्रगट केलेले आहे की आश्चर्याला जिव्हा फुटाव्यात. मराठी माणूस ज्ञानेश्वरीत रममाण झाला तरी आपल्याला आश्चर्य वाटते. इथे एक कानडी कवी ज्ञानेश्वरीच्या प्रेमात विरघळून गेलेला आहे. किंबहुना मी असे म्हणेन की, ज्ञानेश्वरी हा त्यांचा श्वास झालेला आहे. टेलिफोन कंपनीत उच्चपदस्थ अधिकारी असणाऱ्या कोडियाल यांनी केवळ ज्ञानेश्वरी रुपांतरित करायला पुरेसा वेळ मिळावा म्हणून पाच-सात वर्षे अगोदरच आपल्या नोकरीचा राजिनामा दिला. ज्ञानेश्वरीतच शाश्वत तत्त्वज्ञानात ते इतके मिसळून गेले होते की, ऑफिसमधले वातावरणच त्यांना सहन होईना पैशाचे चालणारे उघड व्यवहार पाहून त्यांचा जीव गुदमरून जायचा. त्याला एकच उपाय होता की, नोकरीचा राजिनामा देऊन माऊलीशी एकरूप व्हायचे. ज्ञानदेवांच्या ओवीतून सांगायचे झाले तर कोडियाल ह्यांचे माऊलीशी नाते कसे आहेत तर,

***पैं दोहीं वोठीं एक बोलणे ।***
***दोहीं चरणीं एक चालणें ।***
***तैसें पुसणेंसांगणें ।***
***तुझे माझें ।।*** – ज्ञानेश्वरी : १५ :४५४ ॥

ओठ दोन परंतु बोलणे एकच, चरण दोन परंतु चालणे एकच. तसे ज्ञानदेव आणि कोडियाल ह्यांचा संवाद आहे. ज्ञानदेवांशी संवाद साधायची आध्यात्मिक ताकद कोडियाल यांना सहजगत्या प्राप्त झालेली आहे हे विशेष.

कोडियाल ह्यांन एकूण चौदा भाषा लिहिता-बोलता येतात. मातृभाषा कानडी आहे. मराठीवर विलक्षण प्रेम आहे. त्यातून महत्त्वाचे म्हणजे त्यांचे इंग्रजीवर जे प्रभुत्व आहे ते वाखाणण्यासारखे आहे. इंग्रजीतला एक लेखक किंवा कवी असा नाही की जो कोडियाल यांनी आत्मसात केलेला नाही. शेक्सपियर आणि शेले-कीटस्-बायरन् - मिल्टन हे त्यांचे आवडते विश्व. कविता मुखोद्‌गत. शेक्स-पियरच्या नाटकातले उतारेच्या उतारे पाठ. बंगालीतल्या रविंद्रनाथ टागोरांवर विशेष प्रेम. संस्कृत अस्खलित बोलतात. संस्कृत कवींचा अभ्यास, मुख्य म्हणजे रामायण-महाभारत मूळ



संस्कृतमधून वाचलेले. प्रगाढ पंडित असलेले कोडियाल मनाने इतके निर्मळ आहेत की, त्यांचे मृदुत्व पाहून आश्चर्य वाटते. आपण कोणी मोठे आहोत हे त्यांच्या गावीसुद्धा नाही. त्यांनी इंग्रजीतून खूप लेखन केलेले आहे. जे. कृष्णमूर्तींसारखी प्रज्ञा प्राप्त झालेले कोडियाल तुमच्या आमच्याशी बोलताना इतक्या साधेपणाने वागतात की, कल्पनाच येत नाही की एक प्रचंड व्यक्तिमत्व आपल्याशी अतिशय प्रेमाने संबंध ठेवून आहे. वयाची साठी ओलांडली तरी त्यांनी स्वत:तले मूलपण जपलेले आहे. ऐकताना उत्सुकता टवटवीत ठेवणारे कोडियाल हे खरे तर फार मोठे आश्चर्य आहे. आमच्या मैत्रीला अवघे दोन-अडीच महिने झाले. परंतु असा क्षण जात नाही की त्यांची आठवण होत नाही. घरी येतात तेव्हा त्यांच्या हातात एक प्लॅस्टिकची बॅग असते. त्यात त्यांचे लेखन असते. ते खूप वेळेला वाचून दाखवतात. वाचतांना त्यांचा अप्रतिम स्वर लागतो. ऐकत रहावेसे वाटते. प्रत्येकाची काळजी घेणारे कोडियाल प्रत्येकाला जीव लावतात ही त्यांची खास बात...

कोडियाल हे एक कुटुंबवत्सल गृहस्थ आहेत. अभिजात वाङ्मय हा त्यांचा श्वास आहे. कानडी हा त्यांचा प्राणबिंदू आहे. मुळात मितभाषी आहेत. परंतु बोलायला लागले की ऐकत बसावे असे वाटते. उन्हाचे चांदणे करण्याची किमया त्यांच्या एकूणच जगण्यात आणि वृत्तीत आहे. मी केवळ वाचनातून अनुभवलेला ऋषीमुनींचा आणि संतांचा सहवास आता कोडियाल यांच्या सहवासात आता प्रत्यक्ष जगतो आहे, ही मजवर आता कृष्णकृपा झाली आहे. त्याची ही इवलीशी कहाणी.

आगामी.. आगामी.. आगामी..

आता लवकरच मराठीत सादर करीत आहोत
रवींद्रनाथ टागोरांच्या
नितांत सुंदर पुस्तकांची मालिका!

या मालिकेतील पहिले पुस्तक

काबुलीवाला आणि इतर कथा

अनुवाद
मृणालिनी गडकरी

किंमत
फक्त १०० रु.

## २००४ मधील काही लोकप्रिय पुस्तके

***कादंबरी***

| | | |
|---|---|---|
| टाइमलाइन : मायकेल क्रायटन | अनुः प्रमोद जोगळेकर | ३६०रु. |
| सीमारेषा | माधवी देसाई | २००रु. |
| काबुलीवाल्याची बंगाली बायको : सुस्मिता बॅनर्जी | अनुः मृणालिनी गडकरी | १००रु. |
| द रेनमेकर : जॉन ग्रिशॅम | अनुः अनिल काळे | ३८०रु. |
| फर्स्ट टु डाय : जेम्स पॅटरसन | अनुः रविंद्र गुर्जर | २००रु. |
| फरासि प्रेमिक (फ्रेंच लव्हर) : तसलिमा नासरिन | अनुः सुप्रिया वकील | २००रु. |
| द गोल्डन रॉन्देव्ह्यू : ॲलिस्टर मॅक्लिन | अनुः अशोक पाध्ये | २००रु. |
| फ्रॉम रशिया विथ लव्ह : इयान फ्लेमिंग | अनुः विजय देवधर | २५०रु. |

***कथा***

| | | |
|---|---|---|
| 'हॅलो मी इन्स्पेक्टर प्रधान बोलतोय' | व. कृ. जोशी | १२०रु. |
| पोलिसकथा | व. कृ. जोशी | १५०रु. |
| भीषण हत्याकांड | व. कृ. जोशी | ९०रु. |
| रक्तदान | व. कृ. जोशी | १३०रु. |
| सामक्षा | सुमेध रिसबूड (वडावाला) | २००रु. |

***ललित***

| | | |
|---|---|---|
| मुखवटे: वि.स.खांडेकर | संपा: डॉ.सुनीलकुमार लवटे | ७०रु. |
| साहित्यिकाचा गाव | आनंद यादव | ९०रु. |
| गोष्टी माणसांच्या : सुधा मूर्ती | अनु.: लीना सोहोनी | १३०रु. |
| रंगल्या रात्री | संकलनः अरुण शेवते | ८०रु. |
| रात्ररंग | संकलनः अरुण शेवते | १८०रु. |
| स्पीड पोस्ट : शोभा डे | अनुः अपर्णा वेलणकर | २५०रु. |
| टेक् २५: भावना सोमय्या | अनुः अंजनी नरवणे | ४००रु. |
| या सुखांनो | सुरेश वसंत नाईक | १७०रु. |

***चरित्रे***

| | | |
|---|---|---|
| थॉट लीडर्स : श्रीनिवास पंडित | अनुः वकील/वाडकर | ३००रु. |
| फिटे अंधाराचे जाळे | भालचंद्र करमरकर | १२०रु. |
| जीवनयात्रा अभिनेता दिग्दर्शक : मा. विनायक | भाई भगत | १५०रु. |
| आधुनिक भारताचे प्रेषित :स्वामी विवेकानंद : गौतम घोष | अनु : माधव मोर्डेकर | १८०रु. |
| इंदिरा : कॅथरिन फ्रॅंक | अनु : लीना सोहोनी | ४००रु. |





**जग आज झपाट्याने बदलत आहे.उदारीकरण आणि जागतिकीकरण.....दूरदर्शन, संगणक, इंटरनेट आणि मोबाईल यांनी परस्पर संपर्कातले सगळे दुरावे निष्प्रभ केले आहेत..... एक नवी सर्वस्पर्शी, सर्वंकष जागतिक संस्कृती आकाराला येत आहे.**

**या नव्या लाटेत आपली भारतीय तरुण पिढी वाहवत जाणार का? या पिढीला आपल्या परंपरागत जीवनमूल्यांची मातब्बरी वाटावी अशी आजची स्थिती आहे का? या नव्या पिढीला हवेहवेसे वाटेल, जपावेसे वाटेल असे काही विचारधन व संचित देण्यासारखे आपल्याजवळ आहे का?**

**...अनेक मान्यवरांनी या संदर्भात केलेले हे आत्मचिंतन.**

# नक्षत्रांचे देणे

**नक्षत्रांचे देणे**

# अजून येतो वास फुलांना

**डॉ.अश्विनी धोंगडे**

समाज आणि शिक्षण यांचा संबंध परस्परावलंबी आणि अत्यंत निकटचा आहे. त्या त्या समाजात होणारी परिवर्तने, तत्कालिन शैक्षणिक पर्यावरणाचा दृश्य परिणाम असू शकतात. किंवा चांगले वा वाईट शैक्षणिक धोरण समाजातील घडामोडींवर अवलंबून असते. अर्थातच शिक्षण माणसे घडविते असे म्हणणे एका मर्यादित अर्थापुरतेच खरे आहे, अन्यथा शिक्षण घेतलेली सर्वच माणसे सुसंस्कारित झाली आहेत असे चित्र दिसले असते. बाहेरच्या जगातील व्यवहार ज्या प्रचंड वेगाने घडत असतात. तितक्या वेगाने शिक्षण व्यक्तीवर प्रभाव टाकू शकत नाही. आजच्या काळात तर शिक्षणावरील विश्वासच डळमळीत व्हावा इतक्या बाह्य जगातील अन्य शक्ती प्रभावित झालेल्या आहेत. अशा वेळी शिक्षणापुढील आव्हानांचा विचार नव्याने करावा लागणं हे एक विचारवंतांपुढे आव्हानच आहे.

स्वराज्य मिळाल्यानंतरही पहिली पंधरावीस वर्षे आणि गेली वीस-पंचवीस वर्षे यात एक प्रचंड मोठी दरी आहे. सुरुवातीच्या काळामध्ये सुशिक्षित तरुण पिढीपुढे स्वातंत्र्यासाठी बलिदान केलेल्या, देशप्रेमासाठी स्वार्थत्याग केलेल्या मागील पिढीचे काही आदर्श होते. साधन शुचिता, व्यावसायिक नीतीमत्ता, जुने संस्कार, भारताला असलेला कला व शिक्षणाचा थोर वारसा, सत्य अहिंसा या तत्त्वांमुळे उंचावलेली जागतिक प्रतिमा, साधेपणातील सौंदर्य, व्यक्तिगत जीवनातील उच्च नीतिमूल्ये अशा काही आदर्शवादी संकल्पना पाठीशी घेऊन तत्कालीन तरुण हा भवितव्यातील एका नव्या, संपन्न, देशाच्या जडणघडणीची स्वप्ने पहात होता. आपण शिक्षणाने समृद्ध असू तर देशाच्या जडणघडणीत काहीतरी खारीचा वाया उचलू शकू असा एक शिक्षणाबद्दलचा दृढ विश्वास तरुणांच्या मनामध्ये पक्का होता, किंबहुना तत्कालिन मध्यमवर्गापुढे असलेल्या सर्व प्रश्नांना 'शिक्षण' हे एकच एक उत्तर होते. **पैसा, प्रतिष्ठा, स्थैर्य, मनाजोगता साथीदार कामातील समाधान हे सर्व मिळविण्याचा राजमार्ग शिक्षणाच्या वाटेतूनच जात होता. शिक्षणाने घडू शकणाऱ्या सर्वंकष विकासाची एक भोळीभाबडी श्रद्धा घेऊन त्या काळचा तरुण हा महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी धडपडत होता, पण हळूहळू आपल्या पायाखालची जमीन सरकते आहे ही कल्पना त्या वेळी कुणालाही आली नाही.**

फाळणीच्या खुणा बुजेपर्यंत पाठोपाठ लढावी लागलेली चीन आणि पाकिस्तान बरोबरची दोन युद्धे, वाढती महागाई, टंचाई, आणि प्रचंड प्रमाणात वाढू लागलेली लोकसंख्या, इथपासूनच श्रद्धांचे बुरुज ढासळायला सुरुवात झाली. शिक्षण घेण्याची संधी लाभणारे आपण अत्यंत कमी प्रमाणात असून देशातील कोट्यवधी जनता ही पिढ्यानुपिढ्या शिक्षणापासून वंचित राहिलेली आहे ही जाणीव सुद्धा नव्यानेच आमच्या पिढीला झाली. अडाणीपणा, दारिद्र्य, अंधश्रद्धा यांची विषारी वेटोळी फक्त त्यांच्या बद्दल असलेल्या सद्भावनेनं सुटत नाहीत ही विदारक जाणीव होऊ लागण्याचा हा काळ होता, आणि त्यांच्याबद्दल कळकळीनं बोलणाऱ्या राजकारण्यांना, समाजधुरिणांना तशी ती सोडवायची नसतातच या कटू वास्तवाची ओळखही होऊ लागली. शाळेतून, महाविद्यालयातून जे नीतिमत्तेचे, देशप्रेमाचे धडे मिळत होते, त्यात आणि बाहेरच्या जगात जमीन-अस्मानाचे अंतर पडू लागले, त्यामुळे हळूहळू नीतिमत्तेबद्दलच संभ्रम निर्माण झाला, दुटप्पी -ढोंगी नीती हाच स्थायीभाव समजण्याइतकी त्याची व्याप्ती मोठी होती. अहिंसेनं स्वातंत्र्य मिळालं असं गुरुजनांकडून ऐकलं, पुस्तकातून वाचलं पण स्वजनांचीच इतकी मोठी हत्याकांडं या तरुण पिढीनं प्रत्यक्षात पाहिली. 'खरं बोल' असं शिकविण्याऱ्या शिक्षकांकडूनच सत्याच्या तोंडाला काळं फासण्याची उदाहरणं तरुण पिढीला पहायला मिळाली. 'आईवडील, गुरुजनांचा मान राखा,' अशी सुभाषिते कानाला गोड वाटली तरी ज्यांचा मान राखायचा त्यांनीच अतिशय अवमान-कारक वर्तन केल्यावर तरुण पिढीनं त्यांचा आदर काय म्हणून करायचा? पैशासाठी शील विकणाऱ्या बायका, पैशासाठी लाचखोरी करणारे नोकरदार, पैशासाठी एकमेकांना गळा कापणारे रक्ताचे नातेवाईक, भ्रष्टाचारी राजकारणी, ढोंगी पुढारी, शाब्दिक फुलोऱ्यावर झुलवत ठेवणारे नेते, गरीबांना अधिक गरीब ठेवणारे आणि श्रीमंतांना अधिक श्रीमंत बनवणारे शासन अशी एकाहून एक वरचढ 'आदर्शवादी' (?) उदाहरणे सतत नजरेसमोर असणाऱ्या पिढीमुळे शिक्षण कोणते आदर्श ठेवणार? शिक्षणक्षेत्रातील तथाकथित महर्षींच्या चारित्र्यालाही कीड लागली तर शिक्षणाचे पावित्र्य काय राहणार? चांगल्या कृत्यांची जीत होते,आणि वाईट कृत्यांना शिक्षा होते असला भाबडा काव्यात्म न्याय या पिढीला कुण्या शिक्षकाने शिकवला तर तो त्याला पटेल काय? त्याच्या सभोवतालचे वास्तव त्याला सांगत आहे की चांगल्या कृत्यांचा पराभव होतो, वाईट कृत्ये करून पैसा मिळवणारी माणसे संभावितासारखी समाजात मिरवतात. दारापुढे संस्कृतीची रांगोळी घालणारी माणसं मागल्यादारी नीतीमत्तेला हरताळ फासत असतात, स्वधर्माचा टेंभा मिरवणारी माणसं पाझर फुटू शकेल अशा दगडापेक्षाही अधिक निर्दय बनू शकतात. माणुसकीला काळीमा लावणारी, जाळपोळीची दहशतवादी कृत्ये करू शकतात. जातीजातीतला अंध विद्वेष विषारी पाण्यासारखा माणसांच्या रक्तात भिनला आहे, त्यामुळे कधी कुणाची किती डोकी फुटतील, रक्ताचे पाट वाहतील काही सांगता येत नाही. एका बाजूला एकवेळचे अन्नसुद्धा ज्यांना पोटभर दिवसाकाठी मिळत नाही अशी दारिद्र्य रेषेखालची, रस्त्यावरचे भणंग आयुष्य जगणारी कोट्यवधी जनता आणि दुसऱ्या बाजूला आकाशाशी स्पर्धा करणाऱ्या उंच इमारतीत पंचतारांकित आलिशान वातानुकूलित जीवन जगणारे मूठभर लोक यांच्यामध्ये लोंबकळणारा प्रचंड मोठा मध्यमवर्ग, जो उच्चवर्गात जाण्याची धडपड आयुष्यभर करत मरतो, ज्याचं सगळं आयुष्य हेच लोकलमधली प्रचंड धक्काबुक्की

आहे, रोजचं जीवन हीच एक लढाई आहे, भिंतीवर चढणाऱ्या जाळ्यासारखं दोन इंच वर आणि चार इंच खाली अशी ज्याची धडपड दिवसरात्र चालू आहे, टिचभर जागा स्वत:च्या नावे होण्यासाठी लाखो रुपयाच्या कर्जात जो उभा जन्म बुडतो, मुलाला उच्च शिक्षण देण्यासाठी रेसच्या घोड्यावर पैसा लावावा तसा तो लाखो रुपये फी भरायला मुकाट तयार होतो. असले हे भोवतालचे जग तरुण पिढी पाहते त्यावेळी 'आपण भविष्यात कुठे असू' अशा गरगरत्या विचाराने ती भोवंडून जाते. शिक्षणाशी फारकत घेतलेली माणसे पिढ्यानुपिढ्या पुरेल एवढा पैसा जमा करतात, समाजात प्रतिष्ठा, मानमरातब मिळवतात, पैसा हेच शेवटी यशाचे मोजमाप मानले जाते हे जेव्हा आजचा विद्यार्थी पाहतो तेव्हा साहजिकच शिक्षणासाठी आपण आयुष्याची इतकी मौल्यवान वर्षे, आईबापांचा पैसा आणि आपली तेज बुद्धी का खर्च करतो, यापेक्षा जवळच्या रस्त्याने शॉर्टकट मारून झटपट श्रीमंत व्हावे असे त्याला वाटले तर त्यात त्याची काहीही चूक नाही, परीक्षेतील यश पैशाने विकत घेता येते, परीक्षेतील उच्च श्रेणी आणि आयुष्यातील यशस्विता यांचा अर्थाअर्थी काहीही संबंध नाही, तसाच बुद्धिमत्ता आणि परीक्षेतील उच्च श्रेणी यांचाही काही संबंध नाही अशी समीकरणे आता विद्यार्थ्यांचा मनात तयार होत आहेत. तसेच या देशात आपल्या बुद्धिमत्तेला पुरेशी संधी मिळणार नाही तेव्हा पदवी मिळाल्यावर लौकरात लौकर परदेशी जाणे, आणि तेथे संपन्न आयुष्य जगणे हे बुद्धिमान मुलांचे ध्येय बनू लागले आहे. देशप्रेम, राष्ट्रीयता वगैरे शब्द आणि मूल्ये मोडीत निघालेली असून विनोदाचा विषय होत आहेत. एकूणच नव्या पिढीचे आयुष्य इतके बदलले आहे की काय चांगले काय वाईट, काय खरे काय खोटे, काय जातिवंत आणि काय कृत्रिम यांच्या संभ्रमात ही पिढी सापडलेली आहे. जुनी मूल्ये मोडीत निघाली, पण नव्यांची प्रस्थापना झाली नाही, संवेदनाशीलता गंजून बोथट झाली, आपण आपल्यापुरते पहावे, आला क्षण भोगून घ्यावा, अशी स्वयंकेंद्री आणि अस्थिर वृत्ती निर्माण झाली. भ्रमनिरास आणि वैफल्य, चैनी आणि व्यसनात बुडवून टाकावे आणि बिनधास्त जगावे अशी वृत्ती निर्माण झाली. या काळात विद्यार्थ्यांसाठी केलेली माझी एक कविता आठवते, ज्यातली आई या नव्या 'सुंदर' (?) जगात मुलाचे स्वागत करते आहे.

*ठाऊक आहे तू*
*बुद्धिमान निपजशील*
*बुद्धीच्या जोरावर यश*
*खेचीत म्हणशील*
*पण कॅपिटेशन फी नावाचे*
*महाराक्षस महाविद्यालयातही*
*असतील जागोजाग*
*ज्यांच्याशी करता येत नाहीत*
*बुद्धीला दोन हात*
*त्यांच्याशी हात मिळवणी*
*फक्त तेच करतात*
*ज्यांच्या घरी पैशाची*
*काळी झाडे असतात*
*अशा कल्पद्रुमांची*
*उबदार सावली*
*तुझ्यासाठी डोळे मिटून*
*आम्ही विकत घेतली नाही*
*याची सुद्धा क्षमा कर,*
*तुझ्या स्वागतापूर्वी*
*तुझे स्वागत करताना*
*कसले आश्वासन देऊ?*
*इथे खात्री नाही*



*डिग्रीमधून नोकरी येईल याची*
*इथे खात्री नाही*
*प्रेमामागे सुख येईल याची*
*इथे खात्री नाही*
*नीतिशब्दाला अर्थ असेल याची*
*इथे खात्री नाही*
*खरे तर कशाचीच*
*आपण खातो त्या अन्नाची,*
*राहतो त्या घराची*
*श्वास घेतो त्या हवेची,*
*उभे राहतो त्या मातीची*
*आणि ज्याच्याकडे आशेनं पाहतो*
*त्या आभाळाचीही...*

अशा या पुढच्या पिढीचं जीवन इतकं अस्थिर आणि अस्वस्थ कोणी केलं? फुलं कीडतात ते मुळाशी कीड मुरलेली असते म्हणून. आम्ही जे पेरलं त्याचीच फळं आता आम्हाला तरुण पिढीच्या रूपात दिसताहेत. हेच अंधारलेले 'नक्षत्रांचे देणे' आमच्या पुढच्या पिढीला आमच्याकडून मिळालेला वारसा आहे, हे पटायला कठीण असले तरी एक कटू सत्य आहे. या पिढीची भाषा आम्हाला समजत नाही, त्यांच्या आयुष्यातला समस्या आम्हाला सोडवता येत नाहीत, त्यांची सुखदु:खं आम्हाला समजत नाहीत, त्यांची पिढी आम्हाला मूल्यहीन वाटते, हे आमचेही दु:ख आहे. दोन पिढ्यांमधली ही दरी आम्हाला थोडी तरी कमी करता येईल का? थोडक्यात काही विधायक मूल्यांचे संस्कार आम्ही करतो आहोत की नाही?

समाजाच्या दूषित पर्यावरणापासून विद्यार्थ्यांना दूर तर ठेवता येत नाही, पण त्या दूषितपणाची जाणीव तर करून देता येते. आजचा शिक्षक कोणतेही खोटे आशावाद, भुलवणारी स्वप्ने विद्यार्थ्यांना विकत नाही. बाहेरचे जग कसे आहे, गळेकापू स्पर्धा, बेकारी, भ्रष्टाचार यांचे विळखे व्यक्तीच्या गळ्याभोवती कसे पडू लागतात याची यथार्थ जाणीव शिक्षण करून देते. बाहेरच्या जगात नोकरी मिळवणे किती कठीण आहे याची जाणीव असणाऱ्या शिक्षणसंस्था 'कॅम्पस इंटरव्ह्यू' आयोजित करून व्यवसायाभिमुख शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना भवितव्यातली वाट सुलभ करून देतात. शिक्षणाला इतके विविध पंख हल्लीच्या काळात फुटले आहेत की विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या कोणत्याही क्षेत्रात पदवी मिळविण्याची संधी आहे. संगणक, इंटरनेट, मल्टिमिडीया, माहिती तंत्रज्ञान यामधील जागतिक क्रांती जागतिकी-करणाच्या आजच्या काळात आपल्या घरापर्यंत येऊन ठेपली आहे. त्यामुळे शिक्षणाचे आधुनिकी-करण झपाट्याने होऊ लागले, आणि आपले विद्यार्थी पाश्चात्य देशातही खुल्या स्पर्धेत उतरू लागले. महासंगणकाची निर्मिती आणि या क्षेत्रातील तत्सम तंत्रज्ञानातील प्रगती यामुळे आजच्या विद्यार्थ्याचा आत्मविश्वास दुणावला आहे. अमेरिकेसारख्या प्रगत देशात चांगल्या उच्च पदावर भारतीय विद्यार्थ्यांना स्थान मिळाले याचा अर्थ आपल्या कडच्या शिक्षणाचा स्तर उंचावला आहे, आपल्या विद्यार्थ्यांच्या संधीच्या कक्षा रुंदावल्या आहेत,आणि ज्ञान क्षेत्रातली नवनवी आव्हाने पेलण्याची स्फूर्ती त्यांना मिळू लागली आहे. इतर पाश्चात्य देशांच्या गतीशी आणि प्रगतीशी सुसंगत चाल करण्याची शक्ती त्यांना शिक्षणाने दिली आहे.

शिक्षणाची गंगा खेड्यापाड्यातून आणि आदिवासी पाड्यापर्यंत पोचणे ही देखील एक क्रांतीच आहे. आज आर्थिक व सामाजिक स्तरावरील अगदी खालच्यातल्या खालच्या स्तरावरील मुलामुलींनाही शिक्षणाचे आकर्षण

वाटू लागले आहे, शिक्षणाने जीवनमान सुधारते असा विश्वास त्यामागे आहे. अडाणीपणा-दारिद्र्य-अंधश्रद्धा या एकमेकात गुंतलेल्या दुष्टचक्राला यामुळे काही आळा बसेल अशी आशावादी परिस्थिती निर्माण झाली आहे. शासनाकडून निम्नस्तरावरील जातीजमातीच्या प्रथम शिक्षित होऊ बघणाऱ्या पिढीला मिळणाऱ्या आर्थिक सवलती देखील शिक्षणाबद्दलचा उत्साह वाढविणाऱ्या आहेत. मानवी अधिकारांबद्दलची जागरूकता, मुलांच्या अधिकारांची जाणीव, दुर्बल घटकांचे सबलीकरण हे शिक्षणाचे संस्कार देखील रुजू लागले आहेत. पूर्वीच्या काळाप्रमाणे एकच एक मूल्यशिक्षणाचे छत्र सर्वांवर धरण्याचा आग्रह आता व्यवहार्य राहिलेला नाही. समाजातले इतके विभिन्न स्तर आज शिक्षण-प्रवाहात येऊन मिसळू लागले आहेत की त्यांच्या मूल्यांच्या गरजा या देखील विभिन्न आहेत. अशावेळी धर्म जातींमधील सर्व भेद मिटवून टाकत त्यांना ज्ञानाच्या पातळीवर माणूस म्हणून परस्परांशी वागण्याचे शिक्षण अनेक ठिकाणी मिळत आहे. खरं म्हणजे तरुण वयातील मुले इतकी संवेदनाशील असतात की आजही चांगल्या गोष्टींवर त्यांचा विश्वास बसतो, आदर्शांचे अनुकरण करावे असे त्यांनाही वाटते, फक्त असे चांगले आदर्श त्यांच्यापुढे ठेवायला आम्ही कमी पडतो. ज्या समाजातून आपण वर आलो त्या समाजासाठी आपण काहीतरी करावे अशी सुप्त भावना त्यांच्या मनात असतेच, त्याला योग्य वाट करून दिली तर काही भरीव कार्य विद्यार्थी करू शकतात. अगदी सामान्य परिस्थितीतून वर आलेले आय.ए.एस अधिकारी उत्तम कार्यक्षम प्रशासक बनतात ते केवळ मिळवलेल्या ज्ञानावर नव्हे, तर शिक्षणामुळे झालेल्या संस्कारातून त्यांना हे बळ मिळते. ज्या लोकाभिमुख योजना पूर्ण करायला शासनाचे हात अपुरे पडतात, तेथे आज अनेक बिनसरकारी संस्था (NGOs) पुढे आलेल्या दिसतात. आदिवासींसाठी काम करणारी माणसे, स्त्रियांसाठी काम करणाऱ्या अनेक संस्था, खेडोपाडी साक्षरता प्रसार करणारे कार्यकर्ते, आरोग्याच्या सवयींसाठी झटणारे डॉक्टर्स ही मंडळी संस्थेनं कमी असली तरी आज मोलाचं काम समाजसेवेच्या भावनेनं करत आहेत. हे नक्षत्रांचं पीक ओल्या जमिनीत कधीतरी पेरलेल्या संस्कारामुळेच तरारून वाढते आहे.

शिक्षण हा पेशा न राहता धंदा झाला आहे असे म्हटले तरी आजही याच क्षेत्रात आपल्या उदाहरणाने विद्यार्थ्यांपुढे आदर्श घालून देणारे ऋषितुल्य गुरू अजूनही आहेत. संपूर्ण आयुष्य ज्ञानाच्या साधनेत व्यतीत करून आयुष्यभर छात्रवृत्ती बाळगणारे असे प्राध्यापक आपल्या वागण्यानेच विद्यार्थ्यांपुढे आदर्श निर्माण करत असतात. माहितीचा विस्फोट आणि शिक्षणाचे व्यापारीकरण यांच्या कोलहलात असे ज्ञानाची कावड वाहणारे प्रवाह गाजावाजा न करता काम करत असतात. शिक्षण क्षेत्राला असलेले थोडेफार पावित्र्य अशा हिरव्यागार बेटांमुळेच अजून शिल्लक आहे. विद्यार्थ्यांची सामाजिक मानसिकता विधायक दिशेने घडविणाऱ्या प्राध्यापकांचा आणखी एक वर्ग आहे. केवळ राष्ट्रीय सेवा योजनेपुरते त्यांचे कार्य मर्यादित नसते. विद्यार्थ्यांची सांस्कृतिक मूल्ये, तत्वे, धारणा यांचे संस्करण, संवर्धन, प्रसार हा हेतू मनात धरून अशी कामे सहजपणे बिनबोभाट चालू असतात, मग ती चर्चा, वादविवादांच्या स्वरूपात असेल, सांस्कृतिक कार्यक्रमस्वरूपात असेल, प्रत्यक्ष समाजात मिसळून केली जाणारी कृती असेल अगर रक्तदान शिबिरे असतील. शारीरिक श्रमांपासून तो वैचारिक श्रमांपर्यंत अशा उत्स्फूर्त कामासाठी



विद्यार्थी मोठ्या संख्येनं केव्हाही सहभागी होण्यासाठी तयार असतात. तरुणांच्या उत्साहाला योग्य दिशांनी वाहू देण्याचे कार्य करायला आम्हीच कोठेतरी कमी पडतो. जातीधर्माच्या विद्वेषापलिकडची मैत्री हा या वयात केलेला संस्कार खरे तर चांगला टिकतो, पण महाविद्यालया-पलिकडच्या जगातल्या घडामोडी या मैत्रीत जातीधर्माच्या द्वेषाची बीजे पेरत राहतात. **भाषा, साहित्य आणि सामाजिक शास्त्रांचा अभ्यास हा नेहमीच चांगली माणसं घडविण्याच्या संस्कारांचे शिक्षण देत असतो. साहित्याभ्यासाने संवेदन-शीलता आणि साहिष्णुता वाढते, माणसं अधिक चांगल्यारीतीनं समजून घेण्याची क्षमता निर्माण होते. माणसामाणसातील दरी कमी करण्याचं संवादशास्त्र हे एक चांगलं माध्यम आहे.** मानसशास्त्र, इतिहास हे विषय केवळ तटस्थपणे तात्विक भूमिका मांडत नसतात, व्यक्ती, समाज, देश यांच्या स्वास्थ्याबद्दलच्या विधायक दिशा चांगले शिक्षक यातूनच सहज देत असतात. विषय कोणताही असो, विद्यार्थ्यांच्या विचारांना इष्ट वळण देण्याची भूमिका- अगदी गणिताचा शिक्षकसुद्धा निभावू शकतो, आणि असे शिक्षक आजही शिक्षणक्षेत्रात आहेत. अजूनही अंधारून आले असे वाटत असताना प्रकाशाचे काही दिवे आपल्या भोवतीचा अंधार उजळवताना दिसत आहेत.

व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पना हा देखील आजच्याच शिक्षणाचा एक संस्कार आहे. पूर्वीच्या पिढीच्या मानाने आजचा विद्यार्थी अधिक स्व-तंत्र, मुक्त आणि आत्मनिर्भर आहे, आपल्या आयुष्याबद्दलचे निर्णय आपले आपण घेण्याची क्षमता त्याच्यात आहे. शिक्षणासाठी, विशेषतः उच्च शिक्षणासाठी पूर्वीपेक्षा जास्त वर्षे खर्च करण्याची तयारी, स्पर्धेत टिकून राहण्यासाठी रात्रंदिवस परिश्रम करण्याची धडपड आणि उच्च शिक्षणामुळे पुढे सेवेच्या चांगल्या संधी चालून येतील यावरील विश्वास आजच्या विद्यार्थ्यांच्या मनात आहे. त्याला खतपाणी घालून त्याची जिद्द टिकवून ठेवण्याचे काम शिक्षक करत असतात. आत्मविश्वास आणि आत्मविकासाची प्रेरणा यांचे बीजारोपण शिक्षणातून झाल्याशिवाय इतक्या निष्ठेने विद्यार्थी अभ्यास करणार नाहीत.

स्त्री-पुरुष समानता ही आजच्या काळाची गरज. स्त्रिया आज मोठ्या प्रमाणावर शिक्षण घेऊ लागल्यामुळे साहजिकच मुलांमुलींमध्ये एक निरोगी स्पर्धा सतत चालू असते. पिढीजात संस्कारांमुळे मुलग्यांना अजूनही आपण स्त्रीपेक्षा वरचढ आहोत अशी एक अहंगंडाची भावना असते, तर स्त्रियाही स्वत:ला कमीपणा घेताना दिसतात. बौद्धिक, शारीरिक, सांस्कृतिक दृष्ट्या स्त्री पुरुषापेक्षा कोणत्याही बाबतीत कमी नाही, कोणतीही आव्हानात्मक क्षेत्रे स्त्रीदेखील काबीज करू शकते आणि आपल्या अंगातील क्षमतांचा पूर्ण विकास करून आपल्या आवडीच्या क्षेत्रामध्ये काम करण्याचा स्त्रीला पुरुषाइतकाच अधिकार आहे, हे समाजाला बजावून सांगण्याचे सर्वात मोठे योगदान आजच्या शिक्षणाचे आहे. समाजातील स्त्री-पुरुष विषमता, स्त्रियांच्या सौंदर्याचे बाजारीकरण, शारीरिक शोषण आणि स्त्रियांना आलेले वस्तूपण सोडून देऊन स्त्रीला मनुष्य बनवायचे असेल तर आज शिक्षणाइतके दुसरे कोणतेही सबळ साधन आपल्याकडे नाही. प्रत्येक विद्यापीठात सुरू झालेले स्त्री-विषयक अभ्यासक्रम आणि स्त्रियांची शिक्षणक्षेत्रातील गुणात्मक प्रगती आणि वाढती संख्या हे समानतेच्या वाटचालीतले पहिले पाऊल आहे. परिवर्तनाचा विचार रूजणं ही सुधारणेच्या वाटेकडे नेणारी पाऊलवाट आहे.

संस्कार ही काही देण्याघेण्याची वस्तू नाही. जे चांगले आहे ते नेहमी दुसऱ्या पिढीत झिरपतेच. आणि अशी क्रिया सतत चालू असते म्हणूनच शिक्षण समाजात आपले वर्चस्व टिकवून ठेवू शकते, 'नक्षत्रांचे देणे' देणारी पिढी अजूनही अस्तित्वात आहे. 'अजून येतो वास फुलांना' तसे अजूनही समाजात नीति-मत्ता टिकून आहे, अजून ही चांगल्या विधायक मार्गानेच नाकासमोर जाणारी माणसे आहेत, अजूनही पैशापेक्षा माणुसकीला श्रेष्ठ मानणारी काही माणसे आहेत, अजून दयाक्षमा शांती या शब्दांचे अर्थ कृतीत उतरवणारे महात्मे आहेत, म्हणून हे जग जगण्यालायक आहे. अशा निष्ठा-वान मंडळींची मांदियाळी शिक्षणाने निर्माण व्हावी हेच पसायदान या निमित्ताने मागणे उचित ठरावे.

### डॉ. अश्विनी धोंगडे यांचा अल्प परिचय

पत्ता : शरव्य, ४७, स्वेदगंगा सोसा. वारजे, पुणे- ५२


शिक्षण : एम् . ए. (इंग्रजी)

नोकरी : पुणे येथील एस् . एन. डी. टी. महाविद्यालयात १९७० पासून इंग्रजीचे अध्यापन. १९९२ पासून प्राचार्यपद.

लेखन : पाषाणपुरुष, स्पर्श, होरपळ, जस्मीन या कादंबऱ्या, मनस्वी हा कथासंग्रह,स्त्रीसूक्त, अन्वय, अपौरुषेय हे कवितासंग्रह, वर्तमान हा ललितलेखसंग्रह,मराठी भाषा आणि शैली, स्त्रीवादी समिक्षा हे समीक्षात्मक लेखन,देशांतर हे प्रवासवर्णन व बालकुमारासाठी कथा व एकांकिका प्रसिद्ध. महाराष्ट्र शासन राज्यपुरस्कार, गदिमा पुरस्कार, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचा साहित्य पुरस्कार, उत्कृष्ट समीक्षेसाठीचा महाबँक पुरस्कार,बंधुता प्रतिष्ठानचा प्रेरणा पुरस्कार, शारदा पुरस्कार असे अनेक प्रतिष्ठेचे पुरस्कार प्राप्त.

कार्य : संपूर्ण महाराष्ट्रामध्ये महाविद्यालये, सार्वजनिक संस्था, स्त्रियांची मंडळे यामध्ये स्त्रियांचे प्रश्न व स्त्रियांचा दर्जा या संबधित विषयांवर सुमारे २००हून अधिक व्याख्याने. महाविद्यालयीन विद्यार्थिनींसाठी स्त्रियांच्या सबलीकरणासाठी विशेष प्रयत्न व्याख्यानमाला व अन्य उपक्रम.


सामाजिक प्रश्नांवर तळमळीने केलेले लेखन



**वाइज अँड अदरवाइज**
सुधा मूर्ती अनु. लीना सोहोनी
किंमत : १५० रु.
सभासदांना : १०५ रु.
पोस्टेज : २० रु.

**प्रहार**
प्रकाश पोहरे
किंमत : १५० रु.
सभासदांना : १०५ रु.
पोस्टेज : २० रु.






# नक्षत्रांचे देणे

## चला देऊ त्यांना सोनेरी बालपण अन् उज्ज्वल भविष्यही

**डॉ.सुनीलकुमार लवटे**

काळ अनंत खरा! सतत फिरणाऱ्या कालचक्राच्या फेऱ्यात पिढ्या येतात नि जातात. उरतं ते त्यांनी दिलेलं पाथेय, देणं. प्रत्येक नवी पिढी जुन्यांच्या खांद्यावर उभी असते. त्यामुळे प्रत्येक नव्या पिढीस पूर्वसुरींच्या तुलनेनं अधिक दूरचं, अधिक भव्य, उज्वल दिसत असतं खरं! म्हणून तर दरएक नवी पिढी जुन्यांची उतराई असते. पण अविस्मरणीय 'नक्षत्रांचं देणं' साऱ्यांना लाभतं असं नाही. माणसांचे विचार, आचार, धर्म सकारात्मक असले पाहिजे हे खरं आहे. पण असं भरभरून मिळण्याचं भाग्य न लाभलेलाही एक वर्ग समाजात असतो, आहे. सारा आसमंत दीपावलीनं उजळून, उसळून निघत असताना काही पणत्या, काही दिवे आपली लुकलुक वादळ, वारे, आघात सोसत टिकवण्याचा जिवघेणा प्रयत्न करत असतात. त्या दिव्या-पणत्यांत अधिक तेल ओतायची गरज असते. त्यांच्या जीवनाची वात नेहमीच्या तुरळक वातीपेक्षा मजबूत वळायची गरज असते. अन् शिवाय या दिव्यांभोवती मित्रांनो तो 'विम्याचा हात' धरणं ही अनिवार्य असतं... ज्योत विझू नये, बुजू नये म्हणून!

आपला समाजधर्मच मुळी असा आहे की तो मिळालेल्यासच अधिक कसं मिळेल याचा विचार करतो. मला हे मान्य आहे की पिढी-दर-पिढीगणिक अधिक उन्नत, प्रगत ते मिळायला हवं. पण विकासाचं वर्तुळ आपण किती दिवस असलेल्यांनीच भरत राहणार? नसलेल्यांनी किती दिवस परिघाभोवतीच फिरत रहायचं हा कळीचा मुद्दा आहे. आपल्या समाजात 'आहे रे' आणि 'नाही रें'ची लढाई तशी पुरातनच म्हणायला हवी. मधल्या काळात स्वातंत्र्यानंतर दलित केंद्रस्थानी आले. त्यांना घटनेचं पाठबळ मिळालं. शिवाय स्वातंत्र्याच्या गेल्या सत्तावन वर्षांच्या प्रवासात त्यांना राजकीय वरदहस्तही लाभला. ते परिघावरून, त्रिज्ज्येवर आले. आर्थिक स्थिती, शैक्षणिक प्रगती, समाजमान्यता, स्थैर्य, आरक्षण, विविध सोयी-सवलतींची खैरात यामुळे हा वर्ग जागृत, संघटित होऊन रोज आक्रमक होत प्रस्थापितांच्या पंक्तीत मांडीस मांडी लावून बसण्यास सज्ज झाला आहे.

परंतु स्वातंत्र्यानंतरच्या गेल्या ५७ वर्षांच्या विकास काळात अनाथ, निराधार, अंध, अपंग, मतिमंद, आपद्ग्रस्तांची अपत्ये, बालगुन्हेगार, बालमजूर, अनौरस, दुभंगलेल्या कुटुंबातील मुले, परित्यक्ता, कुमारीमाता, हुंडाबळी,अल्पवयीन वेश्या, देवदासी यांचा एक मोठा गट अजून परिघावरच घुटमळतो आहे. स्वातंत्र्यकाळात आपल्या देशाने यांच्यासाठी अनेक सामाजिक कायदे केले. जुने कालबाह्य कायदे सुधारले. नव्या योजना, संस्था सुरू केल्या. त्यातही

काळाच्या ओघात सुधारणा घडवून आणल्या. त्यांच्यासाठी बरंच काही केलं तरी बरंच करायचं राहून गेलंय. इतरेजनांना 'नक्षत्रांचं देणं' लाभलं. त्या मानानं या वंचित वर्गाला, विश्वाला कमी मिळालं. आपण अजूनही जात, धर्म इ. निकषांवरच अल्पसंख्यकत्व ठरवतो. आपल्या कल्याण नि विकासाच्या योजनाही याच निकषावर ठरतात. आपली सारी राजकीय खेळी व धोरणे अजूनही धर्म नि जातीच्या चक्रात फिरत आहे. धर्मनिरपेक्ष राष्ट्र म्हणून आपण आपल्या देशाचा विकास केलाच नाही. भारतासारख्या गरीब देशात खरं तर साऱ्या सोयी, सवलती, शिष्यवृत्त्या, आरक्षणे ही आर्थिक मागासलेपणा, निराधारत्व, सामाजिक न्याय इ. तत्त्वांवर निश्चित व्हायला हवी. पण आपण त्याबद्दल मन लावायला (To apply the mind) प्राथमिक विचार करायलाही तयार नाही. याचं कारण आपल्या प्रस्थापित मनाला वंचितांच्या खऱ्या दुःखांची जाण नाही. आपण एका अर्थानी असहिष्णूच राहिलो आहोत नि म्हणून वंचितांचे विश्व नक्षत्रांच्या देण्यास पारखं राहिलं आहे. निदान या वर्गाच्या बाबतीत तरी अधिक देणं, विचार करणं घडलं नाही. ज्यांच्या किमान अपेक्षां-बद्दलच अद्याप ब्र काढला गेला नाही त्यांना कमाल, सकारात्मक, होकारार्थी, अधिक हे सारे प्रस्थापितांचे चोचले असलेले शब्द म्हणजे आज तरी चैन आहे, विलास आहे खरा. असलेल्यांना अधिक देण्याचा होकारार्थी विचार करण्यापूर्वी नसलेल्यांना प्राधान्याने देण्याचा विचार व्हायला समाजाच्या विषम वाटणी व विकासाचं दुष्टचक्र रोखायचं तर समतेची, समरसतेची संवेदना जागृत व्हायला हवी. यादृष्टीनं वंचितांना अधिक काय 'नक्षत्रांचं देणं' देता येईल याचा विचार व्हायला हवा.

समाजातील वंचित अनाथाश्रम, बालकाश्रम, बालसदन, निरीक्षणगृह, अनुरक्षणगृह, पाळणाघर, अल्पकालिक निवासगृहे, वृद्धाश्रम, अपंगालय सदृश संस्थांत दिवस कंठत आहेत. या संस्थांना अपेक्षित दर्जा व तत्त्वे (Desirable Standards and Principles) अद्याप निश्चित करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे त्या संस्थांत किमान सुविधांचा अभाव आहे. वंचितांच्या एकाच गटासाठी अनेक प्रकारच्या योजना आहेत. योजनांतून दिल्या जाणाऱ्या सोयी-सवलतींमध्ये विसंगती, वैविध्य व विषमता आहे. काही योजना तर अशा आहेत की त्यांत कर्मचारी वर्गाची तरतूदच नाही. आपल्याकडे सगळे सामाजिक कायदे तोकडे आहेत. कायद्यातच सुविधांची तरतूद करण्याचा आपल्याकडे प्रघात नाही. जपान, सिंगापूरसारखे देश याबाबत फारच प्रगत आहेत असे तिथे भेट देताना माझ्या लक्षात आले आहे. संस्था, क्षेत्रफळ, लाभार्थी संख्या, कर्मचारी वर्ग, अनुदान, पोषण खर्च, देखभाल खर्च इ. संदर्भात राष्ट्रीय मानके (National Standards) निश्चित करणे आवश्यक आहेत. संस्थाश्रयी वंचितांचे विश्व कसे असते ते समाजातील प्रस्थापित, सधन व सुखी वर्गानी समजून घ्यायला हवे. त्यासाठी आता आपल्या शालेय पाठ्यक्रमात समाज शिक्षणाचा अभ्यासक्रम अनिवार्य करायला हवा. सामाजिक स्वयंसेवी संस्थांनी समाज भावसाक्षर व्हावा, समाजातील वंचितांचे विश्व समजून देण्यासाठी विशेष संवेदन सभा, मेळावे, भाषणे योजायला हवीत. अशा अनेकविध उपक्रमांतून 'आहेरे' वर्गानी 'नाहीरे' वर्गास समजून घ्यायला हवं. असं झालं तर मग त्यांना आपण किती सुखी आहोत, नक्षत्रांचा सडा आपल्या अंगणी बरसत असताना, आपण अल्प दुःख गोंजारत उगीच अधिकची अपेक्षा करतो याची जाणीव झाल्याशिवाय रहाणार नाही.



अनाथ मुलांच्या अंगणात सूर्याचं कोवळं किरणही अजून पोहोचलेलं नाही. जगानं बालक हक्कांचा जाहीरनामा मंजूर केलाय. भारताने पण तो स्वीकारला आहे. त्यात मुलांना नाव, पालक, राष्ट्रीयत्व, मनोरंजन, आरोग्य, शिक्षण, आहार मिळण्याचा हक्क आहे. अनाथाश्रमातील मुलांना अजून पूर्ण नाव मिळत नाही. निधर्मी भारतात अजून जात, धर्माचे रकाने रजिस्टर, दाखले, फॉर्म्स इ. वर भरणे अनिवार्य असल्यासारखी स्थिती आहे. या मुलांचे हे रकाने नेहमीच रिकामे रहातात. परिणामी त्यांना ना शैक्षणिक सोयी-सवलती ना नोकरीत आकर्षण. परिणामी ही मुलं जन्मभर वणवणत रहातात. प्रत्येक अनाथ बालकाच्या सर्वंकष व संपूर्ण विकास, पुनर्वसनाचा कार्यक्रम देशानं देणं हेच खरं नक्षत्रांचं देणं नाही का? अनाथांचा अंत्योदय होण्यासाठी अनाथाश्रम सदृश्य संस्थांत सोयी-सुविधांची रेलचेल हवी. त्या संस्था भौतिक व भावनिक दोन्ही दृष्टींनी समृद्ध व्हायला हव्यात. सामाजिक न्यायाच्या तत्त्वावर प्रत्येक कल्याणकारी योजनेचे अनाथ हे पहिले लाभार्थी भागिदार बनायला हवेत. त्यांना पूर्ण नाव मिळायला हवं. ते शिकतील तेवढे शिक्षण मोफत हवे. नोकरीत प्रथम प्राधान्य हवं. विवाह, घरबांधणी इ. योजनांचेही ते हक्कदार व्हायला हवेत.

कुमारीमाता, देवदासी, वेश्या, परित्यक्ता, विधवा, वृद्धा इ. समाजातील वंचित, उपेक्षित माता, भगिनींचे दुःख आजही कुंती, शकुंतला, गांधारी, देवकी, यशोधरा इत्यादींना हरवणारं, लाजवणारं आहे. जगात कुमारीमाता सन्मानाने आपल्या अनौरस अपत्यास घेऊन जीवन जगत मध्यप्रवाहात येतात. आपण अजून अशी सामाजिक प्रगल्भता दाखवत नाही. कुमारीमातांना आर्थिक स्वावलंबन देण्यावर भर हवा. व्यवसायातून मुक्त होऊ इच्छिणाऱ्या वेश्यांना आपण अद्याप समर्थ पर्याय उभे केले नाहीत. देवदासी प्रश्नावर बऱ्यापैकी जागृती झाल्याने ती प्रथा उच्चाटनाच्या मार्गावर आहे. तसे वेश्यांबाबत, किमानपक्षी अल्पवयीन वेश्यांबाबत घडायला हवं. घटस्फोटित महिलांविषयीचे कायदे सदोष आहेत. ते पुरुषी मानसिकतेत गुंतलेले आहेत. कुटुंब न्यायालये अधिक मजबूत झाली व पोलिस यंत्रणा सक्षम झाली तर परित्यक्तांना लवकर न्याय देणे शक्य होईल. त्यांच्यासाठीच्या अल्पकालिक निवासगृहांचा सुमार दर्जा उंचावणे आता काळाची गरज व आव्हान बनत आहे. महिला मंडळे, संघटना, महिला लोकप्रतिनिधी, महिला-दक्षता समिती, महिला व बालकल्याण समिती, महिला आयोग इत्यादींनी याबाबत सरकारला धारेवर धरायला हवे.

अपंगालय, अपंग वसतिगृहे इ. मध्ये ही केवळ निवास, भोजन, शिक्षण सुविधा देऊन आपण समाधान मानत आलो आहोत. या क्षेत्रात कार्य करणाऱ्या सरकारी संस्थांचा दर्जा सुमार आहे. खरं तर वंचित विकासाच्या क्षेत्रातून शासनाने संस्थात्मक कार्याच्या व्यापातून निवृत्त व्हायची वेळ येऊन ठेपली आहे. स्वयंसेवी संस्थांच्या पातळीवर आज जे वंचित विकासाचे कार्य सुरू आहे त्याचा दर्जा उंचावण्यासाठी नियंत्रक मानके, त्यांचे निरीक्षण, नियंत्रण करणारी एखादी स्वायत्त संस्था विकसित झाली तरच आपल्याकडचे कल्याणकारी कार्य लाभार्थी केंद्रीत होईल. आज बहुसंख्य कल्याणकारी संस्था अनुदान उपटणाऱ्या, आप्तेष्टांची वर्णी लावणाऱ्या, भ्रष्टाचारी झाल्या आहेत. अपंगांच्या निवासी संस्था उपचार सुविधांसह समृद्ध असायला हव्यात. सर्व सार्वजनिक संस्थांत अपंगांना सुलभ प्रवेश करता

येईल अशा सोयी करणे अनिवार्य करायला हवे. शाळा, महाविद्यालयातून तर आता हे प्राधन्यक्रमाने पहाणे अशासाठी गरजेचे आहे की आता अपंगांचे शिक्षणप्रमाण वाढत आहे. अपंगांसाठी असलेल्या शिक्षणातील आरक्षणावर अंमल झाला पण नोकरीतील आरक्षण अद्याप प्रलंबित निप्रतीक्षीत आहे. त्यासाठी राजकीय जागृती व इच्छाशक्तीचा अभाव हा चिंतेचा विषय आहे. पोलिओ प्लस इतकच हे महत्त्वाचं आहे. पोलिओ प्लस व नोकरीतील अपंगांच्या अनुशेषाची पूर्तता असा समांतर कार्यक्रम आखून त्याची कार्यक्षम अमंलबजावणी झाली तर राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या स्वप्नातील समर्थ भारत इ. २०२० पर्यंत साकारेल. अपंगांच्या संदर्भातील ही नक्षत्रांची बरसात मृगजळ ठरता कामा नये.

अपंगमती व गतिमंद बालकांसाठी आपण फार जुजबी काम केलं. आपण मतिमंद बालकांच्या विशेष शाळा सुरू केल्या. या प्रश्नाविषयी आता पालक बऱ्यापैकी सजग झाले आहेत. त्यांच्यासाठीच्या निवासीशाळा सुरू करण्यास आता प्राधान्य द्यायला हवे. विशेष शाळांना जोडून उपचार, चिकित्सा केंद्रे विकसित करायला हवीत. अशा शाळांतून कौशल्य धारण करणाऱ्या मुला-मुलींना विनाव्याज भांडवल पुरवून त्यांना आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी केलं पाहिजे. त्यांच्या विवाह संबंधी गरजांकडे प्राधान्याने लक्ष देऊन सहयोगी जीवन (Companion life) वैवाहिक जीवनाचे पर्याय देण्यावर भविष्यकाळात भर द्यायला हवा.

अलिकडे मोठ्या शहरातून गतिमंद बालकांसाठी (Scholastic Backward Children) विशेष शाळा सुरू होताहेत हे समाजाच्या प्रगल्भतेचे व प्रगतीचेच लक्षण म्हणायला हवे. वेडी मुले, मतिमंद मुले, गतिमंद मुले, बहुविकलांग मुले, सीमारेषेवरील मतिमंद, मंगोल्स असे किती सूक्ष्म प्रकार समाजाच्या लक्षात येऊन त्या बालकांच्या विविध गरजा, क्षमता, उपचार, विकास, चिकित्सा सुविधांबद्दल पुरेशी साक्षरता समाजात वाढत आहे. त्या अनुषंगाने शाळा व समाजसंस्थेत बदल झाले तर या निरागस बालकांचे अपराधी व दुय्यम दर्जाचे नागरिक म्हणून जगणे कमी होईल.

अंधांच्या शिक्षणाबाबत स्वतंत्र ब्रेल स्कूल्स अद्याप आपणाकडे विकसित झाली नाहीत. त्यांच्या निवासी संस्थांचा दर्जा सुधारणेस भरपूर वाव असल्याचे दिसून येते. प्रत्येक जिल्ह्यात निवासी ब्रेल स्कूल उपचार, चिकित्सेसह सुरू करण्याचा कार्यक्रम सुरू झाला तरच आपला 'राष्ट्रीय अंधत्व निवारण कार्यक्रम' यशस्वी होईल. अंध मुलींसाठीही जिल्हा पातळीवर अशा स्वतंत्र संस्था सुरू व्हायला हव्यात.

असे झाले तरच वंचित बालकांना आपण त्यांचे सोनेरी बालपण व उज्वल भविष्य दिले असे होईल. आपण समाजातील सनाथ, समर्थ, संपन्न बालकांना सकारात्मक विचारातून त्यांच्या उज्वल उद्यासाठीच्या नक्षत्रांच्या देण्याचा विचार करत असताना मला गॅब्रिअल ग्रिस्टल या कवीची कविता आठवते. आपण 'उद्याचा' विचार करताना हे लक्षात ठेवलं पाहिजे की आपल्या समाजात अशी वंचित बालके आहेत की त्यांच्या जीवनात अजूनही आजची पहाटही झालेली नाही. तो कवी म्हणतो -

*आपणास बऱ्याच गोष्टींची गरज असली तरी*
*आपण थांबू शकतो पण मुलं नाहीत.*
*हीच नेमकी वेळ अशी आहे की*
*त्यांची हाडं आकार घेताहेत,*
*रक्त त्यांचं आत्ता कुठं वाहू लागलय,आणि*
*त्याची समज विकास पावू लागलीय*
*'उद्या' हे उत्तर असूच शकत नाही*
*कारण त्यांचं नाव 'आज' आहे.*

## डॉ. सुनीलकुमार लवटे यांचा अल्प परिचय

पत्ता : 'निशांकुर' रणनवरे वसाहत, राजीव गांधी रिंग रस्ता, सुर्वेनगरजवळ, कोल्हापूर - ४१६००७


शिक्षण : एम् . ए. पिएच् डी (हिंदी)

नोकरी : महावीर महाविद्यालय,कोल्हापूर येथे प्रपाठक व हिंदी विभाग प्रमुख

लेखन : हिंदी व मराठी साहित्यात विपुल प्रमाणात लेखन, अनुवाद, संपादन, व संशोधनकार्य. हिंदी साहित्य अकादमीचा अनंत गोपाळ शेवडे पुरस्कार, हिंदी लेखनासाठी दोन राष्ट्रीय पुरस्कार असे अनेक पुरस्कार व सन्मान प्राप्त. शिवाजी विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर स्मृति संग्रहालयाचे अध्यक्षपद.

कार्य : बालकल्याण संकूल कोल्हापूर या संस्थेच्या विकासामध्ये सिंहाचा वाटा. बालकल्याणाच्या क्षेत्रात दोन दशके निरंतर कार्य. या कार्याची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल. सामाजिक कार्यपाहणीसाठी युरोप व आशिया खंडातील सुमारे १५ देशात अभ्यास दौरा. अनाथ मुलांचे जीवन स्वत: अनुभवले असल्याने अत्यंत तळमळीने वंचित विकासासाठी केलेले व करीत असलेले भरीव कार्य. सामाजिक कार्यासाठी 'कोल्हापूरभूषण' पुरस्कार.


**परिस्थितीवर वर्चस्व गाजवणाऱ्या दुर्दम्य जिद्दीचं दर्शन घडवणारी पुस्तके**




**चाकाची खुर्ची**
नसीमा हुरजूक
किंमत : **१८० रु.**
सभासदांना : **१२६ रु.**
पोस्टेज : **२५ रु.**

**फिटे अंधाराचे जाळे**
भालचंद्र करमरकर
किंमत : **१२० रु.**
सभासदांना : **८५ रु.**
पोस्टेज : **२० रु.**



नक्षत्रांचे देणे

# 'विद्यार्थी' नावाची चैतन्य-शक्ती

**प्रा. डॉ. श्यामा घोणसे**

'नक्षत्रांचे देणे' हा विषय आणि त्यामागील संकल्पना ऐकत असताना मनात अनेक गोष्टींनी गर्दी केलेली आहे. शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांना 'घडवित' असताना (?) आपणच किती तऱ्हेने घडत जातो, हे गेल्या २०-२२ वर्षात मी सातत्याने अनुभवत आहे. या 'अनुभवण्याला कधी-तरी निराशेची काळी कडही असते. पण त्यामुळे सारेच काळेकुट्ट/निराशाजनक आहे, असे मी तरी म्हणणार नाही, कारण हे 'अनुभवणे' नित्य-नूतन, पहाटेच्या प्रसन्न वेळेसारखे असते. शिक्षक म्हणून माझ्याही जगण्याला उमेद देणारे ठरते आणि म्हणून 'नक्षत्रांच्या देण्या'च्या निमित्ताने एक तऱ्हेने आत्मशोध घेण्याची कल्पना मला विलक्षण भावली. कारण देण्या-घेण्याची प्रक्रिया नेहमी दुहेरी, परस्परावलंबी असते. जीवनाच्या कुठल्याही क्षेत्रात वावरत असताना, एक संवेदनाक्षम माणूस म्हणून जगताना, दानशूर कर्णाच्या थाटात, 'मी आजवर केवळ देतच आलो/आले' हे म्हणणे आत्मवंचनाच ठरेल. त्यातही शिक्षणासारख्या जीवनाभिमुख, संस्कारक्षम क्षेत्रात विद्यार्थ्यांना आम्ही शिकवितो, ज्ञान देतो, असा सर्वस्वी दावा करणे मुळातच चुकीचे आहे. शिक्षक विद्यार्थ्यांना ज्ञान देतो, असे क्षणभर मान्य केले तरी तो विद्यार्थ्यांकडून चैतन्य घेतो, एका व्यापक जीवनानुभवाला सामोरे जात असतो हे विसरता येत नाही. शिक्षक ज्ञान-प्रक्रियेत विद्यार्थ्यांकडून जिज्ञासा घेत असतो आणि हीच 'जिज्ञासा' ज्ञानसंस्कृतीचा मूलभूत पाया असते. जिज्ञासेमुळेच गुरू-शिष्य संवादातून भारतीय ज्ञानसंस्कृती फुललेली आहे. विश्वाचे रहस्य उलगडून सांगणारे गुरू ज्ञानपरंपरेत जितके महत्त्वाचे असतात तितकाच ज्याच्यापुढे गहन-गूढ जीवनरहस्याचे चिंतन करायचे तो शिष्यही तोलामोलाचा लागतो. म्हणूनच भारतीय संस्कृतीत 'अंतर हाथ सहार' देणारे सद्‌गुरु आहेत तसेच तितक्याच तोलामोलाचे सच्छिष्यही आहेत. निवृत्तीनाथ-ज्ञानदेव, विसोबा-नामदेव, रामकृष्ण-विवेकानंद यांसारखे जगद्‌वंद्य गुरू शिष्य इथे आहेत. भगवत्‌गिते सारखा जगद्‌-मान्य ग्रंथ अर्जुनाचा शिष्यभाव आणि भगवान श्रीकृष्णाचा गुरुभाव यातून अमर बनलेला आहे. इथल्या परंपरेत सद्‌गुरु नियत असतो, त्याचा आत्मभावाने शोध घेतल्यावर तो भेटतोच; असा विश्वास आहे. पण जोडीलाच सद्‌गुरुही सच्छिष्यासाठी व्याकुळ बनतो यावरही श्रद्धा आहे. रामकृष्ण-नरेंद्र (विवेकानंद) रूपाने ही श्रद्धा साकार झालेली आहे. नरेंद्र-रामकृष्णांच्या पहिल्या भेटीत विवश होऊन रामकृष्णांनी काढलेले ''इतके दिवस तू मला अगदीच कसा विसरला होतास? तू आज येशील, उद्या येशील म्हणून मी सारखा तुझ्या वाटेकडे डोळे लावून बसलो होतो,'' हे उद्‌गार अजरामर झालेले आहेत.

अर्थात् गुरु आणि सद्‌गुरुमधील सूक्ष्म भेद समर्थांनी दासबोधातील पाचव्या दशकातील दुसऱ्या समासात विस्ताराने दिलेला असल्यामुळेच येथे आधुनिक गुरु/शिक्षक अभिप्रेत आहेत, हे मला माहीत आहे. परंतु तरीही 'गुरु-शिष्य संबंध म्हणजे सुपीक भूमी आणि उत्तम बीज यांचा संयोग होय' हे समर्थवचन कालातीत ठरावे. संयोग केवळ अध्यात्मक्षेत्रात घडतो म्हणावा तर आधुनिक शिक्षणप्रणालीत आपल्या विद्यार्थ्यांना मर्ढेकर-विषयक चिंतनग्रंथ अर्पण करणाऱ्या डॉ. विजया राजाध्यक्षांसारख्या गुरुवर्य इथे दिसतातच ना? विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून प्रयोग करणाऱ्या ज्ञानप्रबोधिनीसारख्या आणखीही काही शिक्षणसंस्था आहेतच. म्हणूनच 'नक्षत्रांचे देणे' च्या निमित्ताने हे सारे आठवत आत्मशोध घेणार आहे. या शोधाचे प्रेरक आपण आहात. त्याबद्दल शतशः धन्यवाद!

आठवतेय आज, माझ्या सुदैवाने, 'आजचे विद्यार्थी कसे वाया गेलेत' हे परोपरी सांगणाऱ्या शिक्षकांबरोबरच, प्रसंगी आमच्या वांडपणाकडे! आळशीपणाकडे दुर्लक्ष करीत आमच्या कार्यशक्तीची जाणीव करून देणारे, कानपिचक्या देत असतानाही आमच्यावर विश्वास टाकीत, लेखन-संशोधनाचे काम करून घेणारे शिक्षकही भेटले. त्यामुळेच, 'शिक्षणक्षेत्रात काही अर्थ नाही, फक्त पाट्याच टाकल्या की बस्स!' वगैरे-वगैरे विचार मनात रुजूच शकले नाहीत. शैक्षणिक क्षेत्राला फारशी अनुकूल पार्श्वभूमी नसतानाही मी जाणीवपूर्वक शिक्षणक्षेत्राकडे वळाले. आरंभी समर्थांच्याच शब्दात सांगायचे तर, असे वाटत होते की,

*'जितुके कांही आपणांसि ठावे ।*
*तितुकें हळूहळू शिकवावे ।*
*शाहाणे करूनि सोडावे । बहुत जन।।'*

-दासबोध दशक १९, समास १०.१३

बहुत जन म्हणजे विद्यार्थी, परंतु आज २३ वर्षानंतर या वचनांचा धांडोळा घेताना जाणवले, अरे खरंच आपण किती विद्यार्थ्यांना शहाणे केले आहे? वस्तुस्थिती आहे ती अशी, आपली मातीची ओंजळ त्यावेळी ध्यासमग्न शिक्षकांनी 'नक्षत्रांचे देणे' देत भरून टाकली होती आणि आज, आपण ज्यांना शिकविल्याचा दावा करीत असतो; त्या विद्यार्थ्यांनी ती ओंजळ समृद्ध केली आहे. अनंत हस्ते देणाऱ्या 'विद्यार्थी' नावाच्या चैतन्य-शक्तीने काय दिले? हे शब्द-मर्यादेत सांगणे अवघड आहे. परंतु शिक्षक म्हणून तुमच्या वागण्या-बोलण्याचे होणारे परिणाम एक-दोन ठळक उदाहरणांनी सहज नोंदविते.

एक प्रसंग होता विद्यार्थ्यांमधील चैतन्य-शक्तीचा प्रत्यय येण्याचा. महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून रुजू होऊन दीड-दोन वर्षच होत होती. त्या दरम्यान मला लो बी.पी.चा त्रास होऊ लागला. एक-दीड महिना दवाखान्यातही राहावे लागले. तरीही रक्तदाब काही नॉर्मल होत नव्हता. माझी लहान मुलगी अवतीभवती असायची पण मला एकटे बसल्यावर, पडल्या-पडल्या आठवण यायची ती माझ्या 'मुलांची- विद्यार्थ्यांची'. एक दिवस हिय्या करून डॉक्टरांना म्हटलं, 'आज मी कॉलेजमध्ये जाते, बघू या काय होते ते?' डॉक्टरांनी कशीबशी परवानगी दिली. महाविद्यालयात गेल्यानंतर मी आल्याची बातमी मुलांपर्यंत गेली आणि ५-१० मिनिटांत माझ्याभोवती विद्यार्थी जमा झाले. तेवढ्यात कुणीतरी खुर्चीही आणून दिली आणि महाविद्यालयाच्या पोर्चमध्ये आमचा वर्ग सुरु झाला. २०-२५ मिनिटांनंतर मी थांबले. पण गंमत म्हणजे कुठेही थकवा वाटत नव्हता. पुढचे आठ-दहा दिवसात हा आमचा २०-२५ मिनिटांचा तास नियमित होऊ लागला. 'मृत्यूला स्पर्श करून येणे' आणि 'जीवदान

मिळणे' हे दोन्ही वाक्यप्रचार मी अनुभवले.

आयुष्यात अनेक वाटा-वळणे आली. चढउतार अनुभवाचे लागले. पण या साऱ्या वाटचालीत विद्यार्थ्यांकडून मिळणारा चैतन्य-स्रोत कधीच क्षीण झाला नाही. त्यामुळेच या विद्यार्थीशक्तीबद्दल मी नेहमीच कृतज्ञ आहे. खंत एवढीच वाटते या चैतन्य-कुंभांची जाणीव शिक्षणक्षेत्रातील फारच थोड्या घटकांना असते आणि सांगूनही विद्यार्थ्यांना आपले आत्म-सामर्थ्य कळत नाही. किंबहुना त्यांचे ते कळण्याचे वय नसते.

अनेक वर्षांचा असाही अनुभव आहे की दरवर्षी किमान एक-दोन विद्यार्थी निराश-वैफल्यग्रस्त असतात. काही वादळ त्यांच्या मनात थैमान घालत असते. अशावेळी शिक्षक म्हणून फार मोठी जबाबदारी नकळत येते. वर्ग छोटा असेल तर मुलांचे चेहरे तुम्हांला वाचता आले पाहिजे. आणि वर्ग छोटा-मोठा असेल तर 'शिक्षक' म्हणून वर्गात बोलताना प्रत्येक वाक्य-शब्द विचारपूर्वक बोलला पाहिजे. कारण मुलं तुमचं अनुकरण करतात म्हणून नव्हे तर एका भाबड्या वयात ते त्यातून त्यांच्या परीने अर्थही काढत असतात. याचा अनुभव देणारा एक प्रसंग आजही लख्ख आठवतो.

जपानवरील एक लेख वर्गात शिकवित असताना, जपानच्या प्रगतीबरोबरच तिथल्या सामाजिक मन:स्थितीचे वर्णन करताना अशा स्वरूपाचे एक वाक्य आलेले होते की 'टोकियोमध्ये आत्महत्येचे प्रमाण अधिक आहे.' त्यावर भाष्य करताना, आत्महत्येपेक्षा जीवनाला सामोरे जाण्यास अधिक धैर्य लागते, अशा अर्थाने मी काहीतरी बोलत गेले. अशा धैर्यशील सामान्य माणसांची उदाहरणे सांगत गेले. आणि तीन-चार दिवसांनी एका विद्यार्थ्याने चांगले १०-१२ पानी पत्र मला दिले. त्यात स्वत:च्या प्रतिकूल परिस्थितीचे, वडिलांच्या विक्षिप्त स्वभावांचे वर्णन करताना त्याने लिहिले होते, बाई, या सर्व परिस्थिती मुळे मी आत्महत्या करण्याच्या विचारात होतो. पण त्या दिवशी जपानचा लेख शिकविताना, तुम्ही जीवन कसे धैर्याने जगावे, हे ज्या तळमळीने सांगितले ना त्यामुळे माझ्या विचारांची मलाच लाज वाटली. आता मी धैर्याने जगायचे ठरविले आहे. आज माझा हा विद्यार्थी शासकीय सेवेत महत्त्वाच्या पदावर आहे. जेव्हा जेव्हा हा प्रसंग आठवतो तेव्हा वाटते, आपणही त्यावेळी खाच-खळग्यातून प्रवास करीत होतो, उमेदीच्या त्या काळात स्थिरावण्यासाठी जीवघेणा संघर्षही करीत होतो; त्यावेळी चुकूनदेखील आत्महत्येचे एका शब्दानेही समर्थन केले असते किंवा ते वाक्य वाचून नुसतेच सोडून दिले असते तर?... तर एका अनामिक हत्येचे पातक जन्मभर वागवावे लागले असते. आणि तेव्हापासून आपली मन:स्थिती काहीही असो, महाविद्यालयाच्या आवारात पाऊल टाकताना वैयक्तिक सुख-दु:खाचा 'स्वीच'बंद करून केवळ शिक्षण म्हणून या ज्ञानमंदिरात प्रवेश करायचा- जसा मंदिरात प्रवेश करताना पादत्राणे बाहेर काढतो ना - अगदी तस्साच. हे ठरवले आणि गेली अनेक वर्षे प्रयत्नपूर्वक ते साध्यही केले.

याचा आणखीही एक फायदा झाला - केवळ 'शिक्षक' म्हणून येथे वावरताना जाती-पातींना, श्रीमंत-गरीब कल्पनांना कधीच थारा द्यावासा वाटला नाही. जाती उरल्या फक्त दोन. शिक्षक आणि विद्यार्थी शिवाय त्यामध्ये सहजपणे अदलाबदली करता येऊ लागली. साहजिकच एखादा विद्यार्थी सगळ्या वर्गासह आपल्यालाही संगणकाचे ज्ञान देतो. एखादी विद्यार्थिनी उत्तम रांगोळी, मेंदी रेखाटनाच्या 'टिप्स' देते, एखादी नेमबाजीचे प्रशिक्षण कसे घेते याची चर्चा करते; याचाही अनुभव समृद्ध करीत गेला. एखादा विद्यार्थी तुमचे 'सांगणे' मनात रुजवून त्याचा वटवृक्षही करतो. त्याचा



अनुभव ग्रामीण भागातील एका कार्यक्रमात मला आला. एका मंदिराचा जीर्णोद्धार होता. त्यानिमित्ताने माझे व्याख्यान ठेवले होते. समोर बसलेल्या श्रोत्यांमधला एक तरुण ओळखीचे हसत होता. त्यावरून वाटले, विद्यार्थी असेल आपला. मी नेहमी मुलांना फक्त त्यांच्या व्यक्ती नामाने बोलावते. चुकूनही त्यांच्या आडनावांचा उल्लेख करत नाही. विद्यार्थ्यांना हे फार आवडते, असा अनुभव गाठीस होता. पण आपण कितीही नाही म्हटले तरी जातीवादी-धर्मवादी असतोच कुठेतरी. त्यामुळे त्या हसणाऱ्या मुलाचे नाव मी संदीप, धनंजय, शिवाजीसारखे तत्सम आठवत होते. व्याख्यानानंतर मंदिर उभारणीत सक्रीय मदत करणाऱ्यांमध्ये त्या तरुणाचाही सत्कार ग्रामस्थांनी माझ्या हातून केला. तेव्हा कळाले, त्याचे नाव 'मुजावर' म्हणून. मला माझीच लाज वाटली. तो मात्र, 'मी बाईंचा विद्यार्थी आहे आणि त्यांच्या सांगण्यातून (?) मला जातीधर्मापलिकडे जात 'मी केवळ माणूस'आहे, हे पटले' असे अगदी रंगवून सांगत होता. मला मात्र आतल्या आत रडायला येत होते, आपण किती संकुचित आहोत, शिक्षक असूनही धर्माधिष्ठित विचार करतो याची लाज वाटत होती.

माझ्या या विद्यार्थ्याने नकळत मला जो आत्मशोध घ्यायला प्रवृत्त केले, जाती-धर्माच्या बंधनापलिकडे जात माणूसपणाच्या प्रकाशाने लखलखणाऱ्या नक्षत्रांचे जे देणे दिले, त्याची मोजदाद कशात करायची?

या पार्श्वभूमीवर एक शिक्षक म्हणून, संतसाहित्य-संशोधन क्षेत्रातील एक विद्यार्थी-अभ्यासक म्हणून आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे आयुष्याच्या मध्यावर उभी राहिलेली एक समाजघटक म्हणून मी नवीन पिढीला काय देऊ शकते? हा महत्त्वाचा प्रश्न माझ्या-पुढे उभा राहतो. भारतीय संस्कृती दानाचे महत्त्व सांगते. मी तर आजवर केवळ घेत राहिलेले आहे. माझी ओंजळ प्राजक्तासारख्या अम्लान पवित्र फुलांनी भरण्याचे काम पूर्वपिढीने केले. नवीन पिढीनेही मला आत्मशोधाचे, चैतन्याचे समृद्ध देणे दिलेले आहे. माझी झोळी अजूनही या दानासाठी आसुसलेली आहे. मग सेतूबंधनाचे काम पार पाडावे, अशी अपेक्षा असणारी माझी पिढी अर्थात मी स्वत: देखील या सेतूबंधनात खारीचा काही वाटा उचलते किंवा कसे? हा खरा प्रश्न आहे. त्या संदर्भात एक भाषाशिक्षक, त्यातही मातृभाषेची शिक्षक म्हणून -केवळ प्राध्यापक म्हणून नव्हे, मला काही देता येईल का? याचे उत्तर नक्कीच होकारार्थी आहे.

त्यासाठी पहिली गोष्ट म्हणजे माझ्या मनातील शिक्षक-प्राध्यापक हा श्रेणीभेद गळून जायला हवा. बऱ्याचदा विद्यापीठीय पातळीवर शिकविणारे आम्ही, स्वत:ला 'प्राध्यापक' म्हणवून घेताना आमच्यातील 'शिक्षका'ला हद्दपार करतो. **महाविद्यालयात शिकवित असतानाही मला नेहमीच वाटते, माझ्या-मधला शिक्षक जागृत राहिला पाहिजे. 'शिक्षक' या संबोधनात प्रयोगशीलता आहे, विद्यार्थ्यांच्या अधिक जवळ जाणे आहे, ज्यावेळी विद्यार्थ्यांनी शिक्षणक्षेत्राकडे वळावे,असे आपण म्हणतो तेव्हा डोळ्यापुढे 'सेट-नेट' झालेले, पी.एचडी. धारक प्राध्यापक समोर उभे राहतात.** पण हे दृश्य पाहताना एक मूलभूत भेदही मला तीव्रतेने जाणवतो; तो म्हणजे शालेय विद्यार्थी मनाने शिक्षकांच्या अधिक जवळ असतो, आपल्या सुखदु:खात त्यांना सहभागी करून घेतो, त्याच्यावर त्याच्या शिक्षकांचा प्रभाव नकळत-कळत पडत असतो आणि उत्तरोत्तर शिक्षकाचे रुपांतर प्राध्यापकात झाले की हा प्रभाव कमी-कमी होत जातो. शिक्षकांचा आदरयुक्त धाक विरत जातो. असे का? संपादक महाशय,

विद्यार्थ्यांना समजावून घेण्याची, समजावून सांगण्याची आमची ताकद कमी पडते? मुलांचे भावविश्व वाढत-वाढत बदलतं जाते की अधिक वरच्या वर्गात शिकविताना आमच्यामधील प्रयोग-शीलता कमी होत जाते? उत्तरोत्तर आम्ही 'पुस्तकी' होतो किंवा कसे? स्वत:ला प्राध्यापक समजणाऱ्या आम्हांला जुन्या काळी 'प्राध्यापक' या शब्दाला असणारा विद्वतेचा, चिंतनाचा जो धाक होता- त्याचा विसर पडला आहे कां?

आमच्या गुरुजनांकडून डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे, प्रा. गं. बा. सरदारादींच्या ज्ञानाचे, गुरुजनांमध्ये हे ज्ञान आम्हीही अनुभवले. पण आमचे काय? विद्यार्थी वाचत नाहीत' असे म्हणताना प्रामाणिक उत्तर शोधायला हवे की आजचे किती शिक्षक-प्राध्यापक अभ्यास-वाचन-चिंतनात रमतात? ग्रंथालयाचा वापर करतात? नेमलेल्या अभ्यासक्रमा-पलिकडे, संदर्भग्रंथांपलिकडे वाचतात?

वस्तुत: 'वाचन-संस्कृती' जोपासावी यासाठी अपेक्षित असणाऱ्या घटकांमधील एक महत्त्वाचा घटक म्हणजे शिक्षक-प्राध्यापक. विद्यार्थ्यांना वाचनसंस्कृतीत सामावून घेणे आजच्या 'सायबरयुगा'त अवघड असेलही पण अशक्य मात्र नाही. या वाचनधर्माचे सोपे व्रत म्हणजे शिक्षक प्राध्यापकांनी कसल्याही पूर्वग्रहाखेरीज मुक्त मनाने विविध विषयांवर भरपूर वाचायचे, वाचतच राहायचे. आणि एखाद्या कथेबद्दल/ कविता-नाटकाबद्दल/ चिंतन-ग्रंथांबद्दल बोलताना (की शिकविताना?) सहजपणे अनेक संदर्भ-(पुस्तकांची/कथा, कादंबरी, नाटके फार काय उत्कृष्ट सिनेमादृश्येसुद्धा) सुचवित जायचे. विद्यार्थ्यांना आवर्जून त्या त्या लेखक -कवींची नावे सांगायची, हे करताना एक पथ्यही पाळायचे ते म्हणजे अन्य विषयही मराठीसारख्या मातृभाषेत समाविष्ट होतात हे पटवून द्यायचे. मग बोलता बोलता येणाऱ्या तौलनिक संदर्भातून विद्यार्थ्यांनाही कळत-नकळत संदर्भग्रंथांची, साध्या भाषेत पुस्तकांची गोडी लागते आणि मग वाचन-संस्कृती परिघाचा विस्तार सुरू होतो. हळूहळू विद्यार्थीच काय वाचू? असे विचारू लागतात. आवडलेल्या पुस्तकांबद्दल सांगतात. अशा विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी असेल पण ते आहे हे नक्की. ते प्रमाण पाहिले की वाटते, भोवती असणाऱ्या अंधारा-बद्दलच बोलायचे/ तक्रार करायची का स्वत:च्या वकुबाप्रमाणे तेवणाऱ्या पणतीचे कौतुक करायचे? आणि खरे सांगा, 'नक्षत्रांचे देणे' भोवतालच्या अंधारातच अधिक ठळकपणे जाणवते, नाही का? विद्यार्थ्यांनी 'वाचावे' म्हणून भाषाशिक्षकाला आणखीही काही प्रयोग करता येतात. आम्ही त्यासाठी 'मला आवडलेली कथा/कादंबरी/ मासिक/ दिवाळी अंक अगदी एखादा लेखही यांचे रसग्रहण करण्याची स्पर्धा घेतो. वृत्तपत्रात येणाऱ्या बातम्यांवर प्रतिक्रिया लिहायला लावतो. कलाशाखेकडे येणारे विद्यार्थी बऱ्याचदा आर्थिकदृष्ट्या, शैक्षणिकदृष्ट्या वजाबाकीकडे झुकणारे असतात. साहजिकच त्यांच्यात आत्मविश्वासाचा-अगदी चार-चौघांमध्ये जाहीर-पणे बोलण्याचाही-अभाव असतो. त्यासाठी 'संवाद-साधना' सारखे उपक्रम राबविता येतात. वर्गात मुलांना आवडणारे विषय देऊन, त्यांच्यातीलच एकाने सूत्रसंचालन करणे, दोघातिघांनी वर्गाच्या प्रश्नांना उत्तरे देणे करता येते. याचा सुखद अनुभव मी गेल्या वर्षी घेतला. माझ्या काही विद्यार्थ्यांनी सुप्रसिद्ध मुलाखतकार श्री. सुधीर गाडगीळ यांची आत्मविश्वासाने मुलाखत घेतली.

संपादक महाशय, असे म्हटले जाते, युवापिढीच्या तोंडी असणारे गाणे कोणते आहे, त्यावरून त्या राष्ट्राच्या, संस्कृतीच्या भवितव्याचा अंदाज येतो. वर-वर पाहता ही गाणी कोणती



आहेत, याचा विचार केला तर निराशा येईल कदाचित. पण मला मात्र वाटते या गाण्यांना शब्द देणारे, त्यांना लोकप्रिय करण्यासाठी येन-केन प्रकारेण कुठल्याही पातळीपर्यंत जाणारे याला जबाबदार नाहीत का? या जबाबदारीमध्ये राजकारणपासून अर्थकारणापर्यंत आणि गावगाड्यापासून 'टाऊनशिप' पर्यंतचे अनेकानेक घटक कारणी-भूत आहेत, हे सर्वज्ञात सत्य आहे. असो. त्याचा ऊहापोह करणे हा स्वतंत्र पत्रप्रपंच ठरेल. ज्या 'रॅट-रेस' ला सामोरे जाताना, तिच्यात टिकताना आजच्या विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाची, 'कमवण्याची' नितांत गरज आहे. 'ग्लोबलायझेशन'च्या युगात त्याने व्यावहारिकही बनले पाहिजे हे मान्य पण या साऱ्यात संस्कृतीला उपयुक्त जीवनमूल्यांचे काय? संस्कृतीची व्याख्या करताना विनोबाजींनी म्हटले होते, स्वत:ला भूक लागलेली असतानाही स्वत:ची भाकरी दुसऱ्याला देते ती संस्कृती. काही विचार-वंतांच्या मते पोट भरल्यानेच मानवी संस्कृती विकसित होते. याबद्दल दुमत असणारही नाही. पण केवळ पोट भरणेच हे मानवी संस्कृतीचे व्यवच्छेदक लक्षण आहे का? आज आपले पोट भरण्यासाठी (नव्हे तर पोट भरलेले असतानाही) दुसऱ्याच्या ताटातील भाकरी पळविणाऱ्यांना तुम्ही काय नाव द्याल? अशावेळी केवळ उत्तम उच्चार, शब्दांची, भाषाशिक्षकांच्या प्रयत्नाने असे विद्यार्थी तयार होतीलच होतील. परंतु 'घन तमी शुक्र बघ राज्य करी' अशी स्थिती निर्माण करायची असेल, काळ्याकुट्ट आकाशात स्वयंसिद्ध प्रकाशाने लक्ष वेधून घेणारे नक्षत्रांचे समूह निर्माण करायचे असतील तर तरुण पिढीला संतसाहित्य-संशोधन क्षेत्राकडेही वळण्यास प्रवृत्त केले पाहिजे, असे मला नम्रपणे सुचवावेसे वाटते. भारतासारख्या खंडप्राय आणि विविध ताण-तणावांनी भरलेल्या देशात राष्ट्रीय एकात्मता अधोरेखित करण्याचा जनमान्य प्रवाह म्हणजे संतसाहित्य- कारण लोकजीवन, लोकसंस्कृती आणि लोकभाषेची समग्र ऊर्जा प्रकट झाली ती संतसाहित्याच्या रूपाने, प्रतिकूल परिस्थितीत कसलाही प्रचार न करता लोकजीवनातूनच आलेल्या सामान्यातील असामान्य माणसांनी ' देवमाणसां'नी गेली अनेक शतके भारतीय संस्कृती अक्षुण्ण, अखंडित ठेवलेली आहे. जनसामान्यांमधील असाधारण संयमशक्ती, चांगुलपणावरचा त्यांचा विश्वास आणि 'त्या विश्वात्मक देवाचीच सारी लेकरे आहेत' हा बंधुभाव संतांनी आपल्या कार्यशक्तीने जागविला. आपल्या अभंगकवितेने मानवी विधायकतेला अक्षर केले. कृतार्थ मृत्यूची संकल्पना 'संजीवन समाधी'द्वारे साकार केली आणि त्यामुळेच संतसाहित्य हे जातीधर्मांपलिकडे जाणारे कालातील वाङ्मय बनले. लोकमानसाने त्याला 'देववाणी' मानत मस्तकी धारण केले. या साऱ्यांचे पुन:स्मरण सद्य:स्थितीत आवश्यक आहे, याचे भान शिक्षकांनी ठेवले पाहिजे. कारण तोच राष्ट्रीय एकात्मतेचा महामार्ग आहे. त्यासाठी संत ज्या काळात प्रामुख्याने वावरले त्या मध्ययुगीन साहित्याभ्यासाकडे विद्यार्थ्यांना वळविले पाहिजेत. अर्थात असे करताना दोन गोष्टींचे भान सदैव ठेवायला हवे. एक म्हणजे संतसाहित्य शतकानुशतके इथल्या भूमीत टिकले ते त्यांच्या निर्माणकर्त्यांच्या (संतांच्या) अलौकिक चरित्रामुळे. मात्र संतजीवनातील कार्यकारण-भावाची चिकित्सा न करता आल्यामुळे आणि या चरित्रांच्या नावावर बुवाबाजी करणाऱ्यांच्या वृत्तीमुळे संतसाहित्याच्या नव्हे तर संतचरित्रांच्या आधारे अंधश्रद्धा निर्माण करणाऱ्यांचा, बुवा-बाजी करणाऱ्यांचा एक गट सध्या सुशिक्षित (?) म्हणविणाऱ्यांनी देखील तयार केलेला आहे. श्रद्धा-अंधश्रद्धेतील सीमारेषा धूसर

असल्यामुळे आणि मूळचे संतसाहित्य वाचण्याची तोशीस न घेण्याच्या प्रवृत्तीमुळे असेल, वाढत्या यांत्रिक जीवनमानामुळे असेल हा सुशिक्षित, पांढरपेशा म्हणविणारा नव-अंधश्रद्धावादी गट प्रभावी बनू पहात आहे. त्यांच्या साक्षात्काराचे (?) किस्से जाहीरपणे कौतुकाने सांगितले जात आहेत. आणि अशावेळी पुन्हा एकदा हे नव कर्मकांड मोडून काढण्यासाठी, बुद्धिभेद करणाऱ्या बुद्धिवाद्यापासून खऱ्या साहित्याला वाचविण्या-साठी विद्यार्थ्यांनी संशोधनक्षेत्राकडे वळण्यास प्रवृत्त करायला हवे. दुसरी गोष्ट म्हणजे भक्तीच्या क्षेत्रात 'जातिवर्ण हे आघवेचि गा अकारण' म्हणणाऱ्या संतसाहित्याला विशिष्ट जाती-गटांचे शिक्के मारले जात आहेत. 'हे विश्वचि माझे घर । ऐसी मती जयांची स्थिर' असणाऱ्या संतांना विविध जातींच्या भाषेच्या कप्प्यात बंद केले जात आहे. त्यांच्या 'सांगण्याला' जातीनिष्ठ संदर्भ चिकटवून मतपेट्यांचे राजकारण घडत आहे.

अशावेळी मध्ययुगीन संशोधक विद्यार्थी म्हणून असणारी जबाबदारी असिधाराव्रतासारखी आहे. अर्थात हे व्रत समानधर्मी विद्यार्थी- अभ्यसाक तयार करूनच संपन्न होणारे आहे. त्यासाठी विविध संप्रदायांचा, संतचरित्रांचा तौलनिक अभ्यास करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रवृत्त करणे, चमत्कारांपलिकडे असणाऱ्या संतजीवनाचे मर्म समजावून देणे आणि त्यातून मानवताधर्माचा जागर करीत राष्ट्रीय एकात्मतेचे अधोरेखन करणे आवश्यक आहे.

मला मान्य आहे संपादक महाशय, हे सारे करणे आज अवघड आहे. पण सुरुवात करायला काय हरकत आहे? शेवटी गंगोत्रीचा उगम महत्त्वाचा असतो. अनंत प्रवाह तिच्यात मिसळले की सर्वसमावेशक गंगामातेचे रूप ती धारण करते. कार्यारंभीचा आत्मशोधही महत्त्वाचा ठरेल. 'नक्षत्रांच्या देण्या' निमित्ताने हा शोध घेता आला, थोडेफार सिंहावलोकन करता आले. हीच माझ्या लेखी सुवर्णसंधी.

### प्रा. डॉ. श्यामा घोणसे यांचा अल्प परिचय

पत्ता : निर्मल टाउनशिप, बी-२, फ्लॅट नं. १६, सनसिटी रोड, आनंदनगर, पुणे- ५१

नोकरी : आबासाहेब गरवारे महाविद्यालयात गेली २३ वर्षे मराठीचे अध्यापन.

कार्य : 'संतचरित्रात्मक कादंबरीच्या रसास्वादाची दिशा' हा पी. एच् .डी. नंतरचा अभ्यास प्रकल्प. त्या अंतर्गत दोन ग्रंथ प्रकाशित. भारतीय स्त्रीवाद आणि विविध धर्म संप्रदायांवर महाराष्ट्र, गोवा येथे सुमारे १५० व्याख्याने. ३०- ३५ शोधनिबंध प्रकाशित. 'वीरशैवांचे मराठी हिंदी वाङ्मय : एक अभ्यास' या ग्रंथाला महाराष्ट्र साहित्य परिषदेचे श्रेष्ठता पारितोषिक आणि मातृमंदिर विश्वस्त संस्था, निगडी यांचे उत्कृष्ट समिक्षा ग्रंथ पारितोषिक प्राप्त.



**नक्षत्रांचे देणे**

# असेन मी नसेन मी!

**प्रमोदिनी वडके-कवळे**

आमचा वेगवेगळ्या क्षेत्रातल्या मित्रमैत्रिणींचा एक ग्रुप आहे. शनिवार रविवारची सुट्टी गाठून आणि कधी हुरडा, कधी फळांचा बहर असं निमित्त साधून आम्ही जवळच्या निसर्गरम्य ठिकाणी सहली काढतो. वेगवेगळ्या पेशातले लोक असल्यामुळे आणि रिकामा वेळ मिळाल्यामुळे अशा सहलीच्या वेळी मस्तपैकी गप्पा रंगतात. चर्चा झडतात. त्यातून विविध प्रकारचे विषय घुसळले जातात. नवी माहिती मिळते. मेंदूला खाद्य पुरवलं जातं.

अर्थात कधी एखाद्या हलक्याफुलक्या विषयातून गाडी गंभीर चर्चेकडे वळते तर कधी गंभीर विषयाचीही खिल्ली उडवली जाते.

त्या सहलीतही सकाळचा चहानाश्ता उरकून भरल्यापोटी आमची बांधावरची रपेट चालू असताना कुणीतरी सहज विषय पुढे केला. 'या जगातून जाताना आपण काय मागे ठेवून जाणार आहोत?'

आणि मग एकेकाच्या त्या विषया-वरच्या प्रतिक्रिया बाहेर आल्या. कुणी हसून उडवून लावलं कुणी ऐश्वर्याच्या नेत्रदानाच्या जाहिरातीची नक्कल करून दाखवली कुणी काही तर कुणी काही...

आम्ही पंधरावीसजणं होतो. दोघंदोघं चौघंचौघं असे घोळक्याघोळक्याने चालत होतो. प्रत्येक घोळक्यात या विषयाची वेगवेगळी प्रतिक्रिया उमटली आणि दहा दिशेने घरंगळणारे परिसंवाद चालू झाले.

'या जगातून जाताना मागे ठेवून जाण्यासारखं माझ्यापाशी काय आहे?'

हा प्रश्न मी स्वत:ला विचारला आणि खोलीतल्या माळ्यावरचं एखाद्या गच्च भरलेल्या कप्प्याचं दार चुकून उघडावं तशी माझी अवस्था झाली. कळतनकळत मेंदूत पेरलेले कोंबलेले, खोचलेले (आणि नेटकेपणाने ठेवून दिलेलेही) कितीतरी शब्द धडाधड माझ्या अंगावर कोसळले. संस्कृती, संचित, साहित्य, संस्कार. स ची न संपणारी बाराखडीच शिस्तबद्ध संचलन करत मला जोरात सामोरी आली.

मनातला गोंधळ नीट जागेवर लावून एकेका शब्दाचा परामर्श घेणंच सोयीचं होईल असा मी विचार केला. माझ्याही नकळत मला सुचलेल्या या उपायाचं मलाच हसू आलं, आणि थोडं वैषम्यही वाटलं.

हसू अशासाठी की, सहजपणे विचार करताना नेणीवेच्या पातळीवरही मी अगदी स्वयंपाकघरातीलच उपमा वापरली होती. तिथला गोंधळ आवरण्याची माझी पद्धत अशीच असते. समोरचा पसारा पाहून नेमकी कुठून सुरुवात करावी ते सुचलं नाही की पायरीपायरीने मी पसारा कमी करत नेते. म्हणजे लहानमोठी भांडी एकमेकात, वाट्या मोठ्या पातेल्यात,

छोट्या ताटल्या मोठ्या थाळ्यात असं घालून ठेवलं की मग आवरण्यासाठी अगदी थोडाच पसारा उरतो. (आणि मग तो नंतर आवरू म्हणून बाजूला सरकवून दिला तरी चालतो.)

आताही हा शब्दांचा गोंधळ अशा पद्धतीने आवरता आला असता कदाचित, पण आपल्याला हीच उपमा सुचावी याचं वैषम्य इतकं दाट होतं की मी त्याचाच विचार करत बसले.

तशी मी अगदी निगुतीने संसार करणारी म्हणजे व्यवहारचतुर आणि गृह-कृत्यदक्ष म्हणतात त्यातली गृहिणी नाही. स्वयंपाक करताना आणि कॅज्युअल लीव्ह घेताना सांगायचं कारण माझ्या लेखी सारखंच असतं. अनअॅव्हाइडेबल डोमेस्टिक वर्क.

जमेल तसा संसार करून खेरीज मी (त्या जमेल तशा संसारासाठीच) नोकरीही करते. थोडंफार लेखन करते. माझ्या वेळेच्या सोयीनुसार अधूनमधून सांस्कृतिक कार्यक्रमांना हजेरी लावते. एखाद्या संस्थेला मदत करताना निव्वळ आयकरातून सूट एवढाच हिशेब न करण्याइतपत सामाजिक जबाबदारीचं भान मला आहे. आजूबाजूला घडणाऱ्या अन्यायी घटनांबद्दल मी पोटतिडकीने बोलते. त्यावर उपायाच्या दृष्टीने आणि दिशेने विचारही करते.

एवढं सगळं असूनही या जगाला देण्यासारखं आपल्यापाशी काय आहे ह्या मूलभूत प्रश्नाचं उत्तर शोधताना मला स्वयंपाकघरातलीच उपमा का आठवावी? माझ्या सच्च्या अनुभवांची व्याप्ती इतकी सीमीत, इतकी संकुचित असवी?

मग अशा मर्यादित चिंचोळ्या अनुभवविश्वातून जन्माला आलेलं अशक्त साहित्य कितीसं मौलिक असणार आहे? कलाकाराच्या अस्तित्वानंतरही टिकून राहण्यासाठी त्याच्या कलाकृतीला ठराविक खोली, मनाचा तळ शोधणारा एक विशिष्ट डोळसपणा लागतो. तो जर माझ्या साहित्यात नसेल तर माझ्यानंतरच काय पण माझ्या भौतिक अस्तित्वा-पर्यंत तरी माझं साहित्य टिकून राहिल का?

आणि ते जर राहणार नसेल तर मी दुनियेला अक्षर साहित्यातलं एखादं तरी टिंब देऊन जाईन अशी वल्गना मी का करावी?

साहित्य बाद झाल्यावर संस्कृती पुढे आली. आपली भारतीय संस्कृती प्राचीन आहे. तिने संपूर्ण विश्वालाच मौलिक असं देणं दिलेलं आहे.

ही वाक्यं वक्तृत्व स्पर्धेसाठी मी पाठ केली होती. पण संस्कृती या शब्दाचा जास्त खोलात जाऊन शोध घ्यायची वेळ कधी आलीच नव्हती किंबहुना मी ती येऊ दिली नाही. संस्कृतीच्या मार्गावरून चालताना स्वत:ला सुसंस्कृत समजणारी मी आजीपणजीकडून मिळालेल्या नथीची आणि नऊवारीची जपणूक, संकष्टीचे मोदक आणि सत्यनारायणाचा प्रसाद यांच्या प्रमाण आणि कृतीसाठी अनुभवी बायकांकडून वेळोवेळी गोळा केलेल्या सूचना, आपल्या महाकाव्यांबद्दल उलटसुलट अभ्यास न करता बाळगलेला आंधळा अभिमान, देवापुढच्या रांगोळीतल्या प्रतिकांच्या अर्थाचा शोध आणि पारंपारिक सणसमारंभाच्या रूढी-पालनामागच्या संकेतांबद्दल माझ्यासारख्याच चार अज्ञानी व्यक्तींशी केलेल्या चर्चा या-पलीकडची कुठचीच पायवाट चोखाळलेली नाही. शिवाय संस्कृती या शब्दाच्या उच्चाराने माझ्या मनात हे जे काही धूसर आकार उभे राहतो. त्यात माझं स्वत:चं असं काहीच योगदान नाही. मग पुढच्या पिढीला संस्कृतीचा ठेवा देत असल्याचा डांगोरा मी का म्हणून पिटावा?

संचिताबद्दलही तसंच म्हणता येईल. मी एक सामान्य संसारी स्त्री. या सामान्य-



पणाचाही अभिमान बाळगण्याइतकी माझी विचारशक्ती क्षुद्र आहे. काम, क्रोध, मद, मत्सर, मोह हे सहाही महाबलाढ्य शत्रू पर्समधल्या छत्री, चष्मा आणि चाव्यांसारखे मी सतत जवळ बाळगत असल्याने माणुसकीच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवणारं एखादं सत्कृत्य माझ्याकडून घडलेलं नाही आणि घडण्याची शक्यताही फारच कमी. त्यामुळे माझ्या पूर्वसंचिताची ठेवही मला पुढच्या पिढीला देता येणार नाही.

आईवडिलांनी घरातल्या मोठ्या माणसांनी केले संस्कार मात्र माझ्याजवळ अजूनही आहेत. पण ते मी पुढच्या पिढीला द्यायला गेले तर त्याला कुणीही गिऱ्हाईक मिळणार नाही. कारण ते दहा वर्षांपूर्वीच्या जुन्या गाडीसारखे आहेत. त्याकाळी ते कितीही लोकप्रिय आणि अपूर्वाईचं मॉडेल असलं तरी आजच्या वेगवान युगात ते निरुपयोगी आहे. आता आम्ही मुलांना प्राण गेला तरी 'खरंच' बोलायचं असं सांगत नाही तर वेळ निभावून नेण्याचा चटपटीतपणा शिकवतो. म्हणजे नव्या पिढीला देण्याच्या दृष्टीने माझे संस्कारही मोडीतलेच आहेत म्हणायचे.

एकेका संकल्पनांची अशी पद्धतशीर वासलात लागत गेली आणि मन उदास झालं. आयुष्यात देण्यासारखं काही नाही म्हणजे मूळातच आपण काही मिळालं नाही. अस्मिता, स्वाभिमान सगळ्या बेरीज-वजाबाक्या पोकळच होत्या म्हणायच्या. नकाराचा घंटानाद नारोशंकरी आवाजात मनात घुमत राहिला.

पाय कशाला तरी अडखळले तेव्हा मी तंद्रीतून जागी झाले. माझ्याबरोबर चालणाऱ्या मित्रमैत्रिणींचा घोळका पलिकडच्या वावरात शिरून दुसऱ्या कशात तरी रमून गेला होता. विचारांच्या नादात मी एकटीच चालत बियाणांच्या खोपीपर्यंत पुढे आले होते. ज्याला अडखळून थांबले होते तो बियाणांच्या खोपीबाहेर फेकलेल्या सडक्या बटाट्यांचा ढीग असावा. त्याचा कुजका वास नाकाला जाणवला. पुन: वळून बरोबरीच्या सगळ्यांना गाठण्याच्या विचारात मी अर्धवट मागे वळले आणि अचानक माझ्या लक्षात आलं त्या ढिगातल्या कितीतरी बटाट्यांना कोंब फुटले आहेत. चांगले इंचइंचभर लांब!

माझ्या मनातल्या नकारात्मक विचारांनी मला टोकलं. 'बघ, बघ स्वत:च्या आत्मभानाचा अहंकार आहे ना तुला? तरीही तुला आपण जाताना काय ठेवून जाणार आहोत हा प्रश्न पडतोय आणि ज्याचा बियाणालाही उपयोग नाही अशा अक्षरश: उकिरड्यावर पडलेल्या या कुजक्या बटाट्याने मात्र कसलाही विचार न करता जाताजाता सृजनाचा वसा पुढे रोवून दिलाय. खाली वाकून मी तो काहीसा लिबलिबित झालेला बटाटा उचलला आणि त्याच्याकडे नीट निरखून पाहिलं. त्याला फुटलेला कोंब ही केवळ पुनरुत्पादनाची अडाणी आणि नैसर्गिक प्रक्रिया नव्हती तर त्यापलीकडचंही काहीतरी होतं. कदाचित सुरुवातीपासूनच हे किडकेपण त्या बटाट्याच्या वाट्याला आलं असेल, पण तरीही त्यात जे काही चांगलं सृजनक्षम आणि उपयोगी असं होतं ते जाताजाता निसर्गाला परत करण्याची ती धडपड होती.

मी जेव्हा या जगात पाऊल ठेवलं तेव्हा मी बरोबर काहीच आणलेलं नव्हतं. पण माझ्या पूर्वजांनी माझ्या आप्तसुहृदानी माझ्या गुरुजनांनी आणि माझ्या भवतालाने मला सतत काही ना काही दिलं होतं. माझा जगण्याचा अनुभव समृद्ध केला होता. ती सगळी माणसंही माझ्यासारखीच सामान्य होती. माझ्या मागच्या काळातली असल्यामुळे कदाचित ती माझ्याहूनही

कमी सजग असतील. पण तरीही त्यांनी माझ्यासारखा नकारात्मक विचार न करता आपल्या ओंजळीतलं इवलंसं संचित माझ्यापुढे ठेवलं होतं. मला आनंदाचे किती-तरी अनुभव दिले होते. ते तर मी पुढे पोचवू शकते ना?

माणसांसारखंच माझ्या भोवतालच्या निसर्गानेही मला भरभरून दिलंय. माझी रसना तृप्त करणाऱ्या कितीतरी अवीट चवी, आपल्या विलक्षण दर्शनाने माझ्या डोळ्यांना थक्क करणारी असंख्य निसर्गदृश्यं, माझ्या श्रवणेंद्रियांची कोडकौतुकं पुरवणारे मधुर स्वर. माझ्या श्वासांना गंधित करणारे अत्तर कण. माझ्याशी कोणतंही कथित नातं नसलेल्या या निसर्गाने अक्षरश: माझ्या पंचेंद्रियांना तृप्त केलंय. त्या तृप्तीचा इवलासा कणही मला पुढच्या पिढीसाठी मागे ठेवता येणार नाही? इतका वेळ मी माझ्याच 'सुसंस्कृत' विचारांच्या नादात इथून चाललेय पण भोवतालच्या निसर्गमेळ्याकडे साधी नजर उचलून पाहिलंही नाही. मला हवी होती तेवढी फुलंपानं तोडून घेतली की माझं निसर्गाशी देणंघेणं संपलं. कारण आप मरे दुनिया डुबे. माझ्यामागे झाडांना बहर आला किंवा त्यावर कीड पडली काय त्याच्याशी मला काय करायचं? ती काही माझी निर्मिती नाही. माझी एखादी कविता छापून आणण्यासाठी कागद हवा म्हणून मी कित्येक वृक्षांचा बेलाशक बळी घेऊ शकते. तिची छापील प्रत चिरंतन टिकावी म्हणून घातक प्लॅस्टिकचा वापर करू शकते. मी कॅमेऱ्यात टिपलेलं निसर्गदृश्य टिकवण्याचा मी आटापिटा करेन, कारण ती माझी कलाकृती आहे. पण त्या दृश्याची मूळं ज्या निसर्गातून वर आली आहेत त्या निसर्गाचं काय? माझ्या मातीच्या कुडीत प्राण फुंकणाऱ्या या पंचमहाभूतांचा वापर मी केवळ माझ्यापुरताच करून घेणार आहे का? पुढच्या पिढीसाठी निदान त्याची जपणूक तरी मला करता येईलच ना?

मला नुकताच एका मासिकात वाचलेला एक लेख आठवला. त्यात म्हटलं होतं, **ऐकणे, बोलणे, हसणे, रडणे, स्पर्श, गंध हे सगळे अनुभव माणसाला घेता येतात हीच जगातली सात आश्चर्ये आहेत. वरवर मला ते म्हणणं अतिशयोक्तीचं वाटलं. पण नीट विचार केला तेव्हा लक्षात आलं, सापाला ऐकू येत नाही. कित्येक प्राण्यांना हसता येत नाही. पक्ष्यांना रंग जाणवत नाहीत. आपल्यासारखे सजीव असूनही इतर प्राण्यांमध्ये अशी कितीतरी वैगुण्ये आढळतात. तेव्हा आपल्या संवेदना हे खरोखरीच आपल्याला नशिबाने लाभलेलं आश्चर्यकारक देणं आहे.** हे देणं आपण दुसऱ्याला देऊ शकत नसलो तरी त्याचा जास्तीजास्त चांगल्या पद्धतीने वापर कसा करायचा याचे आदर्श तर आपण पुढच्या पिढीपुढे ठेवू शकतो? यासाठी काही आपल्याला चार चव्वल खर्चावे लागणार नाहीत.

माझी आजी एक व्रत करायची. त्याच्या पारण्याच्या वेळी ती देवपुढच्या पाटावर बसायची. आम्ही सगळे तिच्या मागेच उभे असायचो. मग ती डोळे मिटून हाताची ओंजळ उंच धरत विचारायची, अतिथी कोण आहे?

मागून एकजण पुढे व्हायचा. मी आहे.

आजी डोळे मिटून त्याला ओंजळीतला पदार्थ द्यायची.

त्या व्रताची कथा मला आठवत नाही. पण आपण कोणाला दान दिलंय हेसुद्धा दिसता कामा नये. दान मिरवायचं नसतं. ते असं नि:शब्दपणेच द्यायचं असतं हा त्या व्रताचा हेतू असावा कदाचित.

मला वाटतं आपण पुढच्या पिढीसाठी जे ठेवून जाणार आहोत ते अशा रीतीनेच ठेवावं. त्याची पावती मागू नये कोणाला. त्याचा उपयोग कोणासाठी होणार आहे हे कळलं नाही तरी चालेल पण मी भोगलेला रंगगंधचवीचा अद्भुत सोहळा मला पुढच्या पिढीसाठी जसाच्या तसा नक्कीच टिकवून ठेवता यायला हवा. ठेवण्याची जबरदस्त इच्छा मनात जागायला हवी.

जागतिकीकरणाच्या आणि वेगाच्या मागून धावत सुटण्याच्या पुढच्या युगात कदाचित हवा आणि आपल्याच पावला-खालची वाट दाखवणारा अंधुक प्रकाश! निसर्गातल्या बाकी सगळ्या आनंदाचे अनुभव घेण्यासाठी मग पुढच्या पिढीला केवळ यंत्राची आणि संगणकाचीच कास धरावी लागेल. त्यांच्या आनंदाच्या संवेदनाच हरवून जातील.

असं व्हायला नको. पुढच्या शंभर पिढ्यांसाठी नाही तरी निदान माझ्या पुढच्या पिढीला सच्चेपणाचा अनुभव देण्यापुरता तरी निसर्ग मला वाचवायला हवा. या विश्वातला जो आनंद मी लुटला, चाखला, भोगला त्याची चव पुढच्या पिढीपर्यंत पोचवायलाच हवी मला. बाकी काही नाही तरी तेवढं मी नक्कीच करू शकेन.

आणि कदाचित आजच्या या'वापरा आणि फेका' च्या युगात तेच माझं पुढच्या पिढीला देणं असेल.

**डॉ. प्रमोदिनी वडके-कवळे यांचा अल्प परिचय**

पत्ता : प्राजक्त, अपूर्वा हौ. सोसा,सर्व्हे नं. ६०,सुखसागरनगर क्र. २, गल्ली क्र. १०, कोंढवा बुद्रुक, पुणे ४११०४८

शिक्षण : मराठी घेऊन बी. ए. (ऑनर्स)

नोकरी : २६ वर्षे पर्सनल असिस्टंट( बी. सी. काम्पोनंट्स)

लेखन : माहेर, मेनका, स्त्री, विपुलश्री, हंस, रसिक, मिळूनी साऱ्याजणी, पालकनीती, कालनिर्णय, साहित्य वसुधा, अंतर्नाद, अशा विविध मासिकांतून सुमारे १०५ कथा प्रसिद्ध. गौरीची पावलं व प्रदक्षिणा या कादंबऱ्या प्रसिद्ध. आत्तापर्यंत ५/६ कथांना मानाचे पुरस्कार प्राप्त.साहित्यातील विशेष कामगिरीबद्दल २००३ मध्ये ऑल इंडिया वुमेन्स कॉन्फरन्सकडून सन्मानित. दिल्लीच्या 'कथा' या संस्थेने घेतलेल्या सर्च फॉर एक्सलन्स या स्पर्धेत प्रथम पारितोषिक.


**वेध पर्यावरणाचा**

**निरंजन घाटे**

किंमत : **१५० रु.**
सभासदांना : **१०५ रु.**
पोस्टेज : **२० रु.**

**पर्यावरण संतुलनासाठी हिरवं सोनं**

**डॉ. सरिता पटवर्धन**

किंमत : **६० रु.**
सभासदांना : **४२ रु.**
पोस्टेज : **२० रु.**

# नक्षत्रांचे देणे

## तरुणाईशी मोकळा संवाद

**सौ.मेधा तेलंग**

राधा नावाची दोनअडीच वर्षांची मुलगी माझ्या शेजारी राहते. अतिशय सुरेख, गोबरे गाल, कुरळे केस, गोरीपान. तिला पाहिलं की प्रसन्न वाटतं. रोज माझ्याकडे ती येते. मी एक दिवस प्रयोग केला तिला म्हटलं, तुझे केस किती छान आहेत. राधा, तुझा फ्रॉक छान आहे, तू दिसतेस किती छान, तुझी बाहुली मस्त आहे ह्या सगळ्या संवादात राधा माझ्या इतकी जवळ आली, अक्षरश: मांडीवर बसली. तिला ही मावशी सगळ्यात प्रिय होती. माझ्याबद्दल अतिशय प्रेम, आनंद ती तिच्या कृतीतून व्यक्त करत होती. मी करत असणारा संवाद अगदी परमोच्च पातळीवर गेला होता आणि पुढचं वाक्य मी म्हणाले, राधा तुझी आई माझी आहे. झालं! क्षणात होत्याच नव्हतं झालं, हीच मावशी तिला आवडेनाशी झाली. तिच्या त्या भावुक डोळ्यात राग होता, असुरक्षितता होती. तेवढ्यात तिची आई आली तर तिने धावत जाऊन आईला घट्ट धरलं. तिच्या त्या इवल्याशा मुठीत आई पूर्ण मावली होती. एक वाक्यामुळे संवाद संपला आणि विसंवाद सुरू झाला. किती सारं बदललं त्यामुळे जगण्यासाठी सुसंवादाची गरज आहे.

हे झालं राधाचं! राधा तर इतकी लहान कसंही वळवू शकतो असं वय, पण त्यांच्याही मनाला भीती, आनंद, अस्वस्थता, असुरक्षितता साऱ्या भावना असतात. जसजशी ही मुलं मोठी होतात तसतसं त्यांची विचारशक्ती अधिक प्रगल्भ होते. त्यांना आपली स्वतंत्र मतं असतात आणि ती त्यांच्या मताप्रमाणे वागण्यासाी धडपडत असतात. त्यांच्या मनाविरुद्ध झालं की आक्रस्ताळेपणा करतात आणि तेच मनासारखं झालं की इतके आनंदी असतात की स्वर्ग पृथ्वीवर अवतरलेला असतो. वय वर्ष ५ ते ८ या वयात या मुलांना आपण सांगितलेलं पटतं, थोडक्यात आई, बाई हे त्यांच दैवत असतं. त्यातल्या त्यात शाळेतल्या बाई हा तर त्यांचा फारच जिव्हाळ्याचा विषय असतो. बाईंनी कोणतीही गोष्ट सांगितली की त्यात कधी बदल होत नाही तो बाईचा संवाद हा सर्वस्वी त्यांचा असतो.

हळूहळू या मुलांची मतं तयार होतात. त्याचे स्वतंत्र विचार असतात. वय वर्ष ९ ते १२ त्यांच्या विचारांना आकार येतो. आपण असं का म्हणतो, माझं हे मत का आहे. हे त्यांना विचारलं. म्हणजे विचारलं तर हं! ते मोडक्या तुटक्या भाषेत काहीतरी सांगतात. त्यांना काहीतरी म्हणायचं असतं हेच आपण पालक लक्षात घेत नाही. कारण आपण मोठे असतो आणि ते लहान! त्यांनी आपलं ऐकलचं पाहिजे हा आपला अट्टाहास तर अशा या वयात जेव्हा पालक काहीच ऐकत नाहीत तेव्हा विसंवाद निर्माण होतो. त्यातून हट्टीपणा, हवं म्हणजे हवं म्हणण्याची प्रवृत्ती त्यातूनच मग खोटं बोलणं, उलट बोलणं, या प्रवृत्ती वाढीला लागतात.

माझ्या माहितीत एक कॉलेजमध्ये जाणारी मुलगी आहे. तिच्या घरी इतकी शिस्त आहे. शिस्त म्हणजे काय? तर तिचे पप्पा जे म्हणतील, तसंच सगळ्यांनी वागायचं म्हणजे तिने कॉलेज सुटल्यावर अर्धा तासात घरी आलंच पाहिजे. नाहीतर, हे आदर्श वडील तिला आणायला कॉलेज-मध्ये जातात. संध्याकाळी सात नंतर कोणी बाहेर जायचं नाही म्हणजे आईना सुद्धा. घरात आजोबा आहेत. त्यांना या मुलाचं वागणं अजिबात आवडत नाही. पण मुलाच्या हट्टीपणामुळे ते काहीही करू शकत नाहीत तर या मुलीचं काय? त्यामुळे काय होतं, तर घरात सतत ताणतणावाचं वातावरण, कोणी मोकळेपणाने बोलत नाहीत, वागत नाहीत. हसून आपला आनंद व्यक्त करत नाही. सतत प्रत्येकाला वाटतं पप्पा काय म्हणतील. या वातावरणात त्या मुलीची निकोप वाढ कशी होणार?

तर काही घरात फारच मोकळं वातावरण म्हणजे मुलं आईवडिलांचा सहज अपमान करू शकतात. वाटेल तसा पैसा मागू शकतात आणि हवं तेव्हा घरातून बाहेर पडतात आणि हवं तेव्हा घरात येतात, वाटलं तर घरात जेवतात, नाहीतर हॉटेल मधे जातात आईवडिलांना काही म्हणायचं असतं हे त्यांना समजतच नाही. कारण ते या जगातले हिरो असतात. हे तरुण वय असंच असतं. आपण दिसायला कसेही असो पॉश शर्टपँट, सेंट, हातात एक कड, पॉलीशचा बेल्ट, पॉलीशचे बूट चालण्यात एक प्रकारची ऐट, आणि मुलींना अथवा मुलांना आकर्षित करण्याची वृत्ती हे सारं त्यांच्याकडे असतं.

आणि हल्लीच्या मुली तर विचारायचं नाही, त्यांचे ते घट्ट, अखूड कपडे, म्हणजे स्त्रीचं शरीर हे झाकण्यासाठी असावं की दाखवण्यासाठी हा प्रश्न पडावा इतके घट्ट कपडे, इतके अखूड कपडे की देहाच प्रदर्शनच चालू असतं. मला नेहमी वाटतं हे पालकांना कळत नाही का? मी तरुण मुलांशी एकूण पोषाख याबद्दल बोलत होते तेव्हा मुलं म्हणाली का हल्ली मुली घट्ट, अखूड कपडे घालतात हे चांगलं दिसत नाही आणि एवढंच नाही तर त्या मुलांच्या समोरं ते अखूड टॉप सारखं खाली ओढतात, मग आमचं लक्ष जाणारच, तुम्ही दाखवता तर आम्ही पहाणारच, या मुलींना हे कळायला हवं. ही मतं तरुण मुलांची आहेत.

'लोकमत' दैनिकाच्या 'सखी' पुरवणीत माझी 'रंग उमलत्या मनाचे' नावानी लेखमाला चालू होती त्यात. मी इयत्ता पहिली ते कॉलेज पर्यंतच्या मुलामुलींशी प्रश्नांच्या माध्यमातून संवाद साधून त्यांच्या उत्तराच्या अनुषंगाने लेख लिहिले आहेत. एक शिक्षिका या नात्यामुळे ही मुलं हे माझं विश्व आहे त्यामुळे हे संवाद फारच छान झाले होते आणि त्याचं मालिकेत पालकांशी संवाद मी साधला होता. या संवादातून एकच जाणवलं की आपला मुलांशी होणारा संवाद कमी होत आहे. यात या कॉलेजच्या मुलांची मतं मला अधिक महत्त्वाची वाटली कारण ही मुलं म्हणजे आपल्या संस्कृतीचे भावी आधारस्तंभ आहेत.

त्यांच्यावर आपल्या कुटुंबाचं, समाजाचं देशाचं भवितव्य अवलंबून आहे.

येणाऱ्या संकटांना धीराने तोंड देणारी ही युवा पिढी कशी आहे? त्यांच्याशी त्यांच्या पालकांचं नातं कसं आहे? आपण त्यांना कोणतं नक्षत्रांच देणं देऊ शकतो? तर माझ्या मते 'संवाद' हे नक्षत्रांचं देणं पालकांनी देणं फार महत्त्वाचं आहे. हा संवाद कमी पडतो म्हणूनच असंख्य प्रश्न निर्माण होतात.

या तरुणांनी एकत्र येऊन देशासाठी पूल बांधला पाहिजे. या तरुणाईकडे आत्मविश्वास आहे. नव्या तंत्राचा वापर करण्याकडे त्यांचा कल आहे. नवीन शास्त्राचा त्यांचा अभ्यास

आहे. जगाकडे बघण्याचा विशाल दृष्टिकोन आहे. आजचा युवक स्मार्ट आहे. एखादा विषय, विचार मांडण्याचं त्याच्याकडे कसब आहे. पण दुर्दैवानं म्हणावसं वाटतं,हे त्यांचे विचार खोल नाहीत. यश लवकर डोक्यात जातं, थोड्या यशात ते हुरळून जातात. कल्पना चावला, सचिन तेंडुलकर सारखे हाताच्या बोटावर मोजता येणारे. फारच कमी. मग असं का होतं? तर योग्य काय? अयोग्य काय? हे सांगणारा आणि त्यांना पटणारं असा संवाद कमी पडतो. या वयातल्या मुलांशी पालकांचा संवाद होणं, समजुतीच्या भूमिकेतून ही गोष्ट सोपी नाही कारण त्यांच वयच असं असतं, की मला सगळं कळतंय

हल्ली ही तरुण मुलं, पब, डिस्कोच्या आहारी जाताना दिसतात. फॅशन हा तर त्यांच्या जगण्याचा अविभाज्य भाग आहे. पैसा म्हणजे यश, आणि यश म्हणजे पैसा हे तर समीकरण झालं आहे. मोबाईल, कार, छान कपडे, उंची पोशाख हे त्यांना हवं असतं आणि हल्लीचा मध्यमवर्गीय पालकसुद्धा या गोष्टी मुलांना सहज देतो. बऱ्याच प्रमाणात ती त्यांची गरज झाली आहे. पण हे हवं म्हणजे हवं हे योग्य आहे का? का त्या मित्राकडे आहे म्हणून मला हवं, याचा विचार पालकांनी केला पाहिजे आणि आपल्या मुलांशी समजुतीने संवाद साधून त्यांना सांगितलं पाहिजे. यासाठी आपल्या आर्थिक परिस्थिती बद्दल त्यांच्याशी बोललं पाहिजे.

पालकांनी आपल्या मुलांच्या मनात आत्मविश्वास निर्माण करायला हवा. पण ह्यासाठी हा संवाद अगदी मुलांच्या लहानपणापासून हवा एकदम तुम्ही कॉलेजमधल्या मुलांशी संवाद साधाल तर ते फार अवघड आहे. अशक्य नाही. पण त्यासाठी त्या वयाचा, त्यांच्या विचारधारणेचा अभ्यास हवा. कारण या वयात करू नको म्हटलं, की तो हमखास करणार असंच ही मुलं वागत असतात. कोणतीही गोष्ट त्यांना पटवावी लागते आणि आपल्याला ती पटवून देता यायला हवी.

असं सगळं असताना दुसरीकडे ही युवा-पिढी धर्मांध प्रवृतींकडे वळताना दिसते. देवळात या तरुणाईची गर्दी असते. एखादा बुवा किंवा साधूने कोणता संदेश देण्याचे ठरवले तर त्यांच्यामागे जाणारा हा तरुण आहे. त्या साधूने सांगितलेल्या अंगठ्या तो विश्वासाने घालतो. भविष्य बघण्याकडे त्यांचा कल आहे त्यासाठी मारुतीला तेल घालायला हा तरुण तयार आहे. अनवाणी देवाला जायला हा तरुण तयार आहे. मग हा तरुण नक्की कसा आहे? तो दिशाहीन अस्वस्थ आहे का? हे आपण पाहिलंच पाहिजे कारण ही युवा पिढी म्हणजेच आपला समाज, आपली संस्कृती आपलं भविष्य आहे.

त्यांच्या पुढचे आदर्श कसे आहेत? आजची सामाजिक परिस्थिती बघता सर्वत्र भ्रष्टाचार, बाजार होताना दिसत आहे. हे सगळं बघणारी ही युवापिढी आहे. बाजारकेंद्रित आक्रमणातून ज्ञान जाहिरातीतून येत आहे. काही जाहिरातीतून अवास्तव कल्पना लोंकासमोर येत आहेत. भपकेबाजपणाला महत्त्व आहे. सिनेमा, मालिका यामधील श्रीमंत घरं, नोकर-चाकर, गाड्या दाखवून त्या बघून सामान्यांना सुद्धा वास्तव आणि कल्पना यातील भेद करणं अवघड होऊ लागलं आहे. आपली संस्कृती, कुटुंब व्यवस्था आणि त्यातले आदर्श आता लोप पावू लागले आहेत. मुला-मुलींनी एकत्र बराच काळ राहणं. मुलांनी घरी उशीरा येणं या गोष्टी पालकांनासुद्धा गैर वाटत नाहीत. म्हणूनच वाटतं आपली संस्कृती बोथट होत आहे का? स्वार्थी प्रवृत्ती वाढत आहे. मी, माझं, ही प्रवृत्ती वाढतं आहे. प्रकाशझोताला महत्त्व आहे का? हा प्रश्न आहे. हे फॅशनचं ग्लॅमरचं वेड वाढत आहे. या चक्रात आपला मुलगा किंवा मुलगी आणि आपण स्वत: किती अडकलो आहोत. हे सगळं एकमेकांच्या संवादातूनच आपण जाणू शकणार आहोत.

लता मंगेशकर, भीमसेन जोशी, सचिन तेंडुलकर आणि अमिताभ बच्चन हे कसे निर्माण झाले त्यामागे त्यांचे कष्ट, सातत्य, मेहनत ही मुलांना सांगितली पाहिजे त्यांची कलेसाठी जीवन अर्पण करण्याची प्रवृत्ती त्यांना समजली पाहिजे. हल्ली एखाद्या मालिकेत थोडंफार काम मिळालं तरी तरुण स्वत:ला हिरो समजायला लागतात. अर्थात हे सगळ्यांबद्दल नाही. पण एकूण हवेत उडण्याची वृत्ती अधिक जाणवते त्यातलं वास्तव हे पालकांनी संवादातून या मुलांना सांगितलं पाहिजे.

अनेक तरुण प्रलोभनात अडकून पडतात. पैसा मिळतो म्हणून त्या दिशेला धावतात. पण तो कोणत्या मार्गाने मिळवला जातो? त्यात मूल्यांचा विचार आहे का? का व्यवसायात आपला वापर एक कठपुतळी म्हणून होत आहे? कोणीतरी आपल्याला नाचवत आहे का? या दृष्टीने बघण्याची दृष्टी आपण मुलांना दिली पाहिजे. आणि हे फक्त संवादातूनच शक्य आहे.

आपण घरात एकमेकांच्या सहवासात रहाण्याचा आग्रह धरला पाहिजे. जेवताना एकत्र असण्याबद्दल ठरवलं पाहिजे. एकूण दिवसभरात काय काय झालं असं मुलांना विचारलं तर त्यांच्या चालण्याचा मार्ग बरोबर आहे का चुकत आहे हे समजणं सहज शक्य आहे. मात्र या गप्पांमध्ये अत्यंत मैत्रीचे नातं असायला हवं तर मुलं त्यांची मन नक्कीच मोकळी करतात आणि पालक त्यांचे मित्र होतात पण या गप्पात मी वडील आहे आणि मी विचारतो ते तू सांगितलंच पाहिजे अशी अधिकाराची प्रवृत्ती असेल तर मुलांना काय लपवायचं, कसं खोटं बोलायचं हे माहित असतं. त्यामुळे संवाद कसा घडतो याला खूप महत्त्व आहे.

हा संवाद नीट घडला नाही म्हणून भरकटत जाणारे अनेक तरुण आम्ही बघतो. बिघडत गेलेली मुलं परत मिळवणं सोपं नाही. बिघडणाऱ्या मुलांचा विचार केला तर एकच उत्तर मिळतं की त्यांना समजून घेणारे, त्यांचे विचार ऐकणारे पालक त्यांना मिळाले नाहीत. सतत संशय, शंका, हिडीसफिडीस, आणि पालकांचा वरचष्मा त्यामुळे मुलं बिघडतात. अजून मुख्य विषय म्हणजे मित्र, त्यांची मैत्री त्यांचे विषय हे आपण बारकाईने बघितलं पाहिजेत. पण त्यांना समजता कामा नये. असं आपलं लक्ष पाहिजे. माझी मैत्रीण सांगत होती मध्यंतरी तिने शाळेत जाणारा एक मुलगा रिक्षातून जाताना सिगरेट ओढत होता ही घटना पाहून तिचं मन अस्वस्थ झालं. आणि ऐकून आमचं! त्या रिक्षावाल्यांनी त्याला ओरडायला हवं होतं. आणि तो घरात गेल्यावर त्याच्या पालकांना त्यांच्या तोंडाचा वास येत नसेल, शाळेचा ड्रेस घातलेला मुलगा इतका बिघडला तरी पालकांना कळू नये. एकतर हल्ली आईवडील नोकरीसाठी दोघं बाहेर असतात त्यामुळे असायला हवा तेवढा संवाद एकमेकांमध्ये होत नाही. कॉलेज, शाळा घरापासून दूर असल्यामुळे मुलांना पैसे द्यावे लागतात. तो पैशाचा वापर कसा करतो, त्यांनी किती पैसे खर्च केले? कशासाठी ही चौकशी वेळच्यावेळी व्हायलाच हवी.

दोन पिढ्यात संवाद झाल्याशिवाय हे प्रश्न सुटणार नाहीत तरुणाई हा मोठा धबधबा आहे. त्यांची ताकद मोठी आहे त्यावर आपण वीज निर्माण करणार नसाल तर काय उपयोग? ती वीज इतरांना प्रकाश देणारी हवी, शॉक देणारी नको. त्यासाठी संस्कार हे लहानपणापासून व्हायला हवे. संवाद प्रथमपासून हवा.

माझ्या प्रश्नावलीत प्रश्न होता. तुमचा आवडता मित्र कोण? का? त्यात आई माझी

मैत्रीण हे उत्तर ३०० प्रश्नावलीत फक्त चार मुलांनी दिलं आणि बाबांचं नाव एकाही उत्तरात नाही. यावरून लक्षात घ्या की आपलं आपल्या मुलांशी किती मैत्रीचं नातं आहे. आज आपल्याला मुलांशी बोलायला वेळ नाही त्याला कारण नोकरी, दमून घरी आल्यावर दूरदर्शन त्यावरच्या मालिका त्यामुळे घरातला संवाद संपत आहे तर आपण कोणते आदर्श, कोणती नीतीमत्ता, कोणते विचारधन देणा. हा प्रश्न मनात येऊन जातो. माझ्या मते हे सगळे मोठेमोठे शब्द आहेत. जर संवाद साधला तर वरील सगळ्या मूल्यांचा अभ्यास सहज होणार आहे. संस्कार असे ठरवून होत नसतात ते घरातलं वातावरण, आईवडिलांच वागणं, सभोवतालचे मित्र यातून घडत असतात.

संस्कार करणारे आईबाबा कसं वागतात याकडे मुलांच बारकाईने लक्ष असतं त्यामुळे खोटं कधी बोलू नये असं सांगणारे बाबा, दुसऱ्या क्षणाला त्रखोटं बोलले तर मुलं त्यावेळी तुम्हाला काही म्हणणार नाहीत पण त्यांच्या मनावर हा संस्कार होत असतो. त्याचप्रमाणे आदर्श म्हणजे काय? उगाच थोरामोठ्यांच्या गोष्टी सतत सांगून आदर्श बिंबतीलच असे नाही. ते मनात रुजवायला एक वय असतं ते लक्षात घ्यायला हवं.

पालकांनी स्वत:च्या वर्तनात जर सत्यता, मनाची स्वच्छता आणि चांगलं वागणं, मोठ्यांच्या-बद्दलचा आदर, कामात सातत्य ही मूल्य ठेवली आणि सहज साधा, उपदेशरहीत संवाद घडवून आणला तर मला वाटत नाही की याहून अजून वेगळं काही मुलांना द्यावं लागेल.

काम करणाऱ्याला मी काम करतो हे सांगावं लागतच नाही. त्याचं काम इतरांना दिसत असतं आणि इतरच त्याच्या कामाबद्दल त्याला पावती देत असतात.

चांगलं काम, चांगली वृत्ती, चांगला संवाद हे नेहमीच जीवन घडवण्यासाठी उपयुक्त असतात. म्हणूनच तरुणांचे दोष दाखवून त्यांना दुखवण्यापेक्षा हे दोष या चूका होणारच नाहीत आणि झाल्यातर संवादातून आपल्यापर्यंत सहज येतील इतकं पालक-पाल्य नातं निर्माण करणं हाच खरा आदर्श; हीच खरी नीतिमत्ता.

### सौ. मेधा तेलंग यांचा अल्प परिचय

पत्ता : ४७८/अ, शनिवार पेठ, पुणे - ३०

नोकरी : मुलांची नू. म. वि. प्रशाला येथे अध्यापिका.

लेखन : उदयोन्मख लेखिका. १९८६ पासून अनेक मासिकांतून व वर्तमानपत्रांतून विविध विषयांवर लेख, कथा व कविता लेखन प्रसिद्ध. प्रपंच मासिकाच्या दीर्घकथा स्पर्धेत पारितोषिक. १९९९-२००० या वर्षीच्या कलायात्री आयोजित सातवे अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलनात 'झाले मोकळे आभाळ' या कथेसाठी फ. मु. शिंदे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह. 'हिमालयातील चारधाम' हे प्रवासवर्णन प्रसिद्ध. 'मनोमयी' हे सामाजिक नाटक प्रसिद्ध. 'रंग उमलत्या मनाचे' हे मुलांच्या भावविश्वाचा शोध घेणारे पुस्तक प्रकाशनाच्या मार्गावर.





# निसर्गश्रीमंतीचा वेध घेणारी भ्रमंती

**प्र. के. घाणेकर**

तुम्हा-आम्हाला भटकायला खूप आवडतं. गुलहौशी नी तारांकित पर्यटन किंवा परदेशी सहली हे काही दरवेळी आपल्या खिशाला परवडणारं राहिलेलं नाही. धार्मिक तीर्थक्षेत्रे आणि त्या ठिकाणी केलं जाणारं कर्मकांड यावर नव्या जमान्यातील मंडळींची श्रद्धा राहिलेली नाही. साहजिकच यात्रा-जत्रा-तीर्थयात्रा हे धार्मिक पर्यटन आता महत्त्वाचं राहिलेलं नाही.

दुर्गऋषी गो. नी. दांडेकर, शिवऋषी ब. मो. पुरंदरे, दुर्गपंडित आनंद पाळंदे, हिमालयपुत्र हरिष कापडिया आणि अशाच अनेक जणांनी डोंगर-दऱ्या-कडे-किल्ले इथे भटकायचं वेड लावलं. डॉ. बापूकाका पटवर्धन, ना. कृ. महाजन सर, प्रा. दा. रा. गोळे अशा भटकंतीप्रिय मंडळींनी ट्रेकिंगची दीक्षा दिली. हिरा पंडित, तु. वि. जाधव, अरुण सामंत, श्रीमती उष:प्रभा पागे आदींनी ट्रेकिंग- दुर्गभ्रमण आणि साहसांच्या अनेक वाटा खुल्या केल्या. अर्थात या नामावलीत आणखीही खूप भर टाकता येईल. या साऱ्यांनी भ्रमंती आणि ट्रेकिंग या गोष्टींकडे हौस म्हणून पाहिले. त्यातून तरुणाईला शिस्तबद्ध नी उद्देशनिष्ठ कार्यक्रमांमध्ये सहभागी करून घेतलं.

१९८० नंतर एक नवी कीड या क्षेत्राला लागली. नाव हौशी ट्रेकिंग मंडळाचं, पण प्रत्यक्षात फायदा मिळवून स्वत:च्या खिशात घालणाऱ्या छुप्या-बिलंदर मंडळींनी एक वाईट प्रथम निर्माण केली. शेवटी त्यांच्यात फाटाफुटी होऊन अनेक नव्या संस्था नी मंडळं निर्माण झाली. आता मात्र ट्रेकिंग हा माझा व्यवसाय आहे, अर्थार्जन हा माझा हेतू आहे नी तो व्यवसाय मी प्रामाणिकपणे करणार आहे हे उजळमाथ्याने नी सचोटीने करणारे काहीजण निर्माण झाले. ही उत्तम गोष्ट झाली.

गिर्यारोहण या शब्दाला एक वलय आहे. उत्तरेतील हिमालय हा पूर्वी यात्रा-तीर्थयात्रांमुळे सर्वसामान्यांना परिचित होता. बद्रिनारायण, केदारनाथ, गंगोत्री-गोमुख, यमुनोत्री, अमरनाथ, मुक्तिनाथ, कैलास-मानस सरोवर आणि अशाच अनेक अवघड यात्रा शेकडो वर्षे चालत होत्या. पण त्यात गिर्यारोहण असे काही नव्हते. ब्रिटीशांनी हिमालयातील उत्तुंग-बर्फाळ शिखरे नी दुर्गम मुलुखात पद्धतशीर गिर्यारोहणाची सुरुवात केली. नैनसिंग, किशनसिंग, तेनसिंग नोर्गे, दोनदा एव्हरेस्टवर प्रथम जाणारा नवांग गोंबू, दोनदा एव्हरेस्टवर जाणारी पहिली महिला संतोष यादव, पहिली भारतीय महिला एव्हरेस्ट आरोहक बचेंद्री पाल अशा अनेक गिर्यारोहकांची नावं गिर्यारोहण क्षेत्रात महत्त्वाची मानली जातात. पण तरीही भारतीय गिर्यारोहकांनी एव्हरेस्ट पर्वतात घडवलेला इतिहास वेगळाच विचार करायला लावतो.

एका भारतीय पथकातील मंडळी एव्हरेस्ट शिखराच्या अगदी जवळ होती. हवाही उत्तम होती. एव्हरेस्टवर पदार्पण करणं सहज शक्य होतं.पण...

एव्हरेस्ट शिखरावर जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या काही परदेशी गिर्यारोहकांची प्रकृती अचानक ढासळली. कारण त्यांच्या प्राणवायू पुरवठा करण्याच्या यंत्रात काही बिघाड झाला होतो. एव्हरेस्ट विजय हाता तोंडाशी आलेला असताना भारतीय गिर्यारोहक पथकाने आपली प्राणवायू पुरवठा यंत्रणा त्या गरजू गिर्यारोहकांना दिली. त्यांना सुरक्षित ठिकाणापर्यंत सांभाळून नेले. एव्हरेस्टवीर होण्याचा दुर्लभ बहुमान लाथाडून मानवतेच्या भूमिकेतून त्यांनी अनोळखी- परदेशी - परभाषिक -गरजू गिर्यारोकांचे प्राण वाचवले. ''हायर दॅन एव्हरेस्ट!'' ''एव्हरेस्टपेक्षा उत्तुंग यश'' असंच सारं जग उद्गारलं

पूर्वीच्या एका आंतरराष्ट्रीय एव्हरेस्ट मोहिमेत इतरांनी संकटात सापडलेल्या हर्ष बहुगुणा या भारतीय गिर्यारोहकाला हिमवादळातून वाचविण्याचा साधा प्रयत्नही केला नव्हता. पण भारतीय गिर्यारोहकांनी हे मानवतेचं नवं मूल्य आचरणात आणून दाखवलं. दुर्दैव एवढंच की ही त्यागाची कथा आपल्या पाठ्यपुस्तकातही कधी समाविष्ट झाली नाही.

**दुर्गदर्शनापलिकडलं बरंच काही-**

किल्ल्यांना भेटी देणं हे खूळ आता खूपच पसरलं आहे. किल्ल्यांची माहिती देणारी अनेक पुस्तकं निघाली आहेत. दुर्गभ्रमण करणाऱ्यांची संख्याही खूप वाढली आहे. त्यांच्याकडून माहिती घेऊन कधी चार-सहा जणांचे तर कधी पाच-पन्नास जणांचे गट दुर्गदर्शनाला जाताना दिसतात. सिंहगड-राजगड-तोरणा-पाचाड-रायगड किंवा पन्हाळगड ते विशालगड नाहीतर नाशिक जिल्ह्यातील सातमाळा डोंगररांगेतील अचला-अहिवंत, रवळ्या-जावळ्या, मार्कंडा, धोडप, कांचन, राजधैर, कोळधेर, इंद्राई, चांदवड किंवा अशाच कितीतरी किल्ल्यांचे जंबोट्रेक्स ही आता नवलाई राहिलेली नाही.

किल्ल्यांवर जाताना वाट हरवली, झाडावळीत चुकलं, काही अपघात वा मृत्यू ओढवला, जवळचं पाणी संपलं तर त्या दुर्गम मुलुखात- अनगड वाटांवर असणारी मंडळीच उपयोगी पडतात. तिथला ग्रामीण मामा नाहीतर एखादी मावशीच अशा अडचणीत सापडलेल्यांना मदत करते. मग या अनामिक माऊलींची-डोंगरभावांची नी तिथल्या कच्चाबच्चांची अडचण ओळखून आपण काही करणार की आपल्या अडचणीच्यावेळी धावून येणाऱ्या त्या सर्वांना वाऱ्यावरच सोडणार?

राजमाची ग्राम सहाय्य मंडळ, राजमाता जिजाऊंच्या नावानं ग्रामीण भागातील किल्ल्यांवर किंवा पायथ्याशी राहणाऱ्या एखाद्या माऊलीला साडीचोळी देऊन वर थोडी आर्थिक मदत देऊन पांग फेडणारा एखादा अनामिक मित्रांचा गट पुढे येताना दिसतो. काही डॉक्टर गिरिप्रेमी अशा ट्रेक्सला जाताना सॅकभर औषधं घेऊन जाताना दिसतात. आणि मग जाणवतं, सगळीकडे अंधार असला तरी एखादी पणती मंदपणे तेवत आपल्यापरीने उजेड पाडतेच आहे.

**निसर्ग अभ्यास नी पर्यावरण**

भ्रमंती-भटकंतीतील आणखी एक मोठा गट म्हणजे वनस्पती-पशू-पक्षी-किडे-फुलपाखरं नी अशाच जीवसृष्टीचा धांडोळा घेत फिरणारे निसर्गप्रेमी. दगड-धोंडे आकाशनिरीक्षण यांचंही त्यांना वावडं नाही.

पुणे-मुंबई-नागपूर-कोल्हापूर-नाशिक-औरंगाबाद अशा शहरी विभागातून धूळवाटांवर पावलं उठवित आपल्या निसर्गश्रीमंतीचा वेध घेणारी ही अभ्यासू मंडळी बाहेर पडतात. त्यांना पाहायची असतात अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने नी संरक्षित अभयप्रदेश. ते सारं पाहताना त्यांना दिसतात तिथल्या वनवासींच्या अडचणी. त्यातील काही मग त्यांच्यातीलच एक होऊ पाहतात.

अहुपे-भीमाशंकर-नारोडीच्या परिसराचा निसर्ग नी वनवासी यांना आईच्या मायेनं सांभाळणाऱ्या कुसुमताई कर्णिक, नर्मदा प्रकल्पाने प्रकल्पग्रस्त बनलेल्यांचं पुढारपण करणाऱ्या मेधाताई पाटकर, मेळघाट अभयारण्यातील बालभूकबळींची समस्या समजावून घेणारं नी सोडविण्याचा तळमळीनं प्रयत्न करणारं मेळघाट मित्रमंडळ, वेंगुर्ल्याच्या बर्नट् रॉक्स बेटांवरील वैशिष्ट्यपूर्ण पाकोळ्यांच्या जतनासाठी प्रयत्नांची शिकस्त करणारे डॉ. सतिश पांडे नी भाऊ काटदरे अशी कितीतरी जणांची नावं घेता येतील. काळ्याढगापाठच्या या रूपेरी कडा, उद्याच्या उज्ज्वल भवितव्याचीच ग्वाही देतात.

भ्रमंती-भटकंती-पर्यटनाच्या क्षेत्रातील सांगण्याजोगं बरंच काही आहे. तूर्तास इतकेच.


**प्र. के. घाणेकर यांचा अल्प परिचय**

पत्ता : १०५, नारायण पेठ, पुणे - ३०

शिक्षण : एम् . एस्सी. (वनस्पतीशास्त्र)

नोकरी : आबासाहेब गरवारे महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख व व्याख्याता

लेखन : आजवर ४८ पुस्तके प्रकाशित. बहुतेक सर्व लेखन गिर्यारोहणविषयक. 'अथातो दुर्गजिज्ञासा' या पुस्तकास म.सा.प. चा रा.ना.नातू पुरस्कार, गिर्यारोहणविषयक लेखनासाठी यशवंतराव काळे स्मृतिपुरस्कार,मुरलीधर यंदे स्मृतिपुरस्कार असे अनेक पुरस्कार प्राप्त. मराठीतून विज्ञानप्रसारासाठी इंडियन फिजिक्स असोसिएशन, पुणे यांचा डॉ. मो. वा. चिपळोणकर पुरस्कार प्राप्त. विविध संस्थांच्या तसेच निसर्गनिरिक्षण शिबिरांमध्ये विषयतज्ज्ञ म्हणून सहभाग. सुमारे ३०० किल्ले पादाक्रांत. किल्ले, हिमालय, निसर्ग, गिर्यारोहण, विज्ञान, भटकंती, पर्यटन या विषयांवर विपुल लेखन व ५००हून अधिक व्याख्याने.

एव्हरेस्टचे इश्वरीय दर्शन घडवणारे प्रवासवर्णन

किंमत : ८० रु.
सभासदांना : ५६ रु.
पोस्टेज : २० रु.

**हिमकोंदणातील हिरा**

**सूर्यकांत कुलकर्णी**

नक्षत्रांचे देणे

# स्त्रीविकासाची उज्ज्वल दिशा

**जयश्री काळे**

गेली २५ वर्षे मी पुण्याच्या विविध भागातील गरीब वस्त्यांमधून शिक्षण आणि आरोग्याच्या क्षेत्रात काम करीत आहे. या सामाजिक पातळीवर तसेच वैयक्तिक आयुष्यात आपली पिढी पुढील पिढीला काय देत आहे याचा विचार करू लागल्यावर असं जाणवलं की एक पिढी दुसऱ्या पिढीला काही देत नसावी. परंतु, त्या त्या पिढीतील सामाजिक वास्तव पुढील पिढी घडवित असावे. या वास्तवाचे सजग भान अनेक व्यक्ती, संस्था आणि मुख्य म्हणजे सर्वसमावेशक गतीशील अशा परंपरा करून देत असतात. यात एकाच वेळी नवीन पिढीला आधार आणि आव्हाने दिसत असतात.

खुली अर्थव्यवस्था व जागतिक-करणाच्या सुरूवातीच्या संक्रमणा-वस्थेत काही उद्योगधंदे बंद पडले, बेकारी वाढली पण त्यातूनच निर्माण झालेल्या आव्हानातून प्रचंड ताकदीचं माहिती तंत्रज्ञान, संगणकयुग निर्माण झालं. नारायण मूर्तीसारखे कायदा व सचोटीची कास धरून जागतिक पातळीवर ठसा उमटवणारे अनेक भारतीय उद्योजक पुढे आले. संगणकीकरण जागतिक स्तरावरून आज अगदी वस्तीपातळीवर पोहचले आहे. लहान लहान संगणक शिक्षण देणाऱ्या संस्था येथे कार्यरत आहेत. त्यातून अनेक बेरोजगार युवकांना 'डाटा एन्ट्री' ची कामे मिळत आहेत. शिक्षणसम्राटांनी या क्षेत्राचं जरी बाजारीकरण केलं असलं तरी मुलांना स्वत:चं भविष्य घडवण्यासाठी अनके पर्याय उपलब्ध झाले आहेत. आणि विशेष म्हणजे ते निवडायचं स्वातंत्र्य मुलांना दिले पाहिजे, याची जाण आज पालकांना आली आहे. उच्चशिक्षणा-बरोबरच बालवयातील शिक्षणाची सुरूवात मुलांना आनंददायी तसंच त्यांच्या नैसर्गिक क्षमता विकसित करणारी असावी. हे लक्षात घेऊन त्या दृष्टीने चालवल्या जाणाऱ्या बाल-वाड्या उच्चभ्रू वस्तीत तसेच गोरगरिब वस्तीतून अगदी खेडोपाडी पोहचल्या आहेत. या बालवाडी शिक्षकांना प्रशिक्षित करण्याचं मोलाचं काम निर्मलाताई पुरंदरेंच्या वनस्थळीसारख्या संस्था करत आहेत.

विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे आरोग्य क्षेत्रातही मोठी क्रांती झाली आहे. आणि त्याचा फायदा अगदी गोरगरीब मुलांपर्यंत पोहचला आहे. गेल्या वीस-पंचवीस वर्षात अनेक सेवाभावी संस्था मुलांच्या सर्वप्रकारच्या लसीकरणाची मोहीम युद्ध पातळीवर राबवत आहेत. तसेच आरोग्य संदर्भात जागृतीची कामेही करत आहेत. पोलिओ निर्मूलनाची मोहीम तर यशस्वी होतेच आहे पण झोपडपट्ट्यांतून मुलांमध्ये आढळणारे खरूज नायट्यासारखे त्वचारोगही जवळजवळ नाहीसे झाले आहेत. टायफाइड, टी.बी. रोगांना बळी पडणाऱ्यांची संख्या कमी झाली आहे.

महारोगांसारखे माणसातून उठवणारे रोग काबूत आले आहेत तर महारोग्यांनाही माणसात आणण्यासाठी बाबा आमटे यांसारखे महामानव व त्यांचे कुटुंबीय कार्यरत आहेत. अपंग, अंध, मूकबधीरांचे जीवन प्रगत यांत्रिकीकरणाच्या साहाय्याने बनवलेल्या उपकरणांमुळे सुसह्य झाले आहे. त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी माणसंसुद्धा ताकदीनं लढत आहेत. एड्स-सारख्या रोगाचं नव्यानं आकलन होऊ लागलं आहे. पण हे आव्हान पेलायला संशोधक तसंच विजयाताई लवाटेंच्या 'मानव्य' सारख्या संस्था पुढे येत आहेत. कृषीतंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे व उत्पादनातील वाढीमुळे, त्या त्या मौसमातील भाजीपाला, अगदी झोपडपट्ट्यांत राहणाऱ्यांनासुध्दा उपलब्ध झाला आहे.

गेल्या पंचवीस वर्षात स्त्रीशिक्षणाचा प्रसार अगदी वस्तीपातळीवरसुद्धा वेगाने झाला आहे. मुलींना शिक्षण मोफत असल्यानं जवळच्या शाळेत दाखल तरी केलं जातं. शाळा गळती असतेच परंतु त्यातूनही पुढे जाऊन मुली १०वी व १२वी पास होत आहेत. व्यवसाया शिक्षण घेऊन स्वत:च्या पायावर उभ्या राहत आहेत. सुजाता साळवीसारख्या कष्टकरी गरीब आईवडिलांच्या मुली इंजिनीअर होऊन धाकट्या बहिणीला शिकवत आहेत. आज मुलांपेक्षा मुली अधिक शिकत आहेत आणि त्यामुळेच नवऱ्यापेक्षा अधिक शिकलेल्या बायका येथील अनेक कुटुंबातून दिसून येतात. कुटुंबातील तिचं स्थान निश्चितच उंचावत आहे. अर्थात जादूची कांडी फिरवल्यासारखं सर्वच चित्र एकदम बदलणार नाही. परंतु स्त्रीचं आत्मभान जागृत करून तिला विकासाची दिशा दाखवणारं पथदर्शक कार्य विद्याताई बाळांच्या नारी समता मंच सारख्या अनेक संस्था सातत्याने व जबाबदारीने करत आहेत आणि त्याचा परिणाम दिसून येत आहे.

प्रगतीबरोबर प्रश्नही निर्माण होणारच. पण अन्यायाविरूद्ध आवाज उठवून संघर्ष करणारी अण्णा हजारे, मेधा पाटकर यांसारखी अनेक लहानथोर मंडळी आज लढत आहेत. सामान्य जनतेतही प्रचंड ताकद आहे. तिला गृहीत धरू नका. भरकटलेल्या शासनव्यवस्थेला निवडणूकीत हादरे देऊन जनतेने हेच सिद्ध केले आहे. जिर्णोद्धारावादी वृत्तीतून स्वत:ला संस्कृती रक्षक म्हणवून घेत या परंपरेतील संदर्भहीन गोष्टींचे समर्थन करणे हे अत्यंत घातक आहे. हे कटाक्षाने टाळून त्यातील एकात्म मूल्याधिष्ठीत तत्त्वाशी प्रामाणिक राहून कार्य करणाऱ्या नक्षत्रांची प्रभा सदैव नवीन पिढीला दीपस्तंभासारखी दिशा दाखवत राहील.


**जयश्री काळे यांचा अल्प परिचय**

पत्ता : ८२३/क, सावित्री, वा. गो. काळे पथ, भांडारकर रोड, पुणे- ४

शिक्षण : गणित विषयातील पदव्युत्तर शिक्षण.

नोकरी : बँक ऑफ बरोडा मधून उच्च अधिकारीपदावरून निवृत्त.

कार्य : निवृत्तीनंतर सर्व वेळ समाजकार्यासाठी वाहून घेतले. विशेषत: तळागाळातील वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी गणित, शास्त्र या विषयांचे अनमोल मार्गदर्शन. या कार्यासाठी 'सुचरित' ही संस्था स्थापन.

**'तुम्हांला देव दिसलाय का?' बुद्धिवादी नरेंद्रचा प्रश्न.**

**'हो.'**

**'मग मला तुम्ही देवाचे दर्शन घडवू शकाल का?'**

**'हो.'**

**रामकृष्ण परमहंसांनी तरुण नरेंद्रच्या मांडीला स्पर्श केला आणि नरेंद्रला ईश्वराची दिव्य अनुभूती झाली. त्यातून स्वामी विवेकानंदांचा जन्म झाला.**

**रामकृष्ण परमहंसांच्या अंगी काही अलौकिक, अतींद्रिय शक्ती असणार.**

**-असे अतींद्रिय शक्तीचे अनुभव अनेक संतांच्या चरित्रात वाचायला मिळतात.**

**संतांनाच नव्हे तर आपल्यासारख्या सामान्य व्यक्तींनाही कधीतरी असे तर्कापलीकडचे काहीतरी अनुभव चकवा देऊन जातात.**

**आपल्याला आलेले असे काही अनुभव आमच्या वाचकांनी कळवले; त्यापैकी पुरस्काराला पात्र ठरलेले पाच आणि इतर निवडक लेख येथे देत आहोत.**

# अतींद्रिय अनुभव



# पुनर्जन्म




## वनमाला कुलकर्णी

नागपंचमीचा दिवस होता. आम्ही टी.व्ही बघत बसलो होतो. दुपारची वेळ होती. दादा म्हणाले, आईला लाह्या मेतकूट मीठ लावून खायला दे. आई तत्परतेने उठली. एका पसरट भांड्यात चविष्ट लाह्या तयार करून खायला दिल्या. आणि ती परत सोफ्यावर जाऊन बसली. थोडा वेळ गेला. मोठा आवाज झाला आई सोफ्यावरून खाली कोसळून पडली. मग धावाधाव. लगेच डॉक्टरांना बोलावण्यात आले. आईचं वय ६० व वडिलांचे वय ७०. दहा वर्षांचे अंतर दोघात होते. वयस्कर वडिलांना आईला दवाखान्यात नेणे अवघड व आम्ही लहान म्हणून घरीच डॉक्टरांना बोलावले. डॉक्टर येईपर्यंत आम्हाला काही सुचेना. आई शुद्धीवर नव्हती. डॉक्टर आले. त्यांनी तपासणी केली व लगेच दवाखान्यात ॲडमिट करण्यास सांगितले. आम्ही चार बहिणी व एक भाऊ असा आमचा परिवार. आईला अतिदक्षता विभागात ठेवले.

भावाला बाजूला घेऊन डॉक्टरांनी सांगितले की आईला मेंदूचा आजार आहे (ब्रेन हॅमरेज). यातून आई वाचणार नाही ताबडतोब सर्वांना कळवा. आमचा प्रयत्न असूनही आम्ही त्यात यशस्वी होऊ असं सांगता येत नाही. कोमामध्ये गेली तर अजून अवघड होऊन बसणार. सध्या कोमात जाऊ नये असाही आमचा प्रयत्न चालू आहे.

तेवढ्यात आईने डोळे फिरवले, नाडी बंद झाली. डॉक्टर पळापळ करत होते. हाती काही नव्हते.

आई आम्हाला सोडून गेली. ओक्साबोक्शी रडणे, सांत्वनासाठी लोक येणे चालू होते. दवाखाना गच्च भरला.

आता आईला घरी न्यायचे. तेथून तिची प्रेतयात्रा निघायची होती. आईला सवाष्णपणी मरण पाहिजे होते. तिची शेवटची इच्छा तरी पूर्ण झाली; ती जिंकली असे म्हणत वडील डोळे पुसत होते. आई गेल्याने साऱ्यांनाच तिची उणीव जाणवत होती.

घरी आणल्यावर आईला चटईवर ठेवले.

तोच आईने मी पडले, पडले. मला आधार द्या, असे म्हणत खाडकन डोळे उघडले.

डोळे उघडले असले तरी ती अजून शुद्धीवर नव्हती. वेगळ्या अवस्थेतून ती प्रवास करीत असावी कारण हसणे, मध्येच रडणे, ती अडखळत बोलत होती. 'अहाहा,काय दृश्य आहे! काय उपवन सुरेख आहे! लख्ख वाटतंय प्रकाश कसला? ओळीतल्या बायका गजरे घालून आरतीचे तबक घेऊन उभ्या. मला जागा द्या हो, मला ढकलू नका. मी थोड्या जागेत उभी राहते असे म्हणूनही मला ढकलताय' असं काय काय तिचं बडबडणं चालूच.

आम्ही हलवलं. पाणी शिंपडलं. 'मला गजरा देईनात. शेवटी दिलाच नाही. कसल्या वाईट बायका!' असं म्हणत मग ती आमच्याकडे बघू लागली.

पण ती खूप थकली होती. तिच्या चेहऱ्यावर क्षीणपणा दिसला. असं वाटलं की तिला फार दगदग झाली असावी.

पण त्याही अवस्थेत ती रडत होती.

आई, काय झाले? स्वप्न पडले का?

ती गप्प होती. तोपर्यंत सगळे भेटायला आलेले व हार हातात आणलेले लोक पटापट निघून गेले. त्यांना आश्चर्य तर वाटलेच. पण परत आईला त्रास व्हायला नको, हे लोक का आले होते हे कळायला नको म्हणून ते सर्वजण. नंतर येतो सांगून गेले.

माझ्या आईला बघायला डॉक्टर नर्सेस आल्या. प्रश्न मुलाखती. सतत वर्दळ, कुतूहल सर्वांना वाटले. अशा प्रकारची केस डॉक्टर प्रथमच पहात होते. लाखात अशी केस असू शकते असे डॉक्टर म्हणाले.

२-३ दिवसांनी जे आईच्या अंत्यसंस्काराची यादी तयार करत होते ते आमचे दादा हार्टअॅटॅकने गेले. झोपेत असतानाच ते गेले. सकाळी उठले नाहीत म्हणून उठवायला गेल्यावर ते गेलेलेच होते.

कशी नियतीची किमया! ही सत्यघटना अनुभवली आहे. आज ह्या गोष्टीला तीन वर्षे पूर्ण झाली.

दादा गेल्यावर आईचे मंगळसूत्र तोडताना आईला जो मानसिक त्रास झाला तो शब्दांत मांडता येत नाही.

ती अतिशय दु:खी झाली. कुणाशी बोलायची नाही, आहार कमी झाला होता, मरणाची वाट पहात दारात बसायची. 'गेल्या जन्मीचं पाप. मी पापिष्ट आहे.' स्वत:ला अपराधी समजायची. पण १२ वर्षे ती जगली. त्या जगण्यात तिला कसलेच स्वारस्य वाटत नव्हते. विधवा म्हणून तोंड दाखवणे म्हणजे गुन्हा वाटायचा. तिच्यात नैराश्य, उदासीनता, दु:ख कणाकणात भिनत होते. पण जप मात्र सारखा करायची. शेवटी बोटे चिमटेपर्यंत इतका जप करायची. तिला शिवलीलामृत अभंग, स्तोत्रे, रामरक्षा सगळे धार्मिक तोंडपाठ होते. आरत्या, कहाण्या व्रत पारायणे करण्यातच तिचं अधिकाधिक आयुष्य व्यतीत झालं होत शेवटी माझ्या भावाने काशी त्र्यंबकेश्वर इतर ठिकाणी जाऊन नारायण नागबळी केले. त्याच्या दुसऱ्या दिवशीच आई गेली. भटजींच्या सांगण्यावरून भावाने तो धार्मिक विधी केला व त्याच्या दुसऱ्या दिवशी आईने जावे हा पण आश्चर्यकारक प्रसंग म्हणावा लागेल.

"खरंच, ईश्वर अद्भुत शक्तीचा हा विजय आहे.'

**३४३, दक्षिण कसबा, सोलापूर**

**आगामी.. आगामी.. आगामी..**

**अहिल्याबाई होळकर यांच्या तेजस्वी जीवनावरील कादंबरी**

**कर्मयोगिनी** **विजया जहागिरदार**



# दत्तमूर्तीमध्ये स्वामी समर्थांचे दर्शन




**शरद महाबळ**

माझं लग्न झालं आणि सासऱ्याच्या रूपात मला दुसरे बाबा मिळाले. वामन मूर्ती, दाढी राखलेली. व्यायामाने कमावलेलं शरीर आणि सात्विक चेहरा. हे व्यक्तिमत्त्व अध्यात्मात खूप उंच आहे हे कालांतराने कळले.

त्यांची थोडक्यात पार्श्वभूमी सांगायची झाली तर समजायला लागल्यापासून ते वयाच्या चाळीशीपर्यंत त्यांनी अखंड, अविरत व निर्व्याज अशी दत्ताची भक्ती केली. सोबतच नाथ संप्रदायाच्या अभ्यास. त्यांच्या तोंडात शिवलिंग दिसल्याचे एका फकिराने लहानपणीच त्यांच्या आईला सांगितलं होतं. अर्थात हे कोणीही गांभीर्याने घेतलं नाही हे सांगणे न लगे. दत्ताची आणि नाथांची इतकी जबरदस्त उपासना त्यांनी केली की साक्षात श्रीपादश्रीवल्लभांनी त्यांना दर्शन देऊन कमंडलूतलं पाणी त्यांच्यावर शिंपडलं. तसंच नाथांनीही दर्शन दिलं. एकदा एकरूपता साधल्यावर मग काय? गणपती, शंकर, काळभैरव, बारा ज्योर्तिलिंग यांची त्यांना बसल्या जागी दर्शनं झाली.

एकदा ही अनुभूती झाल्यावर त्यांनी शिर्डीचे साईबाबा, शेगावचे गजानन महाराज, आणि अक्कलकोटचे स्वामी समर्थ यांच्याशीही संपर्क केला. विशेष करून साईंशी जास्त रमले. आणि मग काय चमत्कारांचा पाऊसच पडला. शब्दमर्यादेमुळे सगळे अनुभव लिहिणे शक्य नाही. अशा या सिद्ध पुरुषाच्या मार्गदर्शनाखाली व त्यांच्या कृपाशीर्वादानेच मला अनेक अनुभव आले, त्यातला फक्त एकच अनुभव येथे विशद करतो.

आमचं लग्न म्हणजेच त्यांच्या जीवनात साईंचा प्रवेश आणि अनाकलनीय घटनांची सुरुवात. त्यांची मुलगी म्हणजे आमची बायको. तेव्हा वयात आल्यावर सासूबाईंनी तगादा लावला की तुम्ही काहीच करत नाही म्हणून. त्यांनीही ते आव्हान स्वीकारलं आणि अधिकारवाणीनं सांगितलं की आमचे साई चाळीस दिवसांत लग्न घडवून आणतील. असं म्हणून पोथी वाचायला सुरुवात केली आणि खरोखरी तसंच घडलं.

लग्नात त्यांनी मुलीला दोन अमूल्य वस्तू भेट दिल्या. एक म्हणजे त्यांचा अनोखा फोटो व दुसरी पोथी. बरोबर संदेश दिला की तुला साईंच्या झोळीत टाकलं आहे. त्यांचं स्मरण कर. आणि खरोखरीच आत्तापर्यंत त्यांनीच आम्हाला सांभाळलं यावर माझीही अतूट श्रद्धा आहे. नास्तिक लोक याला योगायोग किंवा बोलाफुलाला गाठ असं म्हणणारच; परंतु जीवनात काही अशक्यप्राय गोष्टी जेव्हा शक्य झाल्या तेव्हा माझाही विश्वास दृढ होत गेला.

यानंतर वेळोवेळी झालेल्या गाठीभेटीतून मलाही अध्यात्मात रस वाटू लागला. मी त्यांना

असंख्य प्रश्न आणि शंका विचारल्या, तेव्हा त्यांनी प्रत्येकाचं समाधानकारक उत्तर तर दिलंच, पण प्रत्येक शंकेचं निरसनही केलं. प्रत्येक गोष्टीला प्रमाण, पुरावा आणि ताळा मिळत गेला. याचि देही याची डोळा काही गोष्टी पाहिल्यावर आणि अनुभवल्यावर विश्वासाची पकड घट्ट होत गेली. शाबरी भाषा, अघोरी विद्या, ध्यानधारणा, कुंडलिनी जागृत करणे, समाधी लावण्याचे कसब या सर्व गोष्टींनी माझं कुतूहल जागृत होत गेलं.

मी बँकेत अधिकारी असल्याने वरचेवर बदली ठरलेली. प्रत्येक बदलीच्या गावी ते आवर्जून यायचे. त्यांच्याच प्रेरणेने मला नवनवीन जागृत स्थळांची माहिती मिळू लागली व आम्ही त्या त्या स्थानांना एकत्रितपणे भेटी देऊ लागलो. प्रत्येक दर्शनानंतर त्यांचं आध्यात्मिक विश्लेषण चाले ते मला विशेषसं कळत नव्हतं तरी त्यांच्या रसाळ वाणीनं मी प्रभावित व्हायचो. त्यांनी सतत बोलावं आणि आपण मंत्रमुग्ध होऊन ऐकत राहावं असं वाटायचं. एक वेगळाच आनंद आणि अनुभूती होत असे.

माझी कुंडलिनी जागृत करा म्हणून मी मागे लागायचो व योग्य वेळ आली की ती आपोआप जागृत होईल असं ते म्हणायचे.

मी त्या क्षणाची आतुरतेने वाट पहात होतो.

हिंगोलीला मंगळवारा भागात एकमुखी दत्ताचं एक प्राचीन मंदिर आहे. हिंगोलीला माझं पोस्टिंग असताना ती. बाबा आले. तेव्हा सगळेजण मंदिरात गेलो ते त्या मंदिरात खूपच रमले होते.

मला त्यांनी सांगितलं की हे खूप जागृत देवस्थान आहे. आणि यात रोगनिवारक शक्ती आहे. पाहिजे तर अजमावून पहा.

काळाच्या ओघात मला या गोष्टीचा विसर पडला.

अचानक माझ्या भावजयीचे वडील खूप आजारी पडले. शेवटची घटका मोजीत होते. मला एकदम वाटलं की हिचं पितृछत्र टिकलं पाहिजे. म्हणून मी आठवणीने याच मंदिरात मनोभावे प्रार्थना केली. तिला आणि तिच्या वडिलांना प्रसाद पाठवला आणि आश्चर्य म्हणजे त्यांना आराम पडला. ते चक्क यमाच्या दारातून परतले आणि आजतागायत हयात आहेत.

तद्नंतर माझी नांदेडला बदली झाली. तिथे एकदा बाबा आले आणि मला म्हणाले, हिंगोलीला जाऊ या.

बाबा वाक्यम् प्रमाणम् या न्यायाने आम्ही दोघेही ताबडतोब मार्गस्थ झालो.

आणि इथेच मला तो अतींद्रिय अनुभव आला.

आम्ही भर दुपारी १२ वाजता मंदिरात पोचलो. मंदिर सुनसान होते, पुजारीही नव्हता.

आम्ही दोघांनी दर्शन घेतलं, पाया पडलो. प्रदक्षिणा घातली. दर्शन झालं की मुख्य हॉलमध्ये डोळे मिटून थोडं ध्यान करायचा असा आमचा प्रघात होताच. परंतु त्या दिवशी मात्र त्यांनी असं म्हटलं की जरा निवान्त बसू या. त्याप्रमाणे खांबाला टेकून देवाकडे तोंड करून ते बसले. मी त्यांच्या पुढ्यात बसलो.

येथूनच अद्‌भुत चमत्काराला सुरुवात झाली.

आमच्या भाषेत ते ट्रान्समध्ये किंवा रेंजमध्ये गेले. त्यांनी बरंचसं असंबद्ध बोलायला सुरुवात केली. अजिबात संबंध नसलेल्या बहिणीची आठवण काढली. तिच्याकडे जायची इच्छा व्यक्त केली. काहीही अपेक्षा नाही.दारातूनच साडीचोळी देऊन परतायचं,पण मला तिथं घेऊन जाल का म्हणून विचारलं.

खरं म्हणजे या प्रश्नाने मी चांगलाच चक्रावलो होतो; तरी पुत्रकर्तव्यानं हो म्हटलं व तसं आश्वासनही दिलं.

त्यानंतर ते दोन मिनिटं डोळे बंद करून स्वस्थ बसले. मग डोळे उघडून मला जवळ बोलावलं आणि सांगितलं की दत्ताच्या मूर्तीची जिवंत पावलं मला दिसत आहेत आणि दत्तमूर्तीमध्ये स्वामी समर्थ प्रकट झाले आहेत. तुम्ही पहा आणि मला सांगा.

ही गोष्ट सांगेपर्यंत माझं गाभाऱ्याकडे लक्षच नव्हतं.

मी वळून पाहिलं आणि आश्चर्यानं दिङ्‌मूढ होण्याची वेळ माझ्यावर आली.

आकाशात लख्खकन वीज चमकावी आणि क्षणात आसमंत प्रकाशमान व्हावा तद्वतच माझ्या डोक्यात वीज चमकली आणि त्यांनी सांगितलं होतं तसंच्या तसं दृश्य मी अनुभवलं.

तो चित्तथरारक आणि रोमांचक क्षण मी अनुभवला. जिवंत पावलं आणि स्वामी समर्थ पाहिले.

दरदरून घाम फुटला, भान हरपून गेलं आणि काही कळायच्या आत देवापुढे नतमस्तक झालो.

डोकं उचललं तेव्हा ते क्षणैक दृश्य नाहीसं झालं होतं. परंतु त्या क्षणाचा जो अनुभव घेतला तो अविस्मरणीय आणि चिरकाल टिकणारा आहे.

आजही आठवला की अंगावर शहारे येतात.

तशा भारावलेल्या अवस्थेत आम्ही घरी आलो.

काही वेळाने ते नॉर्मल झाल्यावर त्यांना विचारलं की हे काय होतं? तर त्यांनी सांगितलं की माझी कुंडलिनी जागृत झाली होती.

यानंतर अशा अनुभवांचा सडा पडला. पाथरीला बदलून गेलो असताना साईंच्या जन्मस्थानी ती. बाबांच्या प्रेरणेने भक्तिरसात आकंठ बुडालो. खूप अनुभव घेतले. या विषयाची चांगली जाण आली.

अशा प्रकारे सासऱ्यांना मी गुरूच मानलं असून त्यांच्यात मला प्रतिसाईच दिसतात.

त्यांच्याच प्रेरणेने हा आजचा लेख होत आहे. या अढळ श्रद्धेच्या भावनेतून त्यांचं, साईंचं आणि सर्व इष्टदेवतांचं स्मरण करून, मला आलेल्या अनुभवाबद्दल बाबांचे व परमेश्वराचे आभार मानून या लेखास पूर्णविराम देतो.

**साईभक्ती', १६-जेथलीया विहार, न्यू उस्मानपुरा, औरंगाबाद ४३१००५**

**आगामी.. आगामी.. आगामी..**

**इराणमध्ये डांबल्या गेलेल्या आपल्या दोन कर्मचाऱ्यांना सोडवण्यासाठी एका मालकाने केलेल्या भगिरथ प्रयत्नांची चित्तथरारक सत्यकहाणी**

# ऑन द विंग्ज ऑफ इगल

**केन फॉलेट** अनुवाद **ज्योत्स्ना लेले**

# तर्काच्या पलिकडे




**माधवी कुंटे**

एका सुशिक्षित, बुद्धिवादी, मध्यमवर्गीय कुटुंबात माझा जन्म झाला. बऱ्याच गोष्टी तर्कावर पारखून घेण्याची रीत कुटुंबात होती तरीही देवावर श्रद्धा होतीच. आजोबा घरात रीतसर पूजाअर्चा करीत. आजी,आई पारंपरिक व्रतवैकल्ये करीत. पण त्यातील त्यांना न पटणारा कर्मकांडाचा भाग त्या काढून टाकत. गुरुचरित्र बायकांनी वाचू नये असे म्हणतात. पण देवाची कुठलीही पोथी आजीला निषिद्ध नव्हती. त्यामुळे तिनं बिनदिक्कत गुरुचरित्राचे पारायण केले आणि आजोबांनीही तिला अडवले नाही.

वडिलांनी कधीही पूजा वगैरे केली नाही. भावांच्या मुंजी केल्या नाहीत. (विद्यासंस्कार सुरू झालेलाच आहे. आता कशाला मुंज वगैरे, त्यांचा वाद आईशी झालेला आठवतो आहे) वडिलांचा उपवास म्हणजे फराळाचे जिन्नस खाण्याचा वार असे. पण परमेश्वरावर त्यांची श्रद्धा होती. त्याहीपुढे जाऊन त्यांचे सांगणे असे की त्या जगन्नियंत्याला नम्रतेने नमस्कार करा आणि सर्वांचे कल्याण होऊ दे असे म्हणा. तुम्ही जे काही कराल त्यानुसार आयुष्य बरेवाईट घडेल असे त्यांचे म्हणणे असे. एकंदरीत घरातील वातावरण फार धार्मिक नव्हते. मनाचे कंडिशनिंग तशा तऱ्हेने झाले नव्हते. काही वेगळ्या जाणिवा विकसित झालेल्या नव्हत्या. वेगळे अनुभव...अनुभवच... अनुभूती फारच वरच्या श्रेणीची असावी. तर वेगळे अनुभव काही आले नव्हते. येतील असं वाटलं नव्हतं. लोकांना स्वप्ने पडत, त्यात मृत आप्तस्वकिय दिसत. त्याबद्दल मला आणि भावाला नवल वाटे. आम्हाला कधी भुतेखेतेही दिसली नाहीत. मरणोत्तर अस्तित्वावर विश्वास नव्हता.

पण आमच्या आजोबा-आजीने तीर्थयात्रा भरपूर केल्या. साधुसंतांची दर्शने घेतली. शिर्डीला जाऊन त्यांनी साईबाबांचेही प्रत्यक्ष दर्शन घेतले. साईबाबांची एक मोठी तसबीर माझ्या माहेरी दरवाजालगतच्या भिंतीवर टांगली होती. वडील दर गुरुवारी तसबिरीला नवीन हार घालत. पेढे आणत. नारळ फोडत. बाहेर जाताना ते आपला जाण्याचा ठावठिकाणा आईला ओरडून सांगत. ''कुसुम, ऑफिसला निघालोय ग.'' तसेच ते बाबांच्या तसबिरीसमोर निमिषमात्र हात जोडून उभे राहत. आम्हीही परीक्षेला वगैरे जाताना घरात देवांना नमस्कार केल्यावर बाबांच्या तसबिरीसमोर हात जोडत असू. अगदी लहानपणी तर बाबांच्या तसबिरीसमोर मी काही गाऱ्हाणीही केली असावीत.

देवाला नमस्कार करून निघणे म्हणजे आपले काम आता नीट होईल असा आत्मविश्वास कमावणे असते हे लहानपणी ठाऊक नव्हते. पण हात जोडून प्रार्थना केली की बरं वाटे एवढं खरं.

यथावकाश लग्न होऊन मी पार्ल्याला आले. धार्मिक बाबतीत सासरचं वातावरण माहेरसारखंच होतं. इथे साईबाबांची तसबीर नव्हती त्यामुळे मला थोडं चुकल्यासारखं होई. पण आपण तसबीर आणून लावावी असं काही घडलं नाही. मी हात जोडून मनात स्मरण करे. आयुष्याचा सुखदु:खांनी युक्त सर्वसामान्य प्रवास चालू होता. माहेरची माणसे एकापाठोपाठ एक मृत्युमुखी पडलेली होती. बहिणीचे लग्न होऊन ती पार्ल्याला राहात होती. तिच्याही अनेक प्रापंचिक कटकटी चालू होत्या.

एव्हाना माझं वय बरंच वाढलेलं. मुलं मोठी झालेली. वडिलांचा मृत्यू झाला. त्यानंतर मात्र एक विलक्षण अनुभव आला.

मृत्यूनंतरच्या अस्तित्वावर माझा विश्वास नव्हता. म्हणजे वासना शरीररूप धारण करून येतात वगैरे आजही पटत नाही. तर वडील गेल्याला आठवडा झाला असेल. आमच्या घराबाहेर ओटा होता. मध्यरात्री मला जाग आली आणि ओट्यावर वडील उभे आहेत असं दिसलं. अगदी स्वच्छ आणि स्पष्ट. मी म्हटलं, ''नाना, बाहेर का उभे राहिलात? आत या. बाहेर गारठा आहे.'' ते म्हणाले,''नाही.आत येता येत नाही. निरोप घ्यायला आलोय. मी चलतो.'' आणि बोलता बोलता ते नाहीसे झाले.

हे सारं अगदी स्पष्टपणे घडलं. कुठेही नि:संदिग्धपणा नव्हता. पण नीट उठून बसले तर दार बंदच होतं. मग हे इतकं स्पष्ट स्वप्न होतं का? की माझ्या मनानं त्यांच्या अस्तित्वाचं केलेलं प्रक्षेपण होतं? तो अनुभव अगदी जिवंत, सच्चा वाटत होता. स्वप्नवत नव्हता. मग तो नेमका कसला होता? हे अजून मला उलगडलेलं नाही.

पुढे मी सकाळची फिरायला जाऊ लागले. त्यानंतर एकदा योगायोगानं साईबाबांच्या मंदिरावरून वळसा घातला गेला. हे देऊळ प्रसन्न आहे. बाबांची मोठी मूर्ती आहे. पुढे बऱ्यापैकी मोठी मोकळी जागा आहे. मी आत जाऊन हात जोडले. खूप बरं वाटलं. देवळात आपल्या मनात दु:खद, दुष्ट वाईट विचार येत नाहीत. फिरून येता येता मी देवळात शिरू लागले. कधी चार फुलं वाहू लागले. पण ह्या पलिकडे आणखी काहीच नाही. अगदी पूर्वी घरात हात जोडायची तशी आता साईबाबांच्या मूर्तीसमोर हात जोडू लागले. मागणं काही नसे कारण आपण करू तेच आपल्यापुढे फलस्वरूप येणार ही शिकवण मनात रुजलेली.

दिवस नेहमीच्या गतीनं चाललेले. मला विशिष्ट त्रास सुरू झाला. भरपूर त्रास सहन केल्यावर सोनोग्राफीनंतर हिस्टरेक्टोमीचं ऑपरेशन ठरलं. ऑपरेशन व्यवस्थित झालं. मी घरी आले. पण दोन टाके पिकले. जखम भरून येईना. मी कंटाळले. औषधांचा मारा चालू होता. मी थकून गेले होते.

एक दिवस एका तिरीमिरीत उठले. कपडे केले आणि साईबाबांच्या मंदिराकडे निघाले. मनात म्हटलं आजारपणं आधीव्याधी यायच्याच आणि त्या सहन केल्या पाहिजेत; पण आता माझी सहनशीलता संपत आली आहे.

मी देवळाशी आले. आणि चप्पल काढून आत शिरणार तर उंबऱ्याशी एक माणूस समोर आला. त्यानं माझ्याकडे निरखून पाहिलं. माझ्या हातात नारळाचा एक मोठा तुकडा ठेवला. माही प्रतिक्षिप्त क्रियेसारखा हात पुढे करून तो तुकडा घेतला. आत आले.

बाबांच्या मूर्तीसमोर हात जोडले आणि मग माझ्या लक्षात आलं, इथे सकाळी असा

प्रसाद कुणी वाटत नाही. बाबांसमोर काही नारळाच्या तुकड्यांचं भांडं नाही. गुरुवार वगळता प्रसाद वाटण्याचा सवाल नसतो. इथे काही मोठी पूजाअर्चा झालेली नाही. मंदिरात दोनतीनच माणसे. ती आपली हात जोडून प्रार्थना करण्यात मग्न! मग मला हा प्रसाद कसा मिळाला? हा योगायोग विलक्षण होता. मी तो प्रसाद खाल्ला. त्यामुळे कदाचित मनाला उभारी मिळाली असेल किंवा कसंही असेल. पण माझी टाक्यांच्याजवळची जखम पाच सहा दिवसांत पूर्ण भरली. बाबांच्या प्रतीकातून मला बरं होण्याची स्वयंसूचना मी करून घेतली होती का? पण मग त्या प्रसाद देणाऱ्याचं काय? अचानक मलाच कसा प्रसाद मिळाला? हा कोणता योगायोग?

पुढे असाच योगायोग घडला. मी सकाळी फिरायला निघाले. माझ्या विचारांमध्ये मी गुरफटले होते. त्यामुळे नेहमीचं वळण घेतलं नाही. पुढे मार्केटच्या अलिकडे पोहोचल्यावर लक्षात आलं की आपण वेगळ्या रस्त्याला आलो. या रस्त्यानं नेहमीच्या वेळेएवढं फिरणं पूर्ण करू या असा विचार करून पुढे निघाले. इतक्या सकाळी बंद. रस्त्यावर तसं कुणीच नव्हतं.. एका माणसानं मला थांबवत म्हटलं.''देवाचा कृपाप्रसाद म्हणून हे घ्या.''

त्यानं देवांची चित्रे कोरलेल्या पातळ छोट्या पत्र्याच्या पट्ट्या काढल्या मी सहजच साईबाबांचा चेहरा कोरलेली पट्टी उचलली आणि म्हटलं,''कशी दिली?'' तो म्हणाला, ''दहा रुपये''. मी म्हटलं ''सात रुपयात द्या.'' त्यावर तो हसला आणि म्हणाला,''ताई, तुमच्या मनाला येईल ते द्या.'' मी त्याला सात रुपये दिले आणि पुढे गेले. मनात आलं बहिणीसाठीही एखादी घेऊ या. दहा पावलंच मी पुढे गेले असेन. मागे वळले तर तो तिथे नव्हता. नंतरही तो कधी दिसला नाही.

ह्या अनुभवाचं स्पष्टीकरण मी आपल्या मनाशी तऱ्हेतऱ्हेनं करून बघितलं. पण त्याचा तर्कशुद्ध उलगडा अजून झालेला नाही.

अशीच सकाळी एकदा वेगळ्या रस्त्यानं फिरत असताना एका माणसानं थांबवून ओंजळभर ताजी फुलं दिली आणि म्हटलं, ''तुमच्या हातानं ही देवाला वाहा. तुमची प्रार्थना देवाच्या चरणी रुजू होईल.''

देवासमोर हात जोडून उभी असताना माझं मन कित्येकदा आनंदाने भरून येतं. पण ह्या अशा योगायोगाच्या घटना क्वचित घडतात. त्यामुळे अज्ञातातून आपल्याला मदतीचा, आनंदाचा पुरवठा होत असतो यावरील विश्वास मात्र दृढ होतो.

**नारायण निवास, हनुमान रोड, विलेपार्ले (पू), मुंबई- ४०००५७**

**आगामी.. आगामी.. आगामी..**

**'वपुं'च्या आत्तापर्यंत पुस्तकरुपात प्रकाशित न झालेल्या नव्या कथांचा संग्रह**

**गोष्ट हातातली होती !** **व. पु. काळे**



# स्वप्नातील दृष्टांत




**नीलिमा आंगले**

जीवन म्हणजे कधीच कुणाला न उलगडणारे विलक्षण कोडं! वास्तव जीवनामध्ये आपणास बुद्धी नि तर्कशास्त्राचा ताळमेळ नसलेले आकलन शक्तीच्या चौकटीत न बसू शकणारे अनेक अनुभव असतात. जे आपण सुसंगतरीत्या व्यक्त करू शकत नसतो. भावी संकटाची पूर्वसूचना मिळणे, असाध्य रोग आकस्मिक बरा होणे, अनपेक्षित सहाय्य मिळणे, अरिष्ट टळणे असे अनुभव आलेले कित्येकजण आढळतात. कुणाला प्राणायाम, योगसाधना यांच्या माध्यमाने सिद्धी अवगत असतात. मृत्यूनंतरचे अस्तित्व, कुंडलिनी जागृती अनुभवलेले कित्येकजण असतात. साधुसंतांच्या सहवासात वा स्पर्शाने अनेक अनाकलनीय गोष्टी जाणवतात. काही काही वेळा विशिष्ट क्षणी विशिष्ट पातळीवर आपणास आगळ्या-वेगळ्या गोष्टींची अनुभूती जाणवते. अशाच एका सैरभैर क्षणी दोलायमान मनस्थितीत आलेला अतींद्रिय अनुभव मला आपणास सांगावासा वाटतो.

मानवी मन हे एक नाणे असते. या नाण्याला सुख आणि दुःख अशा दोन बाजू असतात. सुख आणि दुःख ही भरती-ओहोटीसारखी असतात. भरतीचा भर ओसरल्यावर ओहोटीचा आरंभ होत असतो. त्याप्रमाणे ओहोटी ही सुखाची मावळती नि दुःखाची उगवती दशा असते. सुख म्हणजे ताणतणावविरहित काळ नि दुःख म्हणजे अरिष्ट, अनिष्ट अथवा संकटजन्य काळ असे सुखदुःखाचे समीकरण करता येईल.

नियती ही आकाश पृथ्वी नि पाताळ या तिन्ही लोकांशी निगडीत संबंध असलेली प्रभावी संचार शक्ती आहे. देव, दानव नि मानव यांना अचाट सामर्थ्य या शक्तिमध्ये आहे. जर का एखाद्यावर ही शक्ती अनुरक्त झाली तर क्षणात ती व्यक्ती भिक्षाधीशाची लक्षाधीश बनते. सार्वभौम सत्ताधीश म्हणून मिरवणाऱ्या प्रभृतींना नियतीची लहर फिरल्यास नियतीचे दास व्हावे लागते.

सुख आणि दुःख यांचा रहाटपाळणा दिवसरात्री सारखा असतो. या रहाटपाळण्याची दोरी नियतीच्या हाती असते. मर्जीनुसार माणसाला ती उंच खाली झोके देत असते.

मी बुद्धिवादी आहे, बुद्धिवादी असले तरी मी नास्तिक निश्चितच नाही. ईश्वरावर माझा अढळ विश्वास आहे. श्रद्धा आहे. ज्योतिषशास्त्राची मी व्यासंगी आहे. परंतु मी भविष्यवेत्ती नाही दैववादापेक्षा प्रयत्नवादावर मी जास्त भर देते. विशेष म्हणजे मला असंबद्ध स्वप्ने पडायची सवय आहे.

स्वप्न ही मनाची एक सुप्तावस्था असते. काहींच्या मते स्वप्न ही एक नगण्य बाब असली तरी बऱ्याच वेळा स्वप्नामध्ये तथ्य असल्याचे

मला जाणवले आहे.

आज पणजी शहरात ठिकठिकाणी टुमदार इमारती नि बंगलीवजा घरे दिसून येतात. त्याकाळी पणजी शहर आजच्यासारखे गजबजलेले नव्हते. बहुतेक घरे विटांची नाहीतर तर चुन्याची नि कौलारू असायची. फारच थोड्या लोकांच्या घरांना माडी असायची. आज शहराच्या मध्यभागी महालक्ष्मी मंदिराजवळ ज्या ठिकाणी आंगल्यांची गंगोत्री इमारत उभी आहे, त्या ठिकाणी पूर्वी आमचे चाळवजा कौलारू वडिलार्जित घर होते. जुन्या पद्धतीची बांधणी असलेल्या त्या ऐसपैस घराला पुढे लांबच लांब व्हरांडा नि सोळा खोल्या होत्या. व्हरांड्याच्या दोन पायऱ्या खाली उतरल्यावर चारी बाजूला सिमेंटने बांधलेला फूटपाथ होती नि फुटपाथच्यालगत तांबड्या मातीची सडक होता. आज आमचे आंगले कुटुंब विभक्त झाले आहे. त्यावेळच्या त्या जुन्या गोठ्यासारखी आकारहीन घरामध्ये वीस-पंचवीस माणसे गुण्यागोविंदाने राहायची. मोठे कुटुंब असल्यामुळे घरकामासाठी स्वयंपाकी, मोलकरीण, घरगडी नि मदतनीस राबणे साहजिक होते. दररोज दुपारी जेवणाचे वेळी कोणी ना कोणी पाहुणे असायचेच. आमच्या घराला सोळा खोल्या असल्या तरी मधल्या चार खोल्या पायतुडवणीसाठी गेल्यामुळे निरुपयोगी होत्या. यामुळे जागेची टंचाई भासायची. तशात दिवाळी, ख्रिसमस, उन्हाळ्याची सुट्टी पडली की माझ्या आत्यांची व काकांची मुले यायची. त्यांना झोपण्यासाठी घरामधील व्हरांडा कामी येत असे. ह्या व्हरांड्यात संगीत मैफली झडल्या, कविसंमलने रंगली, प्रकाशन सोहळा, स्वागत समारंभ, विवाह, मुंजीच्या जेवणावळी, ओटीभरण, षष्ट्यब्दिपूर्ती, हळदी कुंकू यांसारखे सांस्कृतिक नि कौटुंबिक कार्यक्रम झाले.

त्यावेळी मुलांना खेळण्यासाठी आजच्यासारखी मैदाने नव्हती. सायंकाळी उन्हे उतरली की मुले आमच्या घरासमोरच्या सडकेवर क्रिकेट खेळायची. काही मुलांचे आमच्या फुटपाथवर लंगडी, हुतूतू, खो-खो चे डाव रंगायचे. लहान मुलांची फुटपाथवर सायकल शर्यत नाही तर परेड चालू असायची. त्या मोरपंखी दिवसांची आठवण झाली की कोमेजलेल्या मनाला आजही पालवी फुटते.

'नेमेचि येतो मग पावसाळा' दरवर्षी येतो नि जातो. जाताना कडू गोड आठवणींचा ठेवा सांडून जातो. पावसाच्या अशा कैक आठवणी पागोळ्यांगत झिरपताहेत. त्या प्रसंगीच अजूनही मनात ताजी आहे.

धुंवाधार पावसात आठ आठ दिवस रस्त्यावर पाणी साचायचे. घराच्या भिंतींना पावसाची झड लागून त्या फुगायच्या. कौले फुटलेली असल्यास ठिकठिकाणी पाणी गळायचे. यावर प्रतिबंधक उपाय म्हणून बैठकीची खोली, जेवणघर व झोपायच्या खोल्यांना कडीपाट घातले गेले. Man proposes God dispose अशी इंग्रजीत एक म्हण आहे. या उक्तीनुसार अपाय टाळण्यासाठी कितीही सुरक्षिततेसाठी धडपड केली तरी व्हायचे असेल ते चुकत नाही म्हणतात ते खोटे नाही.

अशाच एका मध्यान्हीच्या उसवलेल्या करकरीत क्षणाला मला एक स्वप्न पडले. स्वप्नामध्ये मी एका मंदिरात उभी असल्याचे दिसले. माझ्यासमोर गणपतीची दगडी मूर्ती होती. या मूर्तीच्या खालोखाल फरसबंदी जमिनीवर मध्यम आकाराची देवीची मूर्ती पडलेली होती. ती मूर्ती कोणत्या देवीची होती ते मला कळले नाही. 'कुणी बरे ही मूर्ती इकडे ठेवली असेल?' असा विचार करीत मी ती देवीची दगडी मूर्ती उचलून गणपतीच्या मूर्तीशेजारी ठेवली.

उजाडल्यावर सकाळी माझ्या आजीला मी हे स्वप्न सांगितले. 'सवय एकेकाची' एवढे बोलून आजीने तिथेच विषय संपविला. परंतु माझा जिज्ञासू स्वभाव थोडाच गप्प राहील? शंका समाधानासाठी लहान मुलांच्या उत्कंठेने मी दोनचार जाणकार व्यक्तींना या स्वप्नाचा अर्थ विचारला असता एकाने मला ती देवीची मूर्ती म्हणजे माया असल्याचे सांगितले, तर दुसऱ्याने तो ईश्वरी कृपेचा दृष्टांत असल्याचा निष्कर्ष लावला. काही दिवसांनी लवकरच मला या दृष्टांताची प्रचीती आली.

एके दिवशी मुले रस्त्यावर खेळत असताना त्यांचा बॉल आमच्या घरांच्या कौलांवर पडून दोन कौले फुटली गेली. आमच्या घरामधील कुणाच्याही लक्षात ही गोष्ट त्यावेळी आली नाही. पावसाळा सुरू झाल्यावर माझ्या वडिलांच्या खोलीमधील कडीपाटावर गळत असल्याचे जाणवले. माझा धाकटा भाऊ महेश कमालीचा धाडशी. त्यावेळी तो जेमतेम नऊ-दहा वर्षांचजा असेल. पाणी कुठे गळते ते बघायला तो कडीपाटावर भांडे घेऊन चढतो ना चढतो तोच त्याच्या पायाला कडीपाटाला तडा गेला नि भांड्यासहित तो कडीपाटाच्या नऊ फूट उंचीवरून कोलमडून कॉटवर खाली पडला. तशाही स्थितीत त्याने प्रसंगावधान राखले. त्याच्या डोक्याला जबरदस्त मार बसला असता, परंतु पडता पडता त्याने दोन्ही पायामध्ये मान घालून दोन्ही हात मानेखाली घेतल्यामुळे डोक्याला कोणतीही पूजा न होता हाताना खरचटले. उंचीवरून पडल्यामुळे तो विलक्षण भेदरला होता. त्याला नॉर्मल स्थितीवर येण्यास दोन-तीन दिवस लागले.

झाल्या प्रकाराने गलितगात्र झालेल्या आई-वडिलांनी कुलदैवताची पाकळी घेतल्यावर पुरोहित बुवांनी घेतलेल्या कौलानुसार मला पडलेले स्वप्न हा ईश्वरी कृपेचा दृष्टांत असल्याची ग्वाही दिली. 'काळ चुकला वेळ चुकली' असेच या अनुभवावरून म्हणता येईल.

**३, गंगोत्री, पहिला मजला, डॉ. आत्माराम बोरकर रोड, पणजी-गोवा -१**

**आगामी.. आगामी.. आगामी..**

# शिवा डान्सिंग

**मूळ लेखिका : भारती कर्चनर**
**अनुवाद : मंजुषा गोसावी**

**मनोवेधक, संवेदनशील, संस्कृती-संघर्षात उमलत जाणारी कोमल प्रीतीकथा**

# गणेशपुराण

बक्षीसपात्र लेख

## मालती नांदापूरकर

मला सकाळी फिरायला जायला जमत नाही. सूर्योदयापूर्वी पूजा, अर्चा, स्तोत्र, पठण हे सर्व सकाळच्या प्रसन्न वेळी झालेले छान वाटतं. तरीपण, डॉक्टरांनी चालणे हा व्यायाम सांगितल्यामुळे मी गणपती मंदिरालाच प्रदक्षिणा घालायचे मी ठरविले, अन सुरुवातही केली. रोज प्रदक्षिणा सुरू झाल्या, पायाचं दुखणं असह्यच होतं. त्यामुळे फरफटत का होईना, नेटाने चालत होते.

मी नमस्कार करताना श्री गणेशाला म्हणायची, ''गणेशा, बघ! प्रदक्षिणा जरी मी तुला घालत असले, तरी तुलाच मला सांभाळायचं आहे, मला पडू देऊ नकोस.'' खरं तर मी निःस्वार्थपणाने देवाची भक्ती करते, देवाला मागत काहीच नाही. माझी आई म्हणायची,''न मागे तयाची रमा होय दासी''. सवयीप्रमाणे मी नमस्कार केला आणि ''चला, गणेशा आता प्रदक्षिणा!'' असे म्हणत मी मंदिराच्या गाभाऱ्याबाहेर पडले अन्, मला इतका भास झाला की बालगणेशच जणू माझ्याबरोबर चालत आहेत. दोन-चार दिवस मी दुर्लक्ष केलं, पण रोज रोज असंच वाटायचं. बालगणेश म्हणजे इतका लहान की चार-पाच वर्षांची मूर्ती माझ्या बोटाला धरलेली, कधी पळताना लडखडलेली, तर कधी वर माझ्याकडे हसून बघितलेली, मी पण सावरून चालावयची, नकळत हे घडायचं. मला ह्या गोष्टीचा लळा लागला. हे नित्याचेच झाल्यामुळे, वेळ आनंदात जायचा. आणखी विशेष म्हणजे मी एकशेआठ गणेशाची नावे घेत असे, तो कागद, ती माळ माझ्या हातातच असायची. मला अनेकजण म्हणायचे ''चालता चालता वाचणं कठीण आहे हो, धडपडायला होईल.'' मी मनात म्हणायची आहे की माझा गणेश.

मंडळी, मी असं म्हणत नाही की मला रोज साक्षात गणेशदर्शन घडतं, नाही नाही. एवढं माझं पुण्य कुठचं? मी एक साधी सांसारिक स्त्री, मला कुठून देव भेटणार? साधी पूजा सविस्तर होण्याची मारामार, कसलं काय. परंतु मला मंदिरात भास व्हायचा आणि होतो. ''गणेशा इकडून ये, तिकडे खड्डा आहे.'' कंठातील हार भूषणे पळण्याने हालताएत. माझ्या मागे दुडूदुडू धावण्याने मुकुट घसरतोय, चालताना साडीला पकडलंय, एक ना दोन भास! प्रदक्षिणा संपल्या की परत गाभाऱ्यात जाताना मात्र गणेश मूर्ती मला कधीच दिसली नाही. दर्शन घेऊन मी निघते. त्यावेळी निघताना घरापर्यंत वगैरे तो भास मला कधीच झाला नाही. ह्यातून मला गणेशाची भक्ती जडली.

आणखी असाच एक अपूर्व योगायोग. सहा-आठ वर्षापूर्वी ह्याच मंदिरात आम्ही अठरा पुराणापैकी एक 'गणेशपुराण'. वाचले होते. ग्रंथ मोठा असल्यामुळे जे जे ऐकलं, भावले त्याची टिपण्णी करून आणायची, असं आम्हा मैत्रिणीत ठरलं. ते नव्याचे नऊ दिवस झालं, नंतर बंद पडलं. परंतु मी जेवढी आठ-दहा दिवस टिपण्णी केली होती, ती मी ओवीबद्ध स्वरूपात केली होती, तेवढीच सर्वांना खूप आवडली.

केवढा पराक्रम. सर्वात जास्त असुरांचा संहार गजाननाने केला. केवढा भूमिभार हलका केला, एवढे पराक्रमी बलाढ्य असुर की एकेक मरून पडले की की त्यांचे शरीर काही योजने असायचे. एवढाले ते धुड की अशा बलाढ्य राक्षसांना मारण्यासाठी गणेशाला पुन्हा पुन्हा जन्म घ्यावा लागला. अशा थक्क करणाऱ्या गोष्टी गणेशपुराणात खूपच आहेत, शिवाय आपण असेच समजतो की सृष्टीनिर्माता म्हणते 'ब्रह्मदेव'! पण ब्रह्मा, विष्णू, महेशास उत्पन्न केले आणि स्वतः अंतर्धान पावले. त्या तिघांना कळेचना की आपल्याला कुणी उत्पन्न केले आणि कशासाठी? अंधारात लडखडताएत, पडताएत, झडताएत, निर्माणकर्त्याचा शोध घेताएत. नंतर त्यांनी दहा हजार वर्षे तपश्चर्या केली, आणि त्यानंतर श्रीगणेश प्रसन्न झाले, (देवाचंही न्यायतत्त्व असंच असेल की सहज काहीच मिळत नसतं.) त्यांनी सृष्टी निर्माण कशी करायची ते सांगितलं. अशा काही गोष्टी मी माझ्या परिवारात सांगू लागले, बोलू लागले. योगायोगाने एकदा त्या विषयावर माझं माझ्या भावाशी बोलणं झालं. लिहिलेली टिपण्णी दाखवली तो उस्फूर्तपणे म्हणाला की, ''तू हे फारच सुंदर लिहिलं आहेस, पुढचंही कथानक लिही, छोटं गणेशपुराण होईल.'' मला प्रोत्साहन मिळालं, आणि मी 'गणेशपुराण' लिहिण्याचे ठरविले, सुरुवातही केली, एकामागून एक ओव्या तयार होत होत्या. मोठ्या गोष्टीचे सार काढून छोटी गोष्ट तयार करायची. माझे यजमान अवाक होऊन बघायचे, व्यत्यय येऊ द्यायचे नाही, हिच्या हातून काहीतरी विशेष घडत आहे, ह्याचे समाधान त्यांच्या चेहऱ्यावर दिसायचे. तरीपण संसार म्हटलं की एक एक - दोन दोन ओवीलासुद्धा मला उठावे लागत असे, फोन घेणे, या - या म्हणणे, जेवायला येतील तस तसे वाढणे, चहा-पाणी, एक की दोन, अनंत व्याप संसाराचे. सर्वांना आणि मलापण ह्याची गंमत वाटायची की माझी लिंक कधीच तुटली नाही. दोन दिवसांनी जरी लिहायला बसले, तरी लगेच सुरुवात, असे कधीच झाले नाही की मागचे आठवत नाही, पुढचा संदर्भ लागत नाही. बऱ्यापैकी लिहून झालेले पाहून सर्वांना विश्वास वाटला. माझा मुलगा, अरविंदने तर सांगितले की आपण हे छापू आणि सर्वांना प्रती वाटू.

'गणेशपुराण' अध्यपिक्षा अधिक झाले. सगळा कसा योगायोगच. आमच्या गावी म्हणजे मराठवाड्यात, नांदेड जिल्ह्यात 'कलमनुरी' या गावात आमचे घर-शेती, माझे धाकटे जाऊ-दीर तिथे असतात. घराला लागूनच माझ्या सासऱ्यांच्या काळातलं एक गणेश मंदिर आहे. त्याची बरीच पडझड झाली होती म्हणून दिरांनी त्याचा जीर्णोद्धार करण्याचे काम सुरू केले होते. नवा चौथरा बांधण्यासाठी मूर्ती हालवायच्या होत्या. अनेकांचे म्हणणे पडले की, गणपतीदेवतेचे सिंदुरविराजीत कवच, जे बरेच जाडसर होते, ते काढावे. त्यातही संभ्रम चालू होताच तो म्हणजे लाभेल की नाही, जमेल की नाही, विधिपूर्वक झालं पाहिजे. अखेर कवच काढण्याचे ठरले, तज्ज्ञ बोलावले. त्याचा विधी 'इतका असतो की मंत्र शक्तीनेच ते कवच सुटत जाते. त्यातलाच एक योगायोग. माझ्या यजमानांना स्वप्न पडले की, ते

गणपतीला नमस्कार करताएत, ती गणेशमूर्ती गर्रकन फिरली आणि ह्यांच्या मांडीवरच बसली. स्वप्नाचा अर्थ समजेना, कवचाबद्दल काळजी होतीच. पूर्वी ह्यांना पोवळ्याचा गणपती कुणीतरी भेट दिला होता. तो जवळच असल्यामुळे त्यालाच ह्यांनी नमस्कार केला, आणि त्याच दिवशी संध्याकाळी माझ्या दिरांचा फोन आला की, ''सर्व विधी चांगला झालाय. आणि गणेशकवच अलगद माझ्या हातात आले, आतली गणेश मूर्ती सुंदर आहे, सर्व सुरक्षित पार पडले,'' बोलताना त्यांना आनंद होत होता. मनावरचा ताण कमी झाला होता.

ह्या अशा एकामागून एक येणाऱ्या सुंदर योगायोगांनीच माझ्या गणेशपुराणाला स्फूर्ती मिळाली. माझी कामं चालूच होती. गावच्या मूर्ती प्रतिष्ठापनेचा दिवस जवळ आला होता. 'गणेशपुराण' पूर्ण करण्याची जबाबदारी माझी होती. नंतरचे छापणे वगैरे सर्वच झटपट होणार होते. रात्रंदिवस करून मी 'गणेशपुराण' पूर्ण केले, आणि आम्ही गावी जायला निघालो.

मूर्ती स्थापनेचा सोहळा, पू. पारनेरकर महाराजांच्या हस्ते करण्याचे ठरविले होते. लग्नसोहळ्यासारखीच पाहुणे मंडळी जमली होती. सोहळा सुरू झाला. मूर्तीची प्रतिष्ठापना धुमधडाक्यात झाली. बँड वगैरे लावून भजनी मंडळांच्या नादघोषात मिरवणूक पार पडली. छोट्या गावात धार्मिक उपक्रमांना खूप गर्दी होते, तसा सगळा गाव लोटला होता. जेवणावळी चालू होत्या.

सभामंडपात माझ्या 'गणेशपुराणाचे' गठ्ठेच्या गठ्ठे ठेवले होते. 'गणेशपुराण' सुंदरच झाले होते. मुखपृष्ठावर 'श्रीगणेश' मांडी घालून बसलेले आहेत. पारनेरकर महाराजांची प्रस्तावना आहे. माझे मनोगत वगैरे भागही सुंदर रेखीव झाला आहे.

पारनेरकर महाराजांच्या हस्ते प्रकाशन सोहळा पार पडला. भक्तिमय वातावरणाने आम्ही सर्व भारावून गेलो. अत्यंत प्रसन्न वातावरणात लोकांना प्रसादाबरोबर एक-एक 'गणेशपुराणाची' प्रतही वाटली. लोक खुष झाले.

पुढे अनेक दिवस 'गणेशपुराण' सुंदर लिहिले गेल्याबद्दल फोन येत होते. कुणी असेही म्हणाले की ''पडोसवालीने हमे आपका गणेशपुराण समझाया, बताया, अच्छा लगा इसलिए फोन किया. अगर आपने हिंदी-इंग्लिशमे लिखा होता तो हम भी पढ लेते.'' त्याबद्दल मी त्यांच्याकडे दिलगिरी व्यक्त केली. आणि ''गणेशाच्या मनात असेल तर, कृपा झाली तर हिंदी, इंग्लिश मधे छापण्याचे कार्यही आपले हातून होईल अशी अपेक्षा व्यक्त केली!

हे गणाधिपते गणराज  
मी 'अबुध' वर्णना आहे सहज  
परी कृपा करोनी सकला भोज  
'विकल आपदा' हरी आता.

४/३२, उन्नत नगर नं. ३, एम् . जी. रोड, गोरेगाव (प), मुंबई- ६२

आगामी.. आगामी.. आगामी..

चला उठा कामाला लागा

दररोज 'फ्रेश' राहण्यासाठी युक्तीच्या गोष्टी

शैलेश व स्वाती लोढा

अनु. अंजनी नरवणे



# मनाचिये गुंती

**डॉ. लीला दीक्षित**

'अतींद्रिय अनुभव' हे सहजपणे येणारे अनुभव नव्हेत. जीवनामध्ये आपल्याला फक्त इंद्रियगम्य अनुभवांचीच सवय असते. रूप, रस, स्पर्श, गंध आणि नाद या ऐंद्रिय संवेदना सातत्याने आपल्याला नाना प्रकारचे अनुभव देत असतात. मग हे इंद्रियातीत असे अनुभव येतात असे आपण वाचलेले असते. त्यांच्या अलौकिक कार्यामुळे आपण यावर विश्वास ठेवतो. आता हे अनुभव कसे येतात? का येतात? हे तीन महत्त्वाचे प्रश्न प्रथमच पुढे उभे ठाकतात. संत, साक्षात्कारी व्यक्ती, साधू यांना हे अनुभव येतात असे आपण वाचलेले असते. त्यांच्या अलौकिक कार्यामुळे आपण यावर विश्वास ठेवतो.

आता हे अनुभव कसे येतात याचे एक भाष्य संतसाहित्यातून जे भेटले; ते पुढे ठेवते.

आपला देह कसा बनला आहे? पांच ज्ञानेंद्रिये, मन, बुद्धी, अहंकार संघात म्हणजे देह.

देहाची जाणीव कशी होते? ही जाणीव आपल्याला प्राणशक्तीच्या योगे होत असते. प्राणशक्तीला मग अनेक नावे : जीव, चित्‌शक्ती,आत्मा वगैरे. देह आणि परमात्मा यामधे हा जीव किंवा प्राणशक्ती असते.

जीव जेवढा देहाच्या बाजूला झुकतो तेवढा तो इंद्रियांच्यामध्ये गुंततो. पण हा जीव जर परमात्म्याच्याकडे झुकू लागला की चित्र हळूहळू पालटले. इंद्रियाचा मोह हळूहळू दूर होतो. त्याचा एक वेगळा प्रवास सुरू होतो. त्यासाठी तो स्वयंप्रेरणेने अनेक मार्ग आचरतो. ध्यान, योग, भक्ती वगैरे प्रवास सांगता येईल. पण तो इथला मुख्य विषय नाही.

या प्रवासात मन जेवढे शुद्ध सात्विक, निर्विचार होईल त्याक्षणी अशा अनुभवांची प्रतीती येऊ लागते. योगी किंवा संताच्या संदर्भात त्यांना अतींद्रिय अनुभव अनेक येत असतात. मग सामान्य माणसाला असे अनुभव येतात का? येतात. फार क्वचित येतात. आकाशात जाणारा झोका आपण पाहिलेला असतो. एक क्षणच तो सर्वोच्च अशा पातळीवर स्थिरावतो. सामान्य माणूस जर असा प्रवास करू लागला असेल तर त्या एखाद्या सर्वोच्च क्षणी एखादी वीज चमकून जावी तसा तो अनुभव त्याला येतो. वीज केव्हा चमकणार हे जसे निश्चित सांगता येत नाही तसेच हे अनुभव.

मी एक अत्यंत सामान्य व्यक्ती आहे. मी थोडंबहुत लेखन करते. वास्तवाचे दर्शन घडवावे म्हणून प्रथम लेखन सुरू झाले, त्याचा आत्माविष्कार म्हणून नकळत प्रवास घडला. परंतु साहित्य आता या घडीला तरी मला केवळ आत्माविष्कारापुरते मर्यादित वाटत नाही.

माझ्या लेखी आत आत्मशोधासाठी लेखन ही माझी आंतरिक गरज झालेली आहे. माझ्यात राग, लोभ, अहंकार सर्व काही आहे.

तरीही मला काही असे अनुभव आले. अजूनपर्यंत ते मी घरातील व्यक्तींनाही फारसे सांगितलेले नाहीत. कारण अशा अनुभवांची वाच्यता करावी असे वाटले नाही. माझ्या एखाद्या मैत्रिणीजवळ बोलले आहे. आणि माजे पती कै.ग.य.दीक्षित यांच्याजवळ आणि वडिलांजवळ मी एका अनुभवाविषयी बोललेली आहे.आज हे अनुभव मी का सांगीत आहे? अर्थ स्वच्छ आहे. अजून 'मी' चा लोभ आहे.

पहिला अनुभव १९५२ सालचा म्हणजे खूप जुना आहे. माझे लग्न ५२ साली मे मध्ये झाले. पहिल्या दिवाळसणाचे बोलावणे करायला आणि मला गुहागरला न्यायला म्हणून वडील पुण्याला आले. तेव्हा आम्ही ५१५ सदाशिव पेठ, दीक्षित वाडा येथे राहात होतो. वडील रात्री आले. जेवण झाल्यावर म्हणाले,''मी उद्या नाशिकला जाणार आहे. जरा काम आहे.'' रात्री आम्ही झोपलो. मला बालपणापासून साडेचारला उठायची सवय. मी जागी झाले. बाथरूममध्ये गेले आणि दार उघडून बाहेर पडताना माझी 'आजीच' माझ्यापुढे ठाकली. मी मोठ्याने म्हटले-''आजीऽ तूं ग कशी इथे?'' सासूबाई जाग्या असाव्यात. त्यांनी विचारले,''कुठली आजी?'' मी बोलले काही नाही. मनात म्हटलं भास असावा. पण भास नव्हता. जशी माझी आजी होती तसेच रूप लख्ख गोरा वर्ण, ठेंगणी आडव्या बांध्याची, तरतरीत डोळ्यांची आजी मी एक क्षण साक्षात् अनुभवली होती. दुसऱ्या दिवशी सात वाजता नाना (वडील) नाशिकला गेले. परत पुण्याला आले आणि मला घेऊन गुहागरला निघाले. प्रवासात नानांना माझा अनुभव सांगितला. ते म्हणाले,''कमल, काल माझ्याबरोबर डब्यात आजीच्या अस्थी होत्या. त्याच गोदावरीत अर्पण करण्यासाठी मी नाशिकला जाऊन आलो.''

मी थक्क झाले. याचा संदर्भ मला लावता आलेला नाही. हा अनुभव आई-वडील आणि श्री. दीक्षित या तिघांनाच माहीत. कारण इतरांना तो पटण्यासारखा नव्हताच मुळी. मलाही पटला नसताच. पण नकळत आलेला अनुभव सत्य म्हणून मी त्या निमिषात भोगला होता. आजही मला तो साक्षात् आठवतो.

दुसरा अनुभव सुप्रसिद्ध लेखक गो.नी.दांडेकरांच्या संदर्भातील आहे. अप्पा अनेक दिवस अंथरूणाला खिळून होते. मधून मधून वीणाला फोन करून तब्येतीचे क्षेम मी विचारीत असे. एक दिवस मी नेहमीप्रमाणे पहाटे उठले. वाचन झाले. शंकराचार्यांचे आनंदषटक म्हटले. देवाला फुले काढली आणि आंघोळ करून बाहेर येताना एक अजब अनुभव! वाटलं आत्ता आप्पा गेले. काय करावे सुचेना. म्हणून माझी मैत्रीण प्रा. आरती दातार (आता ती आबासाहेब गरवारे कॉलेजमध्ये मराठी विभाग प्रमुख) हिला फोन केला. सांगितले. मला अप्पा गेल्याचे जाणवले. मी अस्वस्थ आहे. काय करावे बरे? ती म्हणाली मी फोन करते. पण मलाही राहवेना. मी फोन केला. मृणालने फोन घेतला. मी शब्द उच्चारले अप्पा... तिने उत्तर दिले.''अप्पा आताच पाच मिनिटांपूर्वी गेले.'' इतक्यात परत आरतीचा फोन आला ''दीक्षितबाई, खरंच अप्पा गेले.''

ही गोष्ट आजपर्यंत घरात माझ्या सुनेला सांगितली. वीणालाही अजून मी सांगितलेलं नाही. याची खरी साक्षीदार आरती. ती पुढे केव्हातरी म्हणाली की डायरीत त्यांची नोंद केली आहे.



तिसरा अनुभव थोडा वेगळा आहे. तो माझ्या अभ्यासविषयाशी निगडीत आहे. संतसाहित्य माझ्या अस्तित्वकोणाचा-आत्मीय असा भाग आहे. संत नामदेवांचा एक अभंग माझ्या मनाला अनेक दिवस छळीत होता. चरण असा होता,''समोर की पाठीमोरा नलगे मज काही'' विठ्ठल समोर की पाठीमोरा हे काहीच कळत नाही. डोळे भिंगुळले का? अतिप्रेमाने अश्रूने भिंगुळले का? काही बोध नाही. काही संतसाहित्याच्या मंडळींना विचारले. समाधानकारक उत्तर नाही. पण अचानक एक दिवस मनात 'नामदेव' मुळीच नसताना भावार्थाची प्रतीती झाली. त्याचे असे झाले. नेहमीप्रमाणे लवकर उठून नेहमीचे कार्यक्रम उरकून उजाडता उजाडता जरा अंधारच असताना बागेत देवाला फुले काढायला गेले.

जाईच्या वेलावर जणू चांदण्या फुटल्या होत्या. गंधाने सर्व विश्व भारलंय असे वाटत होते. एकेक फूल काढून परडीत ठेवीत होते. त्या सुगंधाने एक क्षण डोळे मिटले. डोळ्यापुढे निमिषात लख्ख प्रकाशले. डोळे उघडले आणि जाणवले. नामदेवांना विठोबा 'ज्योती' स्वरूप दिसत असावा. कारण ज्योतीला 'समोर की पाठमोरा' हे शब्दच नाहीत. भावार्थाच्या या प्रतीतीने मन मोर झाले. संपूर्ण दिवस विलक्षण आनंदात डुंबत होते. कुणालाही काही बोलले नाही. परंतु मध्यंतरी म.सा.प. मध्ये एका व्याख्यानात सहजपणाने हा भावार्थ सांगितला. अन्यत्रही एका व्याख्यानात सांगितला.

असे अनुभव मनाची तीर्थोटी करून मनानेच प्राशन करायचे असतात. 'मनाचिये गुंती गुंफियेला शेला' असेच हे अनुभव आपले आपल्यासाठीच असतात. तरी आपल्या ग्रंथजगतातील निवेदनाने हा अक्षरपट मी मांडलाच!

**द्वारा डॉ. अरुणा कुलकर्णी, प्राध्यापक निवास, बिल्डिंग नं.२, ब्लॉक नं. ४, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पंढरपूर रोड, मिरज- ४१६४१०**

आगामी.. आगामी.. आगामी..

**विज्ञानाची**
**गोडी लावणारी**
**नवी कोरी पुस्तके**

**ग्यानबाचे विज्ञान**
डॉ. बाळ फोंडके

**नवे शतक**
निरंजन घाटे

# स्वामींचे दर्शन

**रजनी अपसिंगेकर**

इ. स. १९९९ आषाढ शुद्ध १५, गुरुपौर्णिमा उत्सव! हा दिवस माझ्या आयुष्यातला अत्यानंदाचा दिवस! या दिवसाचे मी नित्य नियमाने स्मरण करते आणि त्या अनुभवाचा आनंद संकलित करत राहते. खरंच असं घडू शकतं आणि तेही आपल्यासारख्या सामान्य स्त्रीच्या आयुष्यात! प्रत्यक्ष श्री सद्गुरू स्वामी समर्थ महाराजांचं साक्षात दर्शन!

आम्ही नुकतेच ठाण्याहून पुण्याला राहायला आलो होतो. पुणे शहराची मला फारशी माहिती नव्हती. लक्ष्मीरोडची अन् विविध पेठांची तसेच डेक्कन परिसराची ओळख होत होती. गुरुपौर्णिमेच्या दिवशी आम्ही सद्गुरु गुळवणीमहाराजांच्या वासुदेवनिवासमध्ये जावं असं ठरवलं. मी, माझे पती अनिल अपसिंगेकर आणि माझे वडील श्री. मधुकरराव नांदापूरकर असे तिघे संध्याकाळी चार वाजता मठात गेलो.

संध्याकाळची वेळ, वातावरण प्रसन्न होतं. दारात भली मोठी रांगोळी होती. गुरुपौर्णिमा म्हणून भाविकांची गर्दी होती. आम्ही आमची गाडी मठा जवळच पार्क केली. आणि मठात जाऊन दर्शन घेतले. दर्शन घेऊन वासुदेवनिवासच्या बाहेर पडणार होतो. भरपूर वेळ होता, कुठेतरी दुसरीकडे जावं की काय या विचारात असतानाच वडील म्हणाले,''दर्शन तर झालं. आता कुठे जाऊ या?'' या प्रश्नाच्या उत्तराच्या शोधात असतानाच वासुदेवनिवासच्या मुख्य प्रवेशद्वाराशी आमच्या दिशेने दोन व्यक्ती आल्या. त्यांनी 'वामन निवास' कुठे आहे असे विचारले. त्यावेळेस मी माझे पती, वडील आणि त्या दोन व्यक्ती असे प्रवेशद्वाराच्या रांगोळीजवळ गोलाकार उभे होते; आणि मी पाहिलं, एक तेज:पुंज व्यक्तिमत्त्व त्या रांगोळीवर माझ्या अगदी समोर उभे होते. म्हणजे त्या दोन नाही तर तीन व्यक्ती होत्या. ती तिसरी व्यक्ती तेज:पुंज, उंच, विशालबाहू असलेली, पांढरी शुभ्र सफारी घातलेली, डोक्यावर पांढरी टोपी असलेली. त्या व्यक्तीचा चेहरा पाहिला आहे असं सतत वाटत होतं. एक हात आशीर्वाद दर्शवत होता तर दुसरा हात सर्व कुशल होईल असे काहीसे सांगत होता;

त्याचवेळेस त्या व्यक्तीच्या मुखातून जे शब्द बाहेर पडत होते ते मला ऐकू येत नव्हते पण समजत होते.

अचानक डोक्यात प्रकाश पडला- मी पहात तो तेज:पुंज चेहरा स्वामी समर्थांचाच होता! त्यांचीच तर मी रोज श्रद्धेने भक्तिभावाने आराधना, पूजा करते- मला काहीच उमजत नव्हतं.

मी नुसती अवाक् होऊन पहात राहिले. त्यांच्या तोंडातून बाहेर पडणारे शब्द समजून घेण्याचा प्रयत्न करू लागले. पण फक्त अर्थ गवसत होता 'निश्चिंत राहा, सारं क्षेमकुशल हाईल.'

तितक्यात त्या दुसऱ्या दोन व्यक्तींचे शब्द कानावर पडले, त्याप्रमाणे मी त्यांना (तिघांना) म्हटलं, 'चला ना आत, ऑफीसमध्ये विचारू. वामन निवास कुठेय आम्हाला माहीत नाही.' आणि मी त्यांना (तिघांना) सोबत घेऊन ऑफिसपर्यंत गेले. ती तेजोवलय असलेली व्यक्तीही आमच्यासोबत होती. त्यांच्या सोबत दहा पावलं चालतानाही ती माझ्याकडे पहात बोलत होती. त्या दुसऱ्या दोघांनी ऑफीसमधील कुणालातरी वामननिवासचा पत्ता विचारला. उत्तर मिळाल्याने आम्ही सगळे परत दहा पावलं चालत पुन्हा प्रवेशद्वाराशी आलो, ती तिसरी तेज:पुंज व्यक्तीही सोबत होती, मला काय करावं समजेचना. नकळतपणे सारखे हात जोडले जात होते. प्रत्यक्ष स्वामी समर्थ! ते मलाच दिसताहेत का सर्वांना! ते दिसताहेत पण त्यांचा आवाज का कळत नाहीय? मी संभ्रमित अवस्थेत.

त्याचवेळेस बाबांनी त्या दोन व्यक्तींना विचारले, ''समजलं का वामननिवास कुठं आहे ते?'' त्यांनी 'हो' म्हटले. 'येताय का चला, आम्हीही तिथेच जात आहोत. आमच्या स्कूटरच्या मागे तुमची गाडी घ्या. मी दाखवतो रस्ता.'' ते पुढे म्हणाले. असे म्हणून माणसं स्कूटरच्या दिशेने गेली. दोघे स्कूटरवर बसले आणि ती तिसरी व्यक्ती कुठे गेली? मी तर पहात होते. मी पुन्हा पुन्हा शोध घेतला पण ती पुन्हा दिसलीच नाही. माझ्या पतींना, बाबांना मी त्या व्यक्तीविषयी विचारले, त्यांनी त्या दोन व्यक्तींविषयीच सांगितले. तिसरी व्यक्ती कुणीच नव्हती म्हणाले. त्यांना ती दिसलीच नाही. म्हणजे प्रत्यक्ष समर्थांनी मला दृष्टांत दिला होता. तोही या पवित्र क्षेत्री. मी धन्य धन्य झाले.

समर्थस्वामींचे दर्शन गुरुपौर्णिमेला आणि तेही गुळवणीमहाराजांच्या मठात- तो क्षण मी पुन्हा पुन्हा आठवत राहिले. त्यांच्या मुखातील शब्दांचा अर्थ लावत राहिले. त्या दोन व्यक्तींच्या स्कूटरमागे आमची गाडी चालली होती. पुढे आलेल्या दशभुजा गणपती मंदिरापुढे आत वळलेला रस्ता वामननिवासकडे जातो हे त्या स्कूटरवाल्यांनी हातांनीच खुणेने दाखवले. आणि ते सरळ कोथरूडकडे गेले. आम्ही आमची गाडी आत वळवली अन् वामननिवासमध्ये पोहोचलो.

तिथेही पौर्णिमेचा उत्सव चालू होता. त्या स्कूटरस्वारांनी आम्हाला वामननिवासचा पत्ता सांगून ते स्वत: कसे नाही आले, तसेच का पुढे गेले? मला काही समजतच नव्हते. ती दोन माणसं हे केवळ निमित्त होतं की काय? पण वास्तविक पाहता स्वामीजींचे दर्शन हाच योग होता. समर्थांनीच मार्ग दाखवला. मी धन्य धन्य झाले.

स्वामी समर्थांनी मला भक्तिमार्गाची उपासना करण्यासाठी स्थलकालाचे दर्शन दिले- सारा माहोल अधिकच प्रसन्न वाटू लागला. पुण्यातला नवखी असणाऱ्या मला 'पुण्यनगरीत आनंदाने रहा, सर्व क्षेमकुशल होईल,' असे सांगणारा स्वामी समर्थांचा चेहरा सतत डोळ्यासमोर येऊ लागला. त्यांच्या कृपेने आम्ही दोघे आणि माझ्या दोन मुली असे आमचे चौकोनी कुटुंब आनंदाने आज इथे प्रभात रोडला राहत आहोत. रोज वासुदेवनिवासमध्ये गुळवणीमहाराजांच्या मठात दर्शनाला जाते.

समर्थांच्या आशीर्वादाने सर्व क्षेमकुशल आहे. हा आनंद वाटावा- समर्थ भक्तांना सांगावासा वाटला म्हणून हा शब्दप्रपंच. 'आनंदाचे डोही आनंद तरंग' म्हणतानाच सांगावेसे वाटते:

ज्या ज्या स्थळी मन जाय माझे
त्या त्या स्थळी हे निजरूप तुझे
मी ठेविते मस्तक ज्या ठिकाणी
तेथे तुझे सद्गुरु पाय दोन्ही
जय जय रघुवीर समर्थ॥

**फ्लॅट नं. ८, दर्शनगड, प्रभातरोड, ९वी गल्ली, एरंडवणा, पुणे-४**

# एका वास्तूचा अतींद्रिय अनुभव

**प्रा. डॉ.शर्मिष्ठा खेर**

विसाव्या शतकाच्या दुसऱ्या अर्धुकात मनोवैचारिक जडणघडण झालेल्यांपैकी मी एक आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या उत्साहाचा कालखंड. वयाच्या दहाव्या वर्षानंतर निव्वळ खेळ-खाऊ असलं जग संपून भवतालाबद्दल वैचारिक स्तरावरचं कुतूहल वाटायला लागलं तेव्हा आपण नेहरूंच्या विज्ञानमंदिरांमध्ये- म्हणजे राष्ट्रीय विज्ञान प्रयोगशाळा, मोठी धरणं, पोलादाचे कारखाने वगैरेंमध्ये- विज्ञानाचं शिक्षण, संवर्धन यात गर्क होतो. समाजवादी समाजरचना घडत होती. वातावरणात विज्ञानवादी विचारसरणी दुमदुमत होती.

मी ज्या गावात वाढले ते समाजवादी-विज्ञानवादी विचारसरणीचा बालेकिल्लाच होतो. म्हणजे आसपास गरीब, अडाणी आणि पारंपरिक जीवनसरणी मानणारी माणसं पुष्कळच होती; परंतु ती त्याबद्दल किंचित अपराधी भावनेनं जगत असत. विज्ञानवाद्यांसमोर तोंड वर करून बोलत नसत. त्या शाळकरी वयापासून वयाच्या पंचविशीपर्यंत मी बुद्धिवादी आणि आधुनिक विज्ञानवादीच होते. परंतु पंचविशीत या संदर्भात एक मोठा उत्पात घडला.

तोवर एम.ए पर्यंतचं शिक्षण पूर्ण झालं होतं. पण वैयक्तिक आयुष्यात मी अगदी गांजलेली होते. बेताची आर्थिक परिस्थिती या गोष्टीची सवय लहानपणापासून होती.

कपडा-लत्ता दागदागिने या विषयात हौसमौज करू शकत नव्हते. पण ती मागणीच नव्हती. त्याचं वैषम्य नव्हतं. फार मोठे छंद जोपासणे, त्यासाठी खर्च करून सर्वांगीण व्यक्तिमत्त्वे घडवणे असल्या गोष्टींनी आमचे पालक स्वत:ला पीडा करून घेत नसत. निव्वळ वाचनाच्या छंदाच्या जोरावरच आमची सर्वांगीण व्यक्तिमत्त्वं त्या काळी घडायची. श्रीमंत लोकं आपल्या श्रीमंतीचं फार प्रदर्शन करत नसत. आणि शिक्षण पार पाडून आपल्या पायावर उभं राहिलं की काय ती हौसमौज करायची अशा वृत्तीनेच बहुसंख्य मध्यमवर्गीय मुलं दुसऱ्या कुणाच्या श्रीमंतीविषयी लोभ-मोह न धरता रहात असत. पण मनात स्वप्नं असायची. तशी माझीही होती. वयाच्या एकविशीतच केलेल्या लग्नामुळे स्वप्नांचा पार चुराडा झाला होता. लग्नामुळे स्त्रीचं सार्वभौमत्वच संपतं, ती आपल्या हातानेच आपल्या आयुष्याची सुत्रं नवरा-सासू या द्वयीच्या हाती सोपवते,याची आधुनिकतावादी पुस्तकांच्या जगात रमलेल्या मला कल्पनाच आली नाही. आपण जोवर कष्टाला कमी पडत नाही आणि दुसऱ्याच्या श्रेयाचा व संपत्तीचा लोभ धरत नाही तोवर आपल्याला शत्रू असण्याचं काही कारण नाही; असं माझं सोपे, सरळ तत्त्वज्ञान होतं. पण जगात लबाड, बिलंदर, दुष्ट लोकं असतात; त्यांना स्वत:च्या उत्कर्षासाठी प्रयत्न करण्याऐवजी दुसऱ्याला खाली पाडून स्वत:चा उत्कर्ष घडवायचा असाते; अशा माणसांकडून नुकताच फटका बसला होता. लग्न लागल्याबरोबर कालचा प्रियकर 'नवरा' होतो आणि बायकोच्या आयुष्याच्या कणाकणावर आणि क्षणाक्षणावर मालकी हक्क गाजवू लागतो. या गोष्टीमुळे माझं कष्टाचं पण पूर्णपणे माझं असलेलं आयुष्य पार बदलून गेलं होतं. अशा उद्विग्न मन:स्थितीत मी एक स्कॉलरशिप मिळवून पुढच्या अभ्यासासाठी पुणं सोडून दक्षिण भारतातल्या एका मोठ्या शहरी दाखल झाले. तो तिथला पहिलाच दिवस.

मी रिक्षेने संस्थेच्या आवारात दाखल झाल्या क्षणापासून मला ती जागा खूप परिचित असल्याचं जाणवू लागलं. वास्तविक पहाता ते शक्य नव्हतं. जन्मात प्रथमच मी त्या शहरात येत होते. ती संस्था तर त्या आधी सुमारे पंधरा वर्षे सुरू झाली होती. म्हणजे पूर्वजन्माच्या स्मृती वगैरेही शक्य नव्हत्या.

ती जागा परिचित असल्याच्या भावनेने दिवसभर पिच्छा सोडला नाही. असा अनुभव आयुष्यात पहिल्यांदाच येत होता. त्यात भुताटकी वगैरे काही वाटली नाही. संध्याकाळपर्यंत त्यामुळे आलेली अस्वस्थताही गेली. रात्री माझ्या उद्विग्नतेचा मागमूसही उरला नाही. छान झोप लागली. वैवाहिक आयुष्यातलं अपयश मागे टाकून आपण आता हाती घेत असलेला अभ्यास छान पुरा करणार अशी खात्रीच वाटायला लागली.

माझे तिथले दिवस खरोखरच छान गेले. उभ्या भारतातून तिथे उच्च शिक्षणासाठी येणाऱ्या वेगवेगळ्या प्रांतांमधल्या लोकांच्या ओळखी झाल्या. जगभरातून येणाऱ्या विद्वानांच्या व्याख्यानांचा आणि संशोधनाचा लाभ झाला. माझं वैचारिक क्षितिज विस्तारलं. मनापासून केलेल्या अभ्यासामुळे शिक्षकांकडून, सहाध्यायांकडून कौतुक वाट्याला आलं. बहुल अशा भारतीय परंपरांचं अशा संस्था म्हणजे एक प्रारूप (Prototype) असतात. आपण व्यक्ती म्हणून तिथे तऱ्हेतऱ्हेचं समायोजन शिकतो.

माझ्या तोपर्यंतच्या मानसिकतेशी हा अनुभव सुसंगत नव्हता. अशा तऱ्हेने काही सामक्षा किंवा मार्गदर्शन मिळावं अशी मी अपेक्षा धरली नव्हती; ज्योतिषी किंवा अतींद्रिय साधना करणाऱ्यांकडे सल्ल्यासाठी गेले नव्हते. तरी हा अतींद्रिय अनुभव मला आला. तो मी नाकारला नाही. नाकारणं शक्यच नव्हतं इतक्या तीव्रतेने तो आला. त्यामुळे भौतिकवाद, विज्ञानवाद न नाकारता ही सुद्धा एक ज्ञानाची वाट आहे या निष्कर्षापर्यंत मी आले.

त्या शहरात त्यानंतर पुन:पुन: मी अभ्यास, कार्यशाळा, परिषद वगैरे कारणांनी गेले. त्या शहराबद्दल मला अजून प्रेम आहे. त्या शहराचा माझ्या आयुष्यात महत्त्वाचा भाग राहणार होता म्हणून ती सूचना मला मिळाली असेल का? मधेच हातपाय गाळून मी नवऱ्याकडे परतू नये असा त्या अनुभवाचा उद्देश असेल का? पण माझी एवढी काळजी कोणाला असावी?

मी सोळा-सतरा वर्षांची असताना माझे वडील गेले. त्यांची माझी शेवटची भेट झाली नाही. मी त्यांची विशेष लाडकी होते असा घरातल्या सर्वांचा आणि माझाही समज होता. पण ते कधीही नंतर माझ्या स्वप्नात वगैरे आले नाहीत की अन्य कुठल्या प्रकारे त्यांच्या आत्मिक अस्तित्वाचे संकेत मिळाले नाहीत. या क्षणीही माझा उलट्या पायांची भुतं, मुंजे,

जखिणी वगैरेंच्या अस्तित्वावर विश्वास नाही. परंतु Extra Sensory Perception यावर मात्र आहे.

पाच ज्ञानेंद्रियांद्वारे मिळालेल्या ज्ञानाच्या आधारावरच आपण सर्व दैनंदिन व्यवहार पार पाडत असतो. पण अपवादात्मक प्रसंगी, अतिशय आणीबाणीच्या प्रसंगी आपलं सहावं इंद्रिय काम करतं. पंचेंद्रियवादी ज्ञानमीमांसा आत्तापर्यंत जगात रूढ होती. परंतु गेली सुमारे पन्नास वर्षे पाश्चात्य विद्यापीठे परामानसशास्त्र या शाखेचा म्हणजेच अतींद्रिय अनुभवांचाही शास्त्रोक्त अभ्यास करत आहेत.

हेन्री बर्गसाँ हा फ्रेंच तत्त्वज्ञ तर यात काही विज्ञानविरोध आहे असं मानतच नाही. आपण अतिशय तीव्र इच्छेने एखाद्या प्रश्नाला भिडल्यावर आपल्या संवेदनात होणारी (intuition) वाढ ही त्याला तर्कसुसंगतच वाटते.

अंत:प्रज्ञा, अतींद्रिय संवेदनाचे वेगवेगळे आविष्कार आहेत. एकमेकांपासून दूर काही एका भौगोलिक अंतरावर असलेल्या व्यक्तींना भाषेच्या लिखित किंवा उच्चारित माध्यमाशिवायच एकमेकांचे मनोगत कळणे म्हणजे दूरसंवेदन (Telepathy)

कारण हे अगोदर असते व त्यानंतर त्याच्या परिणामस्वरुपी कार्य हा क्रम असतो. म्हणजे काळ हा सतत पुढेच ज्ञात असतो. असं आधुनिक विज्ञान मानते. पण काही व्यक्तींना होऊ घातलेल्या गोष्टींचे पूर्वज्ञान होते (clair voyance)

संकल्प, विचार इत्यादींचा परिणाम भौतिक घटनांवर होतो. (म्हणूनच आपल्याकडे सतत चांगल्याच्या उच्चार करावा, कारण वास्तु तथास्तु म्हणत असते असं शिकवलं जातं) आज सतत (Positive Thinking) चा उपदेश होत असतो. तो आधुनिक विज्ञानाच्या विरोधी मानला जात नाही. हस्तस्पर्शचिकित्सा (रेकी आणि तत्सम धारा) मानणारे पुष्कळ आहेत.

अतींद्रिय क्षमता पुष्कळांजवळ असते. पण काही माणसं अतिशय सूक्ष्मसंवेदी असतात. सूक्ष्मसंवेदन प्रयत्नपूर्वक वाढवता ही येतं. पोलिसदलं अशा लोकांचा उपयोग करून घेत असल्याचंही वाचनात येतं.

१९५० च्या आधी मन ही संकल्पना बाजूस ठेवावी आणि मनावाचूनचे मानसशास्त्र विकसित करावे अशी केवळ वर्तनवादी (Behaviourist) भूमिका प्रबळ होती. मन हे माणसाच्या वर्तनाचे सूत्रसंचालन करतं हे मान्य होत नव्हतं. परंतु लवकरच (Purposive Behaviourism) प्रयोजनगर्भ वर्तनवाद मान्यता पावला. मनुष्य म्हणजे शरीररूपी यंत्र नसून त्या पलिकडचे काही आहे असं प्रा. मॅकडुगल, प्रा. मर्फी वगैरे शास्त्रज्ञ म्हणू लागले. मेंदू म्हणजेच मन नव्हे. मन हे मेंदूचा एक उपकरण म्हणून वापर करीत असते. विश्वास, संकल्प, श्रद्धा वगैरे गोष्टी मनामुळेच संभवतात. आणि ह्या गोष्टींचा ज्याला प्रत्यय येत असेल तो परामानसशास्त्र, अतींद्रिय संवेदनही मानेल. त्यात काहीही अंधश्रद्धा नाही.

**कलाबसंत सोसा., १५ वी गल्ली, प्रभात रोड, स्मृतीबंगल्यासमोर, डेक्कन जिमखाना पुणे- ४**



# देव भक्ताघरी धावला

**सुनंदा देशमुख**

बुधवारचा दिवस. सकाळी ६॥ ला माझे वडील, भाऊ आणि नोकर जगन, असे तिघेजण रिक्षाने घरी आले. पुण्यातले गणपती बघण्यासाठी ते मुद्दाम आले होते.

मी चहा करायला आत गेले. भाऊ आणि जगन बॅगमधून सामान काढू लागले. त्यावेळी वडिलांची बॅग नसल्याचे लक्षात आले. आल्यावर सर्व सामान आतल्या खोलीत आणले होते. ते पुन्हापुन्हा पाहिले. घरात शोधले. पण वडिलांची बॅग बरोबर आली नसल्याचे लक्षात आले.

बॅग कुठे राहिली? रिक्षात? प्लॅटफॉर्मवर का आगगाडीत?

भाऊ धावत खाली गेला. रिक्षावाला कोपऱ्यावर गिऱ्हाइकाची वाट बघत थांबला असेल तर रिक्षात बॅग राहिली का, ते बघता येईल!

पण रिक्षावाला केव्हाच निघून गेला होता.

रिक्षाचा नंबर, रिक्षा चालकाचा चेहरा, काही सुद्धा लक्षात नव्हते.

भाऊ सुन्नपणे परत आला.

गाडीतून बॅग प्लॅटफॉर्मवर ठेवल्याचे आठवत होते.पण प्लॅटफॉर्मवरून रिक्षात ठेवली का? रिक्षातून पुन्हा उतरताना काढली का? ते काही आठवेना.

भाऊ म्हणाला, ''मी प्लॅटफॉर्मवर राहिली का ते बघून येतो.''

वडील म्हणाले,''नको जाऊ! एवढ्यावेळ प्लॅटफॉर्मवरची वस्तू राहील का? केव्हाच कोणीतरी उचलून नेली असेल!''

तरी 'मी जाऊनच येतो' म्हणून भाऊ निघाला.

प्लॅटफॉर्मवर सगळीकडे पाहिले. पार्सल ऑफीसच्या जवळपास शोध घेतला. बॅग मिळाली नाही.

भाऊ परत आला. पुन्हा आमची चर्चा सुरू झाली. बॅग नेमकी कुठे राहिली? निश्चित कोणाला आठवेना. सांगता येईना.

दु:खात सुख म्हणून आम्ही सर्व वडिलांना म्हटले, ''जाऊ द्या. झालं ते झालं! आता आपण बॅगसहित नवीन कपडे आणू!''

भाऊ, जगन नवीन कपडे, बॅग आणायला गेले.

घरी आल्यावर वडिलांना वस्तू दाखवल्या. त्या बघून त्यांच्या डोळ्यात पाणी आले. बॅग हरवली म्हणून त्यांना दु:ख झाले, का भाऊ करीत असलेली वडिलांची सेवा बघून सुख वाटत होते?

नेमकी त्यांची मन:स्थिती लक्षात येत नव्हती. आम्ही सर्व शांत बसलो होतो.

वडील म्हणाले,''एका चतुर्थीला मी सारसबागेत दर्शनाला गेलो होतो. परत येताना पायऱ्यांवर सुपारीवर कोरलेले गणपती बघितले. एक गणपती विकत घेतला. तो घरी आणल्यापासून रोज त्याचे भक्तिभावाने दर्शन घेतो प्रवासातही तो माझ्या बरोबर असतो. आज तो मला सोडून गेला.''

वडिलांना गहिंवरून आले. पुढे काही बोलवेना!

आमच्या घरात नित्य पूजेसाठी दोन फूट उंचीची मोठी गणपतीची मूर्ती आहे. वडिलांनी त्या मूर्तीसमोर जाऊन हात जोडले.

बुधवार, गुरुवार दोन दिवस गेले. आता बॅग सापडण्याची सुतराम शक्यता नव्हती. बॅग गेली ती कायमचीच, असे आम्ही समजलो.

शुक्रवारी सकाळी ६।। दारावरची बेल वाजली. एवढ्या सकाळी कोण आलेय, म्हणून सर्व खडबडून जागे झाले. वडील कॉटवर सावरून बसले.

मी दार उघडले. दारात अनोळखी व्यक्ती. हातात बॅग. मी विचारले,''कोण पाहिजे?''

ती व्यक्ती म्हणाली,''पिताजी घरमें है?''

मी म्हटले,''है. लेकीन आपका परिचय?''

ती म्हणाली,''मुझे पिताजीसे मिलना है.''

त्या व्यक्तीचे बोलणे ऐकले आणि वडील मला म्हणाले,''अग, कोण आहे? त्यांना आत येऊ दे!''

मी दार पूर्ण उघडले. तो अनोळखी पाहुणा बॅग घेऊन आत आला. बॅग चप्पल जवळ ठेवून त्याने वडिलांना वाकून नमस्कार केला. जवळच्या खर्चीवर बसत म्हणाला,''पिताजी! मुझे पहचाना?''

वडील म्हणाले,''नही, आपका परिचय ध्यानमें नही आता!''

ती व्यक्ती म्हणाली,''बुधवार के दिन मैने आपको सुबह ६।। बजे स्टेशनसे यहाँ छोडा था। तब आपकी बॅग मेरे रिक्षामें रह गयी थी। वो आज मै साथ लेकर आया हूँ।''

हे ऐकल्यावर सर्वांना एकदम आश्चर्याचा धक्का बसला. वडिलांची बॅग घेऊन रिक्षावाला आला होता. आपण होऊन! प्रामाणिपणे, सदसद्विवेक बुद्धीने

वडील आनंदाने म्हणाले,''पहिले चाय लो, बादमें मेरा इनाम स्वीकार करो. और कहो, क्या क्या हुआ?''

रिक्षावाला म्हणाला,''नही. चाय और इनाम की जरुरत नही। लेकिन क्या हुआ, वह बताता हूँ।''

तेवढ्यात भाऊ बाहेर आला. त्याने रिक्षावाल्याचा हात हातात घेऊन त्याला धन्यवाद दिले.

रिक्षावाला मराठीत बोलू लागला,'' बुधवारी तुम्हाला इथे सोडले. कोपऱ्यावर एक गिऱ्हाईक मिळाले. त्याच्याजवळ ४-५ पिशव्या होत्या. तो दोन पिशव्या मागे ठेवू लागला तर तेथे बॅग होती. तो म्हणाला, ''ही तुमची बॅग पुढे घ्या.''

माझ्याजवळ सामान नव्हते. ती बॅग तुमची राहिली हे मी समजलो. त्या गिऱ्हाइकाची गाडीची वेळ झाली होती म्हणून त्याला घेऊन पुन्हा स्टेशनवर गेलो. तिकडेच दिवसभर फिरत होतो. टिळकरोडकडे यायला व बॅग द्यायला जमले नाही. रात्री ११वाजेपर्यंत हिंडत होतो. शेवटी बॅग घेऊन घरी गेलो. काल गुरुवार. आमचा अल्लाचा नमाज पढण्याचा दिवस असतो. म्हणून मी मशिदीत जातो. त्या दिवशी मी सुट्टी घेतो. म्हणून आलो नाही. पण मला बॅगेकडे बघितले की सारखे कुणी तरी 'मला घेऊन चल, मला घेऊन चल' असे म्हणत आहे असे वाटत होते. रात्रीही मला सारखे असेच वाटत होते. सकाळी उठल्यावर आधी तुमच्याकडे बॅग द्यायची असे ठरवून, एवढ्या सकाळी आलो. बॅगमध्ये काही खास चीज आहे का?''

रिक्षावाल्याचे बोलणे ऐकून सर्वजण एकमेकांकडे बघू लागले.

वडील म्हणाले,''त्यात माझा भगवान आहे. त्याच्यासाठी मी दोन दिवस बेचैन झालो. त्यानेच तुम्हाला, 'मला घेऊन चल' अशी प्रेरणा दिली. आणि अस्वस्थ केले.''

असे म्हणून वडिलांनी बॅगेला हात लावून नमस्कार केला. त्यांच्या डोळ्यातून पाणी येऊ लागले.

भावाने बॅग उघडली. आतून लहानसा गणपती काढून वडिलांच्या हातात दिला. त्यांनी तो मुठीत गच्च पकडून, मूठ हृदयाशी धरून, डोळे मिटले. भगवान आणि भक्त यांच्या भेटीचा तो क्षण होता.अतिशय आनंदाचा! तेवढाच आश्चर्याचा

भावाने रिक्षावाल्याला इनाम देऊ केले. ते न घेता म्हणाला,''मी अल्लाचा भक्त आहे.त्याच्या कृपेने मला सर्वकाही मिळाले. त्याने मला चांगले काम करायला सुचवले. ते मी इमानाने केले. त्यात मला इनाम मिळाले. बॅग परत केली नसती तर अल्लाशी बेइमानी झाली असती. अल्लाचे इनाम हेच माझे इनाम आहे.''


भाविक रिक्षावाला इनाम न घेता निरोप घेऊन निघून गेला.

सर्वांच्या साक्षीने घडलेला प्रसंग! पण अजूनही वास्तवाचे भान येत नव्हते. स्वप्न पडावे तसे वाटत होते. तिकडे गणपती अस्वस्थ, इकडे भक्त - वडील अस्वस्थ.

एका मुसलमानाच्या घरी दोन दिवस राहून पुन्हा गणपती आपल्या भक्ताकडे आला होता. आपण होऊन, अचानक भक्ताच्या ओढीने

**१५७६, चिमणबाग, टिळक रोड, पुणे ३०**


# अंतर-पर्व



आपलं अनुभवविश्व अधिक संपन्न, श्रीमंत करणाऱ्या दर्जेदार रशियन कथांचा भावानुवाद.

**१३० रुपये**

**सभासदांना ९० रुपये**

**पोस्टेज २० रुपये**

भावानुवाद **डॉ. सुनीती अशोक देशपांडे**

# शिव पार्वतीची अपूर्व सोबत

**ना. द. जोशी**

जुलै-ऑगस्ट १९९८ मध्ये श्री वैष्णोदेवी-अमरनाथ-श्रीनगर यात्रेला आम्ही जाऊन आलो.

३० जुलै रोजी पहलगामहून अमरनाथ गुहेकडे जाण्यासाठी निघालो. चंदनवाडी, शेषनाग, महागुणस, पंचतरणी आणि अमरनाथ हे या यात्रेतील पाच टप्पे असून तीन-चार दिवसांचा सर्वसाधारण प्रवास आहे.

चंदनवाडी पासून अवघड चढण आहे. चंदनवाडी पासून दोन किलोमीटरवर पिस्सू घाटीची अत्यंत अवघड चढण सुरु होते. प्रवाशांपैकी काही चालत निघाले होते. काही घोड्यावरून तरी काही कंडी व दंडीच्या सहाय्याने निघाले होते.

एक पन्नाशी ओलांडलेल्या यात्रेकू बाई घोड्यावरून निघाल्या होत्या. अचानक घोड्याचा पाय घसरला आणि तो पुढे झुकला. एका बाजूला खोल दरी, दुसऱ्या बाजूला डोंगर कडा. बाई घाबरल्या आणि तोल जाऊन खाली पडल्या. पायी चालणारे यात्रेकरू लगेच मदतीला धावले. त्यांच्या हाताला थोडासं खरचटलं होतं. पण भीतीने त्यांचं बोलणं थोडावेळ बंध झालं होतं. डोळे मिटले होते.

थोड्या वेळाने त्यांनी डोळे उघडले. ''कसं वाटतंय?'' एका यात्रेकरून विचारलं.

बाई म्हणाल्या, ''बरं वाटतंय. पण माझा घोडा कुठाय? घोड्यावरून खाली पडल्याचं मला आठवतंय पण पुढचं काही आठवत नाही. कुणीतरी मला म्हणत होतं, 'घाबरू नको, मी तुझ्या पाठीशी आहे.' बोलणारी व्यक्ती दिसत नव्हती.

त्यांनी थर्मासमधला चहा घेतला आणि घोड्यावर बसून पुढे निघाल्या.

खरं म्हणजे त्या वाचल्या हेच विशेष. अगदी किरकोळ स्वरूपाची त्यांना इजा झाली होती.

ओम् नम: शिवाय! जय भोलेनाथ! बर्फानी बाबा की जय! असा जप करीत यात्रेकरू पुढे चालले होते.

आम्ही जरी सरकारी घोडी भाड्याने घेतली असली तरी घोड्याच्या पाठीवर पिशव्या ठेवून चालत निघालो होतो.

लोक चालता चालता बोलत होते.

एक जण म्हणाला, ''आपल्या इथून पुढे ठिकठिकाणी बर्फ दिसेल. पुढे कुठे आणि कधी बर्फवृष्टी होईल ते सांगता येत नाही. १९९६ साली इथून वरच्या भागात तुफान बर्फवृष्टी झाली होती. त्यात तीनशेच्यावर यात्रेकरूंना प्राण गमवावा लागला होता. महागुणस हा या मार्गावरचा सर्वात उंच पर्वत आहे. इथं चालताना फार दम लागतो. काही लोकांना हार्ट ॲटॅकसुद्धा येऊ शकतो. १९२८ साली इथं बर्फाचे मोठे वादळ झाले होते. हजारो यात्रेकरू त्यात मरण पावले होते.''

शेषनागला रात्री जेवण करून येताना आठ-दहा यात्रेकरूंचा एक ग्रुप भेटला. त्यापैकी दोघे ओळखीचे होते. ते म्हणाले, ''आम्ही आता उद्या सकाळी परत जाणार आहोत. ही यात्रा आम्ही पूर्ण करू असं वाटत नाही. इथं सगळीकडे मरणाची भीती वाटतेय.''

आम्ही तंबूत परत आलो. ''तंबूची दारं उघडी ठेवू नका.'' एक सैनिक सूचना देऊन गेला.

सकाळपासून मनाला भयभीत करणाऱ्या घटना कानावर येत होत्या. त्यामुळे आपणही इथूनच अमरनाथला नमस्कार करून परत जावे असे वाटू लागले.

पण त्याच पहाटे एक स्वप्न पडले.

एक शुभ्र जटाधारी साधू माझ्या समोर उभा होता. त्याची कफनी, दाढी, मिशा, जटा सर्व काही बर्फासारखे पांढरेशुभ्र होते. समोर मोठी हिमनदी होती. त्याने माझ्या दंडाला धरून नदीतून पलिकडे नेले.

सकाळी लवकर उठलो पण पुढील प्रवासाला निघेपर्यंत साडे-आठ वाजले. चौकशी करता समजले की इथून पंचतरणी १३ कि.मी. असून तिथून पुढे ६ कि.मी. अंतरावर अमरनाथ गुहा आहे. आणि हा प्रवास सात तासांचा आहे. संध्याकाळी सहा नंतर गुहेत प्रवेश मिळत नाही. पुन्हा पंचतरणीला परत येऊन दुसऱ्या दिवशी सकाळी अमरनाथ गुहेला जावे लागले.

मुसळधार पाऊस पडू लागला.

आम्ही एक-दीड कि.मी. आलो. लष्कराचे जवान वाटेत उभे होते. ते म्हणाले, ''वर महागुणसपास जवळ बर्फवृष्टी चालू आहे. त्यामुळे यात्रेकरूंना सुरक्षिततेच्या दृष्टीने पुढे सोडू नका असा आम्हाला वायरलेस मेसेज मिळाला आहे. ज्यावेळी 'यात्रेकरूंना पुढे सोडा' असा मेसेज येईल त्यावेळी तुम्हाला जाता येईल.

आम्ही वाटेत अडकून पडलो.

बराच वेळ आम्ही पावसात उभे होतो. साडे नऊ वाजत आले. आम्ही घोडेवाल्यांना म्हणालो, ''खान, हम वापस जायेंगे! टाईम बहुत हो गया है!''

घोडेवाला म्हणाला, ''घबराओ मत। हम आपको गुहामे ले जायेंगे। आप सिर्फ 'भोलेनाथ - बर्फानी बाबा - ओम् नम:शिवाय ऐसा जाप करो।''

घोडेवाल्याने खूप धीर दिला. पण आम्ही परत जाण्याचा निश्चय करून माघारी वळलो. घोड्यावर बसलो.

आम्ही काही पावलेच पुढे गेलो होतो, तोच एक वृद्ध दांपत्य आमच्यासमोर उभं राहिलं. वृद्ध माझ्या घोड्याजरळ उभा राहिला. आणि म्हणाला, ''यू आर थिंकींग टु गो बॅक. प्लीज डोंट डू लाईक धिस. यू विल सेफली रीच इन ती केव्ह आणि सेफली कम बॅक. नथिंग अनटोअर्ड विल हॅपन. युव पिलग्रिमेज विल बी हंड्रेड परसेंट सक्सेसफुल. यू सी आय एम सेव्हंटी. माय वाईफ इज अल्सो सेव्हंटी इयर्स ओल्ड. वुई बोत आर डॉक्टर्स. वुई केम हिअर फ्रॉम कॅलकटा. ॲट धिज एज वुई आर वॉकिंग... यू कॅन अल्सो वॉक विथ अस इफ यू डिझायर. बट ॲट एनी कॉस्ट डोंट गो बॅक. बिल्ड अप करेज अँड कॉन्फिडेन्स.''

त्या वृद्ध दांपत्याने आम्हाला परत जाऊच दिले नाही.

त्यांच्या बोलण्याने आम्हाला धीर आला आणि आम्ही परत अमरनाथ दर्शनाला जायचा निर्धार केला.

आम्ही चारच्या सुमाराला अमरनाथ गुहेच्या पायथ्याशी पोहोचलो. गर्दी खूपच होती. दर्शन घेऊन सहा वाजेपर्यंत गुहेच्या पायथ्याशी येणे जवळजवळ अशक्य होते.

लष्करी जवान यात्रेकरूंना मीठ घातलेले

कोमट पाणी देत होते. त्यामुळे थकवा जातो. आम्हीही ते मीठ मिश्रित पाणी घेतले व रांगेत उभे राहिलो. बऱ्याच पायऱ्या चढून वर जायचे होते.

त्या मिठाच्या पाण्याने मळमळल्यासारखे होऊ लागले. आम्ही बोलत असताना दोन जवान तिथं आले. ते म्हणाले, ''आम्ही सोलापूरचे आहोत. तुम्हाला काही त्रास होतोय का?'' आम्ही त्याला मळमळल्यासारखं होत असल्याचे सांगितले. त्यांनी आम्हाला बाजूच्या वाटेने शिवलिंगापर्यंत पोहोचवले. आजारी/अपंग व्यक्तींसाठीच तो मार्ग होता.

थंडी खूप होती. गर्दी खूप होती. ओम् नम:शिवाय चा १०८ जप पूर्ण करून सायंकाळी ६ वाजेपर्यंत आम्ही गुहेच्या पायथ्याशी आलो.

घनदाट अंधार होता. आठच्या सुमाराला पंचतरणीला आलो. तिथे तंबूत जागा मिळाली. स्लीपींग बॅग्ज मिळाल्या. जेवण करून आम्ही विश्रांती घेतली.

स्वप्नात बर्फानी बाबा शंकराने माझ्या दंडाला धरून हिमनदीतून पलिकडे नेल्याचे दृश्य मी अनुभवले होते. त्याची प्रचीती आली. इतक्या अडचणी येऊनही बर्फानी बाबाच्या कृपेमुळे आमची यात्रा सुफळ झाली. स्वप्न खरे ठरले.

आम्ही परत येत असताना ठिकठिकाणी त्या वृद्ध डॉक्टर दांपत्याला शोधले. त्यांची बरीच चौकशी केली पण कलकत्ता निवासी ते दांपत्य कुठेही भेटले नाही.

ते डॉक्टर पती-पत्नी खरेच कोण असावेत? काही यात्रेकरू म्हणाले, ''ते साक्षात 'शिव-पार्वती'च होते. या यात्रेत भगवान शंकर आणि देवी पार्वती वेगवेगळ्या रूपात भक्तांना दर्शन देतात.

**प्लॉट नं. २७ ब/१,तारवाला नगर, दिंडोरी रस्ता (मेरी डाकघर) नासिक ४**


## हसता हसता आरोग्य

लेखक **डॉ. मदन कटारिया**

**अनु. दिगंबर गाडगीळ**

**९० रु. सभासदांना : ६३ रु. पोस्टेज :२२ रु.**

मनात, शरीरात दडलेले
सर्व तणाव दूर करून तुमच्या
वृत्तीत बदल घडवून आणणाऱ्या
हास्यक्लबच्या उपक्रमाची
सविस्तर माहिती

# नवीन प्रकाशने

## बुद्धिबळाचा श्रीगणेशा

लेखक **ना. रा. वडनप**

बुद्धिबळ खेळाबद्दल
सर्व काही...
अनेक चाली, डावपेच
यासह कसे जिंकता येईल
हे दाखविणारा उद्‌बोधक ग्रंथ

**१२० रु. सभासदांना : ८५ रु. पोस्टेज :२०रु.**




# बालनगरी


सुंदरीने केली धमाल!
नाताळमध्ये येशू ख्रिस्ताच्या जन्मानिमित्त नाटुकले करायचे वसतिगृहातील मुलांनी ठरवले.
आपण पूर्वेकडचे तीन राजे भेटवस्तू घेऊन आपण जाऊ
सरला, दीपा आणि माला यांनी राजाची भूमिका करायचे ठरवले.
रंगीत तालीम झाल्यावर
छान झाली रंगीत तालीम. मस्त होणार नाटक!
धन्यवाद, बाई
मुली घरी जायला निघाल्या
हे बघा मुलींनो, ही उत्तराची कुपी घेऊन जा. दोन छोटे बॉक्स समजून भेटवस्तू म्हणून आणा.
हो, बाई
सरला आणि दीपा आपल्या खोलीवर आल्या
दीपा, बॉक्स सजवणे मला नाही जमणार.
काही काळजी करू नकोस आपण दोघी ते काम करू.
नंतर
सरल, काय शोधत आहेस?
काल आणलेला चपलांचा बॉक्स
बॉक्स सापडल्यावर
पण हा तर आधीच सजवलेला आहे.
खरंच की!


अगं, तो उघडू नकोस
...नको
पण सरलाने तो आधीच उघडला होता.
फुस्स
सरूने बॉक्स खाली फेकला
अगं, आत साप तर नाही ना?
चूप. हा तर बेडूक?
हा बेडूक कसा शिरला आत?
प्रयोगशाळेतून आणला होता. मी तुझ्या चपलांच्या बॉक्समध्ये ठेवलं त्याला
बेडूक पाळणार तू? दीपा, आपल्या खोलीत हा घाणेरडा प्राणी नको.
अगं, मी याला सुंदरी हे नाव ठेवलय.
अरे वा! खोलीतली सुंदरी
ती रागावलेली आहे. तिला शांत करायला हवे.
दीपाच्या डोक्यात एक कल्पना आली
सुंदरीमुळे माशा आणि झुरळे आपल्या खोलीत येणार नाहीत.
सरला त्यांना घाबरते हे दीपाला ठाऊक होते.


ठीक आहे। मग राहू दे सुंदरीला! पण तिला बॉक्सबाहेर पडू देऊ नकोस।
हा बॉक्स म्हणजे सुंदरीची गुहा असे समज।
बेडकाचे इतके कौतुक? दुकानातून एक मोकळा बॉक्स मी आणते।
माझ्यासाठीही आण एक!
अर्ध्या तासानंतर बॉक्स घेऊन सरला येते
हे बॉक्स मोठ्या नशीबाने मिळाले। दीपा, तू कुठे आहेस?
तेव्हा तिला एक चिठ्ठी मिळाली.
मला घाईत जावे लागतेय। काका काकी मला एक दिवसासाठी घेऊन जायचे म्हणताहेत।
नाही नाही! तर मला एकट्यालाच बॉक्स सजवावा लागेल। उद्या तो हवाय ना!
तिला बेडकाची गुहा दिसली.
याची नक्कल करायला हवी।
तिने हुबेहुब तसाच बॉक्स तयार केला.
बरा जमलाय! अगदी जुन्याचा जुळा भाऊ दिसतो।
नाताळचा कार्यक्रम मस्तच झाला. नंतर ख्रिस्तजन्माचे नाटक-
सर्वजण तयार राहा।
होय बाई
त्या कोकराला कुरवाळत बसू नको।
माझ्या डोक्यावरची पट्टी नीट आहे ना?


नाटुकले सुरू झाले.
गाण्याची धून राजांचा प्रवेश-
ड्रेसिंग रुममध्ये
सरला व दीपा भेटवस्तू तेथेच विसरून गेल्या। आता यातील कोणाची भेटवस्तू हे कसे ओळखायचे?
बाईंनी ते दोन बॉक्स धावत जाऊन दोघींच्या हातात दिले.
आम्ही तिघे पूर्वेचे राजे
सरलाच्या खोक्यातून फुस फुस आवाज
भेटवस्तू घेऊन
माझ्या खोक्यात काही तरी आहे।
खोक्याचे वरचे झाकण हळूहळू उघडत गेले
आम्ही निघालोय्
सरलाने डोळे किलकिले करून बघितले.
अरे, ही तर सुंदरी!
हे खोके असेच सोडून चालणार नाही। अरे देवा, सुंदरीला शांत राहू दे।






# नवीन स्पर्धा

## राजूच्या खोलीत गडबड गोंधळ



**राजूच्या खोलीत काही विचित्र आणि उलट्यापालट्या गोष्टी आम्हाला दिसल्या बघा, तुम्हालाही त्या दिसतात का?**

**अचूक उत्तरे पाठवणाऱ्या पहिल्या ३ मुलांना छान छान चित्रांची आकर्षक २ पुस्तके बक्षीस! उत्तर पाठवताना आपले नाव, पत्ता व इयत्ता लिहायला विसरू नका.**

**मुदत १५ जानेवारी २००५**

आमचा पत्ता : **मेहता मराठी ग्रंथ जगत**, १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवन समोर, पुणे ३०



# साहसी मुले

**लेखिका : उज्ज्वला केळकर**

**मुलांनो, मी तुम्हाला तुमच्याच सारख्या बालमित्रांच्या गोष्टी सांगणार आहे. या अगदी खऱ्या खऱ्या आहेत. या चिमुकल्या दोस्तांनी केवढा पराक्रम केला आहे, ठाऊक आहे? खूऽऽप मोठा! आणि त्यांना त्याबद्दल राष्ट्रपतीपदकही मिळालं आहे! या गोष्टी वाचून तुम्हालाही असंच साहसी बनावंसं वाटेल.**

## प्रसंगावधानी चित्रलेखा

ही गोष्ट आहे छोट्या लोबोंगोची आणि त्याला आगीपासून वाचविणाऱ्या चौदा वर्षाच्या चित्रलेखा लोरेंबर्गची. मणिपूर येथील पंजागाट गावात २५-३० वर्षंपूर्वी घडलेली घटना आहे ही.

छोटा लोबोंगो जमिनीवर खेळत होता. लोबोंगो दोन वर्षाचा मुलगा.



अजून तो धडपणे चालू शकत नव्हता. चालण्यासाठी त्याला भिंतीचा किंवा कशाचा तरी आधार घ्यावा लागत असे.

लोबोंगोची आई जवळच बसली होती आणि आपल्या मुलाचं खेळणं खिदळणं पहात होती. सकाळचे ७ वाजले होते. लोबोंगोच्या आईला एकदम आठवलं की चूल पेटण्यासाठी गायीच्या गोठ्यातून सुकी लाकडं आणायला हवीत. गायीच्या गोठ्यात दिवसासुद्धा अंधार होता. त्यामुळे लोबोंगोच्या आईने चिमणी पेटवली. तिच्या घरात अद्याप वीज आलेली नव्हती. त्यामुळे रॉकेल घातलेलेच दिवे वापरावे लागायचे. चिमणी पेटवून ती आता गोठ्यात निघाली होती. इतक्यात, तिला दुसऱ्या एका जरुरी कामाची आठवण झाली.

तिने चिमणी खाली ठेवली आणि ती बाहेर गेली. छोटा लोबोंगो तिथेच खेळात होता. खोलीत दुसरं कुणीच नव्हतं. फक्त छोटा लोबोंगो आणि थोड्याच अंतरावर जळणारी चिमणी लोबोंगो त्या चिमणीकडे कुतूहलाने पाहात होता. त्याला त्या जळणाऱ्या दिव्याचे इतके आकर्षण वाटले की लटपटत्या पावलांनी ती त्या दिव्याकडे निघाली. दिव्याच्या खेळण्याशी त्याला खेळायचं होतं. त्यातून बाहेर पडणारा प्रकाश, त्याला आपल्या मुठीत धरायचा होता. दिव्यापर्यंत तो पोहोचला. आणि त्याच्या लटपटत्या पावलांचा धक्का चिमणीला लागला. चिमणी खाली जमिनीवर पडली आणि जमिनीवर लागला.



चिमणी खाली जमिनीवर पडली आणि जमिनीवर रॉकेल पसरू लागलं. बघता बघता रॉकेलने पेट घेतला नि जमिनीवर आग पसरली.

निरागस लोबोंगो त्या ज्वालांमध्ये घेरलं गेलं; तो घाबरला. ओरडला. रडायला लागला. त्याच्या गळ्यात बांधलेल्या गळपट्ट्याने पेट घेतला आणि तिथे त्या छोट्या बालकाचे रक्षण करणारे कुणीच नव्हते.

योगायोगाने शेजारची चित्रलेखा काही कामानिमित्त तिथे आली होती. तिथलं दृश्य पाहून ती व्याकूळ झाली. आगीच्या ज्वालांनी लोबोंगोचे शरीर वेढले होते आणि असहाय्य लोबोंगो मोठमोठ्याने आक्रोशत होते.

चित्रलेखेच्या मनात त्या अजाण बालकाविषयी अपार करूणा दाटून आली. पळत पळत ती त्याच्याजवळ पोहोचली. आग कशी विझवावी? ती आसपास अशी वस्तू शोधत होती की ज्यामुळे आग विझवता येईल. आगीवर पाणी ओतलं, तर अंगावर फोडच फोड उठतता, हे तिला माहीत होतं. ती कांबळयाचा शोध घेत होती. पण तिला कांबळ कुठेच दिसेना जवळच तिला एक तरट दिसलं. त्यात काही तरी गुंडाळलेलं होतं.

चित्रलेखेने चपळाईने ते तरट रिकामे केले. आणि लगेचच, लोबोंगोच्या शरीराला सर्व बाजूने गुंडाळलं त्यामुळे आगीच्या लवलवत्या ज्वालांना हार पत्करावी लागली.

इतक्यात, लोबोंगोजी आई तिथं पोहाचली. जमिनीवर पडलेली चिमणी आणि तरटात लपटलेला लोबोंगो पाहून तिच्या सगळं लक्षात आलं. छोट्या लोबोंगोला एकटाच टाकून आपण निघून गेलो, याचा तिला आता पश्चात्ताप होत होता.

चित्रलेखेला मिठी मारत ती म्हणाली,'बेटी तू माझ्यावर केवढे उपकार केलेस! नाही तर आज माझ्यावर कसला प्रसंग ओढवला असता. माझा मुलगा लोबोंगो केवळ तुझ्यामुळे वाचला.'

चित्रलेखा सहज स्वरात म्हणाली,' ते तर माझं कर्तव्यं होतं.'

चित्रलेखेला तिच्या समयसूचकेबद्दल आणि धडाडीने छोट्या लोबोंगोचा जीव वाचवल्याबद्दल राष्ट्रीय पुरस्कारही मिळाला होता.



# समयसूचक आणि चतुर लेवेण्ड कौर

मधल्या सुट्टीची घंटा खणखणली. छोट्या छोट्या मुली आपापलं दप्तर सांभाळत, आपापल्या वर्गाबाहेर पडल्या. ज्यांनी डबे आणले होते त्या मोकळया पटांगणातील मोठ्या झाडाखाला बसल्या. त्यांनी डबे उघडले आणि मजेत फराळ करायला सुरुवात केली.

लेवेण्ड कौर शाळेच्या फाटकाकडे निघाली. तिने डबा आणला नव्हता. फेरीवाल्याकडून काहीतरी विकत घेण्याचा तिचा विचार होता. सुट्टीच्या वेळी खाण्यापिण्याच्या वस्तू विकणारे अनेक फेरीवाले शाळेच्या गेटजवळ गर्दी करून उभे राहिले होते. आइस्क्रीम, चाट, शेंगदाणे, फळे, चणे-चुरमुरे मनाला येईल ते घ्यावं.

लेवेण्ड फाटकाशी पोहोचली आणि एकदम थांबली. चार-पाच धष्टपुष्ट





पुरुष तिला शाळेच्या आसपास घिरट्या घालताना दिसले. त्यांचा पेहेराव साधुंसारखा होता. त्यांच्या खांद्यावर पोती लादलेली होती. त्यात जड सामान असावं, असं बघणाऱ्याला वाटत होतं. त्यांचे डोळे बारकाईने, आसपासचं निरिक्षण करत होते. सतर्कतेने कशाचा तरी शोध घेत होते. लेवेण्डला त्यांचं वागणं संशयास्पद वाटलं.म्हणून ती हळूहळू पण सावधपणे पुढे निघाली. त्यांना अधिक जवळून पहावं, समजून घ्यावं, असा तिचा विचार होता.

अचानक लेवेण्डची दृष्टी एका साधूच्या खांद्यावरील पोत्याकडे गेली आणि तिला असं वाटलं की पोत्यात काही तरी हालचाल होतीय. तिने आपले डोळे चोळले. पुन्हा पोत्याकडे पाहिलं. पोत्यात, निश्चितपणे हालचाल होत होती. लेवेण्ड विचार करत राहिली. काय असेल बरं त्या पोत्यात? एका पोत्याच्या खालच्या बाजूचा एक कोपरा जरा फाटला होता. त्यातून एक बोट बाहेर डोकावत होतं. लेवेण्ड क्षणभर स्तब्ध. उभी राहिली. तिचं हृदय धडधडू लागलं. तिला आठवलं. काही दिवस वर्तमानपत्रातून बातम्या येत होत्या. लहान मुलांना पळवून नेणारी टोळी शहरात आली. अकरा वर्षीय लेवेण्डच्या वाचनात या बातम्या आल्या होत्या.



काय करावं? लेवेण्डच्या निर्णय होत नव्हता, एकदा तिला वाटलं की खूप जोरात ओरडावं आणि साधू वेषातल्या त्या सैतानांचं बिंग फोडावं. पण, मग तिला वाटलं की आपण ओरडलो तर ते सैतान पळून जातील, कदाचित अपाण ओरडलो आणि आपल्याला वाटतय, तसं काही नसलं तर? कदाचित आपलेच डोळे धोका देत असले तर?

ती धीर करून तशीच पुढे चालू लागली. मधली सुट्टी संपत आली होती. साधू शाळेच्या आसपास अजूनही घुटमळत होते. लेवेण्ड आपल्या रस्त्याने भरभर पुढे निघाली. थोडं अंतर चालून गेल्यावर ती चक्क पळायलाच लागली. पळत पळत तिने जवळची पोलिसचौकी गाठली.

पळून पळून दमल्यामुळे तिचा श्वास जोरात चालला होता. आपल्याला उशीर तर झाला नसेल ना या विचाराने ती घाबरी-घुबरीही झाली होती. थोडा वेळ तिला काहीच बोलायला सुधारेना. त्या छोट्या मुलीला समोर पाहून पोलिसही हैराण झाले.

लेवेण्डने आपल्या शाळेच्या फाटकाजवळ जे पाहिलं, ते पोलीस इन्स्पेक्टरला सांगितलं. त्यांनी काही शिपायांना बरोबर घेतले आणि लेवेण्डसहित शाळेजवळ आले. साधुमंडळी अजूनही शाळेच्या आसपास होती. पोलिसांना पाहून ते घाबरले. पळून जाऊ लागले. पण पोलिसांनी त्यांना पकडलेच.

'तुमची पोती उघडून दाखवा!' इन्स्पेक्टर दरडावणीच्या स्वरात म्हणाले.

'काही नाही साहेब! त्यात स्वयंपाकाची भांडी, धान्य, अंथरूण-पांघरूण आहे.' साधुमंडळी म्हणाली. पोती उघडायला ते आळंटाळं करताहेत असं बघून पोलिसांनी जबरदस्तीने ती पोती उघडली आणि काय? छोटी छोटी तीन मुले त्या पोत्यात होती. त्यांचे हात-पाय बांधलेले होते. पोती बंद असल्यामुळे त्यांना पुरेशी हवा मिळाली नव्हती. ती जवळजवळ बेशुद्ध झाली होती. पोलिसांनी तातडीनं त्यांना प्राथमिक उपचार केंद्रात पोहोचवले.

साधूंचं भांडं फुटलं होतं. मुलांचं अपहरण करणाऱ्या कुविख्यात टोळीचे ते सभासद होते. लेवण्डच्या समयसूचकतेमुळे आणि धैर्यामुळे केवळ ती तीनच मुले नाही तर त्यांनी पळवून नेलेली अनेक मुले आपल्या आईवडिलांकडे सुखरूप जाऊ शकली.


अकरावर्षीय लेवेण्डवर सर्व दिशांनी कौतुकाचा, प्रशंसेचा वर्षाव होऊ लागला. नव्या दिल्लीत राहाणाऱ्या लेवेण्ड कौरला ५ एप्रिल १९७५ ला केंद्रीय बालकल्याण समितीने राष्ट्रीय पुरस्कार देऊन सन्मानित केले

# सरस्वती

पुराचं पाणी झोपडीच्या भिंतीवर चढू लागलं होतं. झोपडीची जमिन जलमय झाली होती. चूल-बैल, जळण सगळं पाण्यात बुडून गेलं होतं. एक प्रौढ माणूस एका उंच खाटल्यावर उकिडवा बसला होता. त्याची पत्नी मुलं-बाळं आणि सगळा संसार खाटल्यावर जमा झाला होता. तिथे नव्हती फक्त त्यांची मोठी मुलगी सरस्वती. पुराचं पाणी जसं झोपडीत चढू लागलं तसा साऱ्यांनी खाटल्यावर आसरा घेतला.

पुराचं पाणी वाढत होतं, तसा तो प्रौढ माणूस व्याकुळ होऊन म्हणत होता, 'हे परमेश्वरा, या साऱ्या संसाराचा तूच मालक रे बाबा! पण सरस्वतीचं काय झालं? अजून कशी ती घरी आली नाही.' नवरा-बायको, मुलं सगळीच झोपडीच्या दारातून दूरवर बघत होती. आत्ता एवढ्यात सरस्वती येताना दिसेल, अशी आशा त्यांना लागून राहिली होती. एवढ्या पुरात जाणार तरी कुठे तिला शोधशयला?

सरस्वती नदीवर गेली होती. नदीच्या या काठावरील लोकांना त्या काठावर पोहाचवणं व त्या काठावरील लोकांना या काठावर आणणं, हा तिचा व्यवसाय होता. याशिवाय, ती मासेमारीही करी.' सरस्वती नेहमीप्रमाणे नाव घेऊन नदीकाठी गेली होती.



नदीवर आल्यावर तिला पुराची भीषणता लक्षात आली. तिची नजर जिथपर्यंत पोचेल, तिथपर्यंत पाणीच पाणी दिसत होतं. शेती-बागायती सगळं पाण्यात बुडून गेलं आणि बेडकांच्या



टरटरीचे आवाज अंगावर रोमांच उठवत होते. हे पाहून सरस्वतीच्या हृदयात कालवाकालव झाली. तिला वाटलं, सकाळ होता होता सारा गाव या पुराच्या वेढ्यात सापडेल.



सरस्वती खोल चिंतेत बुडून गेली. गाववाल्यांना वाचवण्यासाठी काय करता येईल? ती विचार करू लागली. गावाच्या बाजूने येणारी किंकाळी, मदतीसाठी मारलेल्या हाका तिला ऐकू आल्या. गावात पाणी खूप वर चढलंय आणि सुरक्षिततेसाठी गाववाले कासावीस झालेत, हे तिच्या लक्षात आलं. क्षणभर तिला आपल्या झोपडीची, आपल्या आई-वडिलांवर कोणता प्रसंग गुदरला असेल, या विचारांनी ती व्याकुळ झाली. पण दुसऱ्याच क्षणी त्या विचारातून बाहेर पडली.

गावाच्या ज्या बाजूने मदतीसाठी हाकाटी येत होती ती जरा खालची बाजू होती. तिथली वस्ती जलमय झाली होती. तिथले लोक आपापली घरंदारं सोडून नदीकाठी पळत येत होते.

सरस्वती पळतच नदीकाठी आली. तिने बांधलेली आपली नाव सोडली आणि सुकाणूच्या साहाय्याने पुढे निघाली. आणि सुरक्षित ठिकाणी नेऊन पोहोचवलं.

पाण्याच्या वेगवान लाटा नौकेला थपडा मारत होत्या. नाव डगमगत होती पण एकटी सरस्वती मोठ्या धैर्याने आणि साहसाने सुकाणूपाशी बसून नाव चालवत होती. त्यावेळी, तिच्या कोमल हातात कुठली शक्ती आली होती, कुणास ठाऊक! सारी रात्र सरस्वती पूरपीडित गावकऱ्यांना सुरक्षित जागी पोचवण्याच्या कामात गढून गेली होती. तिने एक क्षणही विश्रांती घेतली नाही.

सकाळ होता होता गावातील सारे सुरक्षित स्थानी पोचले होते. तिच्या

प्रयत्नामुळे सारेच्या सारे ग्रामवासी पुराच्या तडाख्यातून बचावले होते. कुणीही बुडाले नव्हते. पुराच्या तडाख्यातून बचावलेले सारे ग्रामवासी तिचा जयजयकार करत होते.


सुरक्षा कार्य संपलं आणि तिला आपल्या आईवडिलांची आठवण झाली. ती प्रचंड थकली होती. तिचे हात पाय, मन अगदी भरून गेले होते. आणि बेहोशीची छाया तिच्यावर पसरू लागली होती. पण आपल्या जबरदस्त इच्छाशक्तीच्या बळावर ती आई-वडिलांजवळ पोहोचली.

सरस्वतीच्या आई-वडलांना माहीत झालं की, आपल्या मुलीने पूरग्रस्तांचे प्राण वाचविले, तेव्हा त्यांना अतिशय आनंद झाला. ते आपलं दुःख विसरले.

दुसऱ्या दिवशी सरस्वतीच्या साहसाची आणि शौर्याची कहाणी दूरवर पसरली. बिहारमधील या बहादूर मुलीला राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

**खेळ नजरेचा!**

**आकृतीच्या मध्यावर एकटक बघा व आकृती पुढे मागे हलवा आणि पहा काय गंमत होते ती!**





# एक धाडसी मुलगी

हरियाणातील सोनीपत गाव. या गावात माध्यमिक कन्या विद्यालय होतं. या शाळेचा परिसर आज विलक्षण हर्षोल्हासाने उत्साहाने आणि आनंदाने भरून गेला होता. पताकांनी सुशोभित केलेला होता. डावीकडचा भागाची तर विशेष सजावट करण्यात आली होती. त्या भागाचा जीर्णोद्धार करण्यात आला होता. आता त्या भागाचं उद्घाटन होणार होतं. त्याचबरोबर त्यांच्या शाळेतील विद्यार्थिनी सविता देवी हिचा सत्कारही होणार होता.

समारंभ सुरू झाला. मुख्याध्यापकांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. त्याचप्रमाणे सविताचा परिचय पाहुण्यांना करून दिला. मुख्याध्यापिका माईकवरून सवितेची तिचा समयसूचकतेची, तिच्या विचारांची, शाळेविषयी तिला वाटणाऱ्या आत्मीयतेची मुक्त कंठाने प्रशंसा करत होत्या. मुली टाळ्यांचा पाऊस पाडत होत्या.आणि त्याचवेळी त्यांच्या डोळ्यासमोर उभा राहिला तो दिवस.

पावसाळ्याचे दिवस होते. त्या दिवशी तर आकाश घनदाट मेघांनी आच्छादलं होतं. पावसाची संतत धार लागली होती. पण पाऊस काही मुसळधार पडत नव्हता. सविताच्या एकदा मनात आलं, शाळेत जाऊच नये.


पण, दुसऱ्या क्षणी तिने विचार बदलले.

तिला वाटलं, गैरहजर राहिल्याने अभ्यासाचं नुकसान होईल. आणि आपण इतर मुलींपेक्षा मागे पडू.

ती शाळेत आली. शाळेची इमारत जुनी-पुराणी होती. इमारतीचा एक भाग तर इतका जर्जर झालेला होता की तो कधीही कोसळून पडला असता. त्यामुळे त्या भागात वर्ग भरत नव्हते. पण त्यातील एका खोलीत क्रीडासाहित्य ठेवलेले होते.

सविता शाळेत पोहोचेपर्यंत पावसाने चांगलाच जोर धरला. मुसळधार पाऊस पडू लागला होता. विद्यालयाचा जीर्णशीर्ण भाग अधिकच दयनीय झाला. कोणत्याही क्षणी तो कोसळेल, असं वाटू लागलं.

सविता आणि तिच्या मैत्रिणींची दृष्टी खचत जाणाऱ्या त्या भागावर खिळली. त्या सगळ्या सतर्क झाल्या. त्या बाजूला जाणं अतिशट धोकादायक होतं. सविताला सारखं वाटत होतं, त्या खचत जाणाऱ्या भागात, शाळेचं क्रीडासाहित्य होतं. जर



तो भाग पडला तर हजारो रुपयांचं क्रीडासाहित्य नष्ट होईल. तो खचलेला भाग एका क्षणात काही पडणार नाही. सावधपणे आणि सुरक्षितपणे ते बाहेर काढता आलं तर?

सविताने आपले हे विचार आपल्या मैत्रिणींना सांगितले. मैत्रिणींनी तिची खिल्ली उडवली. 'सामनासाठी आपले प्राण धोक्यात घालणं मूर्खपणाचं आहे. कोणत्या क्षणी तो भाग जमीनदोस्त होईल, कुणास ठाऊक!' सविताने तर सामाना सुरक्षितपणे बाहेर काढण्याचा निश्चयच केला होता. तिच्या मैत्रिणींनी मदत केली असती, तर काम चटकन झालं असतं. सोपं झालं असतं. पण, त्या कुणीच धोका पत्करायला तयार नव्हत्या.

सविता एकटीच त्या जर्जर भागात गेली. आणि तेथील क्रीडासाहित्य उचलून सुरक्षित ठिकाणी नेले. सवितेचे हे साहस पाहून तिची एक मैत्रीणही तिच्या मागोमाग निघाली. बाकीच्या सगळ्या मात्र गप्प उभं राहून बघत होत्या.

सविता आणि तिची मैत्रीण मोठ्या सावधपणे त्या खचलेल्या भागात पोहोचल्या. तिथले क्रीडासाहित्य सुरक्षित जागी त्या नेऊ लागल्या. भिजलेल्या आणि बुळबुळीत झालेल्या भिंती अंगावर रोमांच उठवत होता. त्यावर असलेलं



छप्पर क्षणोक्षणी खाली खाली खचत होतं.

सवितेने शेवटचं सामान बाहेर काढलं आणि अगदी त्या क्षणी आपल्या मैत्रिणीची भीतीने फोडलेली किंकाळी तिने ऐकली. छप्पर कडकडाट करून खाली पडू लागलं होतं. सविता सावध झाली. पळतच मैत्रिणीकडे आली. मैत्रिणीच्या डोक्यावर पडत असलेलं छप्पर आपल्या हातांवर तिने झेललं. मैत्रीण बाल बाल बचावली. सवितेच्या चपळाईमुळं आणि प्रसंगावधानामुळे एक मोठी दुर्घटना टळली.

सवितेच्या हाताला खोलवर जखम झाली होती. पण तिला त्याची पर्वा नव्हती. आपण प्राणांची बाजी लावून खेळाचं सामान सुरक्षितपणे बाहेर काढलं आणि मैत्रिणीचा जीव वाचवला, याचंच अपार समाधान तिला लाभलं होतं.

सवितेच्या या साहसाने शाळेतील इतर विद्यार्थिनी चकित झाल्या. मुख्याध्यापकांनी तिची खूप प्रशंसा केली. इतर विद्यार्थिनींनी तिच्या कृतीचं, साहसाचं, शालेय भक्तीचं अनुकरण करायला हवं असंही सांगितलं.

बहादूर सवितेला तिच्या या साहसाबद्दल राष्ट्रीय पुरस्कारही मिळाला.

# स्पर्धा निकाल

## सप्टेंबर २००४ अंकातील ''कोणती शेपटी कोणाची?'' स्पर्धा

### अचूक उत्तर

घोडा - ग, मांजर - घ, खार - च, गाय - ख, सिंह - क

### यशस्वी स्पर्धक

**१) निहारीका शशांक देशमुख,** ३२०चंद्रनील सोसायटी,पानमळा, पुणे ३०.

**२) संदेश नितीन देशमुख,** अष्टविनायक कॉलनी,सावेडी,अहमदनगर.


**३) सोहम श्रीरंग मक्तेदार,** १, शितल अपार्टमेंट,सम्राट नगर, औरंगाबाद.

**यशस्वी स्पर्धकांचे अभिनंदन!**


**तुमचे बक्षीस लवकरच पाठवत आहोत!**

## खेळ नजरेचा!

खालील आकृती पुढे मागे केल्यास हलताना दिसतात का पहा!







# दोस्त छोटे नाव मोठे

लेखिका : उज्ज्वला केळकर

**बालमित्रांनो, मुलांचे पाय पाळण्यात दिसतात असे म्हणतात. लहान वयात विशिष्ट क्षेत्रात मोठे यश मिळवणाऱ्या बालमित्रांचे हे परिचय तुम्हालाही स्फूर्तिदायक ठरतील.**

## बाल संगणकतज्ज्ञ आनंद आहेरकर

डोंबिवलीच्या उर्सेकरवाडीत राहणारा आनंद आहेरकर १४ वर्षांचा आहे. यंदा खरं तर तो नववीत असायला हवा. पण कसा असणार? त्याने तर सातवी पास झाल्यावर शाळाच सोडली. शाळा सोडली, पण अभ्यास नाही सोडला. संगणक क्षेत्रात त्याला करिअर करायचे आहे. त्यासाठी वेळ कमी पडतो, म्हणून त्याने चक्क शाळा सोडली. पण या वयात, थोरा-मोठ्यांना देता येणार नाही, अशा संगणकाच्या परीक्षा त्याने दिल्यात. त्यांना अवघड वाटणाऱ्या गोष्टी त्याच्या दृष्टीने अगदी साध्या प्राथमिक असतात.

११ व्या वर्षी त्याने 'फील्ड इंजिनिअरिंग'चा डिप्लोमा केला आणि तो जगातला सर्वात लहान 'फील्ड इंजिनियर' बनला. बारावं वर्ष उलटतं न उलटतं तोच 'मायक्रोसॉफ्ट सर्टिफाईड सिस्टिम'चा अभ्यासक्रम पूर्ण केला.

याबद्दल त्याला सायबर विश्वाचं आराध्य दैवत असलेल्या बिल गेटस्‌च्या सहीचे ‘एक्सलन्स’ सर्टिफिकेट मिळाले आहे. बिल गेट्स हे आनंदचे दैवत, त्याच्या सहीचं सर्टिफिकेट म्हणजे, आनंद म्हणता, ‘माझ्यासाठी तो निव्वळ कागदाचा तुकडा नाही. माझ्यासाठी ती सोन्याची खाण आहे.’



यानंतर नेटवर्किंग क्षेत्रात, जागतिक मान्यता असलेल्य ‘सिस्को’या संस्थेचा सी.सी.एन.ए अभ्यसाक्रम-९११/१००० गुणांनी पूर्ण केला. तेराव्या वर्षी इतक्या कमी वयात एवढे मार्कस्‌ मिळवणारा जगातला तो सगळ्यात लहान मुलगा आहे. त्यानंतर त्याने सिस्कोचा ‘नेटवर्किंग प्रोफेशनल’चा सर्टिफाईड आणि ‘पिक्स फायरवेल ॲडव्हान्स कोर्स’ पूर्ण केला.

आनंदने ‘मूरस आणि रोनल्ड कन्सल्टिंग प्रा. लि.’ चा हरिभत्ती ग्रुप आय.टी. नेटवर्क सेटप हा ॲकॅडेमिक प्रोजेक्ट अवघ्या ७ आठवड्यात पूर्ण केला. या काळात तो अतिशय सिन्सिअर, परिश्रमपूर्वक व अंतःस्फूर्तीने काम करत होता, असा कौतुकपूर्ण उल्लेख त्याच्या सर्टिफिकेटात, डायरेक्टर उदय गुलवाडी, यांनी केला आहे. मुंबईला इंटरनॅशनल मर्चंट कॉन्फरन्स झाली होती. आंतरराष्ट्रीय स्तरावरील संगणक क्षेत्रातील बुद्धिमान मंडळी हजर होती. त्यात सर्वात लहान वयाचा आनंद आहेरकर होता. त्याबद्दल त्याला मंत्री अशोक प्रधान आणि आय.एम.सीचे अध्यक्ष शैलेश हरिभत्ती यांच्याकडून ॲवॉर्ड मिळाले. बघता बघता हा किशोरवयीन मुलगा धीरगंभीर, तज्ज्ञ लोकांमध्ये जाऊन बसला. त्याला डोंबिवलीच्या रोटरी क्लबने त्याचप्रमाणे जैन बालतज्ज्ञ अशीही ॲवॉर्डस्‌ मिळाली आहेत.

आनंदने इतक्या लहान वयात एवढी झेप कशी घेतली? आनंदची आई प्रेरणा सायबर कॅफे चालवते. त्यामुळे अगदी लहानपणापासून संगणकाची हाताळू लागला. वयाच्या ५ व्या वर्षी त्याला मायक्रोसॉफ्टच्या डॉस कमांडस्‌ येत होत्या. ‘संगणकावर काम करता करता काही प्रॉब्लेम्स निर्माण होत. ते दूर करण्यासाठी तज्ज्ञांना बोलवावं लागे. असं दुसऱ्यावर अवलंबून राहायचं. मग मीच का तसा प्रयत्न करून बघू नये, असं मनात आलं आणि मी त्यात हात म्हणजे डोकं घातलं. आनंद एकदा म्हणाला. मुलांनो, हे खरंच आहे.

आनंदला संगणकातील अभियांत्रिकी पदवी घ्यायचीच अर्थात बहुतेक विद्यापीठातून त्यासाठी १८ वर्षाची अट आहे. पण सिंगापूर येथील ‘एम.डी.आय.एस’ विद्यापीठाने त्याला खास परवानगी दिली आहे. अमेरिकेत जाऊन ‘इंटरनेट एक्सपर्ट कोर्स’ पूर्ण करायचा आहे. आतापर्यंत जगभरातल्या ५०० लोकांनीच हा कोर्स पूर्ण केलाय. आनंदला ५०१ नंबर व्हायचं आहे.

‘नेटवर्किंग’चं महत्त्व सांगताना आनंद म्हणतो, भारतातील सर्व पोलिस ठाणी नेटवर्कने जोडल्यास कुठल्याही गुन्हेगाराची माहिती संपूर्ण देशभरात ५ सेकंदात उपलब्ध होईल गुन्हेगारील आळा घालण्यासाठी अशा प्रकारचा प्रकल्प हाती घ्यायला हवा.

आनंदच हे सगळं यश लोभावणारं नक्कीच आहे. पण शाळा सोडल्यामुळे आणि केवळ संगणकावरच लक्ष केंद्रित केल्यामुळे तो एकलकोंडा होईल, त्याच्या सामाजिक, भावनिक, शारीरिक, विकासात काही उणीव,कमतरता राहील. असं नाही वाटत आपल्याला? मी प्रकाश आहेरकरांना, आनंदच्या वडिलांना विचारले.

‘मुळीच नाही.’ श्री. प्रकाशराव म्हणाले, ‘त्याचा मित्रपरिवार खूप मोठा आहे. त्यात वेगवेगळ्या वयोगटातील मंडळी आहेत. बरोबरीच्या मुलांबरोबर त्याला क्रिकेट खेळायला आवडतं आणि संध्याकाळी तासभर त्याने खेळलेच पाहिजे, असा आमचा आग्रह असतो. इतर मुलांप्रमाणे बुद्धिबळ आणि हो, कॉम्प्युटर गेम्स खेळण्यात रमून जातो. थोडक्यात, आनंद हा निव्वळ कॉम्प्युटर माईंडेड होणार नाही. याची पूर्ण दक्षता आम्ही आणि तोसुद्धा घेतो.

आनंदने जी स्वप्ने डोळ्यापुढे ठेवली आहेत, ती वास्तवात येवोत; त्याच्या प्रगतीमुळे आपल्या देशाचं, आपल्या महाराष्ट्राचं नाव सर्वतोमुखी होवो, अशा शुभेच्छा देऊ यात ना त्याला!

# स्केटिंगवर शास्त्रीय नृत्य करणारी पंखुरी जुवेकर

छोट्या दोस्तांनो, हा फोटो पाहिलात ना? कुणाचा आहे हा फोटो, माहीत आहे? हा आहे पंखुरी जुवेकरचा. ती काय करतोय,हे ओळखलंच असेल तुम्ही! अगदी बरोब्बर! ती नृत्य करतेय. शास्त्रीय नृत्यातील ओडिसी प्रकारचं नृत्य करतेय ती! तिच्या पायाकडे नीट बघितलंत की लक्षात येईल तुमच्या. नुसती घुंगुरं नाहीयेत तिच्या पायात. तळपायाला स्केट्सही बांधलेले आहेत तिच्या! स्केट्सवर ओडिसी नृत्य करतानाची पोझ आहे तिची ही!

ती सध्या ओडिसी नृत्य शिकते आहे. तसेच स्केट्सवरही नृत्य करायला शिकते आहे. नुसतीच शिकत नाही ती. यंदा मे महिन्यात विशाखापट्टण इथे नॅशनल रोलर स्केटिंगच्या स्पर्धा झाल्या. त्यात स्केटिंगवर क्लासिकल नृत्य हाही एक प्रकार होता. आठ वर्षाच्या पंखुरीने या स्पर्धेत प्रथमच भाग घेतला आणि चक्क पहिला नंबर मिळवून सुवर्णपदकसुद्धा पटकावलं.

पंखुरी अभिनव विद्यालयाच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत इयत्ता चौथीमध्ये शिकत आहे. गेल्या वर्षीपासून म्हणजे वयाच्या सातव्या वर्षीपासून तिने ‘ओडिसी नृत्य’ शिकायला सुरुवात केली. पण स्केटिंग मात्र ती कितीतरी आधीपासून म्हणजे ती दीड-दोन वर्षाची असल्यापासून करते आहे. ती चालायला लागली, ती स्केटवरूनच घसरते आहे म्हणा ना!

पंखुरीची आई मेघना आणि वडील राजन जुवेकर दोघेही उत्तम स्केटिंग करतात. ती दोघे शाळा-कॉलेजच्या विद्यार्थ्यांना स्केटिंग शिकवतात. स्केटिंगच्या स्पर्धांसाठी मुलांची तयारी करून घेतात. स्पर्धांच्या वेळी पंच म्हणून कामही करतात. या वातावरणात पंखुरीला स्केटिंगची आवड निर्माण झाली नाही तरच नवल!

पंखुरीची आई आर्टिस्टिक किंवा कलात्मक स्केटिंगही शिकवते. पंखुरीलाही आपोआपच याची आवड निर्माण झाली. पुण्यातील गणेश फेस्टिव्हलच्या उद्घाटनाच्या वेळी संगीतावर, ग्रुप आर्टिस्टिक स्केटिंगचा छोटासा कार्यक्रम सादर करण्यात आला. या फेस्टिवलचे उद्घाटन सोनिया गांधींनी केले होते. या कार्यक्रमाचे प्रेक्षकांनी खूपच कौतुक केले. या ग्रुपमध्ये पंखुरीही होती. तेव्हा ती फक्त पाच वर्षाची होती. स्टेजवरचा तिचा हा पहिला कार्यक्रम.





यानंतर फरिदाबाद येथे नॅशनल रोलर स्केटिंगच्या स्पर्धेच्या वेळी आर्टिस्टिक स्केटिंगच्या स्पर्धेत तिने प्रथमच भाग घेतला. त्या वेळी काही तिला पदक वगैरे मिळालं नाही. पण स्पर्धेत केवळ नंबर मिळवण्यासाठीच भाग घ्यायचा असं मुळीच नाही. होय की नाही? स्पर्धेत भाग घ्यायचा तो आनंद मिळवण्यासाठी पाच वर्षाच्या पंखुरीने त्या वेळी नंबर नाही, पण आनंद भरपूर मिळवला.

पंखुरीला स्केटिंगची आवड आहेच आहे. पण त्याचबरोबर नृत्यासाठी चेहऱ्यावर जे हावभाव असायला हवेत शरिराच्या लालित्यपूर्ण आणि सुंदर हालचाली व्हायला हव्यात, नृत्य मुद्रांच्या वापरात कल्पकता आणि कौशल्य हवं, त्या गोष्टींची पंखुरीला जन्मतःच देणगी आहे, असं तिच्या आईच्या लक्षात आलं. मग तिला वाटलं, की पंखुरीने या कलेचा, म्हणजे स्केटिंगवर शास्त्रीय नृत्य करण्याचा अधिक अभ्यास करावा. खूप मेहनत करावी नी खूप यश मिळवावं.

पंखुरीने विशाखापट्टण येथील राष्ट्रीय पातळीवरील ‘स्केटिंगवर शास्त्रीय नृत्य’ या विभागात यश मिळवलय. यश मिळवायला तिची सुरुवात झाली. आपण तिला शुभेच्छा देऊ या.



**राजू** : एकदा एका सरदारजीला पंजाबला फोन करायचा असतो. पण त्याला एस.टी.डी कॉल करायचा नसतो. तर तो काय करेल?

**पिंकी** : काय करेल?

**राजू** : तो पंजाबला जाईल आणि लोकल कॉल करेल!

# बटरबॉल आदीश सरदेसाई

३ डिसेंबर २००१ सांगलीच्या आदीश सरदेसाईच्या जीवनातला अत्यंत महत्त्वाचा आणि संस्मरणीय क्षण. त्याच्यापुढे आदर्श असलेला, भारताचा ऑलिंपिक पदक विजेता लिएण्डर पेस याच्याशी त्याची भेट झाली होती. निमित्त होतं, पेप्सी आयोजित टेनिस ओपन टुर्नामेंटसच्या बक्षीस समारंभाचं. दहा वर्षाच्या आतील गटाचं विजेतेपद आदीशला मिळालं होतं. आणि लिएण्डर पेसकडून त्याला पेप्सी चषक मिळाला होता. कार्यक्रमानंतर झालेल्या अनौपचारिक गप्पांच्या वेळी, त्याचा चुलत भाऊ भूषण सरदेसाई लिएण्डर पेसना म्हणाला. या वर्षी आदीश नऊ टुर्नामेंट्स खेळला व नऊच्या नऊ टुर्नामेंट्स जिंकला. भूषण सरदेसाईलाही त्यावेळी बारा वर्षाच्या आतील गटात विजेतेपद मिळालं होतं. आदीशने खेळलेल्या सर्वच टुर्नामेंटस जिंकल्याचं ऐकल्यावर लिएण्डर पेस म्हणाले,

'आता तुला मलाही हरवायला हरकत नाही.'

'ते कसं शक्य आहे?' आदीश म्हणाला.

आता भविष्यात, लिएण्डर पेसशी बरोबरी करण्याची नाही, तरी 'डेव्हिस चषका'साठी भारताचं प्रतिनिधित्व करण्याची मात्र महत्त्वाकांक्षा आहे

त्यानंतर आदीश आणखी तीन टुर्नामेंट्स खेळला व त्याही तिन्ही टुर्नामेंट्स त्याने जिंकल्या. त्याच्या वयोगटातल्या वर्षातला सर्वोत्तम खेळाडू तो ठरला व त्याबद्दल त्या वेळचे अर्थमंत्री व ऑल इंडिया टेनिस असोसिएशनने अध्यक्ष यशवंत सिन्हा यांच्याकडून त्याला मेरिट सर्टिफिकेट मिळाले. आदीशने वर्षातल्या १२ टुर्नामेंट्स जिंकल्या, याचा अर्थ १२ मॅचेस नव्हे बरं का! प्रत्येक टुर्नामेंटमध्ये ५ मॅचेस असतात अशा ६० मॅचेस तो खेळला व त्या जिंकल्या.



आदीशचा जन्म १३ नोव्हेंबर १९९१ चा. यंदा तो आठवीत आहे. अभ्यासात हुशार आहे. गोलमटोल, गोबऱ्या गालाचा, गोड चेहऱ्याचा आदीश टेनिस जगतात बटरबॉल म्हणून ओळखला जातो. या क्षेत्रातल्या जाणकारांनी त्याच्याबद्दल खूप अपेक्षा बाळगल्या आहेत. कारण अर्थातच त्याची आतापर्यंतची कामगिरी. जिल्हा विभागीय सामने खेळता खेळता तो राज्यस्तरीय सामने खेळू लागला. ५ फेब्रुवारी २००२ मध्ये मुंबईत हिरो होंडाने स्पॉन्सर केलेल्या स्पर्धेतील विजेतेपद हा त्याच्या यशातला मोठाच टप्पा होता. खार जिमखान्याने आदीशचा 'बेस्ट प्रॉमिसिंग प्लेअर' असा गौरव केला आहे. तर अखिल भारतीय टेनिस संघटनेने 'फ्युचर किडस ऑफ टेनिस' या उपक्रमासाठी त्याची निवड केली आहे. संपूर्ण देशामधून चांगल्या निवडलेल्या खेळांडूमध्ये स्पर्धा घेऊन या खेळाडूंची निवड केली जाते. यासाठी पश्चिम विभागातून जे चार खेळाडू निवडले, त्यात आदीश सर्वात लहान आहे.

आदीशचं विशेष कौतुक यासाठी की सर्व तऱ्हेच्या सोयी सुविधा उपलब्ध असलेल्या पुण्या-मुंबईत त्याचं वास्तव्य नाही. उत्कृष्ट कोच, समवयस्क चांगले खेळाडू सरावासाठी मिळत नाहीत. इथे शासकीय रुग्णालयाच्या कोर्टावर तो खेळासाठी जातो. डॉक्टर मंडळी तिथे खेळायला येतात. पण ही मंडळी छंद म्हणून, विरंगुळा म्हणून टेनिस खेळतात. आदीशला गरज असते अटीतटीने खेळणाऱ्या, खेळांडूशी खेळण्याची. तो महिन्यातील १५ दिवस पुण्याला हेमंत बेंद्रे यांच्याकडे प्रशिक्षण घेतो आहे.

आपल्या देशात लहानापासून थोरांपर्यंत सगळे क्रिकेटमय झालेले असताना तर टेनिसकडे कसा वळलास? मी आदीशला विचारलं. तो म्हणाला,'बाबांना टेनिसची खूप आवड होती. त्यांनी मला ५ व्या वर्षीच टेनिस शिकवायला सुरुवात केली. हळूहळू मलाही त्यात आवड निर्माण झाली. सांगलीच्या श्री. राम सुतार यांच्या मार्गदर्शनाखाली त्याने टेनिस खेळायला सुरवात केली. दूरदर्शनवरच्या टेनिसच्या मॅचेस तो नियमित पहातो आणि खेळाडूंच्या शैलींचा अभ्यास करतो. फॉर हॅन्ड, बॅक हॅन्डचे फटके याबरोबरच बेसलाईन खेळावर त्याचे प्रभुत्त्व आहे. आंतरराष्ट्रीय खेळांडूमध्ये कलात्मक खेळण्यासाठी प्रसिद्ध असणारा जॉन मॅकेन्रो आदीशचा आवडता खेळाडू आहे. आंद्रे आगासी हा त्याच्यामते आदर्श खेळाडू आहे.

आदीशला टेबल टेनिसचीही खूप आवड आहे. पण दोन्ही टेनिसमध्ये खूपच अंतर आहे. दोन्ही प्रकारच्या स्ट्रोक्समध्ये गोंधळ व्हायला नको, म्हणून आदीश डाव्या हाताने टेबल टेनिस खेळायचा सराव करतोय आहे. आहे ना गंमत?

आदीश! डेव्हिस चषकपर्यंत पोचण्याचे तुझे स्वप्न प्रत्यक्षात उतरो! नुसते स्पर्धेपर्यंत पोचण्यासाठी नाही, भावी काळात तो चषक जिंकण्यासाठीही तुला शुभेच्छा!

# बालकीर्तनकार : जगदीश ठोसर

पूर्वीच्या काळी औपचारिक शिक्षण वरिष्ठ वर्गातील काही मोजक्यांसाठीच उपलब्ध होतं. त्याकाळात सकलजनांना शहाणं करून सोडणारी प्रवचन-कीर्तनं यासारखी माध्यमं लोकप्रिय होती. हरिकथा ऐकवता ऐकवता व्यावहारिक शहाणपणा आणि नीतिमत्तेचे पाठ दिले जायचे. लोकरंजनातून प्रभावीपणे लोकशिक्षण केलं जायचं. वर्तमानपत्रे, मासिके, दूरदर्शन, नाटक, चित्रपट अशी अनेकविध प्रसारमाध्यमे उपलब्ध आहेत. तरीही, कीर्तनाची परंपरा आपले महत्त्व टिकवून आहे

कीर्तन परंपरेचे जनक नारदमुनी आहेत, असं मानलं जातं.वेदांत, सिद्धांत, दृष्टात या माध्यमातून आख्यान कथानक रंगवले जाते. प्रतिपादनासाठी एक सूत्र घेतले जाते. ते सूत्र स्पष्ट करणारा अभंग घेतला जातो. पूर्वरंगात अनेक उदाहरणांसहित तो स्पष्ट केला जातो व उत्तररंगात तेच सूत्र स्पष्ट करणारे कथानक येते. कीर्तनाचे वारकरी संप्रदायी, नाथ संप्रदायी असे अनेक प्रकार आहेत. नारदीय परंपरेने कीर्तन करणाऱ्या एका बाल कीर्तनकाराचा नुकताच परिचय झाला. हा बाल कीर्तनकार म्हणजे सांगलीच्या सिटी हायस्कूलमध्ये इयत्ता आठवीत शिकणारा जगदीश ठोसर.

जगदीश ठोसरने पुण्यातील नारद मंदिरात, २००३ च्या मे महिन्याच्या सुट्टीत, बालवर्गात कीर्तनाचे प्रशिक्षण घेतले. यावेळी घेतलेल्या परीक्षेत तो द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला. वर्षभरात, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, पंढरपूर, पुणे, ठाणे, मुंबई, रायगड, नाशिक, जालना इत्यादी ठिकाणी त्याची कीर्तने झाली.

रसाळ वाणी आणि सुरेल गाणी हे त्याच्या कीर्तनाचे वैशिष्ट्य. उत्तम कीर्तनकार उत्तम नटही असावा लागतो. छोट्या जगदीशमध्ये हे सारेच गुण आहेत. म्हणूनच त्याचे कीर्तन ऐकून परतताना सारेच भारावून गेलेले असतात. त्याची वाखाणणी करतात. सांगलीतील मारुती मंदिरात एकदा त्याचे कीर्तन झाले. त्यानंतर एका वारकऱ्याने त्याच्या चेहऱ्यावरून हात ओवाळून आणि कानसुलावरून बोटे मोडून, आईसारखी त्याची दृष्ट काढली. 'लई ग्वाड आख्यान केलंस रं पोरा!' ते म्हणाले.

कीर्तन हे केवळ लोकरंजनासाठी नसून लोकशिक्षणासाठी आहे, ही गोष्ट





जगदीशच्या सतत डोळ्यापुढे असते. कालसापेक्ष अशी राष्ट्रीय विषयावरची आख्याने त्याने बसवली आहेत. हिरकणी (मातृदेवो भव असं का म्हटलं जातं, ते या कथेतून तो सांगतो.) झाशीची राणी, धर्मवीर संभाजी इत्यादी विषयांवर तो कीर्तने करतो. दर १५ दिवसांनी नवीन आख्यान बसवण्याचा विचार त्याने या वर्षी केला आहे. विवेकानंद, सावरकर, वासुदेव बळवंत फडके, रामशास्त्री इत्यादी विषयांवरची आख्याने तो लवकरच बसवणर आहे.

पुण्याचे प्रशिक्षण झाल्यवार सांगलीत, राष्ट्रीय कीर्तनकार, कीर्तनभास्कर दत्तबुवा घाग यांच्याकडूनही त्याला ८-१० दिवस मार्गदर्शन मिळालं, या शिवाय पुस्तके वाचून व कॅसेटस् ऐकून तो आपला व्यासंग वाढवतो. वडील प्रवचनकार असल्याने त्यांचेही मार्गदर्शन त्याला लाभते.

जगदीशची शालेय प्रगतीही चांगली आहे.पोहणे, चित्रकला, रिंग टेनिस, बुद्धिबळ हे त्याचे छंदविषय. नाटकाचीही त्याला आवड आहे. बाबासाहेब पुरंदऱ्यांच्या 'जाणता राजा'मध्ये त्याने बर्हिजी नाईकची भूमिका केली आहे. ई.टी.व्ही च्या'सवंगडी' कार्यक्रमात सा-सा-सारे-गरे- अंतर्गत अंताक्षरी स्पर्धेत त्याने भाग घेतला होता. आता शास्त्रीय संगीत शिकायला त्याने सुरुवात केली आहे. त्यातही त्याला प्राविण्य मिळवायचं आहे.



एका दवाखान्यात दोन मुले शिरली.
" डॉक्टरकाका, मी चुकून गोटी गिळलीय"
"घाबरू नकोस. काढून टाकू. हा तुझा भाऊ आहे का?"
"नाही. त्याने गिळलेली गोटी माझी आहे!"

## मी मित्र तुमचा रे!

मीना खोंड

बालमित्रांनो,
बालवयापासून
तुमची आमची साथ संगत
तुमच्या पाठीशी संग सतत.
पण मैत्री नाही!
एक परंपरा, एक समाजरीत
पाठीवरचे ओझे समजायचे नाही
नका समजू जबरदस्ती
करा माझ्याशी दोस्ती
मी पुस्तक
तुमचा मित्र, बालसखा
मी तुमचे भवितव्य आहे
ज्ञानाचे भांडार आहे
विज्ञानाचे आगार आहे
जीवनाचं तत्त्वज्ञान समजवतो
व्यक्तिमत्त्व विकसित करतो.
तुमचं मनोरंजन करतो.
थोडं आवडीनं वाचाल?
पुढे जीवनात राजे बनाल.
मला थोडं समजावून घ्या.
माझ्याशी दोस्ती करा
पुस्तक हाच खरा मित्र आहे
एवढचं सांगायचं आहे.

## नातं

पंडित हिंगे (मधुमिलिंद)

माझ्या बाबांचा भाऊ
तो माझा काका
झोपाळ्यावर देतो मला
उंच उंच झोका
माझ्या काकांची बायको
ती माझी काकी
रोज मला शिकविते
बेरीज वजाबाकी
मी कुणाची कोण..?
मी आईची मुलगी
माझ्या मामाची भाची
अन् आजीची नात
माझ्या काकीची पुतणी
अन् दादाची ताई
तरी मला आवडतात
माझ्या शाळेतल्या बाई